# जिनागमाचे
# कारण कार्य रहस्य



डॉ. श्रीमती उज्ज्वला दि. शहा

## जिनागमाचे

# कारण कार्य रहस्य

लेखिका

**डॉ. सौ. उज्ज्वला दिनेशचंद्र शहा**

एम.बी.बी.एस., डी.सी.एच., डी.जी.पी.

संपादक

**पं.श्री दिनेशभाई शहा**

एम.ए., एल.एल.बी.

**वीतरागवाणीप्रकाशक**

१५७/९, निर्मला निवास, सायन (पू.)

मुंबई - ४०० ०२२

| | | |
|---|---|---|
| मराठी | चौथी आवृत्ति ८ मार्च २०११ | २,००० प्रति |
| | तीन आवृत्त्या | ५,००० प्रति |
| हिन्दी | तीन आवृत्त्या | ६,००० प्रति |
| गुजराती | तीन आवृत्त्या | ३,००० प्रति |
| इंग्लिश | दोन आवृत्त्या | ३,००० प्रति |
| | | १९,००० प्रति |

**दातार**

| | |
|---|---|
| एक मुमुक्षु भगिनी, यू.एस.ए. | २०,००० |
| मिकी शाह, यू.एस.ए. | ८,००० |

**– आमची प्रकाशने –**

| | |
|---|---|
| (१) जैनतत्त्व परिचय – मराठी, हिन्दी, गुजराती, इंग्लिश | रु. १५/- |
| (२) कारण कार्य रहस्य – मराठी, हिन्दी, गुजराती, इंग्लिश | रु. १५/- |
| (३) करणानुयोग परिचय – मराठी, हिन्दी, गुजराती | रु. १५/- |
| (४) पंचलब्धि – मराठी, हिन्दी, गुजराती | रु. १५/- |
| (५) भक्तामरस्तोत्र प्रवचन – मराठी | रु. १५/- |
| (६) सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड एवं अर्थसंदृष्टि – हिन्दी | रु. १२५/- |
| (७) सम्यग्ज्ञानचन्द्रिका कर्मकाण्ड एवं अर्थसंदृष्टि – हिन्दी | रु. १५०/- |
| (८) सम्यग्ज्ञानचन्द्रिका लब्धिसार-क्षपणासार एवं अर्थसंदृष्टि – हिन्दी | रु. १००/- |

— प्राप्तिस्थान —

**वीतरागवाणीप्रकाशक**

१५७/९, निर्मला निवास, सायन (पू.), मुंबई – ४०० ०२२.

फोन : ०२२-२४०७ ३५८१

E-mail : ujwaladinesh@yahoo.com

किंमत : रु. १५/-

# लेखिकेचे मनोगत

इ.स. १९९३ साली माझ्या मुलींना जैन तत्त्वज्ञान शिकविण्यास मीं पत्रांद्वारे लिखाण करू लागले होते. एका जैन मासिकात ही पत्रं प्रकाशित केली होती व वाचकांच्या आग्रहाखातर याच पत्रांना 'जैनतत्त्व परिचय' नावाने पुस्तकरूपाने मराठी, हिंदी, गुजराती व इंग्लिश भाषांमध्ये प्रकाशित करण्यात आले होते. काही वर्षांनंतर करणानुयोग विषयावरील पत्रं 'करणानुयोग परिचय' पुस्तकरूपाने मराठी, हिंदी, गुजराती भाषांमध्ये प्रकाशित केली.

लिखाण, भाषांतर, प्रूफ रीडिंगमध्ये अर्थात पुस्तकं प्रकाशित करण्यामध्ये एवढा वेळ द्यावा लागतो की आम्ही दोघांनी नक्की केले होते की आता पुरे, आता फक्त आपला स्वत:चा स्वाध्यायच करूया. पत्रं लिहिताना मी कधी कल्पनाही केली नव्हती की या पत्रांची पुस्तके निघून त्यांच्याद्वारे तत्त्वांचा प्रचार प्रसार एवढे विराट रूप धारण करेल! शेकडो लोकांची पत्रं, फोन, इ-मेल येत राहतात. भारतातीलच नव्हे तर अनेक परदेशातील लोकांनी या पुस्तकांची प्रशंसा केली, धन्यवाद दिले, अभिनंदन केले व असे लिखाण चालू ठेवण्याविषयी वारंवार आग्रह केला.

अनेक अजैन लोकांनी तर असेही म्हटले की, 'तुम्ही जैन तत्त्वज्ञानाची आम्हाला गोडी लावली आहे, आता आम्हाला अर्ध्यावरच सोडू नका. पुढचे सिद्धांतदेखील तुम्हीच शिकवा.' अनेक जणांनी सांगितलं की, 'तुम्ही तर तत्त्वज्ञानाला अतिशय सोपं, सरळ, रसाळ व रोचक करून आम्हाला सांगता आहात.'

जैन तत्त्वज्ञान आहेच मोठे रोचक कारण यामध्ये प्रत्येक जीवाची स्वत:ची अर्थात आत्म्याची माहिती असून आत्म्याला जाणण्याचा मार्ग यामध्ये सांगितला आहे. माझे तर यात काहीही नाही. ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीने टोपलीतली सुगंधी फुलं ओंजळी भरभरून लोकांना दिली तर त्याचे हातदेखील सुगंधित होतात. परंतु सुगंध तर फुलांचाच असतो, हातांचा नव्हे. त्याचप्रमाणे जे तत्त्वज्ञान सर्वज्ञ भगवंतांपासून चालत आले आहे, आचार्यांच्या परंपरेने जे आज आपल्याला उपलब्ध आहे, अनेक ज्ञानींनी ज्याचे मर्म सांगितले आहे, त्यापैकी माझ्या अल्पबुद्धिद्वारे मी थोडेफार ग्रहण करू शकले व तेच येथे प्रस्तुत करीत आहे. यामध्ये महात्म्य तर वीतरागी सर्वज्ञाच्या वाणीचे आहे.

सम्यग्दर्शनासाठी तत्त्वनिर्णय करणे आवश्यक आहे. द्रव्य, गुण, पर्यायांची स्वतंत्रता लक्षात आल्याखेरीज तत्त्वनिर्णय होत नाही. चार अभाव, निमित्त, उपादान, निमित्त नैमित्तिक संबंध, पाच समवाय, षट्कारक, क्रमबद्धपर्याय, सर्वज्ञता इत्यादिचे स्वरूप समजल्याशिवाय द्रव्यांची स्वतंत्र कारण-कार्य व्यवस्था लक्षात येत नाही. म्हणून या सिद्धांतांद्वारे मी 'कारण-कार्य रहस्य' समजाविण्याचा प्रयत्न केला आहे.

**डॉ. सौ. उज्ज्वला दि. शहा**

# प्रकाशकीय

आतापर्यंतच्या अनुभवावरून एक गोष्ट निश्चितपणे लक्षात आली आहे की, आपण जसे ठरवितो तसे घडतेच असे नाही. मागच्याच वेळेला म्हणजे ‘ करणानुयोग परिचय ’ पुस्तक छापले तेव्हा आम्ही उभयतांनी ठरविले होते की यापुढे पुस्तक छापण्याच्या भानगडीत आपण पडायचे नाही कारण त्यामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागते व त्यामुळे वेळेचा अपव्यय खूप होतो. त्यापेक्षा आता आपण आत्मकल्याणाच्या दृष्टीने स्वत:चा स्वाध्याय अधिक करण्याचा संकल्प सोडला.

परंतु जे व्हायचे असते ते कधी टाळू म्हटले तरी टळत नाही, व्हायचे तेच होते. झाले असे की, जिनवाणीचा अभ्यास करणाऱ्यांनी, अनेक विचारवंतांनी, पंडितांनी व अनेक चाहत्यांनी सौ. उज्ज्वलाला नवे पुस्तक लिहिण्यास उद्युक्त केले. एकंदरीत तिच्या विषयाला सोप्या, आकर्षक व सरळ भाषेत विषय समजावून देण्याच्या हातोटीने वाचकांना एकप्रकारे भुरळच पाडली असल्या कारणाने तिला खूप आग्रह झाला, सल्ले दिले गेले व अखेरीस नवीन पुस्तक लिहिण्यास तिने प्रारंभ केला. आम्हीदेखील हाच विचार केला की आपल्या हातून जर जिनवाणीचा प्रचार-प्रसार करण्यामध्ये हातभार लागत असेल तर तसे होऊ द्यावे.

अशा वेळेला मनातून ही पक्की खात्री बाळगून आहोत की हे जे कार्य होत आहे त्यात स्वत:ची कर्ताबुद्धि न बाळगता त्याबाबतीत होणाऱ्या रागाचे आपण जाणणारे आहोत.

सौ. उज्ज्वला नवीन पुस्तक लिहित आहे ही गोष्ट काही इतरांपासून लपून राहिली नाही. ही बातमी सौ. उज्ज्वलाची मावशी सौ. चारूशीला विजयकुमार दोशी, माहीम यांच्यापर्यंत पोहोचली. तेव्हा श्री विजयकुमारच्या भगिनी डॉ. कु. मालती मोहनलाल दोशी, कोल्हापूर यांनी ताबडतोब निर्णय घेतला की यावेळेस या मराठी पुस्तकाचा संपूर्ण खर्च मी स्वत: करणार आहे. त्यांचा निरोप घेऊन चारूमावशी व विजयकुमार आमच्या घरी आले व त्यांनी आपल्या भगिनीचे मनोगत आम्हाला सांगितले. ते म्हणाले की आम्हाला इतरांचे काही माहित नाही परंतु या पुस्तकाच्या संपूर्ण खर्चाची जबाबदारी माझ्या बहिणीचीच राहिल. त्यावेळी त्यांनी सांगितलेला किस्सा मी वर कथन केलेल्या अनुभवाचा भक्कम पुरावाच ठरणारा आहे.

त्यांनी सांगितले की पूर्वी ते सारेजण कोल्हापुरी रहात होते. प.पू. समंतभद्र महाराज पूर्वाश्रमामध्ये त्यांचे वडिल श्री मोहनलाल यांचे मावसबंधु व कॉलेजातील सहाध्यायी होते. क्षुल्लक अवस्थेमध्ये असताना महाराजांचे वरचेवर कोल्हापूरला जाणे व्हायचे त्यावेळी ह्यांच्या घरी येणे जाणे होते. मालतीबाईंच्या बुद्धिमत्तेकडे पाहून महाराजांनी त्यांना कारंजाला जाऊन न्यायदीपिकेचा अभ्यास करावा असे सुचविले. तेथे पार्श्वमती अम्मांकडून त्या संस्कृतमध्ये न्यायदीपिका शिकल्या. त्यानंतर कुंभोज येथेही दोन महिने राहून धार्मिक ग्रंथांचे अध्ययन केले. त्यांनी जैन दर्शनाचे विशेष अध्ययन करून प्राविण्य मिळवावे अशी महाराजांची इच्छा होती परंतु कर्मधर्म संयोगाने घडले वेगळेच. त्या पुण्याच्या ताराचंद रामनाथ हॉस्पिटलमध्ये शिकून डॉक्टर झाल्या. एखाद्याने इच्छा केली तरी तसेच होते असे नव्हे. जे व्हायचे तेच होते. त्यांनी केलेल्या सहकाराबद्दल त्यांचे आभार मानणे म्हणजे त्यांच्या भावना दुखविणे असे मी समजतो.

‘कारण-कार्य रहस्य’ मध्ये जिनागमातील सिद्धांतांची जी अजोड गुंफण केली आहे ती प्रत्येकाला वस्तुस्वरूप समजून घेण्यास अत्यंत उपयोगी ठरणारी आहे.

हे पुस्तक वाचकांच्या हाती देताना मला आत्यंतिक आनंद होत आहे.

**पं. दिनेशभाई शहा**

# अनुक्रमणिका


| पत्रांक | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | सर्वज्ञाचे स्मरण | १ |
| २. | सर्वज्ञाची सिद्धि | १३ |
| ३. | सर्वज्ञासंबंधी मिथ्याकल्पना | २२ |
| ४. | चार अभाव—भाग १ | ३२ |
| ५. | चार अभाव—भाग २ | ४३ |
| ६. | निमित्त | ६० |
| ७. | निमित्त नैमित्तिक संबंध | ७१ |
| ८. | उपादान कारण | ८२ |
| ९. | षट्कारक | ९३ |
| १०. | पाच समवाय | १०८ |
| ११. | कारण-कार्यासंबंधी काही शक्ति | १२० |
| १२. | क्रमबद्धपर्याय - स्वरूप | १२९ |
| १३. | क्रमबद्धपर्याय - एक शाश्वत सत्य | १३९ |
| १४. | क्रमबद्धपर्याय - सिद्धि | १५१ |
| १५. | आत्मानुभूति | १६२ |

**MP3 सीडीज् (128 KBPS)** (प्रत्येक सी.डी. मध्ये १२ तासांची प्रवचनं आहेत)

## — पं. दिनेशभाई शहा —

| | | | |
|---|---|---|---|
| लघु जैन सिद्धांत प्रवेशिका | ७ सीडीज् | नियमसार | ३६ सीडीज् |
| बालबोध पाठमाला | ४ " | प्रवचनसार | ५० " |
| वीतराग विज्ञान पाठमाला | ५ " | समयसार | ७५ " |
| तत्त्वज्ञान पाठमाला | ५ " | योगसार | ५ " |
| गुणस्थान विवेचन | ५ " | कार्तिकेयानुप्रेक्षा | १९ " |
| रत्नकरंड श्रावकाचार | १३ " | कारण कार्य रहस्य | १ " |
| मोक्षमार्ग प्रकाशक | २३ " | छहढाला | ४ " |
| आत्मसिद्धि | १२ " | बृहद् द्रव्यसंग्रह | ८ " |

◆ जैन सिद्धांत : शिबिर १ व २ – Visual 16 DVDs

◆ गुणस्थान – Visual 10 DVDs

## — डॉ. उज्ज्वला शहा —

| | | | |
|---|---|---|---|
| क्रमबद्धपर्याय | ४ सीडीज् | सात तत्त्व | १ सीडीज् |
| करणानुयोग परिचय | ३ " | धवला (पु. १ से १६) | १०२ " |
| निमित्त उपादान + पंचपरावर्तन | २ " | जयधवला (पु. १ से १६) | ११७ " |
| पंचलब्धि | २ " | योग | १ " |
| पांच भाव | १ " | जैनभूगोल + १४ कलर चार्टस् | २० " |
| पांच भाव (तत्त्वार्थसूत्र) | २ " | कारण कार्य रहस्य | २ " |
| प्रमाद के भेद | १ " | सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड | २५ " |
| षट्स्थानपतित हानि वृद्धि | १ " | सम्यग्ज्ञानचन्द्रिका कर्मकाण्ड | १५ " |
| संख्यामान | १ " | | |

◆ सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड : शिबिर १ व २ – Visual 16 DVDs

◆ सम्यग्ज्ञानचन्द्रिका जीवकाण्ड अर्थसंदृष्टि – Visual 18 DVDs

◆ सम्यग्ज्ञानचन्द्रिका कर्मकाण्ड : शिबिर १ व २ – Visual 20 DVDs

# सर्वज्ञाचे स्मरण

पत्रांक १

डॉ. सौ. उज्ज्वला दि. शहा
१५७/९ निर्मला निवास,
सायन (पूर्व) मुंबई ४०००२२
फोन - ४०७३५८१
७ फेब्रु. २००१

प्रिय सौ. रीना आणि सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

दिवसेंदिवस तुमची दोघींची स्वाध्यायातील रुचि वाढत आहे हे पाहून मला आनंद वाटतो. स्वाध्यायासाठी म्हणावा तेवढा वेळ तुम्ही देऊ शकत नाही व कुटुंबातील जबाबदाऱ्या, मुलांची दंगामस्ती, कौटुंबिक अडीअडचणी व सांसारिक सुखदु:खाच्या प्रसंगातून मुष्किलीने थोडासा वेळ मिळतो, त्यामुळे अधिक स्वाध्याय होऊ शकत नाही याची तुम्हाला खंत वाटते असे तुम्ही वारंवार बोलून दाखविलेत. तुमच्या अडचणी मी समजू शकते.

या अशा परिस्थितीतच आपल्याला आपल्या स्वत:च्या भिन्न अस्तित्वाची जाणीव व ओळख करून घ्यायची आहे. सर्व संयोग अनुकूल होतील नंतर आपण निवांत स्वाध्याय करू असे म्हणणाऱ्याला तशी वेळ कधी येतच नसते. घडणाऱ्या गोष्टी त्यांच्या स्वत:च्या योग्यतेनुसार घडत असतात. 'मी स्वत: या सर्वांना जाणणारा आहे, करणारा नाही, त्यात फेरबदल करणारा नाही' याची आपल्याला सदैव जाणीव असली पाहिजे.

'मी परद्रव्यांचे काहीही करू शकत नाही' ही गोष्ट दुसऱ्याच्या सांगण्यावरून आपल्याला पटत नाही, रुचतही नाही. शास्त्रामध्ये लिहिले असले तरी आपल्याला तसे वाटत नाही. वस्तुव्यवस्थेसंबंधी जिनेन्द्रकथित सिद्धांतांचे ज्ञान झाल्यावर आपल्याला अकर्ता का म्हटले आहे याबाबत निर्णय होतो. यासाठी स्वतंत्र वस्तुव्यवस्था सिद्ध करणारे काही सिद्धांत सविस्तरपणे जाणणे अत्यावश्यक आहे. सर्वज्ञता, क्रमबद्धपर्याय, कारण-कार्य व्यवस्था, निमित्त-उपादान, निश्चय-व्यवहार, चार

अभाव, सहा कारक इत्यादि सिद्धांतांना निर्णयपूर्वक जाणणे आवश्यक आहे.

आपण आजपर्यंत पत्ररूप स्वाध्यायाद्वारे सहा द्रव्य, सात तत्त्व, सामान्य व विशेष गुण यांची चर्चा केली होती, जी 'जैनतत्त्व परिचय' नामक पुस्तकरूपाने मराठी, हिंदी, गुजराती, इंग्लिश भाषांमध्ये प्रकाशित झाली आहेत. करणानुयोगाविषयी, जीवाच्या वीस प्ररूपणांविषयीची पत्रं 'करणानुयोग परिचय' नामक पुस्तकरूपाने मराठी, हिंदी, गुजरातीमध्ये प्रकाशित झाली आहेत.

हजारो वाचकांनी ही पुस्तकं वाचून खूपच प्रशंसा केली आहे. परवा एक गृहस्थ म्हणत होते, 'आम्हाला तर ही विज्ञानाची पुस्तकं वाटतात. फिजिक्स केमिस्ट्रीच्या सिद्धांतांसारखे वाटतात. रीना व मोना या दोघींना आम्ही धन्यवाद देऊ इच्छितो कारण त्यांच्या निमित्ताने लिहिली गेलेली ही पत्रं आज आम्हाला पुस्तकरूपाने उपलब्ध आहेत.

मुलींनो, आपण जे शिकत आहोत, ज्याचा आपण स्वाध्याय करत आहोत ते 'वीतराग विज्ञान'च तर आहे. सर्वज्ञ वीतरागी भगवंतांनी सांगितलेले वीतरागी होण्याचे हे विज्ञान आहे. अरहंत, सिद्ध वीतरागी सर्वज्ञ आहेत अर्थात वीतराग विज्ञान स्वरूप आहेत आणि यामुळेच ते त्रिलोकपूज्य झाले आहेत, महान बनले आहेत.

अनेक दिवसांनंतर आपल्या पत्ररूप स्वाध्यायाला पुन्हा आपण सुरवात करूया. मधल्या काळात ही सारी भाषांतरं, त्यांचे प्रूफ रीडिंग, इंग्रजी अनुवाद इत्यादि गोष्टी चालू होत्या. आता काही नवे सिद्धांत समजून घेऊया.

आत्मानुभूति हेच जिनशासन आहे. संपूर्ण जैन शास्त्रांचे सार वीतरागता आहे. वीतरागता म्हणा की धर्म म्हणा, त्याची सुरवात आत्मानुभूतिने, सम्यग्दर्शनाने होते. त्यासाठी वस्तुव्यवस्थेविषयी, मोक्षमार्गाविषयी, देव, शास्त्र, गुरुंच्या स्वरूपाविषयी यथार्थ निर्णय करणे जरूरी आहे. तत्त्वनिर्णयपूर्वकच आत्मानुभूति होते, त्याशिवाय होत नाही.

सर्वप्रथम सर्वज्ञ भगवंतांना नमस्कार करून आपण स्वाध्यायास प्रारंभ करूया. सर्वज्ञ वीतरागी भगवंतांचे स्वरूप

जाणून त्यांच्या गुणांप्रति म्हणजे प्रकट पर्यायांप्रति आदरभाव जागृत होणेच त्यांचा विनय आहे. अरहंत आणि सिद्ध सर्वज्ञ, वीतरागी आहेत.

अरहंत मनुष्यगतितले जीव आहेत, मनुष्यलोकात म्हणजे अडीच द्वीपात ते असतात. सध्या आपल्या येथे-भरतक्षेत्रामध्ये या पंचमकाळामध्ये अरहंत भगवान नाहीत परंतु अन्य ठिकाणी - विदेहक्षेत्रामध्ये तीर्थंकर आणि इतर अरहंत साक्षात विराजमान आहेत. आपण देखील जिनचैत्यालयात जिनप्रतिमांची स्थापना करून अरहंतांच्या गुणांचे स्मरण करत त्यांची वंदना, पूजन करतो.

अरहंत भगवान शरीरसहित 'सकल परमात्मा' आहेत व सिद्ध भगवान शरीररहित असल्याने 'निकल परमात्मा' आहेत. कल म्हणजे शरीर.

अरहंतांचा चार घातिकर्मांचा पूर्ण क्षय अर्थात नाश झालेला आहे तर सिद्धांचा आठही कर्मांचा पूर्ण नाश झालेला आहे.

गुणस्थान व मार्गणास्थान इत्यादि वीस प्ररूपणांच्या द्वारे आपण अरहंत, सिद्धांचे स्वरूप 'करणानुयोग परिचय' मध्ये पाहिलेच आहे.

सिद्धभगवान भावकर्म अर्थात मोह, राग, द्वेष, द्रव्यकर्म अर्थात आठ कर्म आणि नोकर्म अर्थात शरीर, मन, वाणी इत्यादि या तीन कर्ममलांनी रहित आहेत. ते लोकाकाशाच्या अग्रभागात सिद्धालयामध्ये सिद्धशिलेच्या वर अंतिम वातवलयामध्ये विराजमान आहेत.

अरहंत आणि सिद्ध खरे देव आहेत. नग्न दिगंबर भावलिंगी मुनि खरे गुरु म्हणजे साधु आहेत. सर्वज्ञ वीतरागी अरहंतांची वाणी म्हणजे दिव्यध्वनि आणि त्या दिव्यध्वनीच्या अनुसार रचलेली शास्त्रं ही सत्शास्त्र आहेत - आगम आहे.

खरे देव, खरे गुरु आणि खरे शास्त्रच वंदनीय आणि पूजनीय आहेत. कुदेव, कुगुरु, कुशास्त्र वंदनीय, पूजनीय नाहीत, त्यांचा आदर, विनय करणे गृहीत मिथ्यात्व आहे. गृहीत मिथ्यात्वाचा त्याग झाल्याशिवाय अगृहीत मिथ्यात्व सुटू शकत नाही असे वस्तुस्वरूप आहे.

एकेंद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंत सर्व जीवांची प्राप्त शरीरामध्ये म्हणजे प्राप्त पर्यायामध्ये - मनुष्य, देव, नारकी, तिर्यंच या

पर्यायांमध्ये जी आत्मबुद्धि आहे, रागादिमध्ये जी ममत्वबुद्धि आहे, प्रयोजनभूत सात तत्त्वांसंबंधी जी विपरीत मान्यता आहे, ते सारे अगृहीत मिथ्यात्व आहे. कुदेवादिकांच्या श्रद्धानामुळे व उपदेशामुळे जे पुष्ट होते तसेच नव्याने ग्रहण केले जाते ते गृहीत मिथ्यात्व आहे.

मुलींनो, आपण ज्या कुळात जन्म घेतो त्या कुळातील रीतिरिवाज, भाषा, संस्कार, एवढेच नव्हे तर विपरीत रूढी आणि अंधश्रद्धादेखील आपण अंगिकार करतो, विचार न करता शिकत असतो. आपण स्वतःला सुशिक्षित समजतो परंतु देव, शास्त्र, गुरु धर्म इत्यादि संबंधी आपल्या मान्यता व क्रिया आपण विचारात घेतो का? त्यांच्या योग्यते अयोग्यते संबंधी निर्णय करून या क्रिया करतो का? याचा तुम्हीच विचार करा.

आपल्या भोवतालच्या समाजात अन्य धर्मियांच्या व जैनांच्याही अनेक मिथ्या कल्पना व विचार आपणास आढळतात. आपल्याकडून अशी कोणती चूक होत नाही ना याची दक्षता घेणे ही आपली जबाबदारी आहे. आता मला तुमच्याविषयी चिंता नाही, पण रोहित, रिया, रोहन, सोहम् अजून लहान मुलं आहेत. या मुलांवर योग्य संस्कार होतात की नाही, कुदेवांबद्दल त्यांच्यात देवबुद्धि तर निर्माण होत नाही ना यांची सर्व जबाबदारी तुमच्यावर आहे.

अन्यमति लोक व त्यांच्या देवदेवता यांविषयी द्वेषबुद्धि निर्माण न करता खऱ्या देव, गुरु धर्माचे स्वरूप वारंवार त्यांच्या निदर्शनास आणून द्यावे लागेल, जोरजबरदस्ती न करता त्यांना स्वाध्यायाची गोडी लावली पाहिजे. मद्य, मांस, मध व पाच उदुम्बर फळांचे सेवन तर त्यांच्याकडून घडत नाही ना याबाबतीतही दक्ष राहिले पाहिजे. सध्या तर केक, चॉकलेट्स इत्यादिमध्ये अंडी, चरबी वगैरेचा वापर सर्रास चालू असतो. त्याबाबतीत तुम्ही खबरदारी घेता हे मला माहित आहे.

तुम्ही म्हणाल, 'आईला आज एकदम उपदेशाचा मूड आला की काय? एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे काहीही करत नाही हे सांगणारी हीच ती आई आहे का?'

जरा लक्ष देऊन ऐका. ही उपदेशाची भाषा आहे, चरणानुयोगाची भाषा आहे. सिद्धांताची भाषा - द्रव्यानुयोगाची

भाषा - खरे वस्तुस्वरूप दाखविणारी भाषा वेगळी असते. बोलीभाषा आणि लौकिक व्यवहार कथन यांची निमित्तप्रधान आणि आचरणप्रधान शैली असते. परंतु द्रव्यानुयोग यथार्थ वस्तुस्वरूपाचे व त्याच्या सिद्धांतांचे कथन करतो.

द्रव्यानुयोगाच्या सिद्धांतांचा केवळ बौद्धिक पातळीवर स्वीकार करून लौकिक आचार विचारांमध्ये मन मानेल तशी स्वच्छंदी वृत्ति कोणी जोपासू पहात असेल तर ती व्यक्ति चुकीच्या मार्गावर आहे. दुसऱ्यांशी अन्यायाने वागणे, अनीतीच्या मार्गाने धन क़मावणे, अभक्ष्य भक्षण करणे, परिणामांची क्रूरता असणे, तीव्र पाप परिणाम करणे या साऱ्या गोष्टी सम्यक्त्व प्राप्तिमध्ये बाधक आहेत.

ज्याप्रमाणे खडकावर पेरलेले बी वाया जाते, उगवत नाही, निष्फळ ठरते, त्याला अंकुर फुटत नाही, त्याचप्रमाणे पाप पोसणाऱ्या जीवांना तत्त्वश्रवण करूनही त्या अमूल्य तत्त्वज्ञानाचा काही फायदा होत नाही; सारे निष्फळ ठरते. तत्त्वज्ञानाचा उपयोग तत्त्वांचे श्रवण करण्यापुरता व श्रवण करून इतरांना ऐकविण्यापुरता व त्याद्वारे स्वतःचा मान पुष्ट करण्याकरता करून काही जीव संतुष्ट होतात व अनंत काळात महादुर्लभ असा जिनेन्द्रकथित धर्मोपदेश मिळूनही त्याचे मर्म व महत्व न ओळखल्याने हे जीव स्वतःचेच अकल्याण करून घेतात.

सध्या तर येन केन प्रकारेण धन मिळवणे व ते भोगणे एवढीच या मनुष्यजीवनाची इतिकर्तव्यता आढळून येत आहे. सारा लाभ नुकसानीचा हिशोब फक्त पैशांमध्येच मोजला जातो. आत्मिक शांति, आनंद, निराकुलता, स्वतःच्या अस्तित्वाची ओळख, ज्ञान या साऱ्या पुराणातल्या गोष्टी पुराणापुरत्याच - शास्त्रापुरत्याच मर्यादित आहेत, खऱ्या जीवनाशी त्याचा काही संबंधच नाही अशी कित्येक लोकांची पक्की मान्यता दिसून येते.

'तत्त्वज्ञान शिकताना काही उपलब्ध होत नाही, सम्यग्दर्शन होत नाही म्हणून व तत्त्वांचे नीट आकलन होत नाही म्हणून संभ्रमात पडणारेही अनेक लोक भेटतात. 'हे सारे शिकून काय फायदा ?'- असे विचारणारेही भेटतात. 'हे शिकून कितीजण सम्यग्दृष्टि झाले आहेत ?' 'अहो, ज्ञानी जीवांकडून देशना मिळाली पाहिजे, त्यांनी दिलेला उपदेशच कार्यकारी आहे,'

'अहो, आम्हाला सम्यग्दृष्टि जीवांचे दर्शन करायचे आहे' असे मनापासून सांगणारे लोकही भेटतात. अनेक वर्षं सम्यग्दृष्टीच्या सहवासात राहूनही हा सम्यग्दृष्टि आहे अशी ओळख त्यांना पटत नाही.

समयसार गाथा १८ मध्ये म्हटले आहे की हा भगवान आत्मा आबाळगोपाळ सर्वांना नित्य अनुभवास येत आहे. परंतु हाच मी आहे असे ज्ञान त्यास उदित होत नाही. जे स्वतःला ओळखत नाहीत ते दुसऱ्यांचे सम्यग्दर्शन कसे ओळखतील बरे?

कोणी असा विचार करीत नाही की मला माझ्या शुद्धात्म्याचे दर्शन करायचे आहे, मला स्वतःला ओळखायचे आहे. सम्यग्दृष्टि जीवाला नुसते पाहून काय मिळणार? हां, आत्मानुभूतिसाठी त्यांचा उपदेश व त्यांना पाहून प्रेरणा मिळाली तरच ती कार्यकारी आहे. सम्यग्दृष्टि जीवदेखील आगमाचा जो उपदेश देतात, तो आगमातील कथनांचाच देतात. त्यांचा स्वतःचा असा कोणता पंथ ते स्थापन करीत नाहीत.

वेगवेगळ्या धर्मियांच्या उपदेशातून थोडाफार चांगला वाटणारा उपदेश एकत्रित करून स्वतःचा 'विशिष्ट पंथ' स्थापन करून लोकांना भुलविणारे महाभागही आढळतात. दुसऱ्याचे भले करा, पुण्य करा तुमचे कल्याण होईल असा बहुजन समाजाला रुचणारा उपदेश देऊन झटपट लोकप्रियता मिळवून प्रसिद्धीच्या शिखरावर विराजमान होऊन, इतरांबरोबर स्वतःचेही अकल्याण करणारे 'गुरु' देखील ठिकठिकाणी पहावयास मिळतात.

यासाठी देवमूढता, गुरुमूढता व लोकमूढता या तीन मूढतांचे स्वरूप जाणून त्या मूढतांपासून आपला स्वतःचा बचाव करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सहा अनायतनांचा त्यागदेखील आवश्यक आहे. कुदेव, कुगुरु, कुशास्त्र व त्या प्रत्येकाचे सेवक असे धर्माचे अनायतन (अस्थान) आहेत. यांच्याबद्दल पूज्यबुद्धि, आदर, महानता आपल्या मनालाही शिवत नाही ना, याची आपण दक्षता घेतली पाहिजे.

मुलींनो, सध्या मूल जन्मले की लगेचच त्याला पोलिओ, हिपॅटायटिस, थोड्याच दिवसात ट्रिपल, मीझल्स, एम.एम.आर. इत्यादि अनेक प्रकारच्या रोगनिवारक लसी - डोस व इंजेक्शन्स आपण देतो. जितक्या वेळा जरूरी आहे तितक्या वेळा पुन्हा पुन्हा देतो.

त्याचप्रमाणे या तीन मूढता व सहा अनायतन या दोषांपासून आपले संरक्षण करण्यासाठीही आपण मूढतानिवारक स्वाध्यायाचे डोस व इंजेक्शन्स घेणे अनिवार्य आहे. शारीरिक रोग निवारणासाठी लोक जेवढे जागरूक व कटिबद्ध असतात, तेवढे मान्यतेतील, अभिप्रायातील दोष निवारणे तर सोडा, त्याबद्दल विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही. याचे एकमात्र कारण आहे शरीरामधील एकत्वबुद्धि! शरीरच मी आहे अशी अनादिची मान्यता याही भवात चालू ठेऊन त्यायोगे जन्म मरणाचे भवचक्र ते कायम फिरवत ठेवत आहेत, याची जाणीवही या जीवांना होत नाही.

यासाठी सर्वप्रथम खऱ्या देव, गुरु, शास्त्र यांच्या स्वरूपाचा निर्णय करणे आवश्यक आहे. आपल्या आचरणात व अभिप्रायात कुदेव, अदेव, कुगुरु आदिंची श्रद्धा, भक्ति, विनय तर नाही ना? यांचे आत्मपरीक्षण केले पाहिजे. 'रत्नकरंड श्रावकाचार' ग्रंथामध्ये यावर विस्तृत चर्चा केलेली आहे. तुम्ही त्या ग्रंथाच्या कॅसेट्स मध्ये ऐकलेच असेल.

आपली ही कॅसेट्सची सिस्टिम चांगली चालली आहे. तुमच्या दादांच्या संध्याकाळच्या प्रवचनांच्या टेप्स, आम्ही रोज रेकॉर्ड करतो. त्याचे ४-५ सेट्स तयार करून तुम्हा दोघींप्रमाणे इतरही दूर रहाणारे काहीजण त्याचा लाभ घेतात. १०-१५ दिवसात पूर्वीच्या ऐकून परत केलेल्या कॅसेट्सवर आम्ही पुन्हा नवीन प्रवचनं टेप करतो. तुम्ही मला सांगितलं होतं की, 'वेळेअभावी आम्ही कामं करता करता टेप ऐकतो. घरचे इतर कुटुंबीयही कधी कधी त्यावर आपली मतं प्रदर्शित करतात, कॉमेन्ट्स पास करतात, त्यावरून लक्षात येते की इच्छा असो की नसो, ते देखील ऐकत असतात'. चला, रेडिओ व टी.व्ही. दिवसभर चालू रहाण्यापेक्षा हे बरेच आहे. तरीदेखील वेळात वेळ काढून ग्रंथांमधून स्वाध्याय करण्याची सवय लावून घ्या.

खरे देव वीतरागी, सर्वज्ञ असतात. पूर्ण वीतरागता बाराव्या गुणस्थानात प्रकट होते, त्यानंतरच तेराव्या गुणस्थानात सर्वज्ञता प्रकट होते, जीव अरहंत बनतो. यावरून हे सिद्ध होते की जो जीव वीतरागी नाही तो सर्वज्ञही नाही, भगवान देखील नाही. एखाद्याच्या सर्वज्ञतेची ओळख नुसती त्याच्याकडे पाहून होत

नाही परंतु वीतरागतेची ओळख अवश्य होते.

मुनींना पूर्ण वीतरागता नसते, एकदेश वीतरागता असते. त्यांना देखील कोणताही परिग्रह अर्थात वस्त्र, अलंकार, फुलं किंवा हार, शृंगार, चंदनाचा लेप, भांडी, नोकर, स्त्री, शस्त्र, अस्त्र, धन, धान्य, गाडी, वाहन, घर, परिवार, कायमचे निवासस्थान वगैरे असत नाही. अरहंतांना तर पूर्ण वीतरागता आहे, तर मग या गोष्टी त्यांना कशा बरे असतील? आहार संज्ञा (आहाराची इच्छा) सहाव्या गुणस्थानापर्यंतच असते सातव्यापासून वरच्या गुणस्थानात असत नाही. म्हणून अरहंत कवलाहार अर्थात भोजन घेतात ही मान्यता अत्यंत चुकीची असून ते महामिथ्यात्व आहे.

स्त्री पाचव्या गुणस्थानापर्यंत जाऊ शकते, वर नाही, म्हणून स्त्रीला त्याच पर्यायात मुक्ति होते असे मानणे सर्वथा चूक आहे.

अरहंतांना कसल्याही प्रकारचा उपसर्ग असत नाही. पूर्वी मुनि अवस्थेमध्ये उपसर्ग झाला असेल तर तोदेखील १२ व्या गुणस्थानाच्या अंतापर्यंतच रहातो, अरहंत अवस्थेमध्ये नाही. त्यांना रोगदेखील नसतो. त्यांचे परमऔदारिक शरीर असते. अरहंत भगवान अठरा दोषांनी रहित असतात. ते दोष याप्रकारे आहेत - भूक, तहान, वृद्धत्व, रोग, जन्म, मरण, भय, मद, राग, द्वेष, मोह, चिंता, रति, निद्रा, आश्चर्य, विषाद, घाम, खेद.

तुम्हाला माहितच आहे की अरहंत भगवानांच्या चार घातिकर्मांचा पूर्णतः क्षय झालेला असतो. ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय कर्म नष्ट होऊन त्यांचे अनंतज्ञान (केवलज्ञान), अनंतदर्शन (केवलदर्शन), अनंतसुख व अनंतवीर्य प्रकट होतात. याचा अर्थ असा आहे की अरहंत भगवान अनंतचतुष्टयाचे धारक आहेत. हे भगवंतांचे आत्मिक गुण आहेत. भगवंताच्या बाह्य स्वरूपाबरोबरच त्यांच्या अंतरंग स्वरूपाचे ज्ञान देखील आवश्यक आहे. भगवंतांच्या गुणांचे स्मरण हीच त्यांची खरी भक्ति आहे. जर तुम्ही त्यांचे अंतर्बाह्य स्वरूपच जाणत नसाल, तर नुसते मस्तक टेकविण्याने व तोंडाने स्तुति म्हटल्याने त्यांचा आदर होत नसून उलट अनादरच होईल.

इतर देवदेवतांची पूजा करणे, त्यांचा विनय करणे, अर्घ्य चढविणे, लक्ष्मीपूजन करणे, नदी, समुद्र यांची पूजा करणे,

वृक्षाची पूजा करणे, नाग, गाय वगैरे तिर्यंचांना पूजणे, देवता, यक्ष, व्यंतर, भवनवासी देव, देवी यांना पूजणे, वास्तुशांतिसाठी नवग्रहाची पूजा करणे, नवस बोलणे या साऱ्या गोष्टी गृहीत मिथ्यात्व आहेत. आम्ही तर सर्व देवांना नमस्कार करतो म्हणून आम्ही उदारमतवादी आहोत असे मानणारे लोकही आहेत. याला 'विनयमिथ्यात्व' म्हटले आहे.

कुदेवादिकांना मानणे हे तर मिथ्यात्व आहेच परंतु वीतरागी भगवंताच्या स्वरूपाचा निर्णय केल्याशिवाय केवळ कुलाचार म्हणून त्यांना पूजणे याला देखील गृहीत मिथ्यात्व म्हटले आहे. मला माहित आहे की आज मी जरा कडक शब्दात बोलत आहे. वीतरागी देवासमोर नवस बोलणे, मला मूल होऊ दे, कोर्टाचा निकाल माझ्या बाजूने लागू दे, परीक्षेमध्ये मी पास होऊ दे, माझा धंदाव्यापार चांगला चालू दे, तसे झाल्यास नंतर या क्षेत्रावर येऊन भगवानाला छत्र चढवेन किंवा मुलाचे जावळ काढेन......इत्यादि या सर्व गोष्टी मिथ्यात्वच आहे.

काही जणं म्हणतात, 'आम्हाला तर समाजात रहायचे आहे. ओळखी पाळखीच्या लोकांकडे जावे लागते. राजकारणी लोकांप्रमाणे लोकांची मनं जिंकण्यासाठी आम्हाला वेगवेगळ्या देवी-देवतांच्या समोर दिखाव्याखातर हात जोडावे लागतात. परंतु आम्ही तर मनात णमोकार मंत्रच म्हणत असतो.' भयाने, लज्जेने, स्नेहाने, आशेने, लोभाने कुदेव, कुगुरु, कुधर्माचा विनय, सत्कार, वंदन करणे वगैरे गृहीत मिथ्यात्व आहे.

रीना, मोना, मला अनेकजणांनी सुचवलं होतं की 'करणानुयोग परिचया' नंतर आता 'चरणानुयोग परिचय' लिहा. मी अनेक चरणानुयोगाचे ग्रंथ वाचले, त्यामध्ये प्रत्येकात पहिला अधिकार 'सम्यग्दर्शन अधिकार' आहे. सम्यग्दर्शन प्राप्त करणे हेच जीवाचे सर्वप्रथम-आद्य कर्तव्य आहे. म्हणून सम्यग्दर्शनरूपी कार्य प्रकट करण्याच्या दृष्टीने जे सिद्धांत जाणणे आवश्यक आहे, त्या विषयींचे विवेचन मी या पत्रांद्वारे करणार आहे.

आपल्याला सम्यग्दर्शनरूपी कार्य करावयाचे असेल तर प्रथम त्याचे स्वरूप जाणावे लागेल, त्यानंतर ते कार्य प्रकट करण्याचा मार्ग देखील जाणावा लागेल, त्या कार्याची कारणं देखील मिळवावी लागतील. कारणाशिवाय कार्य होत नाही. जसे

कारण असेल तसेच कार्य होईल. तुम्हाला गुलाबजाम बनवायचे असतील तर त्यासाठी योग्य प्रमाणात मावा, साखर, मैदा वगैरे गोष्टी हव्यात. साखरेच्या पाकाऐवजी मीठाचे पाणी वापरू म्हणाल तर ते चालणार नाही, इच्छित कार्य होणार नाही.

त्याचप्रमाणे आपल्याला सुखी व्हायचे आहे, परिपूर्ण सुख वीतरागतेमध्ये आहे, मोक्ष अवस्थेमध्ये आहे आणि त्याची सुरवात सम्यग्दर्शनापासून होते. हे कार्य प्रकट करण्याकरता आपल्याला जिनागमातील कारण-कार्य व्यवस्था व तिचे रहस्य जाणावे लागेल, योग्य कारणं मिळवावी लागतील व अयोग्य कारणं सोडावी लागतील. कारण कार्य रहस्य वाचल्यानंतरच तुम्हाला कळून येईल की मिळविण्याची व सोडण्याची गोष्ट फक्त कथनापुरतीच आहे.

आता आपण सम्यग्दर्शनाचे स्वरूप पाहूया. खऱ्या देव, गुरु, शास्त्र यांचे तीन मूढतारहित श्रद्धान सम्यग्दर्शन आहे. सम्यग्दृष्टि जीवाला सहा अनायतन आणि आठ प्रकारचे मद नसतात, निःशंकितादि आठ अंग असतात. यालाच 'तत्त्वार्थश्रद्धानम् सम्यग्दर्शनम्' असेही म्हटले आहे. या दोन्ही व्याख्यांचा अर्थ एकच कसा आहे याची चर्चा आपण 'जैनतत्त्व परिचय' मध्ये केली होती.

सर्वप्रथम खऱ्या देवाचे स्वरूप निश्चित करताना त्यांच्या सर्वज्ञता व वीतरागता या लक्षणांची आपल्याला प्रतीति आहे की नाही याचा विचार करावा लागेल. केवळ त्यांच्या व्याख्या घोकण्याने, पाठ केल्याने काही साधणार नाही.

तुम्हाला माहितच आहे की गेल्या तीन चार वर्षांपासून आमचा करणानुयोगाचा सामूहिक स्वाध्याय रोज सकाळी दीड तास चालतो. जीवकाण्ड, कर्मकाण्ड, लब्धिसार, क्षपणासार शिकवून झाला, आता अर्थ संदृष्टि अधिकार चालू आहे. हे सारे ग्रंथ वाचताना पदोपदी सर्वज्ञाच्या ज्ञानाची महिमा भासते. ग्रंथकार नेमिचंद्र आचार्य तसेच टीकाकार पं. टोडरमलजी यांच्या बुद्धीची अगाधता लक्षात येते. आपल्या सारख्या मंदबुद्धि जीवांवर त्यांचे असीम उपकार आहेत.

एकदा क्षपणासारचा स्वाध्याय चालू असताना एक ८०-८५ वर्षांचे गृहस्थ स्वाध्यायासाठी आले होते. ते स्वतः विद्वान,

प्रवचनकार व द्रव्यानुयोगाचे चांगले जाणकार आहेत. आमचे क्षपकश्रेणीतील ९ व्या अनिवृत्तिकरण गुणस्थानाचे प्रकरण चालू होते. जाते वेळी ते तुमच्या दादांना म्हणाले, 'भाई, मी काही उद्यापासून येणार नाही. मला काहीदेखील समजले नाही. तरीदेखील आज मला फार मोठा लाभ झाला. आज मला सर्वज्ञतेची अपूर्व महिमा वाटू लागली. ताईंना सांगा की त्यांचा माझ्यावर मोठा उपकार आहे, कारण आज माझा मद गळून गेला. मी स्वत:ला मोठा पंडित समजत होतो, परंतु जिनागमाच्या अगाधतेचा मला बोध झाला.'

अशा रीतीने सर्वज्ञतेचे व सर्वज्ञ भगवंतांचे स्वरूप जाणणे परम आवश्यक आहे. कारण सर्वज्ञाचे स्वरूप निश्चित करण्याने आपल्या सर्वज्ञ स्वभावाची ओळख होते. खरे देव सर्वज्ञ, वीतरागीच असतात. कित्येक अरहंतांची दिव्यध्वनि खिरते. ते विश्वाचे स्वरूप सांगून मोक्षमार्गाचा उपदेश देतात. ज्या अरहंतांची दिव्यध्वनि खिरते, समवशरणादिची रचना होते, तीर्थ म्हणजे खऱ्या धर्माच्या उपदेशाचे जे प्रवर्तन करतात त्यांना तीर्थंकर म्हणतात.

अरहंत अवस्थेनंतर अर्थात आयु पूर्ण झाल्यावर उरलेल्या चार अघाति कर्मांचा क्षय होऊन जीव निर्वाण प्राप्त करतो, त्यांना अशरीरी सिद्ध दशा प्राप्त होते.

अशाप्रकारे आपण पाहिले की भगवान अर्थात ईश्वर म्हणजे खरे देव तर विश्वाला फक्त जाणणारे आहेत, कोणाचेही काहीही करणारे नाहीत. तरीदेखील ईश्वराला जगाचा कर्ता मानणे, आपल्या कर्मांचे फळ देणारा मानणे, ईश्वराला रक्षणकर्ता किंवा नाशकर्ता मानणे, ईश्वराच्या इच्छेने सारे काही होते असे मानणे, ईश्वराला इच्छासहित अर्थात रागसहित मानणे, ईश्वर मला सुखी करतील असे मानणे, ईश्वर मला मरणापासून वाचवतील असे मानणे इत्यादि सर्व देवमूढता आहे.

खरे गुरु निर्ग्रंथ दिगंबर आत्मानुभवीच असतात. ते २८ मूलगुणांचे निरतिचार पालन करतात. नेहमी ज्ञान, ध्यान वगैरें मध्ये लीन असतात. पाण्यावर ओढलेल्या रेघेसमान ते अत्यंत मंदकषायी असतात. त्यांना अशुभोपयोग असत नाही. तरीदेखील वेगवेगळ्या वेषधारींना गुरु मानणे, व्यसनी, तीव्र कषायी अर्थात

क्रोधी, लोभी, मानी, मायाचारींना गुरु मानणे, कोणाला तरी गुरु बनवावे मग तो संसारातून आपल्याला पार करेल व आपली दु:खं दूर करेल असे मानणे; सांसारिक उपदेश देणाऱ्यांना, यंत्र, मंत्र, तंत्र, औषधं, ज्योतिष वगैरे सांगून लोकांना खुश करणाऱ्यांना, तसेच होम हवन करणाऱ्यांना, कुदेवादिकांची पूजा करविणाऱ्यांना, मिथ्यामार्गाचा उपदेश देणाऱ्यांना गुरु मानणे किंवा मुनिंसमान त्यांचा आदर करणे गुरुमूढता आहे.

नदीमध्ये स्नान करण्यात धर्म मानणे, वड, पिंपळ, तुळस वगैरे वृक्षांना पूजणे, अग्निमध्ये जळण्यात किंवा पंचाग्नि तप तपण्यात धर्म मानणे, सूर्य चंद्र ग्रहणांमध्ये सुतक पाळणे-स्नान करणे - भिकाऱ्यांना दान देणे, संक्रांत मानून दान देणे, विहिरीची पूजा करणे, गायीची पूजा करणे, गायीला देव मानणे, रुपये-लक्ष्मी यांचे पूजन करणे, शस्त्रांचे-यंत्रांचे पूजन करणे, मृत पितरांना पूजणे, त्यांना तृप्त करण्यासाठी तर्पण करणे, श्राद्ध करणे, देवतांसाठी जागरण घालणे, गंगाजळीला पवित्र मानणे, तिर्यंचांना देव मानणे, मृत्युंजयाच्या जापाने मृत्यु टळेल असे मानणे, ग्रहांना दान देण्याने मृत्यु टळेल असे मानणे इत्यादि साऱ्या लोकमूढता आहे.

आजकाल तर इतरांचे पाहून अनेक नव्या नव्या मूढता दिसून येतात. वास्तुशास्त्राचे अंधानुकरण करून घराची रचना बदलण्याने माझ्यावरील संकटं टळतील असे मानणे लोकमूढता नाही तर दुसरे काय आहे?

दुसऱ्या जीवांची प्रवृत्ति पाहून सत्य-असत्य, हित-अहित, योग्य-अयोग्य, आराध्य-अनाराध्य यांचा विचार न करता त्यालाच सत्य मानून प्रवृत्ति करणे ही लोकमूढता आहे.

जिनागमाच्या आधारे खऱ्या देव, गुरु, शास्त्र, धर्म इत्यादिचे स्वरूप जाणून निर्णय केल्याने या साऱ्या मूढता टळतील.

आगामी पत्रात आपण सर्वज्ञतेचे स्वरूप पाहून या विश्वात सर्वज्ञ आहेत की नाही यावर चर्चा करूया.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई**

# सर्वज्ञाची सिद्धि

पत्रांक २ २६फेब्रु. २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

सर्वज्ञाच्या स्वरूपाबद्दल आज आपण चर्चा करूया. सर्वज्ञता खऱ्या देवाचे लक्षण आहे हाच या जाणण्यामागचा एकमेव हेतु नसून सर्वज्ञाचे स्वरूप निश्चित केल्याने आपला स्वत:चा सर्वज्ञ स्वभाव कसा आहे याची आपल्याला जाणीव होते.

आत्मा सर्वज्ञ स्वभावी आहे. चेतना अर्थात ज्ञान, दर्शन आत्म्याचे असाधारण लक्षण आहे, जे इतर पाच द्रव्यांमध्ये - पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल या द्रव्यांमध्ये आढळत नाही. ज्ञानाचे कार्य आहे जाणणे. ज्ञान कोणाकोणाला जाणते बरे? स्व आणि पर सर्वांना जाणते. स्व म्हणजे फक्त मी स्वत: शुद्धात्मा-जीवतत्त्व आणि पर म्हणजे विश्वातील इतर सर्व गोष्टी - इतर सर्व द्रव्य, गुण व पर्याय. तत्त्वार्थसूत्रात केवलज्ञानाचे स्वरूप सांगताना म्हटलेच आहे, 'सर्वद्रव्यपर्यायेषु केवलस्य' अर्थात केवलज्ञान सर्व द्रव्यांना, गुणांना व त्यांच्या सर्व पर्यायांना जाणते.

ही सर्व द्रव्यं कोणती व किती आहेत याचा विचार करूया. जीव द्रव्य अनंत आहेत, त्यापेक्षा अनंतानंत गुणे पुद्गल द्रव्य, त्यापेक्षा अनंत गुणे तीन काळाचे समय, त्यापेक्षा अनंत गुणे आकाशाचे प्रदेश, त्यापेक्षा अनंत गुणे एकेका द्रव्याचे गुण, त्यापेक्षा अनंत गुणे सर्व द्रव्यांचे गुण, त्यापेक्षा अनंत गुणे सर्व द्रव्यांच्या सर्व गुणांच्या तिन्ही काळाच्या पर्याय आणि त्याहीपेक्षा अनंत गुणे त्या पर्यायांचे अविभाग प्रतिच्छेद या साऱ्या गोष्टी एका समयात युगपत् स्पष्ट प्रत्यक्ष जाणणाऱ्या ज्ञानपर्यायाचे नाव आहे केवलज्ञान.

ज्याचे केवलज्ञान पर्यायामध्ये प्रकट झाले आहे त्याला आपण सर्वज्ञ म्हणतो. एकदा केवलज्ञान प्रकट झाल्यावर सर्वज्ञ भगवान प्रत्येक समयात केवलज्ञानाने जाणत रहातात - अनंत काळापर्यंत प्रत्येक समयात केवलज्ञान प्रकट होत रहाते.

वर सांगताना तर नुसते अनंत गुणे म्हणजे अनंत पट एवढेच म्हटले आहे. परंतु वास्तविक पाहता जीवराशिची जी अनंत

संख्या आहे त्या संख्येचा वर्ग, वर्गाचा वर्ग, त्याचा वर्ग असे अनंत वेळा वर्गाचा वर्ग करत गेल्यावर पुद्‌गल राशिची संख्या येते. अनंताचेही अनंत प्रकार आहेत व या सर्व अनंतानंत संख्यांपेक्षाही केवलज्ञानाचे अविभाग प्रतिच्छेद सर्वाधिक अनंत आहेत. या विश्वात अशी कोणतीही संख्या नाही की जिच्या पटीमध्ये किंवा गुणाकाररूपामध्ये केवलज्ञानाचे स्वरूप सांगता येईल. केवलज्ञान स्वत:ला व संपूर्ण लोकालोकाला जाणते. असे अनंतानंत लोकालोक जाणण्याची प्रकट शक्ति केवलज्ञानामध्ये आहे. अवधिज्ञानाच्या उदाहरणावरून आपण हे समजून घेऊया.

अवधिज्ञानाचे देशावधि, परमावधि व सर्वावधि असे भेद आहेत. सर्वावधि सर्वोत्कृष्ट अवधिज्ञान आहे. अवधिज्ञान जेवढ्या क्षेत्रातील रूपी द्रव्याला-पुद्‌गलाला जाणू शकते त्यास अवधिज्ञानाचे क्षेत्र म्हणतात. सर्वावधिज्ञानाचे क्षेत्र आहे असंख्यात लोक. येथे प्रश्न पडणे स्वाभाविक आहे की पुद्‌गल द्रव्य फक्त लोकाकाशातच आहे, लोकाकाशाच्या बाहेर नाही, तर मग असंख्यात लोक अवधिज्ञानाचे क्षेत्र कसे बरे होईल? याचे उत्तर असे आहे की त्याची शक्ति एवढी आहे. लोकाकाशाच्या बाहेर पुद्‌गल नाही म्हणून शक्ति फक्त लोकाकाशाच्या क्षेत्राएवढीच नाही.

ऑलिंपिकमध्ये आपण पाहतो की खेळाडू 'वेट लिफ्टिंग' मध्ये विश्वविक्रम करतो. याचा अर्थ असा नव्हे की रोज त्याने तेवढेच वजन उचलून फिरले पाहिजे. समजा तो रोज ५ किलो वजनाचे सामान ने-आण करत असेल तर याचा अर्थ असा नाही की त्याची शक्ति-कपॅसिटी फक्त तेवढीच आहे.

आता समजले ना की केवलज्ञानामध्ये अनंतानंत लोकालोक जाणण्याची शक्ति प्रकट आहे. या सर्व गोष्टींचे ज्ञान त्या गोष्टींकडे पाहून होत नाही परंतु आत्म्यामध्ये एकाग्र झाल्याने होते. ज्ञानपर्याय स्वत: आपल्या योग्यतेने स्व आणि पर यांना जाणण्यारूपाने परिणमित होते. स्व आणि पर दोहोंना जाणणे हे ज्ञानपर्यायाचे स्वत:चे सामर्थ्य आहे. ही ज्ञानाची स्वपरप्रकाशक शक्ति आहे. सर्वज्ञ स्वभावाचा निर्णय करून त्या स्वत:च्या स्वभावामध्ये एकाग्र झाले असता सम्यग्दर्शनाची प्राप्ति होते, त्यामध्ये अधिकाधिक स्थिरता-लीनता करण्याने चारित्राची प्राप्ति

होते आणि पूर्ण रूपाने स्थिर झाल्यानंतर त्याचे फळ अर्थात केवलज्ञान प्राप्त होते - सर्वज्ञता प्रकट होते.

आपला सर्वज्ञस्वभाव आहे. वस्तुचा जो स्वभाव आहे तो 'स्वत:सिद्ध' असतो, दुसऱ्या कोणामुळे तो उत्पन्न होत नाही. स्वभाव अनादिचा असतो व अनंत काळापर्यंत रहातो म्हणून 'अनादिअनंत' असतो. स्वभाव हा 'परिपूर्ण' असतो, 'असीम' अर्थात अमर्यादित असतो. स्वभावाला टिकून रहाण्यासाठी दुसऱ्या कोणाच्या सहाय्याची गरज लागत नाही म्हणून त्यास 'असहाय' म्हटले आहे. परिणमन करणे हा देखील द्रव्याचा स्वभाव आहे.

ज्याप्रमाणे कायम टिकून रहाण्यासाठी द्रव्य स्वत: सामर्थ्यशाली आहे त्याचप्रमाणे परिणमन करण्यामध्येही ते पूर्ण समर्थ आहे. आपले परिणमन अर्थात कार्य करण्यासाठी द्रव्याला इतर द्रव्यांच्या सहाय्याची-मदतीची गरज नसते. जीव स्वत: आपल्या सर्वज्ञस्वभावाचा आश्रय करून सर्वज्ञपर्याय प्रकट करतो.

जरा विचार तर करा की आपल्याला महिमा कशाची येते? 'सर्व' पदार्थांची की 'ज्ञ' स्वभावाची? काय काय जाणतो याची महिमा वाटते की जाणणाऱ्याची महिमा वाटते? सर्वज्ञस्वभावी आत्मा म्हणताच स्वत:च्या सर्वज्ञ स्वभावावर दृष्टि जाते की परद्रव्यांच्या अनंततेची महिमा येते? केवलज्ञानपर्यायाची महिमा वाटते की ज्याच्या आश्रयाने अनंतानंत काळापर्यंत केवलज्ञानाच्या अनंत पर्याय उत्पन्न होत रहातात त्या सर्वज्ञ स्वभावाची महिमा वाटते? आपला सर्वज्ञ स्वभाव तर अनादिअनंत विद्यमान आहे त्याचा निर्णय तर मतिश्रुतज्ञानामध्येच होतो. आपली वर्तमान अल्पज्ञानाची पर्याय सर्वज्ञस्वभावाला जाणू लागते त्या समयापासून 'आत्मज्ञानमयी सर्वज्ञत्व शक्तीचे' परिणमन सुरू होते.

सर्वज्ञत्व अर्थात केवलज्ञान १३ व्या गुणस्थानात प्राप्त होते. अरहंत आणि सिद्ध सर्वज्ञ आहेत. इतर सर्व जीव - १ल्या गुणस्थानापासून १२ व्या गुणस्थानापर्यंतचे जीव अल्पज्ञ म्हणजे छद्मस्थ आहेत. छद्म म्हणजे आवरण, ज्ञानावरण कर्मसहित असे जीव, अल्पज्ञानी जीव छद्मस्थ म्हटले जातात.

सर्वज्ञाचे स्वरूप पाहिल्यानंतर आता आपण सर्वज्ञाची सिद्धि करूया. सर्वज्ञाचे स्वरूप ऐकल्यावर एखादा प्रश्न करेल की,

'अहो, सर्वात आधी सर्वज्ञाची सिद्धि तरी करा ना! खरोखरीच सर्वज्ञाची उपस्थिति असते की काय? मी म्हणतो सर्वज्ञ असतच नाहीत.'

त्याला आपण विचारूया, 'सर्वज्ञ या क्षेत्रामध्ये नाहीत की कोठेच नाहीत?' त्यावर तो म्हणेल, 'कोठेच नाहीत'.

पुन्हा त्याला विचारूया, 'सर्वज्ञ या काळात नाहीत की तिन्ही काळात नाहीत?' त्यावर तो म्हणेल, 'सर्वज्ञ कधीच नसतात'. त्याला आपण म्हणू शकतो, 'बाबा रे! तूच सर्वज्ञ झालास की रे! कारण तुला तिन्ही काळाचे आणि तिन्ही लोकांचे ज्ञान आहे.

सर्व संप्रदायाचे लोक म्हणतात की त्यांचे भगवान सर्वज्ञ आहेत. परंतु प्रत्येकजण आपापल्या भगवानाचे स्वरूप भिन्न भिन्न सांगतात. जर त्यातील एक खरा असेल तर बाकीचे सर्व खोटे शाबित होतात. सर्वज्ञाचे स्वरूप सर्वत्र आणि सदैव एक सारखेच असले पाहिजे, भिन्न भिन्न नाही आणि साऱ्या सर्वज्ञांची वाणीही एकसारखी असली पाहिजे, भिन्न भिन्न नाही. सर्वज्ञाच्या वाणीमध्ये कधीही परस्पर विरोध आढळत नाही. इतर संप्रदायातील देवांच्या वाणीमध्ये अर्थात त्यांच्या शास्त्रामध्ये विरोध आढळतो. जसे, कोठे अहिंसेचा उपदेश तर कोठे हिंसेचे समर्थन, कोठे ब्रह्मचर्याचा उपदेश तर कोठे 'अपुत्रस्य गतिर्नास्ति' चे कथन आढळते अर्थात निपुत्रिकाला स्वर्गात प्रवेश नाही असे म्हटले आहे.

या कारणास्तव जो निर्दोष आणि निरावरण आहे त्यालाच 'आप्त' म्हणजे खरा देव-अरहंत मानणे उचित होईल. निर्दोष म्हणजे दोषरहित, पूर्ण वीतरागी आणि निरावरण म्हणजे आवरणरहित, ज्ञानावरण-दर्शनावरणरहित असे केवलज्ञानी. सर्वज्ञाची सिद्धि करण्यासाठी सर्वप्रथम हे सिद्ध करावे लागेल की कोणी जीव निर्दोष व निरावरण होऊ शकतो की नाही?

आपण पहातो की काही जीव असंयमी (१ ल्या ते ४ थ्या गुणस्थानातील जीव), काही जीव संयमासंयमी (५ व्या गुणस्थानातील जीव) तर काही जीव संयमी (६ व्या ते १२ व्या गुणस्थानातील जीव) असतात. अर्थात दोषांचा अभाव होत होत त्यांचा संपूर्ण अभाव होऊन कोणी जीव निर्दोष होऊ शकतो.

एकेंद्रिय जीवांना ज्ञानावरचे आवरण सर्वात अधिक आहे अर्थात त्यांचा ज्ञानाचा उघाड सर्वात हीन आहे. सर्वात हीन

श्रुतज्ञानाचे नाव आहे 'पर्यायज्ञान' जे अक्षरज्ञानाच्या अनंताव्या भागाएवढे आहे. 'अक्षरज्ञान' देखील श्रुतज्ञानाचा एक भेद आहे, अ ब क ड ही अक्षरं नव्हेत.

एकेंद्रियांपासून पंचेंद्रियांपर्यंत ज्ञानाचा क्रमिक विकास दिसून येतो. संज्ञी पंचेंद्रियांमध्ये, आपल्या भोवतालच्या अनेक माणसांमध्ये देखील बुद्धीची तरतमता दिसून येते. कोणी मतिमंद तर कोणी तीक्ष्ण बुद्धिवाले आढळतात. यावरून हे सिद्ध होते की ज्ञानाचा पूर्ण विकास होऊन ज्ञान पूर्णरूपाने निरावरण होऊ शकते. याला आपण ज्ञानावरण कर्माचा क्षय होऊन क्षायिकज्ञान म्हणजे केवलज्ञान प्रकट झाले असे म्हणतो.

बाराव्या गुणस्थानात जीव निर्दोष अर्थात पूर्ण वीतरागी होतो. त्याला कोणत्याही प्रकारची इच्छा, शुभ किंवा अशुभ भाव, काम, क्रोध, हास्य, शोक, दया वगैरे कोणताही कषाय असत नाही. त्यांच्या अंतर्बाह्य सर्व परिग्रहांचा संपूर्ण अभाव असतो. मोह, राग, द्वेषादि अंतरंग परिग्रह आहे तर वस्त्र, पात्र, धन धान्यादि सर्व बहिरंग परिग्रह आहे.

बाराव्या गुणस्थानाच्या एक अंतर्मुहूर्तानंतर तेराव्या गुणस्थानाच्या पहिल्या समयात जीव सर्वज्ञ म्हणजे निरावरण होतो. जो निर्दोष झाला आहे तोच निरावरण - सर्वज्ञ होऊ शकतो. यावरून हे सिद्ध होते की अन्यमतीच्या ईश्वरासंबंधी कल्पना अत्यंत चुकीच्या आहेत. ईश्वर भक्तांचे भले करतो व दुष्टांचे दमन करतो यासारख्या गोष्टी कल्पित आहेत.

अशाप्रकारे निर्दोष (वीतरागी) आणि निरावरण (केवलज्ञानी) यांची सिद्धि करण्याने आपण सर्वज्ञाची सिद्धि करू शकतो.

सर्वज्ञाची सिद्धि करणारी कथनं तर जिनागमामध्ये ठिकठिकाणी आहेत, सर्वत्र आहेत. 'सर्वज्ञसिद्धि' हा तर न्यायशास्त्रांचा प्रमुख विषय आहे. सर्वज्ञाची सिद्धि समंतभद्र आचार्यांनी 'आप्तमीमांसा' मध्ये, अकलंकदेव आचार्यांनी त्याची टीका 'अष्टशती' मध्ये व विद्यानंदी आचार्यांनी 'अष्टसहस्री' मध्ये विस्ताराने केली आहे.

चारही अनुयोगांद्वारे सर्वज्ञाची सिद्धि होते. प्रथमानुयोगातील अनेक उदाहरणं आपल्याला माहित आहेत. प्रथम तीर्थंकर भगवान आदिनाथांनी सांगितले होते की भरत चक्रवर्तीचा पुत्र

मारीचि, जो मुनिदीक्षा धारण करून समवशरणात हजर होता, अनेक भवांनंतर चोवीसावा तीर्थंकर होईल, त्रिशला व सिद्धार्थ त्याचे माता पिता असतील.

भगवान नेमिनाथांनी बारा वर्षांनंतर द्वारका जळणार व ती कोणकोणत्या कारणांनी जळणार याविषयीचे कथन केले होते.

भूत, वर्तमान, भावी तीर्थंकरांची नावे व त्यांच्या पूर्वभवांचे वर्णन आपल्याला प्रथमानुयोगाद्वारे ज्ञात होते. या साऱ्या गोष्टी सर्वज्ञाच्या वाणीमध्ये आलेल्या आहेत.

करणानुयोग वाचताना तर दर पानागणिक केवलज्ञानाची महिमा व सर्वज्ञाची श्रद्धा दृढतम होत जाते. संख्यामान आणि उपमामानाचे भेद-प्रभेद, असंख्याताचे असंख्यात प्रकार, अनंताचे अनंत प्रकार, जीवराशि, पुद्‌गलराशि, प्रत्येक समयात बांधल्या जाणाऱ्या कर्मपरमाणुंची संख्या, कर्मांची गुणश्रेणीरूप रचना, प्रत्येक समयात कर्मांमध्ये होणारी परिवर्तनं, गणिताच्या चौदा धारा, गणिताची अनेक सूत्रं हे सारे वाचताना लक्षात येते की या साऱ्या गोष्टी केवलज्ञानींनी प्रत्यक्ष जाणलेल्या आहेत - कल्पनेने कोणी रचलेल्या नाहीत. तीन लोकांचे विस्तृत वर्णन वाचताना याची खात्री पटते की हे सारे जाणणारा कोणी सर्वज्ञच असला पाहिजे.

यावर कोणी शंका व्यक्त करेल की या साऱ्या गोष्टी सर्वज्ञकथित आहेत हे आम्हाला मान्य आहे परंतु सर्वज्ञ तर पूर्वी होऊन गेले, सध्या वर्तमानकाळात कोणी सर्वज्ञ नाही, त्यांची उपस्थिति कोठेच नाही. त्याचे उत्तर असे आहे की सध्या वर्तमानकाळात या भरतक्षेत्रात सर्वज्ञ, अरहंत नसले तरी विदेहक्षेत्रामध्ये तर सर्वज्ञांची व तीर्थंकरांची उपस्थिति सदैव असतेच असते. भरतक्षेत्रात फक्त चौथ्या काळात ते होतात.

शास्त्रामध्ये 'निरंतर मार्गणा' सांगितल्या आहेत. निरंतर मार्गणेचा अर्थच असा आहे की काही विशिष्ट गुणस्थानांमध्ये किंवा मार्गणांमध्ये कायम कोणी ना कोणी जीव असतातच. असे एक समयमात्र देखील होऊ शकत नाही की त्या गुणस्थानात एकदेखील जीव नाही. पहिले, चौथे, पाचवे, सहावे, सातवे, आणि तेरावे गुणस्थान ही सारी निरंतर गुणस्थानं आहेत या गुणस्थानांमध्ये नाना जीवांच्या अपेक्षेने एका समयाचे देखील

अंतर पडत नाही. यावरून हे सिद्ध होते की तीर्थंकरांचा, त्यांच्या उपदेशाचा, मोक्षमार्गाचा, एवढेच काय संसाराचा सुद्धा कधीही अभाव होत नाही.

आता अन्य प्रकारांनी सर्वज्ञाची सिद्धि करूया.

जेथे निमित्तरूपाने अनंतानंत ज्ञेयपदार्थ विद्यमान आहेत, तेथे त्या सर्वांना युगपत् जाणणारा कोणी सर्वज्ञ असलाच पाहिजे. प्रत्येक द्रव्यात प्रमेयत्व नावाचा सामान्य गुण आहे, जो सांगतो की द्रव्य कोणत्या ना कोणत्या ज्ञानाचा विषय होतेच होते अर्थात केवलज्ञानाचा विषय तर अवश्य बनते.

द्रव्यांमध्ये, त्याच्या अनंत गुणांमध्ये, त्यांच्या तिन्ही काळच्या सर्व पर्यायांमध्ये तसेच त्यांच्या अविभाग प्रतिच्छेदांमध्ये ज्ञानात झळकण्याची - ज्ञानात प्रमेय होण्याची शक्ति आहे. त्याअर्थी त्या सर्वांना जाणणारे असे ज्ञानसुद्धा अवश्य विद्यमान असले पाहिजे. प्रमेयत्व शक्तीचे प्रमेयरूप होण्याचे कार्य निरंतर चालू असते त्याअर्थी त्या सर्वांना जाणणारा केवलज्ञानी-सर्वज्ञ सदैव विद्यमान असलाच पाहिजे. या न्यायाने देखील सर्वज्ञाची सिद्धि होते.

मुलींनो, आजपर्यंत आपण सिद्धांत प्रवेशिकेमध्ये जे सिद्धांत, जे न्याय शिकलो त्यांच्याच आधारे आपण सर्वज्ञाची सिद्धि करत आहोत.

असा एक नियम आहे की जो ज्याचा स्वभाव आहे तो अमर्यादित असतो, असीम असतो, त्याला मर्यादा, सीमा असत नाही. जसे, अवगाहनहेतुत्व आकाश द्रव्याचा विशेष गुण आहे. इतर द्रव्यांना अवगाहन देण्याचा त्याचा स्वभाव आहे. आकाशद्रव्य अनंतानंत द्रव्यांना अवगाहन देते तरीदेखील सारी द्रव्यं लोकाकाशामध्ये-तेवढ्याच क्षेत्रात सामावली जातात व त्यापेक्षा अनंतानंत गुणे अलोकाकाश रिकामेच रहाते. तेथे आकाश द्रव्याखेरीज इतर कोणतीही द्रव्यं आढळत नाहीत.

त्याचप्रमाणे ज्ञानाच्या एका पर्यायाचे असे सामर्थ्य आहे की विश्वातील अनंतानंत द्रव्यं, त्यांचे गुण, त्यांच्या तिन्ही काळाच्या पर्याय, त्यांचे अविभाग प्रतिच्छेद, त्यांची निमित्तं व त्यांचे परस्परातील संबंध इत्यादि सर्वांना युगपत् प्रत्यक्ष स्पष्ट जाणूनदेखील त्या ज्ञानाचा अनंत पटीने भाव अर्थात शक्ति बाकी

रहाते. म्हटले आहे की असे अनंतानंत लोकालोक असते तरीदेखील ते केवलज्ञानाच्या एका अंशामध्ये जाणले गेले असते.

आध्यात्मिक सत्पुरुष पूज्य श्री कानजीस्वामी सर्वज्ञत्व शक्तिवरील प्रवचनात म्हणतात. 'अहाहा! केवलीभगवान की ज्यांच्या ज्ञानात लोकालोक जाणला जातो असे अनंत केवली-भगवान केवलज्ञानाच्या एका पर्यायामध्ये जाणले जातात, त्या केवलज्ञानाच्या एका समयाच्या पर्यायाची ताकत केवढी ?'

हे वाक्य वारंवार माझ्या मनात घोळत रहाते. अनेक वर्षांपासून तत्त्वांचा अभ्यास व ज्ञायकाचे चिंतन चालत असूनही या वाक्याने सर्वज्ञतेची अशी महिमा आली की चिंतनात मग्न झाले असता विकल्प कसे सुटून गेले कळलेच नाही आणि मला 'आत्मप्रसिद्धि' झाली, माझे 'आत्मवैभव' मला सापडले, मला 'रत्नाकर' मिळाला अर्थात सम्यग्दर्शनाची प्राप्ति झाली.

पूज्य स्वामीजींनी आत्म्याच्या ४७ शक्तींवर वेगवेगळ्या वेळी दिलेली प्रवचनं आत्मप्रसिद्धि, आत्मवैभव, आणि प्रवचन रत्नाकर या पुस्तकांद्वारे प्रकाशित झालेली आहेत. १९९२ साली आम्ही या तिन्ही शास्त्रांमधून प्रत्येक शक्तीचे वर्णन वाचले होते. सर्वज्ञत्व शक्तीचे वाचन झाल्यावर अंतर्मग्न परिणामांमध्ये माझे हे कार्य संपन्न झाले होते.

शास्त्रातील या साऱ्या गोष्टी नुसत्या ऐकून किंवा वाचून त्याचा निर्णय होत नसतो. त्यासाठी आपल्या ज्ञायकस्वभावाला अंतर्मुख होऊन जाणणे जरूरी आहे. सर्वज्ञाचा निर्णय तसेच सर्वज्ञस्वरूप आपल्या ज्ञान सामर्थ्याचा - त्रिकाली स्वभावाचा निर्णय करून त्याला जाणत राहिल्याने उपयोगाच्या स्वसन्मुख अवस्थेमध्ये आपल्याला शुद्धात्मानुभूति होते. अशाप्रकारे आपल्या स्वानुभूतिद्वारे आपण सर्वज्ञाची सिद्धि करू शकतो.

अवधिज्ञानाद्वारे सुद्धा सर्वज्ञाचा निर्णय होऊ शकतो. प्रथमानुयोगात आपण वाचतो की तीर्थंकरांना केवलज्ञान प्राप्त होताच इंद्रांची आसनं कंपायमान होतात, स्वर्गातील वाद्यं वाजू लागतात व तेव्हा इंद्र आपल्या अवधिज्ञानाद्वारे जाणतात की भगवंतांना केवलज्ञान झाले आहे. इंद्र त्यांना परोक्ष नमस्कार करून केवलज्ञानकल्याणक साजरा करण्यासाठी येतात.

इतर काही अवधिज्ञानी, जे कर्मांना प्रत्यक्ष जाणतात, त्यांच्या अवधिज्ञानात सर्वज्ञ अरहंतांची चार अघातिकर्मच जाणली जातात, कारण अरहंतांच्या चार घातिकर्मांचा क्षय झालेला असतो. अवधिज्ञानी जे अल्पज्ञ क्षयोपशमज्ञानी आहेत ते देखील सर्वज्ञतेचा - निरावरण ज्ञानाचा निर्णय करू शकतात.

सर्वज्ञाच्या वाणीद्वारे-जिनेन्द्र भगवान कथित आगमाद्वारे आपण सर्वज्ञाची सिद्धि करू शकतो. सर्वज्ञाच्या वाणीची पूर्वापर अविरोधता, सत्यता, संपूर्ण विश्वाचे स्वरूप कथन करण्याचे सामर्थ्य अर्थात वाचकता इत्यादि गुणांद्वारे, आगम प्रमाणाद्वारे, न्यायशास्त्रांच्या विविध न्यायांद्वारे, द्रव्यानुयोगाच्या सिद्धांतांद्वारे, प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग यांच्या द्वारे अशा अनेक प्रकारांनी आपण सर्वज्ञाची सिद्धि करू शकतो.

कुंदकुंदाचार्य मुनि सदेह विदेहक्षेत्रामध्ये सीमंधर भगवंतांच्या समवशरणामध्ये गेले होते, तेथे आठ दिवसांपर्यंत राहून सर्वज्ञ तीर्थंकरांचे प्रत्यक्ष दर्शन करून, दिव्यध्वनि ऐकून आले होते. सत्य महाव्रतधारी मुनींचे हे कथन शिलालेख व ग्रंथांमध्ये आजदेखील आपल्याला उपलब्ध आहे.

जातिस्मरण ज्ञानाद्वारे पूर्वभवाचे स्मरण होते. श्रीमद् राजचंद्र व बहनश्री चंपाबेन यांनी आपल्या जातिस्मरण ज्ञानामध्ये पूर्वभवात तीर्थंकरांना प्रत्यक्ष पाहिल्याचे जाणले होते.

अशाप्रकारे कारण-कार्य व्यवस्थेचे रहस्य जाणण्यापूर्वी आपण सर्वज्ञतेची सिद्धि केली. सर्वज्ञ तर धर्माचे, धर्मतीर्थाचे म्हणजे मोक्षमार्गाच्या उपदेशाचे मूळ आधार आहेत. सर्वज्ञाचे स्वरूप समजल्याशिवाय त्यांच्या वाणीची सत्यता व महिमा लक्षात येत नाही. सर्वज्ञाच्या यथार्थ निर्णयाखेरीज सम्यग्दर्शनरूपी कार्य प्रकट होणार नाही. मोक्षाच्या व मोक्षमार्गाच्या स्वरूपाचा निर्णय झाल्याशिवाय मोक्षमार्गाचा प्रारंभ होणार नाही.

यासाठी सर्वज्ञतेविषयीच्या मिथ्या कल्पना व त्यांचे निराकरण या विषयावर आपण पुढील पत्रामध्ये चर्चा करूया

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# सर्वज्ञासंबंधी मिथ्याकल्पना

पत्रांक ३ ८ मार्च २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

मुलींनो, प्रत्येक जीवाने स्वत:शीच विचार करावयास हवा की, 'या मनुष्यभवामध्ये येऊन मी विशेष काय मिळविले? अनंत काळात दुर्लभ असा मनुष्यभव आज मला प्राप्त झाला आहे. त्याहीपेक्षा अत्यंत दुर्लभ असा खरा जिनेन्द्रकथित उपदेश मला मिळाला आहे, तरीदेखील लौकिक संयोग प्राप्तीच्या मागे लागून मी स्वत:ची निर्घृण हिंसा तर करत नाही ना ?'

स्वत:च्या अस्तित्वाची ओळख न होणे, त्याचा स्वीकार न करणे, स्वत:च्या अस्तित्वाचाच विसर पडणे ही 'स्व'ची हिंसाच तर आहे. दुसऱ्याला दु:खी पाहून आपल्याला दया येते परंतु आजपर्यंत कधी स्वदयेचा भाव तरी उत्पन्न झाला आहे का? 'दया धरम का मूल है' असे आपण म्हणतो. या दयेची सुरवात तर स्वदयेपासून होत असते.

तुम्ही म्हणाल, 'इथे फुरसत कोणाला आहे? आम्हाला तर मरायला देखील फुरसत नाही. फार हेक्टिक लाईफ आहे - अत्यंत व्यस्त जीवन आहे आमचं.'

जणू काही मरणारे सारे फुरसतीनेच मरत असतात. जेथे स्वत:ची ओळख नाही ते जगणे काय जगणे आहे? हे तर क्षणाक्षणाला भयंकर भावमरण चालू आहे. दिवसभराच्या दगदगीतून १५ मिनिटे स्नानासाठी काढता मग ५ मिनिटे स्व आत्म्यासंबंधी विचार करण्यासाठी नाही काढता येत? प्रवासात, काम करताना, झोप येण्यापूर्वी हे विचार का नाही येत? कारण आपल्याला ज्याची महानता भासते त्याचेच विचार रात्रंदिवस आपल्या डोक्यात घोळत रहातात. परद्रव्यांच्या पर्याय आपण बनवू शकत नाही, बिघडवू शकत नाही, त्यात फेरबदल करू शकत नाही तरी देखील आपण त्यासंबंधी संकल्प विकल्प करत रहातो आणि विनाकारण दु:खी होत रहातो. परंतु शाश्वत सुखाचा मार्ग सुलभ व सहज असूनसुद्धा त्याचा विश्वासच वाटत नाही.

खऱ्या सुखाचा हा मार्ग आपल्याला सर्वज्ञ वीतरागी अरहंतांनी - तीर्थंकरांनी सांगितला आहे. सर्वज्ञाचा यथार्थ निर्णय करणाऱ्यांचाच त्यांच्या वाणीवर विश्वास बसतो. सर्वज्ञाचे स्वरूप निश्चित करताना आपल्याला स्वत:च्या सर्वज्ञस्वभावाची ओळख होते, स्वत:चे स्वरूप समजते, मिथ्यात्व मंद पडून त्याचा नाश होतो.

सर्वज्ञ आहेत व सदैव असतातच हे तर आपण पाहिले परंतु सर्वज्ञाच्या बाबतीत अनेक मिथ्या कल्पना - चुकीच्या मान्यता समाजात प्रचलित आहेत. आपल्या मान्यतेमध्ये असे काही दोष नाहीत ना याचा प्रत्येकाने विचार करावयास हवा.

आपण पाहिले होते की सर्वज्ञ भगवान सर्व द्रव्यांच्या तिन्ही काळाच्या पर्यायांना युगपत् जाणतात. पर्याय निश्चित असतात म्हणूनच तर ते त्यांना जाणतात. अर्थात या पर्यायांचा क्रम, त्यांचा निश्चित समय, त्यांचे निमित्त सारे काही नक्की आहे, निश्चित आहे. याला क्रमनियमित परिणाम किंवा क्रमबद्धपर्याय म्हणतात. ज्यांना क्रमबद्धपर्यायाविषयी अज्ञान आहे किंवा जे या सिद्धांताचा विरोध करू इच्छितात ते सर्वज्ञाचे स्वरूपच विपरीतपणे मानतात व दुसऱ्यांनाही तसाच उपदेश देऊन या भ्रामक कल्पनांचा प्रसार करतात. त्यातील काही भ्रामक कल्पना खालीलप्रमाणे आहेत.

(१) 'ज्या पर्याय भूतकाळात होऊन गेल्या व वर्तमानकाळामध्ये विद्यमान आहेत त्या तर क्रमबद्ध आहेत, निश्चित क्रमाने व ज्या होण्यायोग्य होत्या त्याच झाल्या आहेत, त्यामध्ये बदल होत नाही आणि सर्वज्ञ त्यांना एका समयात जाणतात परंतु भविष्यकालीन पर्याय निश्चित कशा असतील? त्या क्रमबद्ध असू शकत नाहीत म्हणून सर्वज्ञ भविष्यकालीन पर्यायांना जाणतात हे म्हणणे चुकीचे आहे.'

त्यांच्या मान्यतेप्रमाणे सर्वज्ञ भूतकाळ व वर्तमानकाळ यांना तर जाणतात परंतु भविष्यकाळाला जाणू शकत नाहीत. ज्या लोकांना कर्तृत्वाचा अहंकार आहे आणि स्वत:च्या व पराच्या पर्याय स्वत:च्या इच्छेनुसार घडविण्याचा मिथ्या भ्रम अजूनही विद्यमान आहे ते लोक सर्वज्ञाच्या स्वरूपाविषयी संशय निर्माण करून वस्तुस्वरूपाच्या विरुद्ध कथन करतात.

वस्तु अर्थात सहाही द्रव्यं त्रिकाल विद्यमान आहेत. द्रव्य प्रत्येक समयात कोणत्या ना कोणत्या अवस्थारूपाने विद्यमान

रहाते. पर्याय एक समयमात्र रहाते, नंतर नवी पर्याय उत्पन्न होते. याप्रकारे अनादिअनंत सुनिश्चित पर्यायांचे क्रमाने होणे त्या वस्तुच्या स्वरूपातच विद्यमान आहे. पर्यायांचा हा प्रवाहक्रम त्या वस्तुचा स्वकाल आहे आणि विशिष्ट पर्यायाचे जे स्थान आहे, जो समय आहे तो त्या पर्यायाचा स्वकाल आहे, जो एक समयाचा आहे व जो निश्चित आहे.

तुम्हाला माहितच आहे की प्रत्येक द्रव्य आपल्या स्वचतुष्टयाने युक्त असते. प्रत्येक द्रव्याचे स्वतःचे स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल आणि स्वभाव भिन्न भिन्न असते आणि हे त्रिकाल कायम रहाते. द्रव्याच्या अपेक्षेने प्रत्येकाचे स्वद्रव्य तेच रहाते, त्याचे स्वक्षेत्र तेच रहाते अर्थात प्रत्येक द्रव्याचे प्रदेश तेच आणि तेवढेच रहातात, त्याचा स्वभाव म्हणजे द्रव्याचे अनंत गुणही तेच रहातात त्याचप्रमाणे द्रव्याचा स्वकाल म्हणजे पर्यायांचा अनादिअनंत प्रवाहक्रम तोच रहातो, कधीही बदलत नाही.त्या प्रवाहक्रमातील पर्यायांना पुढे मागे करू शकत नाही. प्रत्येक समयाची पर्यायदेखील तीच रहाते व पर्यायांचा निश्चित क्रमदेखील तोच रहातो.

सर्वज्ञाने तर या वस्तुस्थितीला आपल्या दिव्य केवलज्ञानाद्वारे जाणले आहे, हीच वस्तुस्थिति दिव्यध्वनिद्वारे सांगितली आहे परंतु या वस्तुव्यवस्थेला त्यांनी बनविले नाही. सर्व द्रव्यांच्या भविष्यात होणाऱ्या पर्यायांना देखील जाणणे हे तर ज्ञानाचे महात्म्य आहे, केवलज्ञानाचे वैशिष्ट्य आहे. पर्याय प्रकट झाल्यानंतरच ज्ञानात येईल अशी पराधीनता केवलज्ञानात नाही.

भविष्यातील गोष्टी, त्यांचे भाकित तर आपल्यासारखे अल्पज्ञानीसुद्धा करू शकतात. सूर्य-चंद्राचे ग्रहण, चंद्राच्या भ्रमणानुसार होणाऱ्या तिथी, पक्ष, मास तसेच सूर्यभ्रमणामुळे होणारे दिवस, रात्र, वार, मास, अयन व त्यात होणारे परिवर्तन इत्यादि माहिती आपल्याला आधीच उपलब्ध होते. हवामान खात्याचे अंदाजदेखील आधीच जाहिर केले जातात. आपण जाणू शकतो आणि केवली भविष्याला नाही जाणत?

जे जीव आपल्या अल्प ज्ञानाच्या घमेंडीत मिथ्या मान्यतांमुळे सर्वज्ञाच्या स्वरूपाला विपरीतपणे प्रस्तुत करतात त्यांच्यासाठी शास्त्रात आंधळ्याचा दृष्टांत दिला आहे. दोघे जण होते, एक आंधळा व दुसरा डोळस. दृष्टि असलेला माणूस

आंधळ्याला सांगतो की अरे आत्ता आकाशात चार पक्षी उडत आहेत. त्यावर आंधळा त्याच्याशी वाद घालू लागतो की चार नाही, एकच पक्षी आहे.

त्याचप्रमाणे सर्वज्ञ भगवान ज्या गोष्टी प्रत्यक्ष स्पष्ट जाणून सांगतात, त्यावर हे लोक अविश्वास दाखवतात, प्रश्नचिन्ह लावतात, याला सर्वज्ञाचा 'अवर्णवाद' म्हटले आहे. ते दुसरं काय करणार? त्यांनी आजपर्यंत सर्वज्ञाला तर मानले होते त्यामुळे त्यांचा निषेध तर करू शकत नाहीत, त्याऐवजी त्यांचे स्वरूपच विकृत रूपाने प्रस्तुत करतात. समाजातील भोळे जीव, ज्यांना तत्त्वांचा अभ्यास नाही, या लोकांच्या आहारी जातात. अशातऱ्हेने हे लोक स्वत:चे व दुसऱ्यांचे अकल्याण करतात.

(२) कोणी म्हणतात की, 'सर्वज्ञ भगवान भविष्याला तर जाणतात परंतु सशर्त जाणतात. जसे, जो पुण्य करेल तो सुखी होईल, जो अभ्यास करेल तो पास होईल.' मुलींनो, याप्रकारचे ज्ञान तर तुम्हाला व मलाही आहे. तर मग सर्वज्ञतेची दिव्यता ती काय राहिली? सर्वज्ञाच्या ज्ञानात अशी संशयात्मक गोष्ट नसते. ते तर निश्चितपणे जाणतात की अमुक व्यक्ति अभ्यास करेल आणि या क्रमांकाने पास होईल किंवा आजारी पडल्यामुळे परीक्षेला बसू शकणार नाही किंवा विशिष्ट व्यक्ति अभ्यास करणार नाही परंतु खोट्या मार्गाने पास होईल, इत्यादि.

सर्वज्ञ तर त्रिकालज्ञ आहेत. जे निश्चित आहे त्याला ते जाणतात, भविष्य जर निश्चित नसते तर ते भविष्याला कसे जाणू शकले असते?

(३) कोणी म्हणतात, 'त्यांची प्रशंसा करण्यासाठी त्यांना सर्वज्ञ म्हटले आहे, अतिशयोक्ति करून सर्वज्ञ म्हटले आहे परंतु ते काही खरोखरी सर्वज्ञ नाहीत.'

जे लोक सर्वज्ञाला सर्वज्ञ मानण्यास तयार नाहीत त्यांचा त्यांच्या उपदेशावर विश्वास कसा असू शकेल? कोणी आयुष्यभर णमोकार मंत्र म्हणत आले, जिनेंद्र भगवंतांची पूजा अर्चा करत आले आणि तरीदेखील सर्वज्ञाच्या स्वरूपाविषयी त्यांना अशाप्रकारचे अज्ञान असेल तर तो सर्वज्ञाचा अपमान आहे. एखाद्याने आपल्या मातापित्यांच्या पाया पडून रोज सकाळी त्यांना आरती ओवाळावी आणि दिवसभर त्यांची आज्ञा न पाळावी तसा हा प्रकार झाला.

(४) दुसरे काही लोक म्हणतात की, 'निमित्तज्ञानीं प्रमाणे अर्थात पृथ्वी, आकाश, जमीन, मेघ, वारा, स्वप्न, हस्तरेखा, चेहरा, इत्यादि पाहून भविष्यासंबंधी काही ज्ञान होणाऱ्या जीवांप्रमाणे सर्वज्ञ भगवान भविष्याला विशेषरूपाने जाणतात. त्यांचे ज्ञान अत्यंत विशाल असल्याकारणाने त्यांना सर्वज्ञ म्हटले जाते.'

या लोकांच्या मान्यतेनुसार ते सर्वज्ञांना क्षयोपशम ज्ञानवाल्या जीवांमध्ये अधिक ज्ञानवाले मानतात. त्यांना हे माहित नसावे की सर्वज्ञांचे क्षायिक ज्ञान आहे, केवलज्ञान आहे आणि ते त्रिकालवर्ती समस्त पदार्थांना युगपत् प्रत्यक्ष व स्पष्ट जाणतात, क्रमाक्रमाने नाही.

भविष्य निश्चित आहे असे मानण्यामध्ये अज्ञानीला पारतंत्र्य वाटते. 'मग आमचा पुरुषार्थ तो काय राहिला?' असा विचार करून तो पुरुषार्थाची हानि होणे मानतो अथवा पुरुषार्थाशिवायच जे व्हायचे असेल ते होईल अशी चुकीची मान्यता करून घेतो. क्षयोपशम ज्ञानीसुद्धा भविष्यासंबंधी भाकित करू शकतात, जाणू शकतात. उदाहरणार्थ—ते ग्रह, तारे, नक्षत्रांसंबंधी, ग्रहणासंबंधी, धूमकेतुसंबंधी अचूक भविष्य वर्तवू शकतात, अवधिज्ञानी व मनःपर्ययज्ञानी देखील भविष्यातील गोष्टी जाणू शकतात. असे असतांना सर्वज्ञ भगवान भविष्याला जाणत नाहीत हे कथन महान अज्ञानाचे द्योतक आहे.

(५) काही लोक नियमसार गाथा १५९ चा आधार देऊन सांगतात की, 'केवली भगवान पराला तर व्यवहाराने जाणतात निश्चयाने पराला जाणतच नाहीत. व्यवहार असत्य आहे असे समयसारमध्ये म्हटले आहे म्हणून केवली भगवान पराला जाणतच नाहीत, ते फक्त स्वलाच जाणतात. यास्तव ते सर्वज्ञ नाहीत, कथनापुरते सर्वज्ञ आहेत.'

हे जरा स्पष्ट करून लिहू इच्छिते.तुम्ही न नियमसार वाचला आहे आणि न समयसार वाचला आहे. त्यामुळे ग्रंथांच्या या कथनांना नीट, नयविवक्षेने समजणे आवश्यक आहे. प्रथम नियमसारची गाथा व त्याचा अर्थ पाहूया. नियमसार गाथा १५९ मध्ये म्हटले आहे -

"जाणदि पस्सदि सव्वं ववहार णयेण केवली भगवं ।
केवलणाणी जाणदि पस्सदि णियमेण अप्पाणं ॥"

अर्थात व्यवहार नयाने केवली भगवान सर्वांना जाणतात, पहातात आणि निश्चय नयाने केवली भगवान आपल्या आत्म्याला जाणतात, पहातात.

निश्चयनय आणि व्यवहारनय हे श्रुतज्ञानाचे भेद आहेत, कथन पद्धतीचे भेद आहेत, केवलज्ञानामध्ये निश्चय व व्यवहार असे भेद नाहीत, केवलज्ञानाविषयीच्या आपल्या कथनामध्ये हे भेद पडतात. निश्चय आणि व्यवहार या दोन पद्धतींनी एकाच गोष्टीचे निरूपण-कथन केले जाते. निश्चयवस्तु आणि व्यवहार वस्तु अशा दोन भिन्न वस्तु नसतात परंतु एकाच वस्तुसंबंधी निरूपण म्हणजे कथनं दोन प्रकारची असतात.

जसे, मोक्षमार्ग दोन नाहीत परंतु मोक्षमार्गाचे कथन दोन प्रकारांनी केले जाते. त्याचप्रमाणे स्वला जाणणे व पराला जाणणे यो दोन भिन्न गोष्टी नाहीत. ज्ञान तर सर्वांना जाणते. खरे पहाता ज्ञान स्वत:च्या ज्ञानपर्यायालाच जाणते जे स्वपरप्रकाशक आहे. ज्ञानामध्ये स्वपरप्रकाशक शक्ति आहे. प्रकाशन करणे म्हणजे जाणणे. ज्ञान स्वत: ज्ञानरूप राहून परासंबंधीचे ज्ञान होते. ज्ञानाची ही अवस्था ज्ञानपर्यायाच्या स्वत:च्या योग्यतेने होते.

केवलीभगवान सर्व द्रव्य, क्षेत्र, काल व भाव यांना अर्थात सर्व, सर्वत्र, सर्वदा, सर्वथा सारे काही जाणतात. ज्ञान कशाप्रकारे - कोणत्या विधीने - प्रक्रियेने जाणते हे पाहिले असता हे लक्षात येते की ज्ञानाच्या पर्यायामध्ये पर्यायाच्या स्वत:च्या योग्यतेने काही ज्ञात होते - जाणले जाते अर्थात ज्ञान ज्ञानाकार होते.

आकाराचा अर्थ केवळ आकार म्हणजे Shape असा करू नका. विशिष्ट पदार्थासंबंधी ज्ञान होणे, त्याची वैशिष्ट्यं प्रतिभासित होणे-समजणे याला 'आकार' म्हणतात. यासाठीच ज्ञानाला 'साकार' असे म्हटले जाते. प्रत्येक समयाची ज्ञानपर्याय आपल्या या ज्ञानाकारांनाच जाणत असते.

जसे, आत्ता मी माझ्या ज्ञानाकारांना जाणत आहे. तुम्ही विचाराल की हे ज्ञानाकार कोणत्या वस्तुसंबंधीचे ज्ञान करत आहे? त्यावेळी मला ज्ञेयाचे नाव घेऊन सांगावे लागेल की समोर कागद आहे त्याविषयीच्या ज्ञानाकारांना मी जाणत आहे. समजाविण्यासाठी ज्ञेयाचे नाव घ्यावे लागते तेव्हा याच ज्ञानाकारांना ज्ञेयाकार देखील म्हटले जाते. आता तुम्ही मला सांगा की मी ज्याला जाणत आहे तो आकार म्हणजे ज्ञान हे

ज्ञानाने बनले आहे - ज्ञानरूप आहे - ज्ञानमय आहे की कागदरूप आहे - कागदमय आहे? ज्ञानमयच आहे, होय ना?

यालाच असे सांगतात की ज्ञान ज्ञानमय राहून पराला जाणते, पराला जाणताना ज्ञान तन्मय (तत् मय) म्हणजे परमय होत नाही. यालाच नयाच्या भाषेत प्रस्तुत करतेवेळी आपण म्हणतो की ज्ञान निश्चयाने स्वला जाणते व व्यवहाराने पराला जाणते.

याचप्रमाणे केवलीभगवान स्वला जाणतात हे कथन निश्चयनयाचे कथन आहे, ते पराला जाणतात हे कथन व्यवहार नयाचे कथन आहे, परंतु केवली भगवान पराला जाणतच नाहीत असे म्हणणे - त्याला सर्वथा खोटे मानणे हे तर अज्ञानाचे द्योतक आहे. नयविवक्षेचे त्यांना ज्ञान नाही असेच म्हणावे लागेल.

समयसार परिशिष्ट वरील श्री कानजीस्वामींच्या प्रवचनात त्यांनी याविषयावर विस्तृत विवेचन केले आहे. ते म्हणतात, -

''ज्ञानाचा स्वभाव आहे ज्ञेयांना जाणणे. आपल्या ज्ञानाचा स्वभाव असा आहे की ते स्वद्रव्याला जाणते तसेच परद्रव्याला जाणते. स्वक्षेत्राला जाणते तसेच परक्षेत्राला जाणते, स्वकालाला जाणते तसेच परकालाला जाणते, स्वभावाला जाणते तसेच परभावाला जाणते. 'स्वपरप्रकाशक शक्ति हमारी' - स्व आणि पराचे प्रकाशन म्हणजे ज्ञान माझा स्वतःचा स्वभाव आहे. मी स्वतःमध्ये राहून स्वतःद्वारेच जाणतो असे ज्ञानी जाणतो परंतु अज्ञानी, पराला जाणणे हा व्यवहार आहे असे कथन ऐकून, पराला जाणण्याचा निषेध करतो, अनेक ज्ञेयांना जाणल्या कारणाने आपल्याला खंड खंड रूप मानतो; परद्रव्य, परक्षेत्र, परकाल व परभाव यांना जाणण्याचाच निषेध करतो-असे करण्याने स्वतःच्या ज्ञानाचा म्हणजे आत्म्याचाच नाश करण्यासारखे आहे.''

मला माहित आहे की आजचा विषय सूक्ष्म आहे. परंतु मी तरी काय करू? सूक्ष्म मिथ्यात्वदेखील टाळायलाच हवे, नाहीतर सम्यग्दर्शनरूपी कार्य प्रकट होणार नाही. ज्याप्रमाणे तुम्हाला केशभूषा, वेषभूषा वगैरेंच्या नव्या नव्या फॅशनची माहिती होते आणि त्या अनुसार तुम्ही देखील वागता, त्याप्रमाणे काही लोक नव्या नव्या भ्रामक मान्यता उभ्या करून त्यांचा प्रसार करतात. तुम्ही त्याच्या तडाख्यात सापडू नये म्हणून मी हा गहन, सूक्ष्म विषय तुम्हाला समजावित आहे. याला पुन्हा उदाहरणाद्वारे समजूया.

जसे, मोटार ड्रायव्हर समोर पाहून मोटरकार चालवतो. त्याच्या समोर लावलेल्या आरशामध्ये त्याला मागून येणाऱ्या गाड्या व अन्य वाहने दिसतात. तो वळून मागे बघत नाही तरीदेखील त्याला मागचे दिसते. जेव्हा मागे बसलेला मालक त्याला म्हणतो, 'अरे आपल्याला आता येथे उजव्या बाजूला वळून थांबायचे आहे. पण जरा नीट बघ मागून कोणी येत तर नाही ना?' ड्रायव्हर समोरच पहात रहातो व म्हणतो, 'होय साहेब, मागे कोणी नाही. मी आता थांबतो.' तुम्ही मला सांगा, ड्रायव्हरने मागे पाहिले की नाही पाहिले? रीना, तू म्हणशील, 'होय, त्याने मागचा रस्ता पाहिला होता म्हणून तर तो म्हणाला की मागे कोणी नाही.' परंतु मोना तू म्हणशील, 'आई, त्याने तर मान वळवली देखील नाही, त्याने मागे वळून पाहिलेच नाही, तो तर समोरच पहात होता.'

आता लहानपणी भांडत होतात तशा भांडू नका. ड्रायव्हरने मागे वळून पाहिले नाही, मोना तुझे हे म्हणणेही बरोबर आहे आणि ड्रायव्हरने मागचा रस्ता पाहिला होता, रीना हे तुझे म्हणणेही बरोबर आहे. वास्तविक तो समोरच्या आरशात पहात पहात मागच्या रस्त्यासंबंधी ज्ञान करत होता, निर्णय करत होता. म्हणून आपण म्हणू शकतो की त्याने समोरच्या आरशात पाहिले हे निश्चयकथन आहे व त्याने मागचा ट्रॅफिक पाहिला होता हे व्यवहार कथन आहे. परंतु जर तुम्ही असे मानाल की ड्रायव्हर मागचे काही पहातच नाही, मागच्या ट्रॅफिकचा निर्णय न करताच गाडी चालवत आहे तर त्यांच्या नाशाचा प्रसंग ओढवल्याशिवाय रहाणार नाही.

त्याचप्रमाणे ज्ञानपर्यायदेखील स्वत:लाच जाणते. ती पर्याय स्वला तसेच पराला जाणत प्रकट होते. ज्ञान स्वत:मध्येच राहून सर्वांना जाणते. त्यासाठी ज्ञानाला पदार्थामध्ये जावे लागत नाही, पदार्थात तन्मय (पदार्थमय) व्हावे लागत नाही, पदार्थाकडे पहात बसावे लागत नाही. प्रत्येक पदार्थ आपल्या स्वचतुष्टयातच रहातो, परचतुष्टयात त्याचा प्रवेशच होऊ शकत नाही, परपदार्थाला तो स्पर्शही करू शकत नाही. म्हणून ज्ञानदेखील इतर पदार्थांना स्पर्श करू शकत नाही, त्यांमध्ये प्रवेश करू शकत नाही, त्या पदार्थरूप होऊ शकत नाही.

स्वत:मध्येच राहून स्वत:ला तसेच संपूर्ण लोकालोकाला जाणण्याचे सामर्थ्य ज्ञानामध्ये आहे. याच गोष्टीला शास्त्राच्या भाषेत सांगायचे झाले तर आपण म्हणतो की ज्ञान निश्चयाने स्वला जाणते आणि व्यवहाराने म्हणजे उपचाराने पराला जाणते. परंतु पराला जाणतच नाही म्हटले तर ज्ञानाच्या स्वरूपाचा नाश होण्याचा प्रसंग ओढवेल.

आपण आरशात आपला चेहरा पहातो. वास्तविक पहाता म्हणजे निश्चयनयाने बोलायचे झाल्यास आपण आरशाची अवस्था पहातो जी आपल्या चेहऱ्यासारखी आहे - चेहऱ्याचे प्रतिबिंब आहे. परंतु आपण असेच म्हणतो की मी माझा चेहरा आरशात पाहिला - हे तर व्यवहारकथन आहे. आपल्याला हे पक्के ठाऊक असते की ही बोलण्याची रीत आहे पण आरशात माझा चेहरा  नाही. कारण आरशात पाहून आपल्याला आपल्या चेहऱ्यावरील डागाचे ज्ञान होऊ शकते परंतु तो डाग पुसण्यासाठी आपण आरसा पुसत नाही, आपला चेहरा पुसतो. त्यावेळी आपल्याला माहित असते की निश्चय चेहरा तर आपला आहे, व्यवहार चेहरा आरशात आहे. आपल्या चेहऱ्याला आपला चेहरा म्हणणे निश्चयकथन आहे व आरशात चेहऱ्याचे प्रतिबिंब आहे त्याला आपला चेहरा म्हणणे हे व्यवहारकथन आहे.

पहा तर खरं, लौकिक बाबतीत आपण किती हुषार आहोत. बोलतो काही वेगळेच पण त्यातला योग्य अर्थ बरोबर समजतो, तेथे कोणी वाद घालत नाही. परंतु शास्त्रातील कथन ऐकून योग्य अर्थ समजून घेण्याऐवजी आपण वादविवाद चालू करतो. शास्त्रज्ञानाद्वारे आपल्या ज्ञानाचा-आपल्या आत्म्याचा निर्णय करावयाचा होता, ते सोडून वादविवादात अडकून रहातो. आपल्या अतिदुर्लभ मनुष्यभवाचा वेळ आपण व्यर्थ वाया घालवतो आणि त्याहूनही अतिदुर्लभ अशा खऱ्या शास्त्रज्ञानाच्या कथनांना वादविवादाचा मुद्दा बनवून आपल्या मानकषायाचे, अभिमानाचे पोषण करण्याने त्या शास्त्रवचनांना देखील व्यर्थ वाया घालवतो.

आपल्या या चर्चेचा एकमात्र हेतु हाच आहे की आपण आपल्या मान्यतांचे निरीक्षण करावे व आपल्यात काही दोष असेल तर त्याला ओळखून दूर करावे. सर्वज्ञाच्या स्वरूपाविषयी

विपरीत मान्यता असेल तर तत्त्वज्ञानाची प्राप्ति होऊच शकत नाही. सहा द्रव्यं, सात तत्त्वं, कर्म आणि त्यांच्या अवस्था, संसारातील दु:खं, त्यांपासून सुटून मोक्षप्राप्तीचा उपाय, मोक्षाची सिद्धि या सर्व गोष्टी आपण सर्वज्ञाच्या वाणीच्या आधारेच जाणू शकतो, सर्वज्ञाशिवाय आपण या गोष्टी ना जाणू शकतो, ना मानू शकतो.

सर्वज्ञ भगवान सर्व अनंत द्रव्यांना, त्यांच्या गुणांना, त्यांच्या सर्व पर्यायांना प्रत्यक्ष जाणतात. सर्व द्रव्य आपल्या तिन्ही काळाच्या पर्यायांसहित जणूं ज्ञायकामध्ये खचित केले आहेत, निमग्न झाले आहेत. आचार्य अमृतचन्द्रांचा 'लघुतत्त्वस्फोट' नामक ग्रंथ आहे. ही सर्वज्ञाची व २४ तीर्थंकरांची स्तुतिरूप रचना आहे, जी अप्रतिम आहे, अद्वितीय आहे. त्यात ते म्हणतात, 'द्रव्यामध्ये तर फक्त वर्तमान पर्यायच विद्यमान असते, भूत व भविष्याच्या पर्याय तर केवळ योग्यतारूपानेच असतात. परंतु हे भगवान! तुमच्या ज्ञानामध्ये सर्व द्रव्यांच्या तिन्ही काळाच्या सर्व पर्याय एकावेळी विद्यमान आहेत, क्रमाने नव्हे.'

सर्वज्ञ भगवान अक्रमाने सारे जाणतात तरीदेखील पर्यायांचा निश्चित क्रमदेखील त्याच समयात जाणतात.

जेव्हा जेव्हा आपण सर्वज्ञाचे स्वरूप पहातो तेव्हा तेव्हा पर्यायांच्या क्रमबद्धपणाची चर्चा सहजच निघते, त्याचे स्वरूप नजरेपुढे येते. सर्वज्ञाची सिद्धि करताना क्रमबद्धपर्यायाचा सिद्धांत सिद्ध होतो आणि क्रमबद्धपर्यायाचा सिद्धांत समजून घेताना सर्वज्ञाचे स्वरूप चांगल्या प्रकारे लक्षात येते. क्रमबद्धपर्याय या नावातच विशेष जादू आहे. त्याच्या बाबतीत अनेक प्रश्न आपल्या मनात उभे रहातात आणि त्याचे स्वरूप समजण्याची तीव्र उत्कंठा जागृत होते. आपण सुद्धा पुढे त्याविषयी चर्चा करणार आहोत परंतु त्याचे योग्य आकलन होण्यासाठी जिनागमातील काही मूलभूत सिद्धांतांचे, कारण-कार्य व्यवस्थेचे ज्ञान होणे आवश्यक आहे.

यासाठी आगामी पत्रांद्वारे कारण-कार्य रहस्य समजण्यासाठी आपण चार अभाव, निमित्त, उपादान, निमित्त नैमित्तिक संबंध, पाच समवाय इत्यादि विषयांवर चर्चा करणार आहोत.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# चार अभाव - भाग १

पत्रांक ४ ८ एप्रिल २००१

प्रिय सौ. रीना आणि सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

आपण आतापर्यंत सर्वज्ञाच्या स्वरूपाविषयी चर्चा केली. आपल्या स्वत:च्या सर्वज्ञ स्वरूपाचा निर्णय करण्यासाठी हे अत्यंत आवश्यक आहे. आजपासून कारण-कार्य रहस्य समजण्यासाठी इतर सिद्धांतांचा अभ्यास करूया.

एकदा पुणे येथे फलटणचे श्री सुभाष गांधी व सौ. गांधी भेटले होते. सौ. गांधी म्हणत होत्या की, 'तुमची रीना-मोनाची पत्रं आम्ही आवर्जून वाचतो. आम्ही सुशीलमती माताजींना विचारले होते की या पत्रात तत्त्वांबद्दल जी गोष्ट लिहिली आहे व आपण जे आम्हाला शिकवलंत ते एकच आहे. आम्हाला याचे आश्चर्य वाटते.'

मुलींनो, जी व्यक्ति जिनागमाचे म्हणजे शास्त्रांचे कथन करते, ते कथन शास्त्रानुसारच असणार मग भले ते शास्त्र कोणाकडून का शिकलेले असेना आणि कोठूनही का छापले असेना! हां, एक गोष्ट निश्चितपणे आवश्यक आहे की आपल्या मूळ ग्रंथांप्रमाणेच ते ग्रंथ छापलेले असावेत व शिकविलेले असावेत. जसे, तुम्ही तुमच्या शाळेत गणित शिकला होतात तेव्हा पाच अधिक पाचची बेरीज दहा आली होती. कोणी मुंबईच्या शाळेत तर कोणी पुण्याच्या शाळेत तर कोणी एखाद्या खेडेगावात जरी शिकलेला असला तरी सारे जण हेच सांगतील की पाच अधिक पाच दहा होतात.

वर्धा येथे कोणीतरी हा प्रश्न विचारला होता ज्यावेळी इ.स. २००० च्या पर्यूषण पर्वामध्ये मी तेथे लघु जैन सिद्धांत प्रवेशिका शिकविली होती. वास्तविक तिथला समाज सुशिक्षित आहे. त्यावेळी एकाने म्हटले होते, 'ताई, आजपर्यंत आम्ही शास्त्ररूपी वृक्षाची फळं आणि फुलंच पहात आलो होतो व ते दिसायला तर मनोहर वाटत होते परंतु तुम्ही तर त्या वृक्षाची मुळं आम्हाला दाखविलीत. ही मजबूत मुळं जाणून आम्हाला खूपच आनंद झाला.' तेव्हा एका वयोवृद्ध व्यक्तीने भर सभेत विचारले

होते की, 'ताई, सध्या काही विशिष्ट शास्त्र साहित्यावर बंदी का घातली जाते? त्याचा निषेध का केला जातो?' त्याबाबतीत साऱ्या गोष्टी नीट समजावल्यानंतर व हा निषेध कसा अयोग्य आहे हे दाखवून दिल्यानंतर त्यांचे समाधान झाले होते.

दुसऱ्याच्या परिणामांच्या बाबतीत आपण काय करू शकतो? कोठे असे तर लिहिलेले आढळत नाही की श्रावकांना अश्लील साहित्य वाचण्याची मनाई आहे, टी.व्ही. वरच्या विकथा पहाण्याची मनाई आहे, इतर कुदेवादिकांच्या टी.व्ही. सिरियल पहाण्याची मनाई आहे, जिनागमाखेरीज इतर बेकार चर्चा आणि घरादाराच्या गोष्टी मंदिरात करण्याची मनाई आहे. आता जर कोणी जीव सर्वज्ञकथित सत्साहित्याचा निषेध करून स्वत:चेच नुकसान करून घेत असेल, ज्ञानावरणादि कर्मांचा तीव्र बंध करून घेत असेल, तर त्याला दुसरा कोणी काय करू शकतो? त्यांचे भाव पाहून आपले स्वत:चे भाव बिघडू देऊ नका.

या भावांची तसेच या भावांच्या फळाची चर्चा सोडून आज आपण अभावांची चर्चा करूया. हा विषय 'चार अभाव' या नावाने जाणला जातो. काय झाले? अभावांची चर्चा करणार म्हटल्यावर आश्चर्य का बरे वाटते? तुम्ही विचारात पडला असाल की, 'ज्यांचा अभावच आहे त्याविषयी आपण कसे काय शिकणार? त्यांची चर्चा कशी करणार?' पहा बेटा, आपण अभाव 'आहे' असे म्हणून अभावाची सिद्धि केली आहे, त्याची सत्ता सिद्ध केली आहे. अभावाचा अभाव नाही पण त्याचा सद्भाव आहे आणि आज आपण त्याविषयीच अभ्यास करणार आहोत. कशाचा कशामध्ये अभाव आहे हेच तर आपल्याला शिकावयाचे आहे.

'अभाव' या शब्दाचा अर्थ आहे 'नसणे' म्हणजे 'नास्ति'. एका पदार्थाचे दुसऱ्या पदार्थात नसणे यालाच अभाव म्हणतात. शास्त्रामध्ये चार अभावांची चर्चा केली आहे. त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

(१) प्रागभाव - प्राक् + अभाव.
(२) प्रध्वंसाभाव - प्रध्वंस + अभाव.
(३) अन्योन्याभाव - अन्योन्य + अभाव.
(४) अत्यंताभाव - अत्यंत + अभाव.

वर दाखविल्याप्रमाणे संधी फोडून वाचले असता लक्षात येते की ही भावांची नावे नसून अभावांची नावे आहेत. हे पुन्हा एकदा वाचा म्हणजे पाठ होतील.

'कारण-कार्य रहस्यामध्ये ही अभावांची चर्चा का करीत आहेत?' असा तुम्हाला प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. त्याचे समाधान तर या अभावांचे स्वरूप जाणल्यानंतरच होईल. कार्य म्हणजे पर्याय. प्रत्येक द्रव्यात दर समयाला कार्य म्हणजे पर्याय होत आहे. ते कार्य कोठे होत आहे? त्याची अस्ति कोठे आहे? त्या कार्याची नास्ति म्हणजे अभाव कोठे आहे? ते कार्य केव्हापासून होत आले आहे व कधीपर्यंत ते एक समयाचे कार्य चालू राहील? काय एक समयाचे कार्य अनंत काळापर्यंत टिकून राहील की त्यासमयानंतर त्याचा अभाव म्हणजे नास्ति आहे? या साऱ्या गोष्टींची चर्चा आता आपण 'चार अभाव' या विषयाद्वारे समजून घेऊया.

**प्रागभाव** - प्राक् अर्थात पूर्व. कोणत्याही द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा त्याच द्रव्याच्या पूर्व पर्यायामध्ये अभाव - भूतकालीन पर्यायामध्ये अभाव यास प्रागभाव म्हणतात. जसे, आज मंगळवार आहे तर त्याच्या पूर्वी म्हणजे काल सोमवार होता. मंगळवाराचे सोमवारामध्ये नसणे, सोमवारामध्ये त्याचा अभाव, त्याची नास्ति हा प्रागभाव आहे. हे तर ढोबळ उदाहरण झाले. इतर उदाहरणं देखील पाहूया.

तुम्ही आता यौवनावस्थेमध्ये आहात, बाल्यावस्था तुमची भूतकाळातील अवस्था होती. तुमच्या यौवनावस्थेचा तुमच्याच बाल्यावस्थेमध्ये अभाव आहे यास प्रागभाव म्हणतात. जरा पुन्हा ध्यानपूर्वक ऐका. तुमच्या यौवनावस्था या वर्तमान पर्यायाचा तुमच्याच बाल्यावस्था या पूर्व पर्यायात अभाव आहे असे मी सांगत आहे. तुमचा तर बाल्यावस्थेमध्ये देखील सद्भाव होता, आता देखील आहे व भविष्यात देखील रहाणार आहे.

येथे द्रव्याच्या अभावाची चर्चा चालू नसून द्रव्याच्या वर्तमान पर्यायाची त्याच्याच भूतकालीन पर्यायामध्ये नसण्याची - अभावाची चर्चा चालू आहे.

दही वर्तमान पर्याय आहे-ही गोरसाची वर्तमान पर्याय आहे. त्याची भूतकालीन पर्याय दूध ही होती. म्हणून गोरसाच्या दही या

वर्तमान पर्यायाचा त्याच गोरसाच्या भूतकालीन दूध या पर्यायामध्ये अभाव-प्रागभाव आहे.

वर्तमानकाळी कोणी जीव सिद्धदशेमध्ये आहे त्यापूर्वी तो संसारदशेत होता. एखाद्या जीवाच्या वर्तमान सिद्धदशेचा त्याच जीवाच्या पूर्व संसारदशेतील अभाव प्रागभाव आहे. एखादा जीव वर्तमानकाळी मनुष्यपर्यायात आहे त्यापूर्वी तो तिर्यंचपर्यायामध्ये होता. त्या जीवाच्या वर्तमान मनुष्यपर्यायाचा त्याच जीवाच्या भूतकालीन तिर्यंचपर्यायामधील अभाव प्रागभाव आहे.

येथे समजाविण्यासाठी स्थूल पर्यायांची उदाहरणं दिली आहेत. तुम्हाला माहितच आहे की पर्याय एका समयाची असते, एक समयच रहाते. वर्तमान पर्याय देखील एका समयाची आहे, तिचा पूर्व पर्यायांमध्ये अभाव आहे, ज्याला प्रागभाव म्हणतात.

करणलब्धिच्या अंतिम समयापर्यंत मिथ्यात्व होते व पुढच्याच समयात सम्यक्त्व पर्याय प्रकट झाली. या वर्तमान सम्यक्त्व पर्यायाचा पूर्वीच्या मिथ्यात्व पर्यायात अभाव हा प्रागभाव आहे.

तेराव्या गुणस्थानाच्या प्रथम समयात केवलज्ञान उत्पन्न होते. बाराव्या गुणस्थानाच्या अंतिम समयात जीव छद्मस्थ असतो - अल्पज्ञानी-क्षयोपशम ज्ञानी असतो. वर्तमान केवलज्ञान पर्यायाचा पूर्वीच्या अल्पज्ञान पर्यायामध्ये अभाव हा प्रागभाव आहे.

आता प्रध्वंसाभावाची व्याख्या व स्वरूप पाहूया.

**प्रध्वंसाभाव** - पर्याय एक समयमात्र रहाते-केवळ वर्तमानकाळातच विद्यमान असते. नंतरच्या समयामध्ये ती नसते यालाच त्या पर्यायाचा व्यय किंवा नाश असे म्हणतात. त्या समयात दुसरी पर्याय विद्यमान असते.

कोणत्याही द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा त्याच द्रव्याच्या भविष्यकालीन पर्यायामध्ये अभाव असतो त्यास प्रध्वंसाभाव म्हणतात.

गोरसाची वर्तमान पर्याय दही आहे. त्याचे आपण ताक बनवू त्यांवेळी दही रहाणार नाही. गोरसाच्या वर्तमान दही पर्यायाचा त्याच्याच भविष्यकालीन ताक पर्यायामध्ये अभाव प्रध्वंसाभाव आहे.

वर्तमानकाळात तुम्ही तरूण आहात भविष्यामध्ये ही यौवनावस्था रहाणार नाही, वृद्धावस्था प्राप्त होईल. तुमच्या वर्तमान यौवनावस्थेचा तुमच्याच वृद्धावस्थेमध्ये अभाव आहे,

याला प्रध्वंसाभाव म्हटले आहे. जरा नीट ध्यान देऊन ऐका- अभाव होईल असे म्हणत नसून 'अभाव आहे' म्हणत आहे.

आपण सध्या संसार अवस्थेमध्ये आहोत, भविष्यकाळात आपली सिद्ध अवस्था होणार आहे. आपल्या वर्तमान संसार अवस्थेचा आपल्याच भविष्यकालीन सिद्ध अवस्थेमध्ये अभाव आहे, हा प्रध्वंसाभाव आहे.

कोणी जीव वर्तमानकाळी मनुष्यपर्यायात आहे, भविष्यकाळात तो देवपर्यायामध्ये जाणार आहे. या जीवाच्या मनुष्यपर्यायाचा याच जीवाच्या भविष्यकालीन देवपर्यायामध्ये अभाव आहे, नास्ति आहे, याला प्रध्वंसाभाव म्हणतात.

एखाद्याची वर्तमानकाळी मिथ्यात्व पर्याय आहे व तो सम्यक्त्व प्राप्त करणार आहे. त्याच्या वर्तमान मिथ्यात्व पर्यायाचा भविष्यकालीन सम्यक्त्व पर्यायात अभाव आहे, हा प्रध्वंसाभाव आहे.

एखादा जीव सध्या छद्मस्थ आहे-अल्पज्ञ आहे, भविष्यकाळात सर्वज्ञ होणार आहे. त्या जीवाच्या वर्तमान अल्पज्ञ अवस्थेचा त्याच जीवाच्या भविष्यकालीन सर्वज्ञ अवस्थेमध्ये अभाव आहे, हा प्रध्वंसाभाव आहे.

पहा, प्रागभावामध्ये वर्तमान पर्यायाचा पूर्व पर्यायात अभाव आहे असे म्हटले आहे व प्रध्वंसाभावामध्ये वर्तमानपर्यायाचा भविष्यकाळाच्या पर्यायामध्ये अभाव आहे असे म्हटले आहे. येथे अभाव होता किंवा अभाव होईल असे सांगण्यात येत नसून अभाव आहे, नास्ति आहे असे सांगून अभावाचे अस्तित्व सांगितले जात आहे.

यावरून एक महत्वाची बाब लक्षात येते ती अशी की वर्तमान पर्यायाचा सद्‌भाव म्हणजे अस्ति फक्त वर्तमान समयातच आहे, वर्तमान पर्यायातच आहे परंतु ही पर्याय सोडून भूतकालीन व भविष्यकालीन सर्व पर्यायांमध्ये हिचा अभावच आहे.

तुम्ही विचाराल की, 'तू तर एक समयापूर्वीच्या पर्यायातील अभावाला प्रागभाव आणि नंतरच्या समयातील पर्यायामधील अभावाला प्रध्वंसाभाव म्हटले होतेस. आता तर तू भूतकालीन सर्व पर्यायांमध्ये व भविष्यकालीन सर्व पर्यायांमध्ये अभाव आहे असे सांगत आहेस. हे जरा स्पष्ट करून सांग.'

ऐका, ज्या वर्तमान पर्यायाचा एक समयापूर्वीच्या पर्यायात अभाव आहे तिचा त्याही पूर्वीच्या पर्यायात अभाव याप्रकारे पूर्वीच्या सर्व पर्यायांमध्ये अभाव आहे. त्याचप्रमाणे वर्तमान पर्यायाचा नंतरच्या समयातील पर्यायात अभाव आहे तर त्यानंतरच्याही सर्व पर्यायात अभावच आहे. पर्याय फक्त एक समयच रहाते. ती स्वत:च्या रूपाने स्वत:च्या समयामध्ये आहे हे अस्तिचे कथन आहे आणि ती इतर कोणत्याही पर्यायरूपाने नाही, इतर कोणत्याही समयामध्ये नाही, ही तिची नास्ति झाली-नास्तिचे कथन झाले.

समजा, एखाद्या द्रव्याची १०१ क्रमांकाची वर्तमान पर्याय आहे. तिचा पूर्वीच्या सर्व १०० पर्यायांमध्ये अभाव आहे यास प्रागभाव म्हणतात आणि या वर्तमान १०१ क्रमांकाच्या पर्यायाचा १०२ क्रमांकाच्या पर्यायापासून भविष्यकालीन सर्व पर्यायांमध्ये अभाव आहे यास प्रध्वंसाभाव म्हणतात. येथे उदाहरणादाखल पूर्वीच्या १०० पर्याय म्हटले आहे परंतु तुम्हाला तर माहितच आहे की सर्व द्रव्य अनादिकाळापासून आहेत व अनंतकाळापर्यंत रहातात. म्हणून प्रागभाव म्हणताच पूर्वकालीन म्हणजे अनादिपासून एक समय पूर्व पर्यंतच्या सर्व पर्यायांमध्ये अभाव असे समजावे. तसेच प्रध्वंसाभाव म्हणताच एक समयानंतरच्या पर्यायापासून भविष्यातील अनंतकाळापर्यंतच्या सर्व पर्यायातील अभाव समजावा.

हे दोन्ही अभाव केवळ जीव आणि पुद्गल द्रव्यांच्या पर्यायांपुरते मर्यादित नसून सहाही द्रव्यांच्या पर्यायांमध्ये लागू होतात.

प्रत्येक द्रव्याची वर्तमान पर्याय सत् आहे, विद्यमान आहे. तिची सत्ता आहे, अस्ति आहे, सद्भाव आहे. वर्तमान एक समय सोडून अनादिपासूनच्या सर्व पर्यायांमध्ये व अनंतकालच्या सर्व पर्यायांमध्ये हिचा अभाव आहे, नास्ति आहे. या पर्यायासारखी दुसरी पर्याय होऊ शकते परंतु हीच पर्याय होऊ शकत नाही. कारण जी या वर्तमान समयातच उत्पन्न झाली आहे तिचे भूतकाळामध्ये अस्तित्व कसे असेल? आणि जी या वर्तमान समयानंतर रहाणारच नाही, जिचा व्यय होईल तीच पर्याय भविष्यात कशी बरे राहील?

येथे अस्ति व नास्ति, सद्भाव व अभाव एका वर्तमान पर्यायावरच आपण घटित करत आहोत. वर्तमान पर्यायाचा

वर्तमान पर्यायामध्ये सद्भाव आहे, अस्ति आहे, आणि हिचा भूतकालीन व भविष्यकालीन सर्व पर्यायांमध्ये अभाव आहे, नास्ति आहे. ध्यान देऊन पहा, या वर्तमान समयामध्ये वर्तमान पर्यायाचा सद्भाव आहे, अस्ति आहे आणि याच समयामध्ये तिचा भूतकालीन व भविष्यकालीन सर्व पर्यायांमध्ये अभाव आहे, नास्ति आहे. येथे अस्ति आणि नास्ति एकाच पर्यायावर एकाच समयामध्ये घटित करत आहोत. वर्तमान पर्यायामध्ये अस्ति आणि नास्ति हे दोन्ही धर्म एकाचवेळी आहेत, युगपत् आहेत.

यासाठी प्रागभाव आणि प्रध्वंसाभाव यांच्या व्याख्या पुन्हा एकदा पहा. येथे 'चा' हा प्रत्यय वर्तमान पर्यायाला लावला आहे आणि 'त' किंवा 'मध्ये' हा प्रत्यय भूत व भविष्य पर्यायाला लावला आहे. वर्तमान पर्यायाचा भूत आणि भविष्य पर्यायांमध्ये अभाव सांगितला जात आहे. म्हणून व्याख्या याच पद्धतीने पाठ करा.

तुम्ही विचाराल, 'भूतकालीन पर्यायांचा देखील वर्तमान पर्यायामध्ये अभाव आहे व भविष्यकालीन पर्यायांचा देखील वर्तमान पर्यायामध्ये अभाव आहे. तर मग आम्ही 'चा' व 'मध्ये' हे प्रत्यय कोठेही जोडू, त्याने काय फरक पडणार आहे?'

हे पहा, वर्तमान पर्यायांमध्ये त्यांचा अभाव आहे याला कोण नाकारत आहे? परंतु आपले प्रयोजन तर वर्तमान पर्यायाची अस्ति-नास्ति, तिचा सद्भाव-अभाव सिद्ध करणे हे आहे.

कार्य वर्तमान समयातच होत असते म्हणून आपल्याला वर्तमानाकडेच पहावे लागेल. आपण सदा सर्वदा मनामध्ये काही ना काही विचार करत बसतो. आपण भूतकाळासंबंधी तरी नाहीतर भविष्यकाळासंबंधी तरी संकल्प विकल्प करत रहातो. भूतकाळातील सुखद प्रसंगांचे स्मरण करून हर्षित होतो किंवा दु:खद प्रसंगांचे स्मरण करून दु:खित होतो, अथवा भविष्यासंबंधीची मनोरथं करण्यात गुंग होऊन जातो. अशा रीतीने वर्तमान पर्याय यातच वाया जाते.

भूतकाळात ज्या घटना घडून गेल्या आहेत त्यांच्यामध्ये तर आपण काही बदल करू शकत नाही. भविष्यकाळ अजून आला नाही तर त्यात आपण काय करणार ? म्हणून भूतकालीन व भविष्यकालीन पर्यायांवरून दृष्टि हटवून या वर्तमान पर्यायाचे लक्ष त्रिकाल एकरूप रहाणाऱ्या आपल्या ध्रुवस्वभावावर एकाग्र

करण्याने व त्यालाच जाणत राहिल्याने, त्यामध्ये अभेद एकाकार झाल्याने आत्मानुभूति प्रकट होईल, अतींद्रिय आनंदाची प्राप्ति होईल.

अजूनपर्यंत आपण दोनच अभावांची चर्चा केली आहे. या अभावांना जाणल्याने पर्यायांची स्वतंत्रता लक्षात येते. प्रत्येक द्रव्याची प्रत्येक पर्याय स्वतंत्र आहे. एकाच द्रव्याच्या प्रत्येक पर्यायाचा त्याच द्रव्याच्या इतर सर्व पर्यायांमध्ये अभाव आहे - ही गोष्ट लक्षात आल्याने वस्तुस्वातंत्र्य-वस्तुची स्वतंत्रता सिद्ध होते. वर्तमान पर्यायाचा इतर पर्यायांमध्ये अभाव आहे तर मग ती त्यांमध्ये हेराफेरी करेल, त्यांचा नाश करेल किंवा लवकर आणेल हे कसे शक्य आहे? भूतकाळाची व भविष्यकाळाची चिंता सोडून आपण वर्तमान काळात आपले कार्य करत राहू तर आकुलता कमी होईलच.

एखाद्या व्यक्तीने भूतकाळी खूप पाप केले आहे व आता तो धर्म प्राप्त करू इच्छितो, अशावेळी जर तो स्वत:ला हीन, दीन, पापी समजत राहिला, पश्चात्तापाचे अश्रू गाळत बसला तर त्याचे धर्म प्रकट करण्याचे कार्य कधी होईल? त्या व्यक्तीला घाबरण्याचे काहीच कारण नाही. अभावांचे स्वरूप जाणून, प्रागभावाचे स्वरूप समजून ती व्यक्ति वर्तमान पर्यायात धर्म प्रकट करू शकते - सम्यग्दर्शनाची प्राप्ति करू शकते.

वर्तमान पर्यायात मिथ्यात्व आहे म्हणून देखील निराश होण्याची आवश्यकता नाही, कारण या मिथ्यात्व पर्यायाचा भविष्यकालीन पर्यायामध्ये अभाव आहे-प्रध्वंसाभाव आहे. हे मिथ्यात्व पण एका समयाचे आहे, अनादिपासून एक एक समय करत चालत आले आहे म्हणून काही हे जरूरी नाही की ते अनंतकाळापर्यंत राहील.

कारण-कार्य व्यवस्थेमध्ये कार्य कधी होईल या गोष्टीचे ज्ञान आपणास होते अर्थात कार्य नेहमी वर्तमान पर्यायातच होत असते. आत्ता या समयाला कार्य करायचे आहे. भविष्याचे वायदे कधी करू नका. जो जीव भविष्यात विशिष्ट कार्य करेन असे म्हणतो त्याचा भविष्यकाळ नेहमी भविष्यातच रहातो, कधी तो वर्तमानात येत नाही. हे कार्य मी आज नाही पण उद्या करेन असे म्हणणाऱ्याचा उद्या कधी उजाडतच नसतो.

अजून तर मला मुलांना मोठं करायचंय, अजून तर व्यापार धंदा करायचाय, अजून जरा संसारातली मौजमजा लुटू द्या

म्हातारपणी हे करायचेच आहे, सध्या जरा सामाजिक कार्य करतो, अजून मी इतरांना जिनवाणी शिकवतो अशाप्रकारची इतर अनेक कार्यं करू इच्छितो. मी आत्ता या समयातच निराकुल सुखाची प्राप्ति करेन, धर्म अर्थात मोक्षमार्ग - सम्यग्दर्शन प्रकट करेन असे कोणीदेखील म्हणत नाही.

काही लोक विचारतात, 'सध्या तर आम्ही जिनागमाचा एवढा अभ्यास करत आहोत. आता सम्यग्दर्शन नाही झाले तरी हे संस्कार तर पुढे रहातील ना? हे संस्कार तर कामी येतील ना?' अरे बाबा! संस्कारातच का संतुष्ट होत आहेस? कार्य अर्थात धर्म प्रकट करण्याची जिद्द का नाही ठेवत? प्रध्वंसाभाव तर भविष्यकालीन पर्यायामध्ये अभाव दर्शवितो. वर्तमान पर्याय रहाणार नाही, तिचा अभाव आहे परंतु संस्कार मात्र रहाणार - ही कसली विचित्रता!

भविष्यात मला मोक्ष पर्याय प्रकट करायची आहे, करायची आहे असे म्हणत पर्यायाचे लक्ष करण्याने देखील कार्य प्रकट होत नसते. सध्या मी मोक्षाची इच्छा करत आहे, भविष्यकाळात मी मोक्ष प्रकट करेन, आत्ता मी सम्यग्दर्शनाची इच्छा करत आहे मग भविष्यकाळात सम्यग्दर्शन प्रकट होईल ही मान्यता चुकीची आहे.

वर्तमान पर्यायात तर तो इच्छारूपी चारित्र गुणाची विभाव पर्याय करू पहातो व करतो आणि त्याच्या कारणाने भविष्यामध्ये स्वभावरूप शुद्ध पर्याय प्रकट होईल असे मानतो.

आपण गोष्टी तर सम्यग्दर्शनाच्या आणि मोक्षाच्या करतो परंतु वर्तमानकाळामध्ये कार्य कोणते करत आहोत याकडे कोणी लक्ष देत नाही. शुभाशुभ भावरूप कार्य करून शुद्धभावरूप कार्य इच्छितो. पर्यायामधून तर पर्याय येत नाही . पर्याय ही विशेष आहे ती सामान्यामधूनच येते. सामान्य आणि विशेष यांचा अविनाभाव आहे. विशेष बदलत रहातात व सामान्य सदैव एकसारखा रहातो. सामान्य तर त्रिकाल, एकरूप, अभेद, नित्य, द्रव्यस्वभाव आहे, जो शुद्ध आहे. पर्याय जेव्हा या द्रव्यस्वभावाचे लक्ष करते, त्यामध्ये आपलेपणा स्थापित करते, त्याच्याशी अभेद एकाकार अनुभव करते तेव्हा त्यासारखी शुद्ध होते, पर्यायामध्ये अनंत गुणांचे वेदन - अतींद्रिय आनंदाची प्राप्ति होते. स्वभाव पर्याय प्रकट होते. या कार्याच्या कारणांची चर्चा तर

आपण विस्ताराने करणारच आहोत. सध्या तर आपला चार अभाव हा विषय चालू आहे.

तुम्ही विचाराल की, 'जर आम्ही प्रागभाव आणि प्रध्वंसाभाव यांना मानले नाही तर काय बिघडेल? कोणता दोष येईल?'

(१) प्रागभाव मानला नाही तर कार्य अनादिचे आहे असा अर्थ निघेल. आपण पाहिले होते की पर्याय अर्थात कार्य प्रत्येक समयामध्ये नवे नवे उत्पन्न होते आणि पूर्वपर्यायाचा व्यय होतो. या समयातील कार्य भूतकाळात नाही, वर्तमान पर्यायाचा भूतकाळाच्या पर्यायामध्ये अभाव आहे. जर आपण या अभावाला मानले नाही व वर्तमान पर्यायाचा त्याच्या पूर्वीच्या एका पर्यायामध्ये देखील सद्भाव मानला तर त्याही पूर्वीच्या पर्यायामध्ये सद्भाव मानावा लागेल, मग त्याहीपेक्षा पूर्वीच्या पर्यायामध्ये.....असे होत होत अनादिकाळापूर्वीच्या पर्यायामध्ये देखील सद्भाव मानावा लागेल. त्यामुळे कार्य अनादिचे आहे असे मानावे लागेल हा दोष उपस्थित होईल.

पुन्हा नीट लक्ष द्या. येथे कार्याला - पर्यायाला क्षणिक अर्थात एक समयाचे म्हणण्यात येत आहे, द्रव्याला नाही. द्रव्यालाच क्षणिक मानाल तर सर्वथा क्षणिकवादाची मिथ्या मान्यता होईल.

(२) जर प्रध्वंसाभावाला मानले नाही तर कार्य अनंतकाळापर्यंत रहाण्याचा प्रसंग उपस्थित होईल. वर्तमान पर्यायाचा भविष्यकाळाच्या पर्यायामध्ये अभाव नाही मानला तर ही पर्याय आगामी काळात देखील चालू राहील अर्थात वर्तमानाचे कार्य अनंतकाळापर्यंत चालू राहील.

कोणी रोगी असेल तर त्याची रोगी अवस्था भविष्यकाळात देखील चालू राहील. जो मिथ्यात्वी आहे त्याची मिथ्यात्व ही पर्याय भविष्यकाळात देखील चालू राहील. जो दु:खी आहे तो दु:खीच राहील, मुलं कधी मोठी होणार नाहीत, वृद्ध लोक कधी मरणार नाहीत, गरीब सदैव गरीबच रहातील, धनवान बनणार नाहीत.

धनाची गोष्ट ऐकताच प्रध्वंसाभाव खरा आहे असे वाटू लागले, होय ना? कारण गरीब असो की धनवान, सर्व लोक अधिक धन कमावण्याची इच्छा करतात.

तुम्ही विचाराल, 'मग एवढे सारे शिकून काय फायदा? जर ज्ञानाची ही पर्याय भविष्यामध्ये रहाणार नसेल, या ज्ञानाचा

देखील लोप होणार असेल तर मग आम्ही शिकणारच नाही.'

फार छान! प्रध्वंसाभावाचे हे सूत्र इतर सर्वच ठिकाणी का नाही लावत? फक्त शास्त्रज्ञानावरच का लावत आहात?

पर्यायांच्या क्षणिकतेचे खरोखरीच भान झाले असेल तर वर्तमान पर्यायाला त्रिकाली ध्रुव अशा स्वतःच्या सामान्यावर समर्पित करा, ही पर्याय रहाणार नाही आगामी पर्याय वर्तमानरूप होईल तिला देखील या कार्यामध्ये जुंपा. पहा मग अतींद्रिय आनंदाची प्राप्ति होईल.

तुम्ही म्हणाल, 'आम्ही जे जे शिकलो होतो ते सर्व मला आज पण पाठ आहे. भूतकालीन पर्याय राहिली नाही पण ज्ञान तर राहिले ना?'

हे पहा, प्रतिसमयाची ज्ञानपर्याय ते सर्व जाणणेरूप कार्य नवे नवे करत आहे. सर्वज्ञाचे सुद्धा दर समयाला नवे नवे केवलज्ञान उत्पन्न होत रहाते, एकदा सारे जाणले तेच स्मरणात राहिले असे नाही. प्रत्येक समयाचे केवलज्ञान देखील व्यय होऊन नवे नवे केवलज्ञान उत्पन्न होत रहाते. परंतु ते कधीच अल्पज्ञानरूप होत नाही, अनंत काळापर्यंत तसेच्या तसे होत रहाते म्हणून त्याला ध्रुवदेखील म्हटले जाते, सिद्धदशेला देखील ध्रुव म्हटले जाते, जेथे जी अपेक्षा आहे ती बरोबर समजली पाहिजे.

आचार्यांना जीवांची अपार करुणा आहे. जे जीव भयभीत होतात त्यांना सांगतात की घाबरू नका, आत्ता तुम्ही सारे जाणून घ्या तर हे सारे संस्कार भविष्यामध्ये देखील कायम रहातील. जे जीव संस्काराची गोष्ट ऐकून तेवढ्यावरच संतुष्ट होतात, त्यांना म्हणतात की तुमचे मिथ्यात्वाचे संस्कार देखील अनादिचे आहेत. तुम्हाला ते संस्कार मिटविण्यासाठी आणि सम्यग्दर्शनरूपी कार्य करण्यासाठी अपूर्व पुरुषार्थ करावा लागेल.

चार अभावांपैकी प्रागभाव आणि प्रध्वंसाभावाची चर्चा आपण केली. आता अन्योन्याभाव व अत्यंताभावाची चर्चा आपण आगामी पत्रामध्ये करूया.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# चार अभाव - भाग २.

पत्रांक ५ २० एप्रिल २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

मुलींनो, तुम्ही म्हटलं आहे, 'लहानपणाचा अभाव झाल्याने आम्हाला दु:ख होत आहे, आई, तुझा व दादांचा दोघांचा इथे आमच्या सासरी अभाव असल्याने डोळ्यात अश्रू येतात.' तुम्ही विचारले देखील आहे की, 'आम्हा दोघींचा अभाव तुम्हा दोघांना खटकत नाही का? आमच्या शिवाय तुम्हाला घर सुने सुने वाटत नाही का?'

या लौकिक गोष्टींच्या अभावांचा विचार केला असता रागाचेच-कषायांचेच पोषण होते, आकुलता व दु:खच उत्पन्न होते. या उलट, शास्त्राच्या अनुसार या चार अभावांचे यथार्थ ज्ञान झाल्यावर वीतरागतेचे पोषण होते, आकुलता समाप्त होते, निराकुलतेची प्राप्ति होते, शांति आणि समाधान प्राप्त होते. जैन सिद्धांतांचे तर हेच वैशिष्ट्य आहे की त्या सिद्धांतांचे ज्ञान झाल्याने आत्मसन्मुखता तर होतेच पण त्याचबरोबर आपल्या लौकिक जीवनामध्ये देखील संतोष, समाधान आणि शांति वाढत जाते.

लौकिक जीवनात तर आम्हाला अभाव खटकतच असतात, अशांति उत्पन्न करत असतात. पैशांचा अभाव, पदवीचा अभाव, मान सन्मानाचा अभाव, रूप सौंदर्याचा अभाव, निरोगतेचा अभाव, अपत्यप्राप्तीचा अभाव, पत्नीचा अभाव, पतिचा अभाव, नोकरांचा अभाव, नोकरी धंद्याचा अभाव, घरादाराचा अभाव, गाडीचा अभाव.....न जाणो आणखी कितीतरी अभाव! त्यांच्यावरच आपले लक्ष वारंवार जाते आणि आपण संतोष व समाधान हरवून बसतो.

हे सर्व तर पर आहेत, संयोग आहेत. आजपर्यंत या संयोगांनाच आपण आपले ऐश्वर्य मानले होते. परद्रव्यांचा क्षणभंगुर संयोग आपले ऐश्वर्य होऊ शकत नाही. प्रत्येक द्रव्य

आपल्या अनंत गुणांच्या ऐश्वर्याने युक्त आहे आणि हे ऐश्वर्य अनादि अनंत कायम रहाते. बाह्य संयोग मिळाले तरी काय होणार? आपला तर या सर्व परद्रव्यांमध्ये अभावच आहे आणि या परद्रव्यांचा आपल्यामध्ये अभाव आहे, तर मग यांच्यामुळे आपण महान कसे म्हटले जाऊ शकतो? या सर्वांचा एकमेकांमध्ये कोणता अभाव आहे त्याची आपण आज चर्चा करूया.

**अन्योन्याभाव** - एका पुद्‌गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा दुसऱ्या पुद्‌गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायामध्ये अभाव आहे, तो अन्योन्याभाव आहे. अन्योन्य अभाव म्हणजे एकमेकांमध्ये अभाव. येथे देखील वर्तमान पर्यायाचीच गोष्ट चालली आहे. परंतु फक्त पुद्‌गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायाबाबतीतच हा अभाव लागू पडतो, इतर द्रव्यांच्या पर्यायाबाबतीत नाही.

कारण-कार्य व्यवस्थेच्या चर्चेमध्ये आपण पहातो की कार्य म्हणजे पर्याय तर द्रव्याची अवस्था आहे. ती पर्याय स्वपणे आहे ही तिची अस्ति आहे आणि हीच पर्याय परपर्यायिरूपाने नाही ही त्याच पर्यायाची नास्ति आहे. प्रागभाव आणि प्रध्वंसाभावामध्ये तर प्रत्येक द्रव्याच्या वर्तमान पर्यायाचा भूत आणि भविष्य पर्यायांमध्ये अभाव अर्थात नास्ति असते याची चर्चा तर आपण केली होती.

आता येथे दोन पुद्‌गल द्रव्यांच्या वर्तमान पर्यायांचा जो आपापसात - एकमेकांमध्ये अभाव आहे त्या अन्योन्याभावाची चर्चा चालू आहे.

प्रत्येक द्रव्य आपल्या पर्यायाचा कर्ता आहे. द्रव्य कर्ता आहे व पर्याय त्याचे कार्य अथवा कर्म आहे. कर्ता कर्म संबंध प्रत्येक द्रव्याचा आपल्या पर्यायाशी असतो. द्रव्य देखील नेहमी आपल्या स्वचतुष्टयामध्ये रहाते तर त्याची पर्यायदेखील त्याच द्रव्यामध्ये आणि त्याच क्षेत्रामध्ये एक समयापुरती रहाते. प्रत्येक पर्यायाची स्वत:मध्ये अस्ति आहे आणि परपर्यायामध्ये नास्ति आहे, अभाव आहे.

सहा द्रव्यांमध्ये जीव, धर्म, अधर्म, आकाश आणि काल तर अरूपी द्रव्य आहेत. पुद्‌गल द्रव्यच फक्त रूपी द्रव्य आहे जे इंद्रियांद्वारे जाणले जाऊ शकते. परंतु इद्रियंदेखील परमाणुंना जाणू शकत नाहीत, अनंत परमाणुंच्या बंधाने तयार होणाऱ्या

स्कंधांना जाणतात. स्कंधांनादेखील आपण पुद्‌गलच म्हणतो. वास्तविक पहाता स्कंध तर पुद्‌गल द्रव्याची पर्याय आहे, जिला समानजातीय द्रव्यपर्याय म्हणतात.

हे स्कंध बनतात व विखुरले जातात, ते स्वतःच्या योग्यतेने बनतात व विखुरतात. त्यातील प्रत्येक परमाणुची पर्याय त्याच्या स्वतःमुळे होते. असे असताना देखील जे जीव कारण-कार्य व्यवस्थेविषयी अनभिज्ञ आहेत, ज्यांना निमित्त नैमित्तिक संबंधाविषयी काही ज्ञान नाही त्यांना असेच प्रतीत होत असते की एका पुद्‌गल स्कंधामुळे अर्थात पुद्‌गलाच्या पर्यायामुळे दुसऱ्या पुद्‌गलाची पर्याय होत आहे किंवा होत असते. शास्त्रातदेखील निमित्ताचे ज्ञान करविण्यासाठी निमित्त नैमित्तिक संबंध सांगणारी अनेक कथनं येतात. उदाहरणार्थ, नामकर्माच्या कारणाने शरीराची रचना होते, साता-असाता कर्मांच्या कारणाने जीवाला सुखदु:खरूप संयोग प्राप्त होतात वगैरे.

या कथनांचा योग्य अर्थ ज्ञात होण्यासाठी आज आपण अन्योन्याभावाची चर्चा करूया व त्यानंतर काही दिवसांनंतर निमित्त म्हणजे काय आहे, निमित्त नैमित्तिक संबंध काय आहे व कसा होतो इत्यादि विषयांवर विस्तृत विवेचन करेन.

अन्योन्याभावामुळे आपल्या हे लक्षात येते की एका पुद्‌गल स्कंधाचा दुसऱ्या पुद्‌गल स्कंधामध्ये अभाव आहे. याचे उदाहरण पहा.

हात एक पुद्‌गल स्कंध आहे, पेन हा दुसरा पुद्‌गल स्कंध आहे, शाई तिसराच स्कंध आहे आणि कागद तर त्याहूनही निराळा स्कंध आहे. या साऱ्या स्कंधांचा एकमेकांमध्ये अन्योन्याभाव आहे, त्यांची एकमेकांमध्ये नास्ति आहे व त्यांची त्यांच्या स्वतःमध्ये अस्ति आहे. ज्यांची जेथे उपस्थितिच नाही तेथले कार्य ते कसे बरे करू शकतील? शास्त्रामध्ये तर वर्णन येते की एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याला स्पर्शसुद्धा करत नाही. चालताना पाय जमिनीला शिवत देखील नाहीत. हे ऐकून तुम्ही म्हणाल, 'आई, तू आम्हाला मूर्ख समजतेस की काय गं? तू खूप सांगशील पण आम्ही त्याला विनाकारण मानणार नाही.'

मुलींनो, आपण येथे लौकिक भाषा बोलत नसून आगमाची व अध्यात्माची चर्चा-वार्ता करत आहोत. आपण अनेक वेळा पाहिले होते की प्रत्येक द्रव्याचे आपले स्वत:चे स्वचतुष्टय असते - स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वकाल आणि स्वभाव असतो. कोणतेही द्रव्य त्याचे स्वचतुष्टय सोडून परचतुष्टयामध्ये म्हणजे परद्रव्याच्या त्याच्या स्वत:च्या चतुष्टयामध्ये प्रवेश करू शकत नाही. यालाच शास्त्राच्या भाषेमध्ये असे म्हणतात की एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याला स्पर्श सुद्धा करू शकत नाही.

आपण पहातो की भिंतींच्या आधाराने छत आहे, जमिनीच्या आधाराने टेबल आहे, टेबलाच्या आधाराने कागद ठेवले आहेत, पोळपाटाच्या आधाराने पोळी लाटली जात आहे. परंतु आचार्य या गोष्टींना नाकारतात, तसे होत नाही असे प्रतिपादन करतात. ते सांगतात की हे तर सर्व स्कंध आहेत, पुद्गलाच्या पर्याय आहेत, त्यांचा एकमेकांमध्ये अभाव आहे, अन्योन्याभाव आहे. पोळी बनण्याचे कार्य त्या पोळीमध्ये स्वत:मध्ये होत आहे त्यावेळी खालचे पोळपाट त्याजागी स्थिर रहाण्यारूप कार्य त्याच्या स्वत:मध्ये करत आहे, लाटणे पुढे मागे होते हे लाटण्याचे कार्य लाटण्यात होत आहे, हातांची विशिष्ट क्रिया हातांमध्ये होत आहे या सर्व कार्यांचा अर्थात पुद्गलाच्या वर्तमान पर्यायांचा एकमेकांमध्ये अभाव आहे - अन्योन्याभाव आहे.

आपल्याला असेच भासते की आपण जीभ, ओठ, स्वरयंत्र इत्यादिंची हालचाल करून आवाज काढतो, बोलतो, सुरेल गाणे गातो. परंतु तुम्हीच विचार करा की शरीर आहारवर्गणा आहे आणि शब्द भाषावर्गणा आहे, दोहोंचा एकमेकांमध्ये अन्योन्याभाव आहे. तर मग एकामुळे दुसऱ्याचे कार्य झाले हे कसे शक्य आहे? ते देखील एकमेकांमध्ये अभावरूप आहेत, एकमेकांचे कार्य करत नाहीत आणि आपण जीव द्रव्य त्यांचे कार्य करतो ही गोष्ट तिन्ही काळात होऊ शकत नाही.

आपल्याला वाटते औषध खाण्याने रोग बरा झाला, रोग तर शरीराची अवस्था आहे. शरीर एक पुद्गल स्कंध आहे आणि औषध दुसरा पुद्गल स्कंध, त्यांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे. औषधावरून एक गोष्ट आठवली. तुम्हाला माहितच आहे

की पुण्यामध्ये आम्ही दोघांनी - मी व तुमच्या दादांनी - आठ वेळा शिबिरं घेतली होती. तेथे छोटी छोटी मुलं देखील आता तत्त्वज्ञानाच्या बाबतीत तरबेज झाली आहेत, तत्त्वज्ञानाच्या भाषेत बोलतात, रोजच्या जीवनात देखील तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने विचार करतात. सुरवातीला अनेक आयांच्या तक्रारी येऊ लागल्या की 'आमची मुलं (पीयूष शहा, आशित दोशी वगैरे) औषधं खायला नकार देतात, निमित्ताने काही देखील होत नाही म्हणतात, येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांना सुद्धा शिकवत बसतात की एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे काहीही करत नाही. तत्त्वज्ञान शिकवून तर तुम्ही आमच्या समोर नव्या समस्या उभ्या केल्यात, आम्हाला अडचणी निर्माण केल्यात. आता तुम्हीच हे सारे निस्तरा.'

त्यावेळी मुलांना योग्य भाषेत समजावून सांगितले होते. खरे तर त्यांच्या आयांना समजावणे तेवढेच जरूरी होते. तुम्ही दोघी आता दोन दोन मुलांच्या आई झालात. तुम्हीच सांगा तुमची मुलं जेव्हा चालायला शिकू लागली होती तेव्हा पुन्हा पुन्हा पडत देखील होती आणि पुन्हा उठून चालण्याचा प्रयत्न देखील करत होती. तुम्ही त्यांना चालण्यापासून परावृत्त केले होते का? नाही ना? कारण तुम्ही जाणत होता की प्रयत्न करणारे हे मूल आता थोड्याच दिवसात नीट चालू लागणार आहे. त्याचप्रमाणे तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्यांचा सुरवातीला काही घोटाळा होतो, अति उत्साहाने ते सर्वांना सांगू इच्छितात परंतु म्हणून काही त्यांना तत्त्वज्ञानापासून वंचित ठेवणे, त्यापासून परावृत्त करणे योग्य होणार नाही.

पुद्गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायामध्ये अन्योन्याभाव असतो तरी देखील त्यांच्यात निमित्त नैमित्तिक संबंध आढळतो. जेव्हा जेव्हा कोणतेही कार्य होते तेव्हा तेव्हा निमित्ताची उपस्थितिदेखील असतेच परंतु निमित्त कार्यामध्ये काहीही करत नाही. निमित्ताचा निषेध करायचा नसून निमित्तामुळे कार्य होते या मान्यतेचा निषेध करायचा आहे. कार्यामध्ये योग्य निमित्त असतात. जर त्यांचा स्वीकारच केला नाही तर ज्ञान खोटे ठरेल व निमित्ताने कार्य होते असे मानले तर श्रद्धा खोटी ठरेल. या विषयाची चर्चा तर नंतर करणारच आहे.

जेव्हा शास्त्रात आपण वाचतो की पुण्यकर्माच्या फळामध्ये संपत्ति, चांगले संयोग वगैरेंची प्राप्ति होते तेव्हा शास्त्रानुसार हे देखील जाणणे आवश्यक आहे की हे निमित्त कथन आहे. पुण्यकर्म कार्माणवर्गणा आहे, बाह्य संयोग आहारवर्गणा आहे, दोघांमध्ये अन्योन्याभाव आहे.

आपण तर येथे स्थूल स्कंधांची उदाहरणं पाहिली, वास्तविक पहाता एकाच स्कंधाच्या प्रत्येक पुद्‌गल परमाणुच्या वर्तमान पर्यायाचा इतर परमाणुंच्या वर्तमान पर्यायांमध्ये अन्योन्याभाव आहे. परमाणुंच्या बंधासंबंधी आपण फार पूर्वी चर्चा केली होती. पुद्‌गलाच्या स्पर्श गुणाच्या पर्यायांपैकी स्निग्ध आणि रुक्ष गुणांमुळे अर्थात स्निग्धता व रुक्षता यांच्या अंशांमुळे बंध होतो. रुक्ष परमाणुचा दोन गुण अधिक रुक्ष परमाणुशी किंवा दोन गुण अधिक स्निग्ध परमाणुशी बंध होतो. तद्वतच स्निग्धाचा दोन गुण अधिक स्निग्ध किंवा रुक्ष याच्याशी बंध होतो. बंध होताच कमी रुक्षता किंवा स्निग्धतावाले परमाणु अधिक स्निग्धता किंवा रुक्षतावाल्या परमाणुंच्या समान स्निग्धता किंवा रुक्षता धारण करतात.

येथे कोणी म्हणू शकतो की, 'पहा, अधिक रुक्षतावाल्या परमाणुंशी बंध झाल्यामुळेच कमी रुक्षता किंवा स्निग्धतावाले परमाणु सुद्धा अधिक रुक्षतावाले बनले.'

परंतु अन्योन्याभावाचे स्वरूप समजल्याने हे लक्षात येते की प्रत्येक परमाणुच्या पर्यायाची इतर सर्व परमाणुंच्या पर्यायांमध्ये नास्ति आहे. तर मग त्यांच्या कारणाने याच्या स्पर्शगुणातील रुक्षता किंवा स्निग्धता वाढली असे होऊ शकत नाही.

**अत्यंताभाव** - एका द्रव्याचा इतर द्रव्यांमध्ये त्रिकाल अभाव आहे यास अत्यंताभाव असे म्हणतात. हा अभाव सहाही द्रव्यांच्या बाबतीत लागू पडतो.

प्रत्येक द्रव्य स्वतंत्र आहे. प्रत्येक द्रव्य आपल्या स्वचतुष्टयामध्ये आहे, प्रत्येक द्रव्याची स्वतःमध्ये अस्ति आहे, सत्ता आहे परंतु प्रत्येक द्रव्याची इतर सर्व द्रव्यांमध्ये नास्ति आहे, अभाव आहे.

आता येथे पर्यायातील अभाव न सांगता द्रव्यांमधील अभाव सांगत आहे. एका जीव द्रव्याचा इतर जीव द्रव्यांमध्ये तसेच इतर पाच द्रव्यांमध्ये अभाव आहे - अत्यंताभाव आहे. एका पुद्गल परमाणुचा इतर पुद्गल परमाणुंमध्ये तसेच इतर पाच द्रव्यांमध्ये अभाव आहे. एका काल द्रव्याचा इतर कालद्रव्यांमध्ये तसेच इतर पाच द्रव्यांमध्ये अभाव आहे. धर्म द्रव्याचा इतर पाच द्रव्यांमध्ये, अधर्म द्रव्याचा इतर पाच द्रव्यांमध्ये आणि आकाश द्रव्याचा इतर पाच द्रव्यांमध्ये अभाव आहे.

तुम्ही म्हणाल, 'इतर पाचही द्रव्य आकाश द्रव्यामध्ये - लोकाकाशात रहातात. आकाश द्रव्य त्यांना अवगाहन देते, तरीही अभाव आहे? आकाश द्रव्य तर सर्वत्र-सर्वव्यापी आहे ना?'

होय, हेच तर सांगत आहे. दोन किंवा अधिक द्रव्य एकाच क्षेत्रामध्ये रहातात त्यास एकक्षेत्रावगाह संबंध म्हणतात. असे असताना देखील प्रत्येकाचे स्वत:चे स्वचतुष्टय भिन्न भिन्नच रहाते, प्रत्येकाचे आपले अस्तित्व भिन्नच रहाते. काचेमधून प्रकाश आरपार जातो, तरीदेखील काचेचे अस्तित्व भिन्न आहे आणि प्रकाशाचे अस्तित्व भिन्न आहे. पाण्यामध्ये कापड भिजवले तरीही पाण्याचे अस्तित्व भिन्न आहे आणि कापडाचे अस्तित्व भिन्न आहे.

आकाश द्रव्य अनंत प्रदेशी आहे. त्याचा अनंतावा भाग लोकाकाश आहे. त्यामध्ये इतर पाच द्रव्य एकक्षेत्रावगाह संबंधाने रहातात. तरीदेखील आकाश द्रव्याचा त्या इतर द्रव्यांमध्ये अत्यंताभाव आहे.

प्रत्येक द्रव्याचा इतर सर्व द्रव्यांमध्ये अभावच आहे. तर मग कोणतेही द्रव्य इतर द्रव्यांमध्ये काहीही हेराफेरी, मदत, असर, सहाय्य किंवा त्यांचे कार्य कसे करू शकतील?

आपण पहातो की एखाद्या व्यक्तिवर खुनाच्या आरोपाखाली खटला चालू असेल आणि जर तो हे शाबित करेल की जेव्हा खून झाला होता तेव्हा तो त्या ठिकाणी हजरच नव्हता, त्यावेळी दुसऱ्या शहरात एका मीटिंगमध्ये व्यस्त होता व त्यासाठी अनेक

जणांची साक्षही तो प्रस्तुत करेल तर खुनाच्या आरोपातून त्याची मुक्तता होते, त्याला शिक्षा होत नाही. कारण त्याचा तेथे अभावच होता.

त्याचप्रमाणे एक द्रव्याचा दुसऱ्या द्रव्यामध्ये अत्यंताभाव असल्या कारणाने ते इतर कोठल्याही द्रव्याचे कार्य करेल, त्याची पर्याय करेल ही गोष्ट तिन्ही काळात कधी होऊ शकत नाही.

आपण कार्य तर कोणते ना कोणते करू इच्छितो. खरं सांगायचं तर आपण अनादिकाळापासून पराचे कार्य करण्याची बुद्धि - पराची कर्तृत्वबुद्धि बाळगत आलो आहोत. पराचे कार्य तर एक समयदेखील कोणी करू शकत नाही परंतु हा जीव मिथ्यात्वाच्या कारणाने असेच मानत आला आहे. प्रत्येक द्रव्याचे प्रत्येक समयाचे कार्य त्याच्या स्वत:मध्ये स्वत:मुळेच होत आहे. परंतु अज्ञानी मानतो की मीच या कार्यांचा कर्ता आहे.

चार अभावांचे स्वरूप आता तुमच्या लक्षात आलेच असेल. त्याची पुन्हा उजळणी करूया. अत्यंताभाव सहाही द्रव्यांमध्ये एकमेकांमध्ये असतो. तो एका द्रव्याचा इतर सर्व द्रव्यांमध्ये अभाव  सांगणारा आहे.

प्रागभाव व प्रध्वंसाभाव सहाही द्रव्यांच्या वर्तमान पर्यायांचा त्याच द्रव्यांच्या भूत व भविष्य पर्यायांमध्ये अभाव सांगतात.

अन्योन्याभाव फक्त पुद्गल द्रव्यांच्या वर्तमान पर्यायांचा एकमेकात अभाव सांगतो.

तर आता मला सांगा की चारही अभाव कोणत्या द्रव्यावर घटित होतात? विचारात काय पडलात? पुद्गल द्रव्यावरच चारही अभाव लागू होतात.

आता या चार अभावांना मानले नाही तर कोणता दोष येईल ते पाहूया.

(१) प्रागभाव मानला नाही तर कार्य अनादिचे ठरेल.

(२) प्रध्वंसाभाव मानला नाही तर कार्य अनंतकाळापर्यंत चालू राहण्याचा प्रसंग येईल.

(३) अन्योन्याभाव मानला नाही तर एका पुद्‌गलाच्या पर्यायाचे म्हणजे कार्याचे अस्तित्व दुसऱ्या पुद्‌गलाच्या पर्यायामध्ये आढळल्याने सर्व वस्तुव्यवस्थाच बिघडून जाईल.

(४) अत्यंताभाव मानला नाही तर प्रत्येक द्रव्याची स्वतंत्रता - भिन्नता रहाणार नाही. दोन किंवा अधिक द्रव्य एकरूप होता होता सहा द्रव्यांचे भिन्न अस्तित्वच समाप्त होईल व विश्वाच्या नाशाचा प्रसंग येईल.

तुम्ही म्हणाल, 'या अभावांना मानले नाही तर काय नुकसान होईल हे तर तू सांगितलेस. परंतु यांना जाणण्याने, मानण्याने काही लाभ देखील होतो की नाही?'

या अभावांना जाणल्याने धर्मासंबंधी काय लाभ होतो ते आपण पाहूया, कारण आपले प्रयोजन तर धर्म प्रकट करणे, सम्यक्त्व प्रकट करणे, वीतरागता प्रकट करणे, मोक्षमार्गाचा आरंभ करणे हे आहे.

(१) प्रागभाव समजल्याने असे लक्षात येते की जीव अनादिकाळापासून अज्ञान, मिथ्यात्व, रागद्वेष दर समयाला नवे नवे करत आला आहे. त्याने धर्म म्हणजे वीतरागता कधी प्रकट केली नव्हती. तरीदेखील तो वर्तमान पर्यायामध्ये नवा पुरुषार्थ करून धर्म प्रकट करू शकतो कारण त्याच्या वर्तमान पर्यायाचा त्याच्या पूर्व पर्यायामध्ये अभाव आहे.

(२) प्रध्वंसाभाव समजल्याने हे लक्षात येते की वर्तमान पर्यायामध्ये धर्म केला नाही किंवा होऊ शकला नाही तरी देखील जीव भविष्यातील पर्यायामध्ये अधर्मदशेच्या व्ययपूर्वक नव्या पुरुषार्थाने धर्म प्रकट करू शकतो. कारण त्याच्या वर्तमान पर्यायाचा त्याच्या भविष्यकालीन पर्यायामध्ये अभाव आहे.

(३) अन्योन्याभाव समजल्याने हे लक्षात येते की एका पुद्‌गल द्रव्याची वर्तमान पर्याय दुसऱ्या पुद्‌गल द्रव्याच्या वर्तमान पर्यायामध्ये असर, मदत, प्रेरणा, सहाय्य, प्रभाव, हेराफेरी वगैरे काहीदेखील करू शकत नाही. जी सजातीय द्रव्याच्या पर्यायात काहीही करू शकत नाही ती पुद्‌गलाची पर्याय जीवामध्ये काही करेल, जीवाला सुखी दुःखी बनवेल हे कसे शक्य आहे?

(४) अत्यंताभाव समजल्याने विश्वव्यवस्थेचे ज्ञान होते. विश्वातील अनंत द्रव्यांपैकी प्रत्येक द्रव्य स्वपणे अस्तिरूप आहे आणि परपणे नास्तिरूप आहे. त्याच्या कार्यासाठी - पर्यायासाठी त्याला इतर द्रव्यांची मदत, असर, प्रेरणा, सहाय्य यांची गरज पडत नाही.

शास्त्रामध्ये जे अन्य द्रव्याच्या करण्या-करविण्या संबंधीचे कथन येते ते निमित्ताचे कथन आहे. अत्यंताभावाचे स्वरूप लक्षात आल्यावर आपली दृष्टि परपदार्थांवरून हटून आपल्या त्रिकाली द्रव्यावर येते आणि पर्यायामध्ये धर्माचा म्हणजे वीतरागतेचा प्रारंभ होतो, सम्यग्दर्शन प्राप्त होते.

अशाप्रकारे चार अभावांचे स्वरूप विस्ताराने जाणल्यानंतर तुमच्या कितपत लक्षात आले आहे हे जाणण्यासाठी आता मी काही प्रश्न व त्यांची उत्तरं येथे देत आहे. त्याला असेच नुसते वाचू नका. प्रत्येक प्रश्न वाचल्यावर प्रथम त्याचे उत्तर तुमच्या मनाशी ठरवा आणि नंतर उत्तर वाचून त्याच्याशी जुळते की नाही ते पहा. यामुळे स्वत: विचार करण्याची, उत्तर शोधण्याची सवय लागेल.

**प्रश्न** - तीन वेगवेगळ्या भांड्यांमध्ये एकात दूध, एकात दही व एकात ताक ठेवले आहे. त्यामध्ये कोणते व किती अभाव आहेत?

**उत्तर** - वर्तमान काळातच हे तीन वेगवेगळे पदार्थ आहेत- पुद्‌गलाच्या पर्याय आहेत म्हणून त्यांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे.

त्यांच्या एकेका परमाणुचा इतर सर्व परमाणुंमध्ये अत्यंताभाव आहे. त्या पर्यायांचा प्रत्येकाचा आपापल्या पूर्व पर्यायांमध्ये प्रागभाव आहे आणि आपापल्या भविष्य पर्यायांमध्ये प्रध्वंसाभाव आहे.

**प्रश्न** - भगवान महावीरांची वर्तमानकाळात केवलज्ञान पर्याय आहे. त्यामध्ये प्रागभाव आणि प्रध्वंसाभाव लावा.

**उत्तर** - भगवान महावीरांना तेराव्या गुणस्थानाच्या पहिल्या समयामध्ये अरहंत अवस्था प्राप्त झाली, केवलज्ञान प्रकट झाले.

त्यापूर्वी बाराव्या गुणस्थानाच्या अंतापर्यंत मतिज्ञान, श्रुतज्ञान, अवधिज्ञान आणि मन:पर्ययज्ञान (६ व्या गुणस्थानापासून बाराव्या गुणस्थानापर्यंत) होते. या वर्तमान समयापर्यंत केवलज्ञान होत आले आहे. म्हणून वर्तमानातील केवलज्ञान पर्यायाचा पूर्वीच्या केवलज्ञान पर्यायामध्ये - अरहंत अवस्थेपासून १ समय पूर्वपर्यंतच्या केवलज्ञान पर्यायांमध्ये व अरहंत अवस्थेच्या पूर्वीच्या सर्व ज्ञानपर्यायांमध्ये जो अभाव आहे तो प्रागभाव आहे.

या वर्तमान केवलज्ञान पर्यायाचा भविष्यकालीन सर्व अनंतानंत केवलज्ञान पर्यायांमध्ये अभाव आहे, तो प्रध्वंसाभाव आहे.

**प्रश्न** - छताला भिंतींचा आधार आहे व भिंतींना जमिनीचा आधार आहे, काय ही गोष्ट ठीक आहे?

**उत्तर** - नाही. कारण छत, भिंती व जमीन यांचा परस्परांमध्ये अन्योन्याभाव आहे. प्रत्येकाची सत्ता भिन्न भिन्न असल्याने प्रत्येक वस्तु स्वक्षेत्राच्या आधारे आहे.

**प्रश्न** - तेजसशरीर व कार्माणशरीर यांमध्ये कोणता अभाव आहे?

**उत्तर** - तेजसशरीर व कार्माणशरीर यांमध्ये अन्योन्याभाव आहे कारण या दोन्ही पुद्‍गल द्रव्याच्या वर्तमान पर्याय आहेत.

**प्रश्न** - खालील गोष्टींमध्ये कोणकोणता अभाव आहे? का?

(१) इच्छा व भाषा. (२) चष्मा, डोळे आणि ज्ञान.

(३) शरीर व वस्त्र. (४) शरीर व जीव.

**उत्तर** - १. इच्छा आणि भाषा यांमध्ये अत्यंताभाव आहे. कारण इच्छा जीवाच्या चारित्र गुणाची विभाव पर्याय आहे व भाषा पुद्‍गलाची पर्याय आहे. दोन्हींची द्रव्य भिन्न भिन्न आहेत.

२. चष्मा आणि डोळे यांमध्ये अन्योन्याभाव आहे कारण दोन्ही पुद्‍गलाच्या वर्तमान पर्याय आहेत. या दोहोंचा व ज्ञानाचा एकमेकात अत्यंताभाव आहे कारण ज्ञान तर जीवाच्या ज्ञान गुणाची पर्याय आहे. पहा तर खरं! चष्मा आणि डोळे यांच्यामुळेच मला ज्ञान होते अशी अज्ञानीची मान्यता आहे.

३. शरीर आणि वस्त्र यांमध्ये अन्योन्याभाव आहे, कारण शरीर एक पुद्‌गल स्कंध आहे व वस्त्र दुसरा पुद्‌गल स्कंध आहे.

४. शरीर आणि जीव यांच्यामध्ये अत्यंताभाव आहे; कारण जीव आणि पुद्‌गल दोन भिन्न स्वतंत्र द्रव्य आहेत. वास्तविक पहाता शरीरातील एक एक परमाणु स्वतंत्र द्रव्य आहे, त्यांचा एकमेकात व जीव द्रव्यात अत्यंताभाव आहे.

या साऱ्या गोष्टींविषयी अनभिज्ञ - अजाण जीव शरीरालाच हा मी आहे असे मानून एकत्वबुद्धि करतो व वस्त्रांमुळे मी सुखी, उंची वस्त्रं आभरणं वगैरेंमुळे मी महान आहे असे मानून ममत्वबुद्धि करतो. मी शरीराचे कार्य करणारा आहे व परपदार्थांना भोगणारा आहे असे मानून कर्तृत्वबुध्दीचे व भोक्तृत्वबुद्धीचे पोषण करून तो जीव त्याचे मिथ्यात्व आणि अज्ञान कायम ठेवतो.

**प्रश्न** - कुंभाराने चाक, काठी वगैरे द्वारे घडा बनविला असे निश्चयाने मानले तर कोणते अभाव मानले नाहीत?

**उत्तर** - कुंभाराचे शरीर, चाक, काठी, घडा या सर्वांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे. कुंभाराचा जीव आणि या सर्वांमध्ये अत्यंताभाव आहे. कुंभाराने या साधनांच्या द्वारे घडा बनविला हे निमित्ताचे कथन आहे, उपचार कथन आहे. त्याला निश्चय कथन मानले तर अन्योन्याभाव व अत्यंताभाव यांना मानले नाही.

**प्रश्न** - चार घातिकर्मांच्या नाशाने केवलज्ञान उत्पन्न झाले असे मानले तर काय आपत्ति आहे?

**उत्तर** - कर्म पुद्‌गलाची पर्याय आहे व ज्ञान जीवाची पर्याय आहे व पर्याय आपापल्या द्रव्यामध्ये होते. म्हणून पुद्‌गल व जीवामध्ये अत्यंताभाव आहे. जीव स्वत: आपल्या स्वभावाचा अनुभव करत शुद्धोपयोगात लीन रहातो तेव्हा केवलज्ञान प्राप्त होते, त्यावेळी घातिकर्मांचा त्यांच्या स्वत:च्या कारणाने पूर्णत: क्षय होतो.

कर्मांच्या अवस्थेचे म्हणजे निमित्ताचे ज्ञान करविण्यासाठी शास्त्रामध्येच असे कथन येते की अरहंत भगवानांनी चार घातिकर्मांचा नाश करून केवलज्ञानादि अनंत चतुष्टयाची प्राप्ति केली. शास्त्रातील वचनांचा योग्य अर्थ व मर्म जाणणे ही आपली जबाबदारी आहे, नाहीतर त्याच वचनांना चुकीच्या अर्थाने समजल्याने ते शास्त्र नव्हे शस्त्र बनून आपलाच घात करतील.

**प्रश्न** - जीव भाषा का नाही बोलू शकत? कमीत कमी तोंडातून शब्द तरी निघतात ना?

**उत्तर** - जीव आणि भाषा (पुद्गल) यांच्यामध्ये अत्यंताभाव आहे म्हणून पुद्गलाचे कार्य जीव करू शकत नाही. तोंड आणि शब्द यांच्यामध्ये अन्योन्याभाव आहे कारण हे दोन्ही भिन्न भिन्न स्कंध आहेत, पुद्गलाच्या वर्तमान पर्याय आहेत.

**प्रश्न** - पंचमकाळात केवलज्ञान होत नाही कारण जीवांना वज्रवृषभनाराच संहनन नसते. - कोणता अभाव मानला नाही?

**उत्तर** - हा तर करणानुयोगाचा नियम आहे परंतु जर आपण त्याचा योग्य अर्थ न समजता, हे निमित्ताचे कथन आहे असे न जाणता याला निश्चयाचेच कथन मानले तर आपण अत्यंताभावाला जाणले व मानले नाही असे म्हणावे लागेल.

पंचमकाल हा व्यवहारकाल अर्थात कालद्रव्याची पर्याय आहे जी कालद्रव्यात आहे आणि केवलज्ञान ही ज्ञानगुणाची पर्याय जीवामध्ये आहे. तसेच वज्रवृषभनाराच संहनन ही शरीराची विशिष्ट रचना-हाडांची बळकटी शरीरात आहे. ती पुद्गलाची पर्याय आहे. या तिन्ही द्रव्यांचा एकमेकात अत्यंताभाव आहे. त्यावर तुम्ही विचाराल, 'वज्रवृषभनाराच संहनन नामक नामकर्माच्या उदयाने हे संहनन प्राप्त होते असे आम्ही करणानुयोगात ऐकले होते त्याचे काय?' तुम्ही बरोबर ऐकले होते. परंतु हे तर निमित्ताचे कथन आहे. नामकर्म आणि शरीर या दोहोंमध्ये अन्योन्याभाव आहे.

**प्रश्न** - वाऱ्यामुळे ध्वजा फडकते ना?

**उत्तर** - वारा आणि ध्वजा यांच्यामध्ये अन्योन्याभाव आहे ध्वजा तिच्या क्रियावती शक्तीच्या कारणाने फडकते.

**प्रश्न** - घातिकर्म आणि अघातिकर्म एकत्र (बरोबरीने) रहातात, त्यांच्यामध्ये तर कोणता अभाव नाही ना? ते जीवाला संसारात रखडवितात ना?

**उत्तर** - घातिकर्म आणि अघातिकर्म दोन्हीही पुद्‌गलाच्या वर्तमान पर्याय आहेत. त्या दोन्हीमध्ये अन्योन्याभाव आहे. या दोन्हीचे भेद असे आहेत - ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय व अंतराय हे घातिकर्म आहेत आणि वेदनीय, आयु, नाम व गोत्र हे अघातिकर्म आहेत त्या सर्वांचा देखील एकमेकात अन्योन्याभाव आहे. त्यांचे आणखी उपभेद करत गेले असता असंख्यात लोक प्रमाण भेद होतात त्या सर्वांचा देखील एकमेकात अन्योन्याभाव आहे.

जीवाचा आणि या सर्व कर्मांचा एकमेकात अत्यंताभाव आहे, असे असताना कर्म जीवाला संसारात रखडवितात ही गोष्ट कितपत खरी आहे? तुम्हीच विचारा करा.

**प्रश्न** - आत्म्याने पोळी पकडली नाही, पण हाताने तरी पकडली ना?

**उत्तर** - हात आणि पोळी या दोघांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे. हाताने पोळी पकडली असे मानले तर अन्योन्याभाव मानला नाही.

**प्रश्न** - मी पोळी खाल्ली. कोणता अभाव मानला नाही?

**उत्तर** - मी जीवद्रव्य आहे आणि पोळी पुद्‌गल स्कंध आहे. दोघांचा एकमेकात अत्यंताभाव आहे. म्हणून जीव पोळी खातो ही मान्यता चुकीची आहे त्याने अत्यंताभाव मानला नाही.

**प्रश्न** - माझ्या शरीराने तरी पोळी खाल्ली ना?

**उत्तर** - माझे शरीर मानल्याने मी जीव द्रव्य व शरीर पुद्‌गल द्रव्य या दोघांचा एकमेकात अत्यंताभाव आहे त्याला मानले नाही तसेच शरीर आणि पोळी यांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे त्यालाही मानले नाही.

**प्रश्न** - मी देखील पोळी-अन्न खाल्ले नाही, शरीराने देखील अन्न खाल्ले नाही, तर मग पोळी गेली कोठे ? आजपर्यंत आम्ही रोज इतक्या पोळ्या, एवढे सारे अन्न खाल्ले

होते असे मानले होते त्याचे काय?

**उत्तर** - न जीव पोळी खातो, न शरीर पोळी खाते. अन्नाचे परमाणु स्वत:च त्यांच्या क्रियावती शक्तीच्या योग्यतेने क्षेत्र क्षेत्रांतर करतात. जीव तर फक्त जाणतो. त्यावेळी शरीराच्या क्रिया - चावणे, गिळणे वगैरे शरीरामध्ये शरीराच्या स्वत:मुळे होतात. पोळीचे तुकडे होणे, तोंडामध्ये त्याचे बारीक पिष्टण होणे हे सर्व पोळीच्या स्वत:मुळे होते.

या सर्व अभावांना यथार्थ मानल्यानंतर पूर्वीच्या मान्यतांचे काय होणार आहे? त्या मिथ्या मान्यता आता रहाणार नाहीत, सम्यक्त्वप्राप्तिसाठी योग्य तत्त्वनिर्णय होत जाईल. तुम्हाला त्या पोळयांची चिंता आहे की ज्या तुम्ही खाल्ल्या होत्या असे तुम्ही मानत आला होतात, की तुम्हाला त्या मान्यतांची चिंता आहे ज्यांना तुम्ही खऱ्या समजत होतात, की तुम्हाला तुमची स्वत:ची चिंता आहे? प्रथम नक्की तरी करा.

**प्रश्न** - आपण सिद्धक्षेत्रांची वंदना करतो कारण सिद्धक्षेत्रावरून जीव मोक्षास गेले होते ना?

**उत्तर** - सिद्धक्षेत्र आकाशाचे क्षेत्र अर्थात स्थान दर्शविते आणि मोक्ष ही तर जीवाची पर्याय आहे जी जीवद्रव्यात असते. कोणत्याही जागेचे नाव मोक्ष नाही की जेथे जीव जातो. जीवद्रव्य आणि आकाशद्रव्य या दोघांचा एकमेकात अत्यंताभाव आहे, वास्तविक पहाता जीवद्रव्याच्या स्वक्षेत्रातच मोक्षपर्याय प्रकट होते, परंतु संयोगाच्या अपेक्षेने ज्या आकाश क्षेत्रात-ज्या ठिकाणी जीवाने मोक्षपर्याय प्रकट केली त्या ठिकाणास-त्या क्षेत्रास उपचाराने-व्यवहाराने सिद्धक्षेत्र म्हटले जाते.

सिद्धक्षेत्राची वंदना करताना जर आपण हे रहस्य जाणले की त्या जीवाने मोक्षपर्याय-मोक्षरूपी कार्य कशाप्रकारे-कोणत्या रीतीने प्रकट केले तरच आपली तीर्थवंदना कार्यकारी ठरेल.

**प्रश्न** - मन, वचन, कायेने भगवंतांची वंदना करण्यानेच लाभ होईल ना?

**उत्तर** - मन हे मनोवर्गणेचे कार्य आहे, वचन तर भाषावर्गणेचे कार्य आहे व काया आहारवर्गणेचे कार्य आहे या

सर्वांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे आणि या सर्वांचा व जीवाचा एकमेकात अत्यंताभाव आहे. या परद्रव्यांच्या क्रिया करण्याने-झाल्याने मी भगवंतांची वंदना, स्तुति केली असे मानणे चुकीचे आहे. भगवंतांना द्रव्यरूपाने, गुणरूपाने, पर्यायरूपाने जाणून आपल्या स्वत:च्या भगवान स्वरूप स्वभावामध्ये ज्ञानाला लीन करणे, नमविणे हीच भगवंतांची खरी स्तुति व वंदना आहे.

**प्रश्न** - माझे तारुण्य कायम टिकविण्यासाठी मी औषधं खाते-कोणते अभाव मानले नाहीत?

**उत्तर** - मी तर जीवद्रव्य आहे व तारुण्य शरीराची पर्याय आहे आणि औषधं पुद्‌गलाची पर्याय आहे. मी व तारुण्य तसेच मी व औषधं यांचा एकमेकात अत्यंताभाव आहे. तारुण्य व औषधं यांचा परस्परात अन्योन्याभाव आहे. - त्यांना मानले नाही.

**प्रश्न** - अग्निमुळे पाणी गरम झाले, पेट्रोलमुळे गाडी चालते असे मानले तर कोणता अभाव मानला नाही?

**उत्तर** - अन्योन्याभाव मानला नाही, कारण अग्नि व पाणी यांचा एकमेकात तसेच पेट्रोल व गाडी यांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे. निमित्ताच्या अपेक्षेने हे कथन ठीक आहे, परंतु निश्चयाने तसेच मानले तर चुकीचे होईल.

**प्रश्न** - पैशांमुळे सुख मिळते, आम्ही मेहनत करून पैसे मिळविले - काय हे खरे आहे?

**उत्तर** - पैशांमध्ये सुख नावाचा गुणच नाही तो तर जीवामध्ये आहे. पैसे आणि जीव यांचा एकमेकात अत्यंताभाव आहे. निष्परिग्रही मुनि तर प्रचुर सुखाचा उपयोग घेतात आणि अरहंत सिद्ध तर अनंत सुखी आहेत. म्हणून कोणत्याही परद्रव्यातून सुख मिळते ही मान्यताच चुकीची आहे. निमित्ताच्या अपेक्षेने सुद्धा हे कथन चुकीचे आहे. मेहनत शरीराची क्रिया आहे. तिचा व पैशांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे. जीवाचा व शरीराचा एकमेकात तसेच जीवाचा व पैशांचा एकमेकात अत्यंताभाव आहे.

**प्रश्न** - आमच्या सातावेदनीय कर्माच्या उदयाने तरी आम्हाला पैसे मिळत आहेत ना? चांगले संयोग मिळत आहेत ना ?

**उत्तर** - कर्म तुमचे नाहीच. तुमचा व कर्माचा एकमेकात अत्यंताभाव आहे. कर्माचा, पैशांचा व संयोगांचा एकमेकात अन्योन्याभाव आहे. संयोगाच्या रुचिमुळे कर्माच्या उदयाला चांगले मानून विशिष्ट पुण्यकर्माचा बंध तुम्ही चांगला मानत आहात. ज्याला बंधाची आणि त्याच्या फळाची रुचि आहे त्याला धर्माची, मोक्षमार्गाची, मोक्षाची रुचि असू शकत नाही, आपली स्वत:ची रुचि असू शकत नाही. ही त्याची बंधतत्त्वासंबंधी तसेच सातही तत्त्वांसंबंधी चुकीची मान्यता आहे.

आज मला काय झाले कळेना. प्रश्न विचारता विचारता पत्र एवढे लांबले हे लक्षातच आले नाही. तरीदेखील एक शेवटचा प्रश्न विचारतेच. सांगा बरं, चैतन्य आणि जीव यांच्यामध्ये कोणता अभाव आहे?

शाबास! यांच्यामध्ये कोणताच अभाव नाही. चैतन्य अर्थात ज्ञान-दर्शन तर जीवाचा 'भाव' आहे - गुण आहे - स्वभाव आहे. जीवाचा आणि चैतन्याचा तर नित्यतादात्म्य संबंध आहे. त्यांच्यामध्ये अभावाची कोणतीही शक्यताच नाही.

पहा बरं, अभावाचा विषय आहेच मोठा मनोरंजक. जीवांच्या मिथ्यामान्यता दूर होण्यासाठी या अभावांचे ज्ञान फारच उपयोगी आहे. आपण तर भाषेद्वारे समजावतो व भाषा स्वयं उपचार आहे. कथनामध्ये तर निमित्तपरक कथनाचीच मुख्यता असते. तरीदेखील ज्ञानामध्ये व मान्यतेमध्ये जसे वस्तुचे स्वरूप आहे तसेच जाणले व मानले पाहिजे.

अभावांना जाणल्याने होणाऱ्या लाभांची आपण चर्चा करत आलो. अभावांना जाणल्याने वस्तुव्यवस्था लक्षात येते, कार्य कोठे होते व कोठे होत नाही ही बाब समजते.

अभावांचे ज्ञान झाल्यावर दृष्टि आणि ज्ञानाचा उपयोग त्रिकाल भावस्वरूप अशा आपल्या स्वभावावर जातो, त्यामध्ये अहंपणा स्थापित होतो, जीव स्वत:ला चैतन्यरूप अनुभव करू लागतो, ज्ञाता दृष्टा बनतो.

बाकी चर्चा पुढील पत्रात करूया.

जय जिनेन्द्र.

तुमची आई.

# निमित्त

पत्रांक ६ १ मे २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

कारण-कार्य व्यवस्थेचे रहस्य जाणण्यास तुम्ही खूपच उत्सुक आहात हे मला माहित आहे.

कार्य म्हणजे पर्याय. गुणाच्या विशेष कार्याला अर्थात परिणमनाला पर्याय म्हणतात हे आपण पूर्वीच शिकलो आहोत. जीवादि सहा द्रव्यांपैकी प्रत्येक द्रव्यामध्ये अनंत गुण आहेत आणि त्या प्रत्येक गुणामध्ये दर समयाला स्वत:चे कार्य स्वत:मध्ये स्वत:च्या शक्तीने, स्वत:च्या त्यासमयाच्या पर्यायाच्या योग्यतेने होत असते. आपण वस्तुत्व गुणाचे स्वरूप शिकत असतांना हे पाहिले होते की स्वत:चे कार्य स्वत:च करण्याची शक्ति प्रत्येक द्रव्यामध्ये विद्यमान आहे.

द्रव्य स्वत: कार्यरूप परिणमते, ही त्याची निजशक्ति आहे, हे कारण द्रव्यातच विद्यमान असते, यास 'उपादान कारण' असे म्हणतात.

परंतु जे स्वत: कार्यरूप तर परिणमित होत नाही परंतु कार्याच्या उत्पत्तिमध्ये अनुकूल होण्याचा आरोप ज्यावर येऊ शकेल त्यास 'निमित्त कारण' असे म्हणतात.

निमित्ताची ही व्याख्या तुम्ही पाठ करा. निमित्ताने कार्य होते असे मानणाऱ्यांची ही भ्रमणा एवढ्यासाठीच होते की त्यांना शास्त्रामध्ये सांगितलेले निमित्ताचे स्वरूपच नीट माहित नसते.

जेव्हा जेव्हा आपण एखादे कार्य झालेले किंवा होताना पहातो, तेव्हा तेव्हा त्याच्या कारणांची चर्चा करतो. उदाहरणार्थ घडा बनला हे कार्य झाले. तो घडा कोणी बनविला? त्याचे कारण कोण आहे? असा प्रश्न विचारला असता सहजच आपण उत्तर देतो की कुंभाराने घडा म्हणजे मडके बनविले. लहाणपणी शिशुवर्गात असताना तुम्ही पाठ केले होते की मडके बनवितो तो कुंभार, चपला शिवतो तो चांभार, कपडे शिवतो तो शिंपी, दागिने घडवितो तो सोनार.

आचार्य म्हणतात की हे सारे तर निमित्त आहेत. कुंभार स्वत: घडारूप परिणमित झाला का? नाही, तर मग तो घड्याचे

उपादान कारण होऊ शकत नाही, खरे कारण असू शकत नाही. हां, जेव्हा घडा बनला तेव्हा त्यामध्ये अनुकूल होण्याचा आरोप कुंभारावर येऊ शकतो, म्हणून कुंभार हे घड्याचे निमित्त कारण आहे. कुंभारच काय, त्याचे चाक, काठी वगैरे देखील निमित्त कारणंच आहेत.

'घडारूप स्वत: कोण परिणमित झाले?' 'माती'. म्हणून माती हे घड्याचे उपादान कारण आहे. माती 'कर्ता' आहे व घडा तिचे कार्य म्हणजे 'कर्म' आहे. शास्त्राच्या भाषेत सांगायचं झालं तर, माती व घडा यांमध्ये कर्ताकर्म संबंध आहे परंतु कुंभार व घडा यांमध्ये कर्ताकर्म संबंध नाही. कुंभार व घडा यांमध्ये निमित्त-नैमित्तिक संबंध आहे.

जेव्हा जेव्हा कार्य घडते तेव्हा तेव्हा अनेक कारणं एकत्रित येतात. कारणांशिवाय कार्य घडत नाही. या कारणांना आपण विभाजित केले असता त्यातील एक आहे उपादान कारण व दुसरे आहे निमित्त कारण. कार्य तर एकच घडले, परंतु कारणं दोन आहेत. म्हणून या कारणांच्या अपेक्षेने कार्याची नावे देखील वेगवेगळी पडतात. उपादान कारणाच्या अपेक्षेने कार्याला उपादेय म्हणतात. सात तत्त्वांच्या हेय, ज्ञेय, उपादेय श्रद्धानामध्ये जो उपादेय शब्द आला होता तो अर्थ येथे नाही. त्यावेळी उपादेय शब्दाचा अर्थ प्रकट करण्यायोग्य-आश्रय करण्यायोग्य असा केला होता. याठिकाणी कार्याला आपण उपादेय म्हणत आहोत.

श्रीमद् राजचंद्रांनी म्हटलंय, 'ज्यां ज्यां जे जे योग्य छे, तहां समझवुं तेह' अर्थात ज्या ज्या ठिकाणी जो जो अर्थ योग्य असेल तेथे तो तो अर्थ जाणावा.

हां, तर काय सांगत होते? उपादानाच्या अपेक्षेने कार्याला उपादेय म्हणतात आणि निमित्ताच्या अपेक्षेने त्याच कार्याला नैमित्तिक असे म्हणतात. आपल्या घड्याच्या उदाहरणावर हे घटित करूया. घडा बनला हे कार्य झाले. माती हे उपादान व घडा त्याचे उपादेय आहे. तसेच कुंभार हे निमित्त व घडा हे त्याचे नैमित्तिक आहे. आता कसं तत्त्वज्ञानाच्या भाषेत बोललं की जरा आपण विशेष जाणकार झाल्यासारखे वाटते, नाही का? माती व घडा यांचा उपादान-उपादेय संबंध आहे आणि कुंभार व घडा यांचा निमित्त नैमित्तिक संबंध आहे

घडाच उपादेय आहे व घडाच नैमित्तिक आहे. उपादेय आणि नैमित्तिक ही एकाच कार्याची दोन नावे आहेत. उपादान आणि निमित्त ही एकाच कार्याची दोन भिन्न कारणं आहेत.

उपादान ही निजशक्ति आहे व निमित्त 'पर' आहे. कार्य निजशक्तीनेच होते, त्यावेळी निमित्ताची फक्त उपस्थिति असते. परंतु ते निमित्त कार्यामध्ये काही ढवळाढवळ, फेरफार, मदत वगैरे बिलकुल करत नाही.

निमित्ताच्या उपस्थितिमध्ये द्रव्य स्वत:च ते कार्य करते. कार्याचा कर्ता शंभर टक्के उपादानच आहे, निमित्त हा कार्याचा कर्ता नाही. परंतु जेव्हा जेव्हा कार्य होते तेव्हा तेव्हा ज्या अन्य अनुकूल गोष्टींची सहज उपस्थिति आढळते त्यांना निमित्त असे म्हणतात.

तुम्ही म्हणाल, 'प्रत्येक कार्य केवळ उपादानानेच होते तर मग निमित्ताचे नाव घ्यायची गरजच काय? निमित्ताचे कथन तरी का करावे बरे?'

मुलींनो, निमित्त नावाचे कोणते विशिष्ट द्रव्य असत नाही. या विश्वातील अनंतानंत द्रव्यं स्वत:च्या उपादान शक्तीने दर समयाला, सतत परिणमन करीत असतात अर्थात या विश्वातील प्रत्येक द्रव्य स्वत:च्या पर्यायांचे उपादान कारण आहे. अशावेळी ज्यांची पर्याय अन्य द्रव्यांच्या पर्यायामध्ये अनुकूल भासित होते, अशा द्रव्यांना निमित्त म्हटले जाते. एखादे द्रव्य जाणून बुजून दुसऱ्या द्रव्याला निमित्त होऊ शकत नाही.

खरं तर, द्रव्य हे निमित्त नसून त्याची विशिष्ट पर्याय निमित्त असते. परंतु कथन करताना आपण त्या द्रव्याला निमित्त म्हणतो.

आपण सहा द्रव्यांची नावे व विशेष गुण पूर्वी शिकलो आहोत. जीवद्रव्य, पुद्‌गलद्रव्य, धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य आणि कालद्रव्य. यामध्ये धर्मादि चार द्रव्यांचे वर्णन करताना ते जीव पुद्‌गलास कसे निमित्त आहेत ते सांगितले आहे.

धर्मद्रव्याचा 'गतिहेतुत्व' व अधर्मद्रव्याचा 'स्थितिहेतुत्व' हा विशेष गुण हेच दर्शवितो की ही दोन द्रव्यं जीव व पुद्‌गल यांना अनुक्रमे गति व स्थिति करण्यामध्ये निमित्त आहेत. या दोन द्रव्यांची व्याख्या आठवा बरं जरा. स्वयं गमन करणाऱ्या जीव व पुद्‌गलास गमन करण्यामध्ये निमित्त होते ते धर्मद्रव्य, तसेच स्वयं गमनपूर्वक स्थिर होणाऱ्या जीव व पुद्‌गलास स्थिर होण्यास

निमित्त होते ते अधर्मद्रव्य असे आपण वारंवार पाठ केले होते. त्यावेळी या शब्दांचे महत्व विशेष कळत नव्हते. परंतु आता तुमच्या लक्षात येईल की जीव व पुद्‌गल स्वतःच्या उपादान शक्तीने गमन किंवा स्थिरता करतात त्यावेळी धर्म किंवा अधर्म द्रव्य निमित्तरूपाने उपस्थित असते.

निमित्तालाच उपकारी असेही म्हणतात. निमित्तरूपाने रहाणे म्हणजेच उपकार होय. तत्त्वार्थसूत्रामध्ये म्हटलेच आहे, 'गतिस्थिति उपग्रहौ धर्माधर्मयोः उपकारः।' 'आकाशस्य अवगाहः।' अर्थात सर्व द्रव्यांना रहाण्यास स्थान देण्यामध्ये आकाश द्रव्य निमित्त आहे यालाच आकाश द्रव्याचा उपकार आहे असे म्हणतात.

शरीर, वचन, मन, श्वासोच्छ्‌वास, इंद्रियजन्य सुख दुःख, जीवन व मरण हे सारे पुद्‌गलाचे जीवावर उपकार आहेत, अर्थात यामध्ये पुद्‌गल निमित्त आहे. आपण लौकिक भाषेत उपकार करणे, मदत करणे म्हणतो तसा अर्थ येथे नाही.

प्रत्येक कार्य उपादानाने स्वसमयातच होत असते व त्यावेळी निमित्ताची उपस्थितिदेखील सहजच असते, ते मिळविण्याच्या प्रयत्नाने येत नाही व हटविण्याचा प्रयत्न केल्याने दूरही होत नाही.

'परस्परोपग्रहो जीवानाम्' हे सूत्र तर सर्वविदित आहे. एक जीव दुसऱ्या जीवाच्या सुखामध्ये, दुःखामध्ये, उपदेशादिमध्ये, जन्म देण्यामध्ये, मरणामध्ये उपकारी आहे, निमित्त आहे. तुम्ही म्हणाल, 'मरणामध्ये निमित्त हा तर अपकार झाला याला उपकार कसे म्हणतेस?' मी थोडेच म्हणत आहे? आचार्यांनी म्हटले आहे. आत्ता एक मिनिटापूर्वीच आपण पाहिले होते की उपकार शब्दाचा अर्थ निमित्त होतो. जीवांनी एकमेकांना मदत करावी, भले करावे, असा या सूत्राचा अर्थ नाही. जशी इतर द्रव्यं जीवांच्या कार्यांमध्ये निमित्त आहेत तसे एक जीव अन्य जीवाला निमित्त असू शकतो.

परंतु याचा असा अर्थ कदापि होत नाही की एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे कार्य करतो, कार्याला हातभार लावतो, मदत करतो. उपकार किंवा निमित्त म्हणणे हे त्या द्रव्याची सहज उपस्थिति दर्शविणे आहे, बस, आणखी काही नाही.

काल द्रव्य सर्व द्रव्यांच्या परिणमनामध्ये निमित्त आहे. याचा अर्थच असा आहे की प्रत्येक द्रव्य स्वतःच्या उपादान शक्तीच्या

कारणाने परिणमन करीत आहे त्यामध्ये कालद्रव्य निमित्त आहे, कालद्रव्य त्यांना परिणमवित नाही.

हे सारे सिद्धांत आपल्याला आपल्यावर म्हणजेच आत्म्यावर घटित करावयाचे आहेत. कारण आपले प्रयोजन तर आत्म्याच्या स्वरूपाला जाणण्याचे आहे. आपले ज्ञान, दर्शन, चारित्र आदि अनंत गुणांचे कार्य होत आहे, तर याला कारण कोण आहे? कोण बरं आपणास मदत करेल? कोणी आपणास विघ्न तर आणणार नाही ना? याचा आपण विचार केला पाहिजे.

जाणणे, जाणणे हे आपल्या ज्ञानगुणाचे कार्य तर निरंतर चालूच आहे, आपण जाणत आहोत हे तर प्रत्येकाच्याच लक्षात येत असते, अनुभवास येत असते. परंतु आजपर्यंत अज्ञानी जीवाने समोर वस्तु आहे म्हणूनच मला ज्ञान होते, ज्ञेयामुळे ज्ञान होते अशी चुकीची मान्यता ठेवली आहे.

ज्ञानाची प्रत्येक पर्याय हे ज्ञानगुणाचे कार्य आहे व त्याचा कर्ता ज्ञानगुण आहे-ते उपादान कारण आहे. ज्ञानगुणाशिवाय अन्य कोणीही या ज्ञानपर्यायाचे उपादान कारण नाही. परंतु आपण असे मानतो का हे तुम्हीच स्वत: पडताळून पहा.

'समोर पुस्तक आहे म्हणून ज्ञान झाले,' 'गुरुमुळे ज्ञान झाले,' 'प्रकाश आहे म्हणून ज्ञान झाले अंधारात कसे बरे झाले असते?' 'तोंडात गुलाबजाम ठेवला म्हणून त्याच्या गोडीचे ज्ञान झाले'. 'चष्मा लावल्यामुळे ज्ञान झाले'- अशीच बहुतांशी लोकांची मान्यता आढळते.

तुम्ही म्हणाल,'या सर्व गोष्टी तर प्रत्यक्षात अशाच आढळतात मग त्या गोष्टींना आम्ही मानणारच. त्यांचा तू निषेध का करीत आहेस? तुला काय गुलाबजाम न खाताच त्याची गोडी समजते की काय? तुझ्या आध्यात्मिक उन्नतिमध्ये पू.श्री. कानजीस्वामींचे अनंत उपकार आहेत- त्यांच्या उपदेशाने हा मार्ग मिळाला असे तूच तर वारंवार सांगतेस.'

अगं, येथे कथनाचा कोण निषेध करतोय? आपण चुकीच्या मान्यतेचा निषेध करीत आहोत. नेहमी कथन निमित्ताच्या अपेक्षेने केले जाते परंतु कार्य उपादानाने होते. त्याची आपण जाणीव ठेऊन निमित्ताचे कथन केले असता योग्य ठरते. परंतु उपादानाला न मानता, निमित्तालाच कार्याचा कर्ता मानणे हे मिथ्यात्व आहे.

मला तर असे गुरु (विद्यागुरु) भेटले की त्यांनी वारंवार सांगितले की अरे, तुम्हाला जे हे ज्ञान होते आहे ते तुमच्या उपादानाने होत आहे. हा जो उपदेश-ही वाणी आहे ती भाषावर्गणेचे कार्य आहे-मी त्याचा कर्ता नाही. ज्या गुरुंनी ४५-४५ वर्षे असा उपदेश दिला की, 'हे शिष्य, गुरुमुळे ज्ञान होत नाही. तुझी निमित्ताधीन दृष्टि सोड. तू स्वत: स्वयंसिद्ध परमात्मा आहेस याचा निर्णय कर' त्या गुरुबद्दल अनंत उपकार वाटणार नाहीत तो शिष्य कसला?

तुम्ही नाही का म्हणत की, 'आई, तुझे किती उपकार आहेत. आम्हाला लहाणांचं मोठं केलंस, दु:खाची कधी झळही पोहोचू दिली नाहीस व आता खरा धर्मोपदेश देऊन आम्हाला संसार सागर पार करण्याची कला शिकवीत आहेस.' अगं, वचनाद्वारे उपकार स्मरण करणे ही तर कृतज्ञता व्यक्त करणे आहे. त्यावेळी काही मान्यता चुकीची होत नसते. ज्ञानी व अज्ञानी दोहोंचे कथन एकसारखे वाटत असले तरी त्या दोघांच्या अभिप्रायामध्ये - मान्यतेमध्ये जमीन आसमानाचे अंतर असते. ज्ञानी निमित्ताला निमित्तरूपाने स्वीकार करतो परंतु अज्ञानी निमित्ताला कर्ता मानतो.

एखादा म्हणेल मी पाणी, खत, ऊन देऊन हा वृक्ष वाढवला. त्याने बी न पेरताच तो वृक्ष वाढवला का? आम्रवृक्ष आंब्याची कोय पेरून उगवला की लिंबाचे बी पेरून? त्या त्या बी मध्ये विशिष्ट वृक्ष बनण्याची निजशक्ति आहे. दुसरे उदाहरण पहा. शिक्षकामुळे ज्ञान झाले असे मानले तर सर्व विद्यार्थ्यांना समान व्हायला पाहिजे. परंतु काही विद्यार्थी फर्स्ट क्लासमध्ये पास होतात तर काही नापासही होतात.

एखाद्याला निमित्त तेव्हाच म्हटले जाते जेव्हा कार्य घडते. कार्य न घडता निमित्त कशाचे? वृक्ष उगवलाच नाही तर पाणी, खत, ऊन हे निमित्त कशाचे? विद्यार्थी विद्या ग्रहण करेल तर शिक्षकावर आरोप येईल की या शिक्षकामुळे त्याला ज्ञान झाले. आरोप म्हणजे उपचार. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे कार्य करतो असे म्हणणे हे औपचारिक-उपचाराचे कथन आहे. वास्तविक म्हणजे यथार्थ कथन नाही. असे कथन वाचले तरी त्याचा योग्य अर्थ आपण लावला पाहिजे.

सारा कर्म सिद्धांत निमित्ताच्या भाषेत आहे. जीवाने कर्म बांधले, अरहंतांनी चार घातिकर्मांचा नाश करून अनंतचतुष्टयाची प्राप्ति केली, ८ कर्मांचा नाश करून जीव सिद्धगति प्राप्त करतो, अशी ही सारी कथनं तर जिनागमात आपण वाचतो. परंतु त्या कथनाचे मर्म न ओळखता सर्वथा तसेच मानल्याने निमित्ताने कार्य होते अशा भ्रमाची पुष्टी होते.

या कथनांचा खरा अर्थ असा आहे - जेव्हा जीव स्वत: राग, द्वेष, मोह रूप परिणमन करतो तेव्हा कार्माणवर्गणा स्वत: कर्मरूप परिणमित होऊन पूर्वीच्या कर्मात येऊन मिसळतात, बंध होतो. जीव निज शुद्धात्म्यातील लीनतेद्वारे अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतसुख व अनंतवीर्य प्राप्त करून अरहंत परमात्मा बनतो तेव्हा चार घातिकर्म स्वत:च्या योग्यतेने खिरून नष्ट होतात. जीव जेव्हा पूर्ण शुद्धतारूपी मोक्षदशा प्रकट करतो तेव्हा सर्व कर्मांचा सर्वथा क्षय होतो.

'एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे कार्य करू शकत नाही त्यात सुधार किंवा बिघाड काहीही करू शकत नाही' हा जिनागमाचा सिद्धांतरूपी मंत्र सदैव ध्यानात ठेवाल तर जिनागमाचा योग्य अर्थ व रहस्य समजून येईल.

जिनागमामध्ये बहुतांशी कथन हे असे औपचारिक आहे. कारण तेथे निमित्ताचे ज्ञान करविले जाते. निमित्ताची उपस्थिति सांगितली जाते. त्या कथनाचे मर्म-रहस्य जाणले नाही तर शास्त्र वाचून देखील निमित्ताधीन दृष्टीचेच पोषण केले जाते. कसे ते पाहू या.

भगवान महावीरांना केवलज्ञान झाले. समवशरणाची रचना झाली. भव्य जीव उपदेश ऐकण्यासाठी रोज येऊ लागले परंतु ६६ दिवसांपर्यंत दिव्यध्वनिच खिरली नाही. इंद्राने अवधिज्ञानाने जाणून वैदिक साधु इंद्रभूतीला प्रश्न विचारून आपल्या गुरुशी चर्चा करण्यास बोलावले. इंद्रभूती, वायुभूती, अग्निभूती आपापल्या ५००-५०० शिष्यांसह समवशरणात आले. मानस्थंभ पाहताच त्यांचा मान गळाला. भगवंतांसमोर येऊन मुनिदीक्षा घेतली. दिव्यध्वनि खिरली.

निमित्तानेच कार्य होते असे मानणारे लोक हे उदाहरण सांगून म्हणतात, पहा निमित्त नव्हते ना म्हणून वाणी खिरली नाही, निमित्त हजर होताच निमित्तामुळे वाणी खिरली.

भाषावर्गणा तर अचेतन आहे, गणधर आल्यानंतर शब्दरूप व्हायचे असे ज्ञान तर त्या जड वाणीमध्ये नाही. म्हणून गणधर आल्यामुळे वाणी खिरली ही मान्यता कितपत योग्य आहे?

येथे भाषावर्गणा शब्दरूप परिणमित झाली हे कार्य घडले. त्याचे उपादान कारण भाषावर्गणा आहे. निमित्त तर अनेक असतात. स्तुतिमध्ये म्हटलेच आहे की, 'भविभागन वचजोगे वशाय, तुम धुनि व्है सुनि विभ्रम नशाय' अर्थात 'भव्य जीवांच्या भाग्याने - पुण्योदयाने व तुमच्या वचनयोगाच्या वशाने म्हणजे निमित्ताने तुमची दिव्यध्वनि खिरते व ती ऐकून विभ्रमाचा म्हणजे भ्रांतीचा - मिथ्यात्वाचा नाश होतो.'

केवळ गणधराची उपस्थिति एवढे एकमात्र निमित्त नव्हते दिव्यध्वनि खिरण्यामध्ये तीर्थंकर केवलींचा वचनयोग निमित्त आहे जो नामकर्माच्या उदयामुळे होत असतो. कर्मावरून अजून एक उदाहरण आठवले.

एखाद्याला क्रोध आला, का ? तर मुलांनी दंगा केला म्हणून. हे तर निमित्त झाले. उपादान तर त्याचा चारित्रगुण आहे. कारण क्रोध ही चारित्रगुणाची विभावपर्याय आहे. करणानुयोगाचा अभ्यास झाल्याने तुम्ही विचाराल की क्रोध कर्माच्या उदयाने क्रोध झाला ना? कर्माचा उदय देखील निमित्त आहे, कर्ता नाही. कर्म व जीव दोन भिन्न द्रव्यं आहेत, त्यांचा एकमेकांमध्ये अत्यंताभाव आहे तर मग ते दुसऱ्या द्रव्याचे कार्य कसे करतील बरे? जीव स्वत: क्रोध करतो तेव्हा क्रोध कर्माचा उदय आढळतो.

मग आता मुलांवर रागवायचे की कर्मावर? मुलींनो, आजतागायत जीव हीच तर चूक करत आला आहे. निमित्तानेच कार्य होते, दुसऱ्यामुळे मला क्रोध येतो असे मानून पराबद्दल द्वेषभाव करून जीव रागद्वेषाची परंपरा चालूच ठेवतो. मुलांचा दंगा, शेजाऱ्यांचा त्रास, इतर कटकटी ही तर सर्व बाह्य कारणं झाली. ती वेगवेगळी असू शकतात. त्यांना बहिरंग निमित्त म्हटले जाते. परंतु प्रत्येक वेळी क्रोध कर्माचा उदय तर असतोच असतो ते नियमरूप निमित्त आहे म्हणून कर्माच्या उदयास अंतरंग निमित्त म्हटले आहे.

आता सम्यग्दर्शन या कार्यावर उपादान-निमित्त घटवूया. तुम्हाला सम्यग्दर्शन प्राप्तीची ओढ लागली आहे म्हणून त्याचेच उदाहरण घेऊया. सम्यग्दर्शन हे कार्य आहे व त्या कार्याचे

उपादान कारण जीवाचा श्रद्धागुण आहे, कारण श्रद्धागुण स्वत: सम्यग्दर्शन पर्यायरूपाने परिणमित होतो. त्यावेळी दर्शनमोहनीय कर्माचा क्षय, उपशम अथवा क्षयोपशम व अनंतानुबंधीचा उपशम किंवा अनुदय असतो. हे नियमरूप निमित्त असल्याने यास अंतरंग निमित्त म्हणतात.

सम्यग्दर्शनाची प्राप्ति देशनालब्धिपूर्वक होते. ती देशना देव, गुरु, शास्त्र यांच्या निमित्ताने प्राप्त होते. ज्ञानीच्या उपदेशाने प्राप्त होते. हे बहिरंग कारण आहे.

देशनालब्धिवाला जीव देखील जिनबिम्बदर्शन, स्वर्गातील महान ऐश्वर्य, नरकातील तीव्र वेदना आदिंमुळे अंतर्मुख होऊन सम्यग्दर्शनाची प्राप्ति करतो तेव्हा या कारणांना बहिरंग निमित्त म्हणतात.

येथे तुम्हाला प्रश्न पडणे स्वाभाविक आहे की, 'क्षायिक सम्यग्दर्शनाची प्राप्ति तर तीर्थंकर किंवा केवलीच्या पादमूलाशी - चरणाशी होते असा नियम शास्त्रात सांगितला आहे. पहा तीर्थंकर होते म्हणून हे कार्य झाले ना? सध्या पंचम काळात केवलीभगवान नाहीत म्हणून क्षायिक सम्यग्दर्शन होत नाही. पहा, निमित्तानेच कार्य होताना दिसते आहे.'

हे पहा, क्षायिक सम्यग्दर्शनाचे कार्य श्रद्धागुणात होते. जीवाच्या परिणामांची विशुध्दि अत्यंत वाढते, व करणपरिणामांद्वारे-आत्मस्थिरतेद्वारे-शुद्धोपयोगाद्वारे जीव क्षायिक सम्यग्दर्शन प्राप्त करतो. श्रद्धागुण हेच त्याचे उपादान कारण आहे. त्यामध्ये अंतरंग कारण सात कर्मप्रकृतिंचा (दर्शनमोहनीय तीन व अनंतानुबंधी क्रोध, मान, माया व लोभ हे चार) क्षय हे आहे व बहिरंग कारण तीर्थंकरांचे सान्निध्य हे आहे. तीर्थंकर जर जीवांना क्षायिक सम्यक्त्व प्राप्त करून देत असते तर सर्व जीवांना ते व्हायला हवे. वीतरागी भगवान एका भक्तावर प्रसन्न व दुसऱ्यावर नाही असे तर तिन्ही काळात होऊ शकत नाही.

तीर्थंकरांकडे पहात असताना त्यांची भक्ति करत असताना, त्यांचा उपदेश ऐकत असताना जीव क्षायिक सम्यग्दर्शन प्राप्त करत नाही, तर बाह्य सर्व गोष्टींवरचे लक्ष सुटून निजशुद्धात्म्यामध्ये स्थिरता झाल्याने ते प्राप्त होते.

निमित्तांचे अंतरंग व बहिरंग असे भेद केले तरी देखील निमित्त हे निमित्तच आहे. त्यातील एक निमित्त अधिक बलवान

आहे व दुसरे कमी आहे असे नाही. निमित्तांचे दुसऱ्या पद्धतीने देखील वर्गीकरण केले जाते - (१) प्रेरक निमित्त व (२) उदासीन निमित्त.

'इच्छावान' व 'क्रियावान' द्रव्यांना प्रेरक निमित्त म्हणतात. इच्छाशक्तीने रहित व निष्क्रिय द्रव्य उदासीन निमित्त आहेत असे म्हटले जाते. प्रदेशांच्या हलनचलनास व क्षेत्र क्षेत्रांतर करण्यास क्रिया असे म्हणतात. ही फक्त जीव व पुद्गल द्रव्यांमध्येच होते कारण त्यांच्यामध्ये क्रियावती शक्ति आहे. क्रियावती शक्ति नसल्याने, अनादिअनंत सदैव स्थिर असलेली धर्म, अधर्म, आकाश व काल ही निष्क्रिय द्रव्यं आहेत म्हणून त्यांना उदासीन निमित्त म्हटले आहे. जीव इच्छावान व क्रियावान आहे म्हणून प्रेरक निमित्त तसेच पुद्गल क्रियावान असल्याने प्रेरक निमित्त म्हटले जाते. उदाहरणार्थ, विद्यार्थ्यांना शिकविणारे अध्यापक इच्छावान असल्याने प्रेरक निमित्त आहेत व ध्वजा फडकताना वारा सक्रिय असल्याने प्रेरक निमित्त आहे. निमित्त प्रेरक असो की उदासीन, परद्रव्याचे कार्य करण्यामध्ये ते कोणताही हातभार लावत नाही, दोहोंची स्थिति समानच आहे. दोन प्रकारच्या निमित्तांमध्ये भेद करण्यासाठी प्रेरक व उदासीन ही नावे असली तरीदेखील कोणतेही निमित्त परद्रव्याचे कार्य करण्यामध्ये 'धर्मास्तिकायवत् उदासीनच' आहे असे शास्त्रवचन आहे.

तुम्ही म्हणाल, 'निमित्तांचा एवढा निषेध करण्यात येतो तर त्यांचे नावच कशाला घ्यायचे? त्यांचे स्वरूप कशाला शिकायचे? कोणत्या कार्यात कोणते निमित्त असते हे तरी सांगायचे काय प्रयोजन? बस, उपादानाने कार्य होते म्हटले की झाले.'

पुन्हा नीट ऐका, निमित्ताचा कोणीही निषेध करीत नाही. निमित्ताच्या कर्तृत्वाचा निषेध केला जात आहे. निमित्तामुळे परद्रव्यामध्ये कार्य होते या मान्यतेचा निषेध केला जात आहे. निमित्त तर असतेच असते. परंतु ते अन्य द्रव्याच्या कार्यामध्ये किंचित देखील मदत, असर, प्रभाव, सहाय्य, फेरफार, ढवळाढवळ करत नाही. जेव्हा जेव्हा कार्य होते तेव्हा तेव्हा दोन कारणं असतातच - एक उपादानकारण व दुसरे निमित्तकारण. निमित्त असते म्हणून त्याचे कथनही केले जाते.

कार्य तर आपल्या लक्षात येते ते व्यक्त आहे. परंतु उपादानशक्ति अव्यक्त आहे ती लक्षात येत नाही, निमित्ताची उपस्थितिच लक्षात येते. त्यामुळे निमित्तानेच ते कार्य केले असा भ्रम उत्पन्न होतो. निमित्ताचा स्वीकारच केला नाही तर ज्ञान खोटे होईल, निमित्ताने कार्य होते असे मानले तर श्रद्धा खोटी होईल.

जोपर्यंत निमित्तामुळेच कार्य होते अशी मान्यता राहील तोपर्यंत त्या जीवाची निमित्ताधीन दृष्टि सुटणार नाही. स्वतःच्या कार्यासाठी तो दुसऱ्या व्यक्तीकडे, कर्मांकडे आशाळभूत नजरेने पहात बसेल. परपदार्थांचे महात्म्य कधी हटणार नाही व दृष्टि व ज्ञान स्वला कधी पकडणार नाही.

मी दुसऱ्या पदार्थांचा, मुलाबाळांचा, धंदा-व्यापाराचा, घर-गृहस्थीचा कर्ता आहे अशी मान्यता आहे, तोवर कर्तृत्वबुद्धीचे ओझे कधी हटणार नाही, परकर्तृत्वाचा अहंकार व आकुलता यांसह जीव स्वतःच्या शुद्धात्मस्वरूपाचे निराकुल वेदन करू शकणार नाही. प्रत्येक वस्तुची व त्याच्या कार्यांची अनंत स्वतंत्रता स्वीकारणाराच स्वतःच्या स्वयंसिद्ध स्वरूपात लीनता करू शकेल, त्याचे सम्यग्दर्शनरूपी कार्य सहजच प्रकट होईल. ते कार्य प्रकट करण्याची देखील आकुलता उरणार नाही.

तुम्ही विचाराल की, 'उपादान तर अनादिचे आहे. आमच्या द्रव्यामध्ये व श्रद्धागुणामध्ये शक्ति तर आहे, परंतु आजपर्यंत सम्यग्दर्शनरूपी कार्य का नाही घडले? आजपर्यंत निमित्त मिळाले नव्हते म्हणूनच ना? तुम्हा दोघांच्या उपदेशाने आता प्रेरणा मिळाली आहे. आता नक्कीच 'हम होंगे कामयाब.' हो ना?'

अजूनही निमित्तालाच कार्याचा नियामक-कार्य कधी होणार हे नक्की करणारे कारण मानल्याने असा घोटाळा होत आहे, कारण तुम्हाला अजूनही उपादानाचे भेद माहित नाहीत. ते शिकल्यानंतर तुमच्या लक्षात येईल की श्रद्धागुण अनादिचा असूनदेखील कार्य कधी होणार याचे नियामक उपादानही द्रव्यामध्येच विद्यमान, हजर आहे.

या सर्व प्रकारच्या उपादान कारणांची चर्चा आपण पुढे करणारच आहोत.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# निमित्त - नैमित्तिक संबंध

पत्रांक ७ - ११ मे २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद,

मुलींनो, कारण-कार्य व्यवस्थेमध्ये कारणांची चर्चा करत असताना आपण निमित्तकारण व उपादानकारण यांसंबंधी माहिती करून घेत आहोत. कारणांच्या बाबतीत चुकीचे ज्ञान अर्थात कारण विपरीतता हे मिथ्याज्ञानाचे एक लक्षण आहे. अनादिपासून या अज्ञानी जीवाने एका द्रव्याच्या कार्याचा-पर्यायाचा कर्ता अन्य द्रव्याला मानले आहे. वस्तुव्यवस्था संपूर्णपणे स्वतंत्र असून देखील मान्यतेमध्ये व ज्ञानामध्ये विपरीतता असल्याने परद्रव्यांना कर्ता समजून हा जीव रागद्वेष करत आला व त्याने संसार परिभ्रमण चालूच ठेवले.

जिनागमाचा अभ्यास करून देखील समीचीन दृष्टिविना या जीवाने आपली निमित्ताधीन दृष्टि सोडली नाही. 'निमित्तरूपाने तरी कर्ता आहे ना?' 'निमित्तकर्ता तरी आहे ना?' असे म्हणणारा जीव आपल्या मिथ्याबुद्धीचे प्रदर्शन नव्या नव्या वेषामध्ये करत रहातो. आजपर्यंत ज्या मान्यतांचे पोषण केले, ज्यांचा उपदेश इतरांना दिला त्या मान्यता खोट्या आहेत असे कबूल करायला देखील फार मोठे धाडस लागते. फार थोड्या लोकांना ते जमते.

ज्याच्यावाचून कार्य होत नाही परंतु तरीदेखील जे कार्य करीत नाही ते निमित्त होय. अशी वस्तुस्थिति असल्याने निमित्तच कार्याचा कर्ता आहे असे सामान्यत: सर्वांना वाटते. ज्ञानीच्या उपदेशाने निमित्ताधीन दृष्टि सुटून उपादान शक्तीची जाणीव होते. पहा, येथे देखील ज्ञानीचा उपदेश हे केवळ निमित्त आहे. त्या जीवाची तशी 'पर्यायगत योग्यता' हेच खरे कारण आहे. 'योग्यता' शब्दाची सविस्तर चर्चा पुढे येईलच.

पं. बनारसीदास म्हणतात, —

''उपादान निज गुण जहाँ, तहाँ निमित्त पर होय ।''

येथे 'पर' म्हटले आहे, परद्रव्य नाही. अधिक सूक्ष्मतेने पाहिले असता हे 'पर' दोन प्रकारचे आहे.

(१) परद्रव्याची पर्याय.

(२) स्वद्रव्यातील अन्य गुणाची पर्याय.

परद्रव्याच्या पर्यायांची उदाहरणं आपण पूर्वी पाहिली. अन्य गुणांच्या पर्यायांची तुम्हाला माहिती आहे. परंतु निमित्तांच्या कथनामध्ये आपण त्यांना पुन्हा समजून घेऊ. जरा सामान्य गुणांच्या व्याख्या आठवून पहा बरं. प्रत्येक व्याख्येची सुरवात 'ज्या शक्तीच्या निमित्ताने ....' अशी आपण पाठ केली होती.

प्रत्येक द्रव्यामध्ये अनंत गुण आहेत व प्रत्येक गुण स्वतः स्वतःचे कार्य करतो, त्यामध्ये त्या द्रव्यातील वस्तुत्व गुण निमित्त आहे - खरे पहाता वस्तुत्व गुणाचे परिणमन निमित्त आहे. प्रत्येक गुणाचे कार्य निरंतर चालू असते. त्यामध्ये द्रव्यत्व गुण निमित्त आहे. प्रत्येक द्रव्याची व त्याच्या सर्व गुणांची सत्ता अनादिअनंत कायम रहाते त्यामध्ये त्या त्या द्रव्याचा अस्तित्व गुण निमित्त आहे.

एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्ता नाही हे तर स्थूल कथन आहे. एका द्रव्यातील एक गुणसुद्धा दुसऱ्या गुणाचे कार्य करीत नाही. एवढेच काय प्रत्येक पर्याय देखील स्वसमयामध्ये स्वतःच्या 'योग्यतेने' उत्पन्न होते.

तुम्ही म्हणाल, 'तर मग आम्ही निमित्तांना शोधायचे की नाही? आहे त्या निमित्तांना ठेवायचे की सोडून द्यायचे?'

मुलींनो, निमित्तं शोधून मिळत नसतात, कारण निमित्त नावाचे कोणते विशिष्ट द्रव्य नाही, त्या द्रव्याची पर्याय आहे. तुम्ही परद्रव्याला जरी शोधले तरी त्या द्रव्याची विशिष्ट पर्याय उत्पन्न करणे हे काही तुमच्या हाती नाही. शिवाय असं पहा, कार्य हे एक समयाचे असते. एका द्रव्याच्या अनंत गुणांमध्ये प्रत्येक समयाला स्वतःचे एक एक कार्य निरंतर चालू असते. असे असताना कोणत्या गुणाच्या कोणत्या कार्याचे निमित्त तुम्ही शोधणार? एक समयाचे कार्य हे आपल्या क्षयोपशम ज्ञानात जाणले जाऊ शकत नाही. आपण ज्याला कार्य म्हणतो ते तर स्थूल कथन आहे.

आपण म्हणतो मी बोट हलविले. बोटामध्ये अनंत पुद्‌गल परमाणु आहेत. त्या प्रत्येकाच्या स्वतःच्या स्वतंत्र उपादानाने त्या

त्या परमाणुची हलण्याची-क्षेत्रक्षेत्रांतराची-क्रिया घडली. त्यामध्ये अंतरंग निमित्त अर्थात नियमरूप निमित्त धर्मद्रव्य आहे. तुम्ही म्हणाल, 'जीवाने इच्छा केली तेव्हाच तर बोट हलले, पहा मी मला पाहिजे तेव्हा बोट हलवू शकते'. मला सांगा, एखाद्या पॅरॅलिसिस (लकवा) झालेल्या माणसाला बोट हलविण्याची खूप इच्छा असते मग तो का बरं हलवित नाही? तुम्ही म्हणाल, 'त्याच्या शरीराची व मज्जातंतुंची तशी योग्यता नाही.' हां, हेच तर जिनागमामध्ये पण सांगितले आहे. त्याची योग्यता नसते तेव्हा हलत नाही व जेव्हा हलते तेव्हा ते त्याच्या योग्यतेनेच हलते, जीवाने इच्छा केली म्हणून नाही.

स्वत: परिणमन करणाऱ्या द्रव्याला अन्य द्रव्याच्या मदतीची जराही अपेक्षा, जरूरी नसते.

एखाद्या पार्किन्सोनिझम (कंपवात) झालेल्या मनुष्याची बोटे, हात त्याच्या इच्छेविरुद्धच हलतात, तो तर त्यांच्या हलण्याने कासावीस होऊन जातो. यावरून हेच सिद्ध होते की जीवाच्या इच्छेने शरीराची क्रिया होतही नाही व थांबतही नाही.

जीवाच्या व शरीराच्या अनेक क्रियांमध्ये निमित्त नैमित्तिक संबंध आढळून येतो. जसे, चालणे, बोलणे, हसणे, भोजन करणे, उपवास करणे इत्यादि. जीवाने आजपर्यंत या सर्व क्रियांना स्वत:च्याच क्रिया मानल्या आहेत.

संबंध हा शब्दच दोन भिन्न गोष्टींचा सूचक आहे व निमित्ताचा अर्थच असा आहे की जो स्वत: नैमित्तिक कार्याचा कर्ता नाही. निमित्त नैमित्तिक संबंध, ज्ञेय ज्ञायक संबंध, एकक्षेत्रावगाह संबंध, संयोग संबंध आदि भिन्नतेचे ज्ञान करून देणारे संबंध आहेत. परंतु त्याऐवजी 'पहा हा संबंध तरी आहे ना' म्हणून जीवाने आपली परामधील एकत्वबुद्धि व ममत्वबुद्धि पुष्ट केली. अनादिपासून पराशी संबंध जुळविण्यातच या जीवाला रस आहे.

ज्याप्रमाणे एका गुणाच्या पर्यायामध्ये - कार्यामध्ये स्वद्रव्याचे अन्य गुण सहजच निमित्त बनतात तसेच एका द्रव्याच्या कार्यामध्ये देखील अन्य द्रव्य सहजच निमित्त बनतात. एखाद्याला निमित्त बनवू अशी इच्छा केल्याने ते निमित्त बनत नाही. परंतु

ज्यावेळी एखादे कार्य होते तेव्हा त्या कार्यात विशिष्ट द्रव्य निमित्त झाले असे आढळून येते. त्याचे उदाहरण पाहूया.

मारीचि हा वृषभदेवाच्या भरत चक्रवर्ती या पुत्राचा पुत्र - त्यांचा नातू. ज्याचे आजोबा साक्षात तीर्थंकर, वडील चक्रवर्ती, क्षायिक सम्यग्दृष्टि होते, त्या मारीचिने स्वत: अज्ञान दशेत दिगंबर मुनिदीक्षा अंगिकार केली. सर्वोत्कृष्ट सर्व निमित्तं होती परंतु तरीदेखील सम्यग्दर्शनाची प्राप्ति झाली नाही, उलट त्याने ३६३ पाखंडी मतांची स्थापना केली. सम्यग्दर्शनाचे कार्यच घडले नाही म्हणून त्याच्याबाबतीत निमित्तं होती असं म्हणणंही चुकीचे आहे. तोच जीव अनेक भवांनंतर सिंह पर्यायामध्ये आला. दोन चारण ऋद्धिधारी मुनींच्या उपदेशाने अंतर्मुख परिणामांद्वारे त्याने सम्यग्दर्शन प्राप्त केले.

त्या जीवाची सम्यग्दर्शन प्राप्तीची योग्यता होती तर निमित्त आकाशातून उतरले. मुनींना उपदेशाचा भाव झाला हे त्यांचे कार्य त्यांच्या उपादानाने झाले व सिंहासाठी ते निमित्तरूप झाले. निमित्त नैमित्तिक संबंध असा नेहमी सहजच असतो. प्रथमानुयोगातील अनेक कथा वाचून आपल्या हे लक्षात येते.

दुसरा प्रश्न होता की निमित्तांना हटवून विशिष्ट दुर्घटना तरी टाळता येते ना? यासाठी आपण हरिवंशपुराणातील प्रसिद्ध घटना पाहूया. नेमिनाथ तीर्थंकरांनी द्वारकानगरी १२ वर्षांनंतर जळेल असे सांगितले होते. त्यामध्ये निमित्तही घोषित केले होते की यादव राजकुमार मद्य पिऊन द्वीपायन मुनींवर उपसर्ग करतील व त्यामुळे क्रोधित होऊन मुनींच्या अशुभ तेजस शरीराद्वारे द्वारका जळेल व तेही भस्म होतील.

सर्वज्ञावर व क्रमबद्धपर्यायावर ज्यांची श्रद्धा होती त्यांना वैराग्य होऊन त्यांनी महाव्रतं, अणुव्रतं धारण केली व काहींनी सम्यक्त्वाची प्राप्ति केली. ज्यांचा सर्वज्ञावर पूर्ण विश्वास नव्हता त्या यादवराजांनी ती दुर्घटना टाळावी म्हणून सर्वत्र 'दारूबंदी' चा कायदा लागू केला. मद्य निर्माण करण्यासाठी वापरात येणाऱ्या साऱ्या वस्तु दूर जंगलात दऱ्याखोऱ्यांमध्ये फेकून देण्यात आल्या. द्वीपायनाने विचार केला की आपणच येथून निघून जाऊ त्यायोगे 'न रहेगा बास, न बजेगी बासुरी.'

बारा वर्षं संपत आली. अधिक मास मोजायला विसरल्याने द्वीपायन १२ वर्षं उलटून गेली असे समजून कुतुहलाने १२ वर्षं पूर्ण होण्यापूर्वीच द्वारकेस परतले. रानामध्ये वनक्रीडा करण्यासाठी गेलेल्या राजकुमारांनी तेथल्या तळ्यातलं पाणी प्राशन केले. परंतु ते तर मद्यसामुग्री कुजून त्याचे मद्य बनले होते. राजकुमारांना मद्याची धुंदी चढली. नगराकडे येत असतांना द्वीपायन दिसले व हेच ते द्वारका जाळणारे असे म्हणून त्यांना दगडं मारायला सुरवात केली. त्यामुळे द्वीपायन अतिशय क्रुद्ध झाले व त्यांच्या डाव्या बाहूतून अशुभ तेजस शरीर बाहेर पडले, द्वारकेस जाळून ते परत मूळ शरीरात आले व द्वीपायन देखील जळून मेले. या गोष्टीला तेजस समुद्घात असे म्हणतात.

जी घटना टाळण्यासाठी सर्व प्रयत्न केले होते ते प्रयत्नच कालांतराने निमित्त ठरले. म्हटलेच आहे, 'तादृशी जायते बुद्धि यादृशी भवितव्यता'. हे वाचून नियतिवर किंवा कर्मावर सारा भार सोपवू नका बरं! शास्त्रामधील कर्माचे सविस्तर वर्णन व त्यांचा जीवाशी निमित्त नैमित्तिक संबंध यांचे कथन वाचून जीव कर्मावरच सारा हवाला ठेवतो. कर्मच मला रागद्वेष करवितात, मला सुख दुःख देतात, मला संयोग मिळवून देतात अशा प्रकारे कर्माला कर्तापणा बहाल करून हा जीव स्वतःला पराधीन मानून हीनदीन बनतो.

पं. टोडरमलजींनी म्हटले आहे की, ''जर कर्म स्वतः प्रयत्नपूर्वक जीवाच्या स्वभावाचा घात करत असते, त्याला बाह्यसामुग्री मिळवून देत असते तर कर्मामध्ये चेतनपणा पण असायला पाहिजे व बलवानपणादेखील असायला पाहिजे, तो तर आढळत नाही, सहजच निमित्त नैमित्तिक संबंध असतो. ज्यावेळी त्या कर्मांचा उदयकाल असेल तेव्हा जीव स्वतःच स्वभावरूप परिणमन करत नाही, विभावरूप परिणमन करतो व अन्य द्रव्य त्याचप्रमाणे संबंधरूप होऊन परिणमतात.''

''ज्याप्रमाणे सूर्यादय झाल्यावर चकवा-चकवीचे मिलन होते. रात्री कोणी त्यांना द्वेषबुद्धीने बळजबरी करून वेगळे केलेले नसते व दिवस उगवताच कोणी त्यांना करुणाबुद्धीने एकत्र आणत नाही, सूर्यास्ताच्या निमित्ताने स्वतःच ते वेगळे होतात व

सूर्योदयाच्या निमित्ताने स्वतःच भेटतात असाच निमित्त नैमित्तिक संबंध बनतो. त्याचप्रमाणे कर्माचादेखील निमित्त नैमित्तिक भाव जाणावा''.

आचार्य अमृतचंद्रांनीं प्रवचनसारच्या तत्त्वप्रदीपिका नावाच्या टीकेमध्ये म्हटले आहे, ''द्रव्य आपल्या अनंतशक्तिरूप संपत्तिने परिपूर्ण आहे, म्हणून स्वतःच सहा कारकरूप होऊन आपले कार्य करण्यास समर्थ आहे. त्याला बाह्यसामुग्री - अन्य कोणीही सहाय्य करू शकत नाही. म्हणून केवलज्ञानाची इच्छा करणाऱ्या जीवाला बाह्यसामुग्रीची अपेक्षा ठेऊन परतंत्र होणे योग्य नाही.''

बाह्यसामुग्री म्हणजे देव, शास्त्र, गुरु, कर्म, इतर अनुकूलता वगैरे. वर सहा कारक असा शब्द आला आहे त्या विषयाची सविस्तर चर्चा आपण नंतर करूया. कारणांच्या चर्चेमध्ये सहा कारकांची चर्चा देखील आवश्यक आहे.

अमृतचंद्राचार्य आत्मख्यातिच्या शेवटी लिहितात की, ''हे व्यवहारी जनांनो, ही टीका अमृतचंद्रसूरि यांनी रचली अशा मोहाने नाचू नका. ही तर शब्दांची रचना शब्दांमुळे झाली आहे''.

तुम्हाला वाटेल हे सारे बोलण्यापुरते आहे. ज्याची स्वतःची कर्तृत्वबुद्धि कायम आहे, त्याला दुसऱ्याचे विधान अंतःकरणापासून लिहिले आहे याची खात्री पटत नाही. मी तुम्हाला सांगू इच्छिते की वस्तुस्वरूपाचे-तत्त्वांचे ज्ञान झाल्यावर, सम्यग्दर्शन झाल्यावर परद्रव्यांची सर्व कार्य होत असलेली भासित होतात, स्वतःची भिन्नता सदैव अनुभवात येत असते.

जो जीव ज्ञानींचा उपदेश सरळ मनाने ग्रहण करतो, हे असेच आहे असा विश्वास ठेवतो, जिनेन्द्र भगवंतांची वाणी पूर्ण सत्य व कल्याणकारी आहे अशा खात्रीपूर्वक त्यावर श्रद्धा व तदनुसार तत्त्वनिर्णय करतो तो जीव अल्पकाळातच सम्यग्दर्शन प्राप्त करून मोक्षमार्गावर अग्रेसर होतो. त्याच्यासाठी मोक्ष दूर नाही, हे सांगण्याची गरजच नाही.

तुम्ही म्हणाल, 'निमित्त कार्यामध्ये काहीही करत नाही तर मग कुदेव, कुगुरु, कुशास्त्र यांचा त्याग करा असा उपदेश का दिला जातो?'

जेव्हा 'हे करा', 'ते करा' किंवा 'असं करायला पाहिजे' अशी भाषा असते तेव्हा ती उपदेशाची भाषा आहे असे समजावे. चरणानुयोगात देखील अशा पद्धतीची भाषा आढळते. याचा अर्थ असा कदापि होत नाही की चरणानुयोगामध्ये निमित्ताला कर्ता मानले आहे. आपण सिद्धांत शिकतो तेव्हा जी यथार्थ वस्तुस्थिति आहे तिचे कथन केले जाते. तत्त्वनिर्णय या सिद्धांतांच्या आधारे होत असतो, ते करण्याची प्रेरणा देणारी उपदेशात्मक भाषा अशी असते.

ज्या जीवाला सम्यग्दर्शन प्राप्त झाले आहे त्या जीवाला खऱ्या देव, शास्त्र, गुरुची प्रतीति, प्रयोजनभूत सात तत्त्वांचे हेय, ज्ञेय, उपादेय श्रद्धान असतेच असते. सम्यग्दर्शनाची प्राप्ति होण्यापूर्वी ही पात्रता आहे की त्या जीवाला कुदेवादिंची श्रद्धा, आदर, विनय असत नाही. कोणते कार्य होताना कोणत्या प्रकारचे निमित्त असते त्याचे आपणास ज्ञान करविले जाते, प्राथमिक भूमिकेतील जीवांना ही उपदेशात्मक भाषा लवकर समजते, म्हणून तसा कुदेवादिंचा त्याग करण्याचा उपदेशही दिला जातो.

आम्ही डॉक्टर्स पेशंटला औषध देताना बजावून देतो की हे औषध पोटात घ्यायचे आहे-खायचे आहे व हे वरून लावायचे औषध आहे. त्यावर छापलेले असते **For external use only** म्हणजे फक्त बाहेरून लावावे. बाहेरून लावण्याचे औषध खाता कामा नये हा एवढा विवेक रोग्याला हवा नाहीतर अनर्थ होईल. द्रव्यानुयोगाच्या व चरणानुयोगाच्या भाषेबद्दलही असा विवेक आपण बाळगला पाहिजे.

चरणानुयोगाच्या ग्रंथांमध्ये मुनि व श्रावक यांच्या आचरणाबद्दल उपदेश असतो. तेथे काही शरीरातील एकत्वबुद्धीचे पोषण करण्याचे प्रयोजन नसते. ज्या जीवांनी सम्यग्दर्शन प्राप्त केले आहे, ज्यांची शरीरातील एकत्वबुद्धि नष्ट झाली आहे अशा जीवांना हा उपदेश दिला जातो. मोक्षमार्ग हा आत्मस्थिरतेद्वारेच प्राप्त होतो व त्याची वृद्धिही वृद्धिंगत आत्मस्थिरतेद्वारेच होत असते. परंतु त्याच बरोबर अशा जीवांना सहजच श्रावक व मुनियोग्य व्रतं व आचरण पाळण्याचा भाव - राग येतो. असा सहजच निमित्त नैमित्तिक संबंध असतो.

निमित्त हे सहचर आहे, सूचक आहे, ज्ञापक म्हणजे सांगणारे आहे. ज्या जीवास, श्रावकास योग्य अशी दोन कषाय चौकडीच्या अभावपूर्वक वीतरागता असते, त्या जीवास अणुव्रतांचे परिणाम असतातच. ज्या जीवास मुनियोग्य अशी तीन कषाय चौकडीच्या अभावपूर्वक वीतरागता असते त्या जीवास महाव्रतं व इतर मिळून २८ मूलगुण पाळण्याचे परिणाम व तद्वत आचरण असतेच असते.

श्रावक, मुनि, भगवान यांच्या बाह्य स्वरूपाकडे पाहून आपण त्यांच्या भूमिकेबद्दल अंदाज बांधू शकतो. जे म्हणतात आम्ही मुनि-आचार्य आहोत आणि त्यांना बाह्य परिग्रह-वस्त्र-पात्र इत्यादि असतील तर ते तिन्ही काळात खरे मुनि असू शकणार नाहीत. हां, बाह्यतः नग्न वेष आहे म्हणून कोणी मुनियोग्य वीतरागी असेलच असे नाही. परंतु जो जो खरा मुनि असेल त्याच्या अंतरंगात मुनियोग्य वीतरागता व बाह्यतः २८ मूलगुणांचे पालन असेलच. पहा, येथे वीतरागतेच्या बरोबर निमित्तरूप रागभाव - सरागधारा व निमित्तरूप शरीराची अवस्था यांचा सहज सुमेळ असतो. असाच सहज निमित्त नैमित्तिक संबंध असतो.

शरीरावर जखम झाली असता आपण मलमपट्टी लावतो - ड्रेसिंग करतो. जखम भरून येण्याचे कार्य तर शरीरात होते, पट्टीतून काहीही होत नाही. तरीदेखील बाह्य इन्फेक्शन लागू नये, मार लागू नये म्हणून तिचा उपयोग असतो. तद्वतच त्या त्या भूमिकेस योग्य आचारही असतात. तुम्ही म्हणाल, 'तू तरी उपदेश का देत आहेस? पत्ररूप स्वाध्याय का करत आहेस?' स्वामीजींचे एक उत्तर मला नेहमी आठवते. ते म्हणत, 'कोण करे'? अर्थात 'कोण करतो?'

शब्दांची रचना हे परमाणुंचे स्वतःच्या उपादानशक्तीने होणारे कार्य आहे. त्यामध्ये निमित्तं अनेक आहेत. तुमच्या व इतरांच्या निमित्ताने हे लिहिले जात आहे त्यात तुम्ही निमित्त आहात. लिहिण्याचा राग माझ्यामध्ये उत्पन्न होत आहे तो काही मला विचारून येत नाही-तेही सहज निमित्त आहे. अधिक आत्मस्थिरते ऐवजी हा शुभ अपराध होत आहे याचीही मला जाणीव आहे. तुमच्याशी घर-गृहस्थी, मुले बाळे, दागिने -

साड्या यांच्याबद्दल चर्चा करण्याचा विचारही माझ्या मनात येत नाही याचेही मला भान आहे.

कोणी जिनमंदिर बांधतो, कोणी शास्त्रं छापतो, कोणी दान देतो व कोणी प्रचार प्रसारामध्ये आपले योगदान देतो. आपण त्यांची प्रशंसादेखील करतो. अशावेळी ते कार्य करणाऱ्याला व त्याची प्रशंसा करणाऱ्या आपणालाही हे लक्षात हवे की ही सारी परमाणुंची रचना परमाणुंमुळे-त्यांच्या योग्यतेने होत आहे, मी त्या गोष्टींचा कर्ता नाही. निमित्ताची ही सारी चर्चा ऐकून तुम्ही म्हणाल की, 'आम्ही दान द्यावे की न द्यावे? लाडू बनवावे की नाही? निदान खाण्याचा आनंद तरी घ्यावा ना?'

पहा, अजूनही भ्रांति चालूच आहे. निमित्ताला केवळ निमित्तरूपाने स्वीकार करायचे आहे, कर्तापणाने नव्हे. जे जे कार्य घडते व घडणार आहे, त्याला योग्य असे निमित्तदेखील सहजच उपलब्ध होत असते. कोणालाही हटवायचे नाही, कोणाला जबरदस्तीने आणावयाचे नाही.

जीवाची अनादिकालीन मिथ्याबुद्धि अशीच चालत आली आहे की 'मी परद्रव्यांचा कर्ता आहे.' केवळ कर्ता मानून तो थांबत नाही, परद्रव्यांचा मी भोक्ता आहे असा अभिप्रायदेखील त्याच्या बरोबरच विद्यमान असतो. आपण विशिष्ट कार्याचे कर्ता आहोत की नाही हे पहाण्यासाठी मी तुम्हाला एक साधी सोपी युक्ति सांगते. गुणामध्ये जी शक्ति विद्यमान असते तिच्या प्रकट अंशालाच तर पर्याय असे म्हणतात, त्यालाच आपण कार्य म्हणतो. याचा अर्थ असा की जसा गुण तसे कार्य. ज्या कार्याचा आपण स्वत:ला कर्ता मानत आहोत, त्यामध्ये आपले गुण प्रकट झाले आहेत का याचा विचार करा. आपल्याला अभिमान वाटतो की पहा मी पोळ्या किती सुंदर बनविते. आपले ज्ञान, दर्शन, श्रद्धा, चारित्र, सुख इत्यादि गुणांचा अंश पोळीमध्ये प्रकटला का? नाही, तसे तर कधीच होत नाही. तर मग निश्चित समजा की ते आपले कार्य नाही.

जीव परद्रव्याचा कर्ता मानून थांबला नाही, त्याने स्वत:ला परद्रव्याचा भोक्ता मानले, परद्रव्याला - पुद्‌गलाला आपले 'भोग्य' मानले म्हणूनच प्रश्न पडतो की मी लाडूचा कर्ता नाही परंतु त्याचा भोक्ता तरी आहे ना? पहा मी त्याचा स्वाद घेत

आहे, आनंद घेत आहे, सुखी होत आहे. जरा विचार करा लाडूचा कोणता गुण जीवामध्ये प्रविष्ट झाला? लाडूतील स्पर्श, रस, गंध, वर्ण गुण जीवामध्ये आले का? लाडूत सुख गुण आहे का की ज्याची पर्याय जीवामध्ये व्हावी?

जीवाने लाडूतील गोड रस आपल्या ज्ञानाद्वारे जाणला, ज्ञान रसरूप परिणमले का? स्पर्श, गंध, वर्णरूप परिणमले का? तसे झाले असते तर ज्ञान अचेतन होण्याचा प्रसंग आला असता. लाडूला जाणताना ज्ञान ज्ञानरूपानेच स्वचतुष्टयात राहिले, लाडू हे ज्ञेय ज्ञेयरूपाने त्याच्या स्वचतुष्टयात राहिले. जर गुणाचे परिवर्तन म्हणजे एका द्रव्यातून दुसऱ्या द्रव्यात जाणेरूप कार्य घडत नाही तर मग एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्ता किंवा भोक्ता असू शकत नाही.

आरशामध्ये अग्निचे प्रतिबिंब ही आरशाची अवस्था आहे अग्नि आरशात प्रविष्ट झाला नाही. आरशाचे गुण आरशात व अग्निचे गुण अग्निमध्ये कायम आहेत. ज्ञान देखील ज्ञेयाला जाणताना सदैव ज्ञानरूपच रहाते. ते स्वशक्तीने ज्ञेयाच्या गुणपर्यायांना जाणते परंतु ज्ञेयरूप होत नाही. अज्ञानी जीव स्वतःला ज्ञेयरूप मानतो (एकत्वबुद्धि), ज्ञेय माझे आहे असे मानतो (ममत्वबुद्धि), मी ज्ञेयाचा कर्ता आहे असे मानतो (कर्तृत्वबुद्धि), मी ज्ञेयाचा भोक्ता आहे असे मानतो (भोक्तृत्वबुद्धि). अशा विविध रूपांमध्ये तो आपले मिथ्यात्व कायम ठेवतो.

जीवाने स्वतःला कर्माचा, नोकर्माचा म्हणजे शरीरादिंचा कर्ता मानले कारण त्यांच्यातील निमित्त नैमित्तिक संबंध न ओळखल्याने जीवाने त्यांच्याशी कर्ता कर्म संबंध मानला. जीवाच्या मोह रागद्वेष रूपी भावांच्या निमित्ताने कार्माण वर्गणा स्वतः कर्मरूप परिणमतात. हे परिणमन त्यांच्या स्वतःच्या उपादानाने स्वकालाच्या योग्यतेने होते, जीव त्यांचा तिळमात्रही कर्ता नाही. जीवाचा रागभाव निमित्तरूपाने उपस्थित आहे म्हणून अज्ञानीचा असाच भ्रम होतो की जीवाने कर्म बांधले. नोकर्माच्या बाबतीतही असेच आहे.

एक नियम पक्का ध्यानात ठेवा की जो कोणी कर्ता असतो तो आपल्या भावांचाच म्हणजे पर्यायांचा कर्ता असतो.

परभावांमध्ये - परद्रव्यांच्या भावांमध्ये निमित्तमात्र होऊन सुद्धा कोणी परभावांचा कर्ता किंवा भोक्ता होऊच शकत नाही. विभाव असल्याने जीवाला आपल्या रागभावांचा कर्ता एका अपेक्षेने म्हटलेही जाऊ शकते परंतु कर्माचा कर्ता तो सर्वथा होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे जीव सुख, दु:खाचा भोक्ता आहे असे म्हणता येईल परंतु कर्माचा किंवा परवस्तुचा भोक्ता तो सर्वथा होऊ शकत नाही.

कर्म व शरीरादि नोकर्म जीवाबरोबर एकक्षेत्रात रहातात. परंतु हा जीव अत्यंत भिन्न अशा सजीव व निर्जीव पदार्थांचा - स्त्री, पुत्र, घर, धन, धान्य, आदिंचा आपल्याला कर्ता, भोक्ता मानतो. अज्ञानी जीवाने या पदार्थांमधून सुख मिळते अशी भ्रामक कल्पना करून घेतली आहे. परंतु कधी कधी हे पदार्थ दु:खामध्ये निमित्त झाल्याचेही आढळून येते.

हे सारे निमित्त नैमित्तिक संबंध जाणून पराशी संबंध प्रस्थापित करणे हे आपले प्रयोजन नसून, भेदविज्ञान करणे हेच एकमेव प्रयोजन आहे. आत्मा ज्ञानस्वरूप आहे - चैतन्यमय आहे व त्याच्या पर्याय, त्याची कार्यं आपल्या चैतन्यस्वभावाला सोडत नाहीत. आत्मा निजभावांचा कर्ता व भोक्ता आहे, पर पदार्थांच्या भावांचा कर्ता, भोक्ता तो कदापि नाही.

अशाप्रकारे प्रत्येक कार्य उपादानरूप निजशक्तीनेच होत असते त्यावेळी निमित्तही सहजच उपस्थित होत असते. अशा वस्तुव्यवस्थेला जाणून योग्य तत्त्वनिर्णयाने आपल्याला निराकुलतेची प्राप्ति होते.

उपादान कारणांच्या भेद-उपभेदांची चर्चा केल्यानंतर तुमचे कारण-कार्यासंबंधीचे अन्य प्रश्नही सुटतील अशी मला आशा आहे.

शेष पुढील पत्री.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# उपादान कारण

पत्रांक ८ २२ मे २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

मुलींनो, जिनागमाच्या आधारे आपण कारण-कार्य व्यवस्था पहात आहोत, कारणांची चर्चा करत आहोत. शास्त्रात म्हटले आहे, 'कारणानुविधायिनी कार्याणि' अर्थात कार्य हे कारणाला अनुसरून होते. जसे कारण तसे कार्य. एक कार्य घडते तेव्हा अनेक कारणं एकत्रित होतात. त्यामध्ये खरे कारण अर्थात कार्याचा कर्ता कोण व बाकीची कारणं म्हणजे निमित्त - अनुकूल विशिष्ट परिस्थिति कोणती याचा निर्णय आपण करावयास हवा.

आचार्य अमृतचंद्र आत्मख्याति टीकेमध्ये म्हणतात की, "जो परिणमन करतो तो कर्ता, जे परिणमन झाले ते त्याचे कर्म म्हणजे कार्य व जी क्रिया घडली या तीन गोष्टी वस्तुपणाने एकच आहेत परंतु त्यांचा असा भेद करणे हा उपचार आहे. परंतु एका द्रव्याचे कार्य अन्य द्रव्य करतो असे ज्ञान मिथ्याज्ञान आहे. जीवद्रव्य पुद्‌गलाचे-कर्माचे, शरीराचे कार्य करतो असे जाणणे मिथ्याज्ञान आहे, अशी मान्यता मिथ्यादर्शन आहे. दोन द्रव्यामध्ये कर्ता-कर्मपणाचा उपचारदेखील संभवत नाही."

एखादा म्हणेल की दोन द्रव्यं मिळून तरी एक कार्य करीत असतील ना? उपादान व निमित्त मिळून तरी कार्य होते ना? त्यावर आचार्य म्हणतात 'दोन द्रव्य मिळून एक परिणाम - पर्याय - कार्य करीत नाहीत, दोन द्रव्यांची मिळून एक क्रिया होत नाही.'

एखादा शंका करेल की जीवद्रव्य राग द्वेष रूप कार्य व कर्मबंधरूप कार्य ही दोन कार्ये तर करू शकेल ना? तर तेही अशक्य आहे. जीवद्रव्याची परिणति चैतन्यमय आहे, पुद्‌गलाची परिणति जड आहे - अचेतन आहे. जीव जीवभावरूप परिणमित होतो मग ते स्वभावरूप अर्थात शुद्ध चेतनारूप परिणमन असो की विभावरूप - राग, द्वेष, मोहरूप अशुद्ध चेतनारूप परिणमन असो. त्याचप्रमाणे पुद्‌गलद्रव्य ज्ञानावरणादि जडकर्मरूप परिणमित होते.

आचार्य पुढे म्हणतात, ''अनादिकाळापासून मिथ्यादृष्टि जीव मिथ्यात्वरूप अंधःकारामुळे कर्माचा कर्ता जीव आहे असेच मानत आले आहेत. कर्मकृत पर्याय - मनुष्य, तिर्यंच, देव, नारकी यामध्येच 'हा मी' असे मानत आले आहेत. परंतु हे अज्ञान अनादिचे असले तरी घाबरण्याचे कारण नाही. स्वतःच्या स्वरूपाचे - शुद्धज्ञानघन स्वरूपाचे भान होताच हा जीव अंतर्मुहूर्तात सम्यक्त्व प्राप्त करू शकतो.''

जोपर्यंत परद्रव्यामुळे कार्य होते, निमित्तामुळे कार्य होते, निमित्त नाही म्हणून माझं कार्य पुरं होत नाही अशी मान्यता राहील तोपर्यंत दृष्टि व ज्ञानाचा उपयोग दोन्ही पराकडेच लागून रहातील, तेथून हटून स्वद्रव्याकडे येणार नाहीत.

या विश्वातील अनंत द्रव्यांमध्ये प्रत्येकामध्ये स्वतःची उपादान शक्ति विद्यमान आहे, ज्यायोगे त्या त्या द्रव्याचे कार्य-परिणमन होत आहे, अनादिपासून होत आले आहे व अनंतकाळापर्यंत होत राहील. प्रत्येक द्रव्यातील अनंत गुणांचे प्रत्येकाचे स्वतःचे परिणमन स्वतःमध्ये स्वतःमुळे चालू आहे.

कालाणु व परमाणु ही एकप्रदेशी अतिसूक्ष्म द्रव्यं असोत की अनंतप्रदेशी आकाशद्रव्य असो प्रत्येक द्रव्य स्वतःमध्ये स्वयंपूर्ण आहे, परिपूर्ण आहे. त्याला टिकून रहाण्यासाठी किंवा प्रतिसमय परिणमण्यासाठी - स्वतःचे कार्य करण्यासाठी परद्रव्याची किंचितही अपेक्षा नाही, आवश्यकता नाही. प्रत्येकजण निजशक्तीने भरपूर आहे. प्रत्येक द्रव्यात अशी अनंत प्रभुता आहे, असे अनंत ऐश्वर्य आहे. प्रत्येक द्रव्य ईश्वर आहे. हीच चराचराची ईश्वरता आहे. एक ईश्वर सर्व विश्वात व्यापलेला आहे अशी मान्यता अज्ञानाचे द्योतक आहे.

अज्ञानी जगताने पराचे कार्य करणारा तो ईश्वर असे मानले आहे. दुनियेचा कर्ता, धर्ता, हर्ता तो ईश्वर असे मानले आहे. असा कोणी ईश्वरच अस्तित्वात नाही, असे कोणतेही द्रव्य नाही की जे दुसऱ्याचे काही कार्य करेल, दुसऱ्याचे बरेवाईट करेल, दुसऱ्याला मदत करेल, दुसऱ्याचा नाश करेल.

प्रत्येक द्रव्याचे परिणमन-कार्य-पर्याय त्या द्रव्याच्या निजशक्तीनेच होत असते, त्या शक्तीला उपादान कारण असे म्हटले आहे. आपल्याला कार्य तर दिसते, निमित्तकारणंही लक्षात

येतात परंतु ही उपादान शक्ति कधी माहितच नव्हती. ती अव्यक्त आहे, म्हणून ती नाही असे मानणे चुकीचे होईल.

तुम्ही विज्ञानाच्या प्रयोगशाळेत सूक्ष्मदर्शक यंत्राने अनेक वेळा परीक्षण केले आहे. साध्या डोळ्यांना नुसता रक्ताचा थेंब, तोही काचेवर पसरलेला, एवढेच दिसते. पण सूक्ष्मदर्शक यंत्राने पाहिले असता त्यात पांढऱ्या पेशी, लाल पेशी व त्यांचेही अनेक भेद इत्यादि कितीतरी गोष्टी दिसतात. तसेच वस्तुस्वरूपाचे ज्ञान आपल्या सामान्य नजरेमध्ये-ज्ञानामध्ये येत नाही, त्यासाठी केवलज्ञानींनी आपल्या केवलज्ञानाद्वारे जाणून जे कथन केले आहे त्या आगमाचा अभ्यास हवा. आपल्याला आगम चक्षुद्वारे हे सारे स्पष्ट दिसू लागते.

प्रवचनसार ग्रंथामध्ये म्हटले आहे की सर्व प्राणी इंद्रियचक्षुवाले आहेत, देव अवधिचक्षुवाले म्हणजे अवधिज्ञानाद्वारे जाणणारे आहेत, साधु आगमचक्षुवाले म्हणजे आगमाद्वारे सर्व जाणणारे आहेत व केवलीभगवान सर्वत:चक्षुवाले आहेत अर्थात सर्व आत्मप्रदेशांद्वारे जाणणारे आहेत-केवलज्ञानाद्वारे जाणणारे - 'सर्वज्ञ' आहेत.

प्रयोगशाळेत आपण कधी असं म्हणत नाही की माझ्या डोळ्यांना दिसते तेवढेच मी मानेन. उलटपक्षी सूक्ष्मदर्शित्राखाली निरीक्षण करून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यामध्ये-आपले ज्ञान विकसित करण्यामध्ये आपल्याला केवढा तरी उत्साह वाटतो.

तद्वतच आगमाद्वारे विश्वाचे, सहा द्रव्यांचे, प्रयोजनभूत सात तत्त्वांचे स्वरूप, कारण-कार्य व्यवस्था इत्यादि अनेक गोष्टी जाणून आपल्याला खऱ्या वस्तुस्वरूपाचे ज्ञान होते, आपले स्वत:चे स्वरूप स्पष्टपणे लक्षात येते. स्वत:च्या स्वरूपाबद्दल व ते अनुभवण्याच्या मार्गाबद्दल नि:शंकता असेल तरच स्वस्वरूपामध्ये एकाग्रता-रमणता-लीनता करून आपण शुद्धात्मानुभूति करू शकतो-सम्यग्दर्शनाची प्राप्ति करू शकतो.

आगमाचा अर्थ आगमानुकूलच लावला पाहिजे. 'मला असं वाटतं' म्हणून स्वत:च्या बुद्धिचे माप लावून चालत नाही. गणिताच्या पुस्तकातली उदाहरणं-गणितं सोडवल्यावर मागच्या पानावरच्या उत्तराशी आपले उत्तर जुळते की नाही हे आपण पहातो. जुळत नसेल तर पुन:पुन: सोडवतो, सुटत नसेल तर गुरुजनांना-शिक्षकांना किंवा मित्रांना विचारतो.

तद्वतच आगमाचे सिद्धांत जसे आहेत तसेच जाणावयाचे आहेत. आपल्याला त्यातील अर्थ समजत नसेल, बुद्धीच्या कसोटीवर स्वीकार होत नसेल तर ज्ञानी गुरुजन किंवा इतर स्वाध्यायी जनांना त्याचा अर्थ विचारावा लागेल. आगमानुसार निर्णय होईपर्यंत त्यावर वारंवार विचार करावा लागेल.

कोणतीही घटना घडली की आपण त्याच्या कारणांची चौकशी करतो, तेही निमित्तांची व त्यातही बहिरंग निमित्तांची. कारण आपल्याला उपादान कारण माहित नाही, अंतरंग निमित्त कारण-कर्मांचा उदय आदि अवस्था आपल्या ज्ञानात येत नाहीत. एखाद्या व्यक्तीचे मरण झाल्याचे ऐकताच एखादा प्रश्न विचारतो, 'काय झालं, कशाने मेला?' उत्तर येते, 'आजारी होता किंवा कोणी अपघातात मेला.' त्यावर 'कोणता आजार, कोणत्या डॉक्टरला दाखवले कोणत्या हॉस्पिटलमध्ये नेले, औषधं कोणती दिली', इत्यादि अथवा अपघाताने मेला असेल तर 'अपघात कसा झाला? गाडी कोण चालवत होतं? टक्कर झाली का?' अशी प्रश्नोत्तरमाला चालू होते. लौकिक व्यवहार हा असाच चालतो परंतु त्यात किती आकुलता दडलेली आहे पहा.

त्या डॉक्टरकडे उगाच गेलात त्याने नीट तपासले नाही, विशिष्ट औषध का बरं दिले नाही? वेळेवर उपचार केले नाहीत म्हणून असं झालं वगैरे उपदेशामृतही पाजले जाते ज्यामुळे आकुलता अजून वाढते. परंतु याचे खरे कारण समजले तर आकुलता कमी होते, दु:खाच्या प्रसंगीही दु:खाची तीव्रता कमी होते, मानसिक संतुलन बिघडत नाही.

जीव स्वत:च्या योग्यतेने विशिष्ट पर्यायात रहातो व स्वत:च्याच योग्यतेने त्याची पर्याय पलटते. जसे, मनुष्यपर्याय पलटून देवपर्याय होते. ही त्या जीवाची उपादानगत योग्यता आहे. त्याचवेळी मनुष्यायु कर्म खिरून संपुष्टात येते व दुसऱ्याच समयाला नवीन आयुकर्माचा उदय सुरू होतो. आयुकर्म तर आपण पूर्वीच्याच भवात बांधत असतो, चालू आयुमध्ये काही बदल, वधघट आदि होत नाही.

निमित्ताच्या भाषेत बोलायचे झाले तर जोपर्यंत आयुकर्माचा उदय आहे तोपर्यंत मरण होऊ शकत नाही व वर्तमान भुज्यमान आयुकर्म संपल्यावर जीव या भवात एक समयदेखील अधिक

राहू शकत नाही. समयसारमध्ये म्हटले आहे, ''हे जीवा, तू दुसऱ्याला आयु देऊ शकत नाहीस व कोणाची आयु हिरावून घेऊ शकत नाहीस, तर मग 'मी दुसऱ्यांना वाचवतो किंवा मारतो' ही बुद्धि कितपत योग्य आहे?''

उपादानासंबंधी चर्चा ऐकताना अनेकांच्या मनात हा प्रश्न उद्‌भवणे स्वाभाविक आहे की उपादान तर सदैव उपस्थितच होते परंतु पहा बरं, निमित्त मिळाले तेव्हाच तर कार्य घडले ना? मूग, मटकी डब्यात होती तोवर काही झाले नाही, पाण्यात भिजवल्यानंतरच त्याला मोड आले ना? अंकुर फुटले ना? जीवामध्ये श्रद्धागुण तर अनादिचा आहे परंतु मोक्षमार्गाचा उपदेश मिळाला - देशनालब्धि प्राप्त झाली तेव्हाच तर जीव या मार्गाकडे वळला ना? सम्यग्दर्शन प्राप्त झाले ना?

उपादानासंबंधी व त्याच्या प्रकारांसंबधी माहिती नसल्यानेच अशी गैरसमजूत होते. त्यासाठी आपण उपादानांचे भिन्न भिन्न प्रकार, त्यांची नावे व स्वरूप समजावून घेऊया.

उपादान दोन प्रकारचे आहेत. — (१) त्रिकाली उपादान (२) क्षणिक उपादान. जे द्रव्य अथवा गुण स्वत: कार्यरूप परिणमित होते त्या द्रव्यास अथवा गुणास त्या कार्याचे 'त्रिकाली उपादान' म्हटले जाते. विशिष्ट पर्यायरूप परिणमण्याची शक्ति त्या द्रव्य - गुणामध्ये सदैव विद्यमान असते. त्याचबरोबर 'क्षणिक उपादान' कारण देखील असते ज्यामुळे कार्य कधी होईल व कोणते होईल हे ठरते, यालाच कार्याचा नियामक असेही म्हणतात. क्षणिक म्हणजे क्षणवर्ती-एक समयापुरते. याचेही दोन भेद आहेत

(१) अनंतरपूर्वक्षणवर्ती पर्याय.

(२) त्या समयाची योग्यता.

कार्य घडते त्यावेळी पूर्व पर्यायाचा व्यय होतो व कार्य म्हणजे विशिष्ट पर्याय उत्पन्न होते. समजा १०१, १०२, १०३......१०९, ११० अशा पर्याय होत आहेत. ११० वी पर्याय हे विशिष्ट कार्य झाले त्यामध्ये त्रिकाली उपादान तर त्या द्रव्याचा तो गुण आहे व क्षणिक उपादान दोन प्रकारचे आहेत.

(१) १०९ व्या पर्यायाचा व्यय हे कारण व ११० व्या पर्यायाचा उत्पाद हे कार्य. याला अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्यायाचा व्ययरूप क्षणिक उपादान कारण असे म्हटले आहे.

परंतु पर्यायामधून पर्याय उत्पन्न होत नाही. जी स्वत: व्ययरूप होते तिच्या अभावातून भावाची उत्पत्ति कशी बरे होईल? पर्याय तर द्रव्यामधून उत्पन्न होते.

कार्तिकियानुप्रेक्षामध्ये म्हटले आहे की अनंतरपूर्व परिणामाने युक्त द्रव्य कारण आहे व अनंतर उत्तर परिणामाने युक्त तेच द्रव्य कार्य आहे. अनंतरपूर्व म्हणजे पूर्वीची पर्याय. मधे अंतर न सोडता अशी असलेली पूर्व पर्याय, ती अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्याय.

(२) कार्य घडले ते त्या विशिष्ट पर्यायाच्या स्वत:च्या योग्यतेने घडले, त्याला 'तत्समयाच्या पर्यायाची योग्यतारूप क्षणिक उपादान कारण' असे म्हणतात.

११० नं.ची पर्याय १०९ नं.च्या पर्यायपूर्वक झाली. १०९ वी पर्याय १०८ व्या पर्यायपूर्वक झाली. १०८ वी पर्याय १०७ व्या पर्यायपूर्वक झाली. विशिष्ट पर्याय विशिष्ट समयी तिच्या स्वत:च्या योग्यतेने तर होतेच होते परंतु विशिष्ट पूर्व पर्यायाचा व्यय होऊनच होते. याचा अर्थ पूर्वपर्याय देखील निश्चित आहे, त्यापूर्वीची देखील. अर्थात एक एक पर्यायाचा व्यय आणि उत्पाद अशी अनेक पर्यायांची मालिका - असा सिलसिला (क्रम) होऊन विशिष्ट समयी विशिष्ट कार्य होते. याला 'विधि' असेही म्हणतात. विशिष्ट विधिनेच-प्रक्रियेनेच कार्याची उत्पत्ति होते. यालाच 'पुरुषार्थ' म्हटले आहे.

११० वी पर्याय विशिष्ट वेळी उत्पन्न झाली एवढेच नव्हे तर विशिष्ट विधिपूर्वक झाली. त्यापूर्वीची पर्यायांची अखंड मालिका त्यामध्ये कारण आहे. सम्यग्दर्शन विशिष्ट समयी उत्पन्न होते परंतु त्यापूर्वीच्या परिणामांची - पर्यायांची निश्चित मालिका असते. सम्यग्दर्शनाची पर्याय उत्पन्न होते त्यापूर्वीच्या वाढत्या विशुद्ध परिणामांना करणलब्धि म्हणतात. करणलब्धि पूर्वकच सम्यक्त्व होते. यामध्ये तीन करण असतात. अध:करण, अपूर्वकरण व अनिवृत्तिकरण. त्यांचाही असा क्रम निश्चित आहे.

करणलब्धि प्राप्त करणाऱ्या जीवाला त्यापूर्वी अन्य चार लब्धि प्राप्त होत असतात. त्यांचा क्रम असा (१) क्षयोपशमलब्धि (२) विशुद्धिलब्धि (३) देशनालब्धि (४) प्रायोग्यलब्धि यानंतरच करणलब्धि होते. या साऱ्या पर्याय न होता, एकांत नियतवाद मानणारे अज्ञानी जीव सम्यक्त्व व्हायचे तेव्हा होईल असे फक्त काळाकडे पहात बोलतात.

क्षणिक उपादान कारणामध्ये दोन्हींचा समावेश आहे, अनंतर पूर्व क्षणवर्ती पर्यायाचा व्यय आणि त्यासमयी ती पर्याय उत्पन्न होण्याची योग्यता हे कारण आहे व ती पर्याय उत्पन्न झाली हे कार्य आहे. नीट लक्ष द्या बरं, येथे योग्यतेला कारण व पर्यायाला कार्य म्हटले आहे.

प्रत्येक पर्यायामध्ये आपल्या विशिष्ट समयात उत्पन्न होण्याची योग्यता असते. ती कोणी निर्माण करत नाही, बाह्य परिस्थितिनुसार ती योग्यता बदलत नाही. प्रत्येक द्रव्यामध्ये जो अनादिअनंत पर्यायांचा प्रवाह आहे त्यातील प्रत्येक पर्याय आपल्या स्वसमयी स्वतःच्या योग्यतेने उत्पन्न होते. याला प्रवचनसार ग्रंथात पर्यायांचा जन्मक्षण असे म्हटले आहे. यामुळेच क्षणिक उपादान कारणाला 'समर्थ उपादान कारण' म्हणतात. त्रिकाली उपादान तर सदैवच विद्यमान असते. त्याला समर्थ कारण मानले तर विशिष्ट कार्य नेहमीच उत्पन्न होत राहिले पाहिजे. परंतु असे तर होत नाही.

समर्थ उपादान कारणाची व्याख्या आपण अशी करू शकतो, 'ज्याच्याशिवाय कार्याची उत्पत्ति होत नाही व जे असताना नियमाने-निश्चितपणे कार्याची उत्पत्ति होते त्यास समर्थ उपादान कारण म्हणतात.' समर्थ उपादान निश्चितच कार्याचा जनक आहे. समर्थ उपादानाने तेच कार्य घडते की ज्या कार्याचे ते उपादान आहे. त्या विशिष्ट समयी जे निमित्त उपस्थित असते त्यामध्ये कार्य करण्याची शक्तिच नसते परंतु उपादानानुसार होणाऱ्या कार्याचे ते सूचक असल्याने त्यास निमित्त असे म्हटले जाते.

याचा अर्थ असा आहे की त्रिकाली उपादान हे कार्याचे नियामक कारण नसून क्षणिक उपादानच कार्याचे नियामक कारण आहे. या नियामक कारणामुळेच विशिष्ट कार्य निश्चितपणे उत्पन्न होते. 'असे असेल तर मग त्रिकाली उपादान सांगण्याची गरजच काय?' असा प्रश्न उद्भवतो.

उपादान ही निजशक्ति आहे. ही शक्ति दोन प्रकारांची आहे - द्रव्यशक्ति व पर्यायशक्ति. कोणत्या द्रव्यात हे विशिष्ट कार्य होईल हे द्रव्यशक्ति सांगते. श्रद्धा, ज्ञान, सुख आदि गुणांच्या पर्याय - ही कार्ये जीवद्रव्यातच होतात, अन्य द्रव्यात नाहीत

म्हणून या कार्यांचे त्रिकाली उपादान जीवद्रव्य आहे, यालाच द्रव्यशक्ति म्हणतात.

विशिष्ट कार्य विशिष्ट समयात होईल हे सांगणारी पर्यायशक्ति आहे. ही काळाची नियामक आहे. ही पर्यायशक्ति अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्यायाचा व्यय आणि तत्समयाच्या पर्यायाच्या योग्यतारूप आहे. त्या दोन्हीला मिळून क्षणिक उपादान म्हटले आहे व ते कार्याचा नियामक आहे.

त्रिकाली उपादान व क्षणिक उपादान या दोन्ही कारणांना एकाचवेळी सांगायचे झाले तर 'पर्यायशक्तीने युक्त द्रव्यशक्ति' असे म्हणावे लागेल. निमित्तालाही याच्याबरोबर सांगायचे झाले तर 'सहकारीकारण (निमित्त) सापेक्ष विशिष्ट पर्यायशक्तीने युक्त द्रव्यशक्ति' असे म्हणावे लागेल. यामध्ये सर्व कारणांचा समावेश होतो.

तत्त्वार्थराजवार्तिक आदि ग्रंथांमध्ये यावर विस्तृत चर्चा केली आहे. आपले मातीच्या घड्याचेच उदाहरण पुन्हा पाहूया. यामध्ये माती हे त्रिकाली उपादान आहे, घडारूप परिणमन करण्याच्या सन्मुख अशी माती हे क्षणिक उपादान आहे व दण्ड, चक्र, कुंभाराचे प्रयत्न इत्यादि निमित्त आहेत. विशिष्ट प्रकारची मातीच घडारूप होते, वाळूवाली माती घडारूप होऊ शकत नाही म्हणून माती हे उपादान आहे व दण्डादि निमित्त आहेत.

ही झाली त्रिकाली उपादानाची गोष्ट. आता क्षणिक उपादान कोण आहे हे पाहूया. मातीचा चिखल, गोळा वगैरे पर्याय घड्याची क्षणिक उपादान नाहीत परंतु दुसऱ्याच समयात घडारूप परिणमित होणारी मातीच क्षणिक उपादान आहे व हे परिणमन होत असतानाच फक्त दण्ड, चाक, कुंभार इत्यादिंना निमित्तपणाने स्वीकारले आहे, अन्यवेळी त्यांना निमित्तदेखील म्हटले जाऊ शकत नाही. कोणी असे मानले की उपादानानेच कार्य होईल, निमित्ताची आवश्यकताच नाही तर तेही चुकीचे होईल.

जेव्हा जेव्हा विशिष्ट कार्य होताना विशिष्ट पर्यायशक्तीने युक्त द्रव्यशक्ति आढळते तेव्हा तेव्हा त्या कार्यास अनुकूल निमित्त भेटतातच असा नियम आहे. असे कधीच होत नाही की निश्चय उपादान आहे व निमित्तच मिळत नाही.

अशाप्रकारे आपण पाहिले की त्रिकाली उपादान हे स्वभावाचे नियामक आहे. कोणत्या द्रव्यात व तेही कोणत्या गुणात हे कार्य घडेल हे निश्चित करणारे हे कारण आहे. अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्यायाने युक्त द्रव्यरूप क्षणिक उपादान कारण हे विधिचे (प्रक्रियेचे, पुरुषार्थाचे) नियामक आहे. तत्समयाच्या पर्यायाची योग्यतारूप क्षणिक उपादान हे काळाचे अर्थात पर्यायाचे-कार्याचे नियामक आहे.

कार्य उपादानाने होते त्यावेळी निमित्ताची सहज उपस्थिति असते. निमित्तांना शोधत बसावे लागत नाही. निमित्त कसे मिळणार या चिंतेने आपल्याला आकुळ व्याकुळ होण्याची गरज नाही. निमित्तानुसार कार्य होत नाही. परंतु कार्य होते त्यावेळी त्यानुसार निमित्त म्हटले जातात. कार्य हे एक समयाचे असते व त्यामध्ये निमित्तरूप परद्रव्याची पर्याय असते, तीदेखील एक समयवर्ती असते. यावरून एक गोष्ट लक्षात येते की निमित्त नैमित्तिक संबंध हा दोन द्रव्यांच्या विशिष्ट पर्यायांमध्ये असतो व तो देखील एकच समयापुरता असतो.

एकच विशिष्ट घटना किंवा पर्याय अन्य अन्य जीवांना अन्य अन्य कार्यामध्ये निमित्त ठरू शकते. मृत स्त्रीला पाहून एखाद्याला वैराग्य होईल तर एखाद्या कामी व्यक्तीचे कामभाव जागृत होतील. निमित्तानुसार कार्य होत असते तर प्रत्येकाला समानच भाव निर्माण व्हायला हवेत, परंतु असे तर कधीच होत नाही.

पं. टोडरमलजींनी म्हटले आहे की परद्रव्य आपले भाव बिघडवित नाहीत, आपले भाव बिघडतात तेव्हा ते तर केवळ बाह्यनिमित्त आहेत. याप्रकारे परद्रव्यांना दोष लावणे मिथ्याभाव आहे.

निमित्त जबरदस्तीने उपादानात काहीही करत नाही व उपादानदेखील निमित्तांना जबरदस्तीने मिळवत किंवा हटवत नाही. दोन्हींचा सहजच संबंध आढळतो.

जीवाच्या स्वभावभावामध्ये परद्रव्याचे काही कर्तृत्व तर नाहीच नाही, त्याच्या विभावभावामध्ये सुद्धा पराच्या कर्तृत्वाचा निषेध केला आहे. खरे देव, शास्त्र, गुरु काही आपल्याला सम्यक्त्व प्रदान करीत नाहीत. तरीदेखील त्यांच्या श्रद्धेला सम्यग्दर्शन म्हटले आहे, कारण खऱ्या देव, गुरु, शास्त्राचे स्वरूप ओळखल्याशिवाय, त्यांनी सांगितलेल्या वस्तुस्वरूपाचा

निर्णय केल्याशिवाय मोक्षमार्गाची ओळख व मोक्षमार्गाचा प्रारंभ होऊ शकत नाही.

ज्याला आत्म्याची रुचि आहे तो ज्ञानी सत्पुरुषाला सहज शोधतो, त्याच्या उपदेशाद्वारे हा ज्ञानी आहे अशी ओळखही त्याला होते. येथेच मला खरा मार्ग भेटेल अशी त्याला खात्री होते. परंतु अशी ज्ञानी व्यक्ति मिळत नाही म्हणून आकुळ व्याकुळ होण्याची गरज नाही. स्वत:ची पात्रता वाढते तेव्हा त्याला ज्ञानीची ज्ञानी म्हणून ओळख पटते. पूर्वी त्या व्यक्तिशी परिचय आलेला असेलही परंतु तो ज्ञानी आहे याची ओळख त्याला स्वत:च्या पात्रतेने पटते.

'निमित्तोपादान' पुस्तकामध्ये डॉ. हुकमचंदजी भारिल्ल लिहितात, ''जेव्हा संसार सागराचा किनारा जवळ येतो तेव्हा सहजच आत्म्याची रुचि जागृत होते. ही आत्मरुचि भगवान आत्मा आणि आत्मज्ञ सत्पुरुष यांच्या शोधार्थ पुरुषार्थाला प्रेरित करते, सत्पुरुषाच्या समागमाने आत्मरुचीला अभूतपूर्व बल प्राप्त होते. अध्ययन, मनन, चिंतन यांची प्रक्रिया परापासून हटून स्वसन्मुख होते. रुचीची तीव्रता आणि पुरुषार्थाची प्रबलता दृष्टीला तर स्वभावसन्मुख करतेच, ज्ञान व ध्यान पर्यायाला देखील आत्मोन्मुख करते. निमित्त उपादानाचा हा सहज सुमेळ देशनालब्धिकडून करणलब्धिकडे जात असता सम्यग्दर्शन प्राप्त करण्याची सशक्त भूमिका बनवितो.''

निमित्त उपादानाचा असा सहज सुमेळ असताना देखील दोन भिन्न द्रव्य स्वत:च्या योग्यतेने स्वत:मध्ये परिणमतात. जीवाचे राग, द्वेष, मोह हे निमित्त व पुद्‌गलाचा कर्मबंध हे कार्य, यामध्ये जीवाच्या पर्यायाचे स्वत:चे षट्‌कारक स्वतंत्र आहेत व पुद्‌गलाच्या कर्मरूप पर्यायाचे षट्‌कारक स्वतंत्र आहेत.

ही आणखी नवी नावे ऐकून घाबरून जाऊ नका. मला माहित आहे की उपादानाच्या भेद-उपभेदांमध्ये अनेक नव्या नावांची चर्चा ऐकून तुम्ही गोंधळून जाण्याची शक्यता आहे. षट्‌कारकांची चर्चा आपण पुढील पत्री करूया.

त्यापूर्वी आपण निमित्त उपादानाची जी चर्चा केली, मातीचे व घड्याचे उदाहरण त्यावर घटविले त्याचप्रमाणे रोटी बनली,

सोन्याची साखळी बनली, दिव्यध्वनि खिरली या कार्यांवर उपादानाचे सर्व भेद व निमित्त हे लावून पहा. अगं, आम्हाला हा विषय पं. कैलाशचंदजी बुलंदशहरवाल्यांनी १९७६ मध्ये शिकविला होता. ते तर आम्हाला गृहपाठ देत असत. रोज गृहपाठ लिहून काढायला आम्हाला रात्रीचे २ वाजत असत. दिवसातून ३ वेळा त्यांचा क्लास चालत असे. एक दोन दिवस नव्हे सतत अडीच तीन महिने दररोज आम्ही अशा पद्धतीने शिकलो. घर, दवाखाना, तुम्ही दोघी लहान, घरी २५-३० जणांचा राबता, स्वयंपाक-पाणी या साऱ्या गोष्टी सांभाळून देखील आम्ही घरातले सर्वजण-तुमचे आजी, आजोबा, सर्व काका-काकी, फै-फुवा मोठ्या उत्साहाने जात होतो. तुम्हीही जेवढ्या उत्साहाने शिकाल, तेवढा मलाही शिकविताना अधिक उत्साह वाटेल.

'निमित्तोपादान' पुस्तकाच्या आधारे मीही रोज दीड तास शिकवित होते. त्याच्या ९० मिनिटांच्या बारा कॅसेट्सचे सेट तुम्हा दोघींनाही पाठवत आहे. त्या लक्षपूर्वक नीट ऐका. त्यामध्ये अधिक विस्ताराने व वारंवार समजाविले असल्याने हा विषय चांगला आत्मसात होईल. तत्त्वनिर्णय करण्याच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्वाचा आहे.

मला खात्री आहे की निमित्त उपादानाचे स्वरूप नीट लक्षात आल्यानंतर पुढे पाच समवाय, षट्कारक इत्यादिंची चर्चा तुमच्या सहजपणे लक्षात येईल.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# षट्कारक

पत्रांक ९ २ जून २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेकानेक उत्तम शुभाशिर्वाद.

कारण-कार्य व्यवस्थेची चर्चा करताना आपण निमित्त व उपादान कारणांची सविस्तर माहिती पाहिली. आपण कार्य तर झालेले पहातो परंतु त्या कार्याचे कारण काय आहे, त्याचे 'कारक' कोण आहे याचे ज्ञान नसल्याने कोणी ईश्वराला, कोणी नियतीला, कोणी निमित्ताला कारण मानून या पराधीनतेच्या कल्पनेने परपदार्थांना मिळविण्यात व हटविण्यात राग द्वेषांची शृंखला चालू ठेवून संसारचक्र फिरवित ठेवण्यात रात्रंदिवस कार्यरत आहे.

आत्तापर्यंत आपण (१) निमित्त कारण (२) त्रिकाली उपादान कारण (३) अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्यायरूप क्षणिक उपादान कारण आणि (४) तत्समयाची योग्यतारूप क्षणिक उपादान कारण अशी चार कारणं पाहिली, त्याला कारकदेखील म्हटले जाते.

जिनवाणीमध्ये कथन दोन प्रकारांनी केले जाते (१) औपचारिक कथन व (२) वस्तुस्थितीचे यथार्थ कथन. औपचारिक कथन हे कथनापुरते कथन आहे, वस्तुस्थिति तशी नसते. यालाच व्यवहार कथन म्हटले आहे. दुसरे यथार्थ कथन ते निश्चय कथन आहे अथवा ज्याला मुख्य करायचे आहे त्याला 'निश्चय' व ज्याला गौण करायचे आहे त्याला 'व्यवहार' म्हणतात.

कारकांच्या चर्चेत निश्चय व्यवहाराची चर्चा वाचून गोंधळून जाऊ नका. त्याचा आवश्यक तेवढाच उल्लेख करून आपण आपला विषय पुढे चालू ठेवणार आहोत.

मोक्षमार्ग प्रकाशकमध्ये म्हटले आहे, 'मुख्य सो निश्चय, गौण सो व्यवहार'. आपण निमित्ताने कार्य होते असे कथन वाचतो तेव्हा हे लक्षात हवे की हे उपचार कथन - व्यवहार कथन आहे. त्याच्या तुलनेमध्ये कारण नं.२-त्रिकाली उपादान कारण हे कार्याचा कर्ता आहे हे कथन निश्चय कथन आहे.

जेव्हा कारण नं. २ व कारण नं. ३ मध्ये तुलना करू तेव्हा त्रिकाली उपादानाला कर्ता म्हणणे हे व्यवहार कथन होईल व अनंतर पूर्व क्षणवर्ती पर्यायरूप क्षणिक उपादानाला कर्ता म्हणणे हे निश्चय कथन होईल. या पुढची गोष्टही तुमच्या चाणाक्ष बुद्धिमध्ये आलीच असेल की जेव्हा कारण नं. ३ व कारण नं. ४ यामध्ये तुलना करू तेव्हा अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्यायरूप क्षणिक उपादानाला कर्ता म्हणणे हे व्यवहार कथन होईल व तत्समयाच्या पर्यायाच्या योग्यतारूप क्षणिक उपादानाला कर्ता म्हणणे हे निश्चय कथन होईल.

यावरून एक गोष्ट लक्षात येईल की सर्वप्रथम निमित्ताचे ज्ञान करविण्यासाठी निमित्ताला कारण म्हटले जाते परंतु निमित्ताधीन दृष्टि सोडविण्यासाठी व परद्रव्यांपासून भिन्नता दर्शविण्यासाठी त्रिकाली उपादानाने कार्य होते असे सांगितले जाते. परंतु कार्य कोणते, कधी व कशाप्रकारे संपन्न होईल हे सांगण्यासाठी त्याला विधि अर्थात् पुरुषार्थ व तत्समयाच्या पर्यायाची योग्यता ही कारणे सांगून कारणासंबंधीचे आपले अज्ञान दूर करण्यात येते.

पूर्व पर्यायाचा व्यय व तत्समयाच्या (वर्तमान समयाच्या) पर्यायाची योग्यता ही क्षणिक उपादान कारणं तर वर्तमान काळात एका समयामध्ये आहेत. त्यामुळे भूतकालीन व भविष्यकालीन पर्यायांवरील आपली दृष्टि हटते व तत्समयाची योग्यताच कार्याचा खरा कर्ता आहे हे लक्षात येते.

खरं तर ही जी चार कारणें आपण पाहिली त्यांना कर्ताकारक म्हटले आहे. तुमच्या प्रश्नाचा मला अंदाज आहे. तुम्ही म्हणाल, 'हे जर कर्ताकारक आहेत तर मग अजूनही अन्य कारक आहेत की काय? असतील तर ते कोणते? कारकाची व्याख्याही नीट सांगितलीस तर बरे होईल.'

आपण पाहिलेच आहे की कार्य अर्थात पर्याय, परिणाम, दशा, हालत, अवस्था, कर्म, परिणति, क्रिया. क्रियेचा-कार्याचा जो जनक आहे, कार्य उत्पन्न करणारा आहे त्यास 'कारक' असे म्हणतात. कोणत्या ना कोणत्या रूपामध्ये जो कार्याप्रति प्रयोजक असतो त्यालाच आपण कारक म्हणू शकतो, अन्य कोणास नाही.

असं पहा, कोणत्याही कार्याबाबत सहा प्रश्न उठू शकतात, त्यांच्या उत्तरातच हे सहा कारक आपणास आढळतात.

(१) कार्य कोणी केले? - कर्ता (२) काय केले? - कर्म (३) कोणत्या साधनांद्वारे केले? - करण (४) कोणासाठी केले? - संप्रदान (५) कशातून केले? - अपादान (६) कोणाच्या आधारे केले? - अधिकरण.

यावरून लक्षात आलेच असेल की 'कारक' सहा आहेत - (१) कर्ता (२) कर्म (३) करण (४) संप्रदान (५) अपादान (६) अधिकरण.

तुम्ही शाळेमध्ये व्याकरण शिकत होतात तेव्हा प्रथमा, द्वितीया, अशा विभक्ति व त्यांचे प्रत्यय पाठ केले होतेत, आठवतंय? येथे पहिले पाच कारक ओळीने प्रथमा, द्वितीया....पंचमी विभक्तिपर्यंत आहेत व सहावे कारक हे सप्तमी विभक्तिसमान आहे. षष्ठी विभक्ति ही संबंधसूचक आहे त्यामध्ये कार्याप्रति काही प्रयोजन आढळत नाही व सम्बोधनामध्ये हे राम, हे सीते असे केवळ सम्बोधनच आहे, कार्यासंबंधीचे ते सूचक नाही. म्हणून त्यांना कारकांमध्ये सामावलेले नाही.

आता या प्रत्येक कारकाची व्याख्या पाहूया.

(१) कर्ता कारक - जो स्वाधीनपणे स्वत:च्या परिणामास करतो तो कर्ता होय.

(२) कर्म कारक - कर्ता ज्या परिणामास प्राप्त करतो तो परिणाम त्याचे कर्म अर्थात कार्य आहे.

(३) करण कारक - त्या परिणामाच्या उत्कृष्ट साधनास करण म्हणतात.

(४) संप्रदान कारक - कार्य ज्याला देण्यात येते अर्थात ज्याच्यासाठी ते कार्य केले गेले त्याला संप्रदान म्हणतात.

(५) अपादान कारक - ज्यातून कार्य करण्यात येते त्या ध्रुव वस्तुस अपादान म्हणतात.

(६) अधिकरण कारक - ज्यामध्ये अथवा ज्याच्या आधारे कार्य करण्यात येते त्यास अधिकरण म्हणतात.

प्रत्येक द्रव्याच्या प्रत्येक पर्यायामध्ये हे सहा कारक एकत्र रहातात. जीव व पुद्‌गल द्रव्य शुद्ध पर्यायरूपाने किंवा अशुद्ध (विभाव) पर्यायरूपाने परिणमतात तेव्हा स्वत:च सहा कारकरूप होऊन परिणमन करतात, त्यांना अन्य कारकांची अर्थात निमित्त कारणांची अपेक्षा नसते. पंचास्तिकाय गाथा ६२ च्या टीकेतील हे कथन आहे.

जेव्हा निमित्तांचे ज्ञान करविण्यासाठी भिन्न द्रव्यांना-निमित्तांना कारक म्हटले जाते तेव्हा ते व्यवहार कारक आहेत असे निश्चितपणे समजावे. उदाहरणादाखल पहा - कुंभार कर्ता आहे, घडा कर्म आहे, चाक, लाकडी, दोरी हे करण आहे, पाणी भरणाऱ्यासाठी घडा बनविला म्हणून पाणी भरणारा संप्रदान झाला, टोपलीतून माती घेऊन घडा बनविला म्हणून टोपली अपादान, जमिनीच्या आधारे घडा बनविला म्हणून जमीन अधिकरण.

दुसरे एक उदाहरण पहा. मी बुंदीचे लाडू बनवित होते, मी कर्ता. रोहितने विचारले, 'आजी काय करताय?' 'लाडू'. लाडू हे झाले कर्म. पुढचा प्रश्न, 'कशाने बनविता?' 'झाऱ्याने'. झारा हे झाले करण. 'आजी, कोणासाठी बनविता?' - 'तुझ्यासाठी, रियासाठी, रोहनसाठी, सोहम्‌साठी'. ही सारी नातवंडं झाली संप्रदान. 'कशातून बनविता?'- 'डब्यातून पीठ काढून त्यातून बनविते' - डबा झाले अपादान, 'कशात बनविता?' 'परातीमध्ये बनविते.' - परात झाले अधिकरण.

येथे प्रत्येक कारक वेगवेगळा आहे म्हणून यांना भिन्नकारक म्हणू शकतो. अन्य कर्ता, अन्य कर्म, अन्य करण, अन्य संप्रदान, अन्य अपादान व अन्य अधिकरण आहे. म्हणून हे व्यवहार कारक आहेत.

प्रवचनसार गाथा १६ च्या भावार्थामध्ये म्हटले आहे की, वस्तुस्थिति पहाता अर्थात परमार्थ दृष्टीने एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा कर्ता हर्ता होऊच शकत नाही. म्हणून हे व्यवहार सहा कारक असत्य आहेत. त्यांना कारक म्हणणे हे औपचारिक कथन आहे. निश्चयाने कोणत्याही द्रव्याचा अन्य द्रव्याशी कारकपणाचा संबंध असूच शकत नाही.

'व्यवहारकारक असत्य आहेत तर मग सत्य कारक - निश्चय कारक कोणते असतील बरे ?' असा प्रश्न पडणे स्वाभाविक आहे. आपल्या घड्याच्या प्रसिद्ध उदाहरणावरच ते घटवूया.

माती स्वतंत्रपणे घडारूप कार्यास प्राप्त होते म्हणून माती कर्ता आहे. घडा कर्म आहे अथवा घडा व माती अभिन्न असल्याने माती स्वतःच कर्म आहे. स्वतःच्या परिणमन स्वभावाद्वारे मातीने घडा बनविला म्हणून माती स्वतःच करण आहे. मातीने घडारूप कर्म स्वतःलाच दिले म्हणून माती स्वतःच संप्रदान आहे. मातीने स्वतःमधूनच पिंड (गोळा) रूप अवस्था नष्ट करून घडारूप कर्म केले ती स्वतः ध्रुव राहिली म्हणून माती स्वतःच अपादान आहे. मातीने स्वतःच्या आधारे घडा केला म्हणून माती स्वतःच अधिकरण आहे.

याप्रमाणे सहाही कारक अर्थात अभिन्न कारक एकाच द्रव्यामध्ये-प्रत्येक द्रव्यामध्ये स्वतःचे असतात. परमार्थाने एक द्रव्य दुसऱ्या द्रव्यास सहाय्य करू शकत नाही. द्रव्य स्वतःच, स्वतःला, स्वतःद्वारे, स्वतःसाठी, स्वतःमधून, स्वतःच्या आधारे कार्य करत असल्याने हे निश्चयकारकच परमसत्य आहेत. प्रत्येक द्रव्य स्वतःच स्वतःच्या अनंत शक्तिरूप संपदेने परिपूर्ण असल्याने स्वतःच सहा कारकरूप होऊन स्वतःचे कार्य करण्यामध्ये समर्थ आहे. त्यामध्ये बाह्यसामुग्री किंचित देखील मदत करू शकत नाही.

हे सहा कारक प्रत्येक समयामध्ये असतात. हे कारक आहेत तरी काय? द्रव्य आहेत, गुण आहेत की पर्याय आहेत? हे सहा कारक सर्व द्रव्यांमध्ये आढळणारे सामान्य गुण आहेत - जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल या सहाही द्रव्यांमध्ये ते आढळतात. समयसार ग्रंथामध्ये आत्म्याच्या ४७ शक्तींचे वर्णन आहे त्यामध्ये देखील या सहा शक्ति सांगितल्या आहेत - कर्तृशक्ति, कर्मशक्ति, करणशक्ति, संप्रदानशक्ति, अपादानशक्ति व अधिकरणशक्ति.

सहा कारक हे गुण आहेत व त्यांचेही परिणमन निरंतर चालू असल्याने प्रत्येक पर्यायामध्ये नवे नवे पर्यायरूप सहाकारक

आढळतात. म्हणूनच म्हटले आहे की प्रत्येक पर्यायाचे स्वत:चे षट्कारक भिन्न आहेत - स्वतंत्र आहेत. अनेकांना प्रश्न पडतो की द्रव्य त्रिकाल शुद्ध असताना पर्याय अशुद्ध होतेच कशी? त्या प्रश्नाचे उत्तर आता ध्यानात येईल की प्रत्येक पर्यायाचे स्वत:चे षट्कारक भिन्न असल्याने पर्याय तत्समयाच्या योग्यतेनेच उत्पन्न होते. परंतु आपण एखाद्या कार्यासाठी परपदार्थांना जबाबदार मानून त्यांच्याशी रागद्वेष करतो. हे रागद्वेषदेखील स्वत:च्या षट्कारकांनी उत्पन्न होतात बरं, परपदार्थांमुळे नाही. चारित्रमोहनीय कर्माचा उदय आहे म्हणून देखील नाही. कारण कर्म ही पुद्गलाची पर्याय आहे व रागद्वेष जीवाची पर्याय आहे. दोन्हीमध्ये निमित्त नैमित्तिक संबंध असला तरी कर्ता कर्म संबंध नाही.

समयसार कलश ४९ मध्ये म्हटले आहे की व्याप्यव्यापकभाव असल्याशिवाय कर्ताकर्मस्थिति होऊ शकत नाही. या मोठ्या नावाने घाबरून जाऊ नका, त्याचा अर्थ समजावून घेऊया.

जो आपल्या सर्व अवस्थांमध्ये व्यापतो तो व्यापक व त्याची विशिष्ट अवस्था ते त्याचे व्याप्य, असे असल्याने द्रव्य व्यापक आहे व पर्याय व्याप्य आहे; माती व्यापक आहे व घडा व इतर पर्याय त्याचे व्याप्य आहे. द्रव्य व पर्याय अभेद असल्याने द्रव्य पर्यायामध्ये व्यापते-पसरते व पर्याय द्रव्याद्वारे व्यापली जाते. असा हा व्याप्यव्यापकपणा अभिन्न सत्तेमध्ये - द्रव्य व त्याच्या पर्यायामध्ये असतो, दोन भिन्न द्रव्यांमध्ये नसतो.

जेथे जेथे व्याप्यव्यापकभाव असेल तेथेच कर्ताकर्मभाव असतो, व्याप्यव्यापकपणाशिवाय कर्ताकर्मभाव असू शकत नाही. पुद्गल द्रव्य त्याच्या पर्यायांमध्ये व्यापक आहे व जीव स्वत:च्या पर्यायांमध्ये व्यापक आहे. परंतु जीव व्यापक व शरीर व्याप्य असे तिन्ही काळात होऊ शकत नाही. कोणतेही द्रव्य आपले स्वचतुष्टय सोडून परचतुष्टयात प्रवेशच करू शकत नाही, परद्रव्य, परक्षेत्र, परकाल, परभावामध्ये व्यापू शकत नाही. म्हणूनच मी - जीवद्रव्य अन्य कोणाचाही कर्ता नाही, मी अन्य कोणाचे कार्यही नाही. प्रत्येक द्रव्यात 'अकार्यकारणत्व' शक्ति आहे. एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे 'अकार्य' व 'अकारण' आहे.

कोणीही अन्य द्रव्याचे कार्य नाही, तसेच कारणदेखील होत नाही - होऊच शकत नाही.

मी पराचे किंवा पर माझे बरे वाईट करू शकते, कर्म मला संसारात रखडवितात, कर्मामुळे मला रागद्वेष होतात इत्यादि मान्यता मिथ्यात्व आहे, अज्ञान आहे. निमित्ताविना कार्य होत नाही, उचित निमित्ताने कार्य होते इत्यादि शास्त्रातले कथन व्यवहारनयाचे कथन आहे - औपचारिक कथन आहे. त्याला निश्चनयाचे कथन मानणे - सत्यार्थ मानणे हे पण मिथ्यात्व आहे, अज्ञान आहे.

ज्याप्रमाणे मातीद्वारे घट होऊ शकतो परंतु मातीद्वारे वस्त्र होणे अशक्य आहे त्याचप्रमाणे प्रत्येक द्रव्य स्वतःच्या भावाचा - पर्यायाचा कर्ता होऊ शकतो परंतु परभावाचा - पराच्या पर्यायाचा - पराच्या कार्याचा कर्ता होणे अशक्य आहे. तरीदेखील आत्म्याची व पुद्‌गलाची दोहोंची क्रिया एक आत्माच करतो असे मानणारा मिथ्यादृष्टि आहे.

कोणतेही द्रव्य अन्य कोणत्याही द्रव्याचा कर्ता असतच नाही, सर्व द्रव्यं आपापल्या स्वभावानुसार परिणमतात. हा जीव, हा मूर्ख - उल्लू जीव, व्यर्थ राग द्वेष करून आकुळ - व्याकुळ होतो - दुःखी होतो.

कित्येक वेळा आपल्याला इच्छा होते व त्याचप्रमाणे पदार्थ परिणमतात तरीदेखील ते आपल्या इच्छेमुळे परिणमन करीत नाहीत. त्यांच्या स्वतःच्या परिणमन स्वभावाने परिणमतात व अज्ञानी जीव मी हे कार्य केले अशी मिथ्या कल्पना करून पराच्या कर्तृत्वबुद्धीची मिथ्या मान्यता पुष्ट करतो.

लहान मूल चालत्या गाड्याला हात लाऊन मानतो की मी हा गाडा चालवित आहे, तद्वतच आपली मान्यता नाही ना याचा प्रत्येकाने विचार करावयास हवा.

तुम्ही म्हणाल, ' सकाळपासून रात्रीपर्यंत आम्ही कामाच्या ओझ्याखाली मरमर मरतो व तू म्हणत आहेस यातील एकही कार्य आम्ही नाही केले? झाडलोट, साफसफाई, स्वयंपाक, धुणी-भांडी, मुलांच्या खस्ता, एवढेच काय आमचा व्यस्त

व्यवसाय हे आम्ही नाही करत तर ते कोण करतं गं? जाऊ दे, उद्यापासून करणारच नाही ही कामे, पाहू कशी होतात ते?'

झालं बोलून? आता जरा शांत व्हा व नीट लक्षात घ्या. जी कामं तुम्ही करूच शकत नव्हतात, करत नव्हतात ती तुम्ही सोडूच कशी शकाल? आम्ही आता करणार नाही या कथनाद्वारे 'आम्ही करू शकतो' या मान्यतेचेच तर तुम्ही प्रदर्शन करीत आहात. बाळांनो, अशा रागावू नका. मी मनुष्य आहे अशी मनुष्यपर्यायामध्ये-या असमानजातीय द्रव्यपर्यायामध्ये एकत्वबुद्धि असल्याने या शरीराच्या क्रिया मी करतो अशी या जीवाची मान्यता अनादिकाळापासून चालत आली आहे.

आचार्य करुणाबुद्धीने या विश्वातील सर्व पदार्थांची कारण - कार्य व्यवस्था व त्याचे रहस्य सांगून या जीवाच्या कल्याणाचाच मार्ग दाखवित आहेत. 'मी माझ्या मिथ्यामान्यतेमुळे व रागद्वेषांमुळे दु:खी आहे व जिनागमाचा उपदेशच मला सुखाचा मार्ग दाखविणारा आहे-अन्य कोणताही मार्ग मला सुखप्राप्तीस कारणभूत नाही' असा पूर्ण विश्वास ठेवा. सरळ मनाने हा उपदेश ग्रहण करून त्यातील मर्म ओळखलेत तर हा अत्यंत सहज, सुलभ, स्वाधीन मार्ग तुम्हालादेखील प्राप्त होईल.

जिनागमाचे हे रहस्य जाणाल तर तुम्हीदेखील ज्ञाता-दृष्टापणाचा अनुभव कराल. वर सांगितलेली सारी कामं त्यानंतर देखील होत रहातील, परंतु त्यावेळी ती कामे 'होत असलेली' भासू लागतील, पराची कर्तृत्वबुद्धि नष्ट होईल, ज्ञाता दृष्टा स्वभावात अहंबुद्धि प्रस्थापित होईल, सहज सुखाची प्राप्ति होईल. आईची कटकट म्हणून याकडे न पहाता आचार्यांचा अनमोल उपदेश, जो सर्वज्ञाच्या दिव्यध्वनिच्या अनुसार आहे, समजून हे सारे ग्रहण करा, त्यातील मर्म ओळखा, नुसत्या शब्दांचे ग्रहण व पाठांतर करू नका.

आचार्य जो उपदेश देतात तो कोठे व्यवहार कथनाद्वारे प्राथमिक भूमिकेतल्या शिष्यांना समजाविण्यासाठी, तर कोठे निमित्तादिंचे ज्ञान करविण्यासाठी केलेला असतो, तर कोठे निश्चय कथनाद्वारे सत्यार्थाचे विवेचन करण्यासाठी असतो. आपण त्यातून योग्य अर्थ लावला पाहिजे. चला, आपल्या मूळ विषयावर येऊ या.

**कर्ताकारक** - कर्ताकारकामध्ये चार प्रकारचे कारक (निमित्त, त्रिकाली उपादान, अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्याय व त्या समयाच्या पर्यायाची योग्यता) सांगितले जातात. समजा कोणी फक्त तत्समयाच्या पर्यायाच्या योग्यतेलाच कार्याचा कर्ताकारक मानेल व इतर सर्व कारणांचा निषेध करेल तर ते चुकीचे होईल. जेव्हा जेव्हा कार्य होते त्यावेळी चारही कर्ताकारक असतातच असा वस्तुस्वभाव आहे व त्यामधील तत्समयाची पर्यायाची योग्यता हेच खरे कारण-कार्याचा नियामक कर्ता आहे हे सुद्धा जाणले पाहिजे.

'कर्ता' च्या व्याख्येमध्ये 'जो स्वतंत्रतापूर्वक आपले कार्य करतो' यामध्ये स्वतंत्रतापूर्वक शब्द महत्वाचा आहे. तो नसेल तर अन्य द्रव्यदेखील या कार्याचा कर्ता होण्याचा प्रसंग येईल. उदाहरणार्थ - पोळी पिठापासून बनली व बाईपासून देखील बनली असा प्रसंग येईल, घडा मातीने बनविला व कुंभारानेही बनविला असा प्रसंग येईल, शब्द भाषावर्गणाही करते व जीवही करतो असा प्रसंग येईल, ही अक्षरांची रचना शाईदेखील करते व मीदेखील करते असा प्रसंग येईल.

तुम्ही विचाराल, 'जीव रागद्वेषादि विकार देखील स्वतंत्रपणेच करतो ना?' पंचास्तिकायमध्ये त्याचे उत्तर दिले आहे. जीव विकार करतो ते त्याच्या अशुद्ध उपादानाद्वारे - तत्समयाच्या पर्यायाच्या योग्यतेने-त्या पर्यायाच्या स्वतंत्र षट्कारकांद्वारे करतो. परंतु तो जीवाचा स्वभाव नाही हे सांगण्यासाठी निमित्ताचे - द्रव्यकर्माच्या उदयाचे ज्ञान करविले जाते. त्याचप्रमाणे पुद्गल द्रव्यदेखील स्वतंत्रपणे कर्मरूप परिणमित होते तेथे जीवाचे रागद्वेष निमित्त आहेत.

जीव स्वतःच्या योग्यतेने स्वतंत्रपणे विभाव अर्थात मोह, राग, द्वेष करतो तेव्हा पूर्वी बांधलेल्या कर्माचा उदय निमित्त असतो. कर्माचा उदय जीवाला पराधीन बनवित नाही, रागद्वेष करायला लावत नाही. पूर्वी आपण पाहिलेच आहे की निमित्ताची फक्त उपस्थिति असते.

त्याचप्रमाणे कार्माण वर्गणा स्वतःच्या योग्यतेने स्वतंत्रपणे कर्मरूप परिणमतात त्यावेळी जीवाचे मोह, राग, द्वेष निमित्त

असतात. जीव व कर्म दोन्हीही स्वतःचे कार्य स्वतःमध्ये करतात. शास्त्रामध्ये असे कथन आपण वाचतो की जीवाने कर्म बांधले किंवा कर्माचा क्षय केला त्यावेळी हे निमित्ताचे कथन आहे, निमित्ताची उपस्थिति दर्शविणारे हे कथन आहे असा योग्य अर्थ आपण ग्रहण करावयास हवा.

ज्याप्रमाणे सूर्य, चंद्राच्या प्रकाशाच्या निमित्ताने संध्याकाळी आकाशात ढग विविध रंग व आकार धारण करतात, इंद्रधनुष्याची रचना, चंद्रभोवतालचे खळे या सर्व रचनांमध्ये पुद्गलस्कंध स्वतःच स्वतःच्या शक्तीने विविधरूपाने परिणमित होतात अन्य कोणीही त्यांचा कर्ता नाही. तद्वतच जीवाच्या रागद्वेषादि भावांच्या निमित्ताने पुद्गल द्रव्य स्वतःच्या शक्तीने ज्ञानावरणादि आठ कर्मरूप परिणमित होते.

अज्ञानी जीव रागद्वेषांची उत्पत्ति परपदार्थांमुळे, कर्मामुळे होते असे मानतो. खरे कारण तर त्या जीवाचा अज्ञानभावच आहे. ' समयसार नाटक ' मध्ये लिहिले आहे - " शिष्य विचारतो, ' हे स्वामी! रागद्वेष परिणामांचा मूळ प्रेरक कोण आहे ते तुम्ही मला सांगा. पुद्गल कर्म आहे? की मन वचन कायेची क्रिया आहे? की इंद्रियांचा भोग आहे? की धन आहे? की घर आहे?'

गुरु समाधान करतात - ' सहाही द्रव्यं स्वतः स्वतःच्या स्वरूपामध्ये सदैव असहाय (दुसऱ्याच्या सहाय्याविना) परिणमन करतात, म्हणून कोणतेही द्रव्य इतर कोणत्याही द्रव्याच्या परिणमनासाठी कधीही प्रेरक होत नाही, म्हणून रागद्वेषाचे मूळ कारण मिथ्यात्वरूपी मदिरापान हेच आहे.''

हे अनादिकालीन मिथ्यात्व दूर करण्यासाठीच आपण जिनेन्द्र कथित आगमाचा अभ्यास करीत आहोत. निमित्त उपादान, निश्चय व्यवहार, पाच समवाय, चार अभाव, क्रमबद्धपर्याय, सर्वज्ञता इत्यादि विषयांचे नीट आकलन करून, समजून घेऊन त्यानुसार तत्त्वनिर्णय करणे हे मिथ्यात्व ग्रंथीचा भेद करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

अज्ञानी अवस्थेमध्ये जीवाला रागाचा कर्ता म्हणायचे तर म्हणा परंतु सम्यग्दृष्टि ज्ञानी जीवास रागभावांचे स्वामित्व नसते,

स्वत:च्या ज्ञातापणातच त्याला अहंबुद्धि असल्याने, आस्त्रव तत्त्वास तो स्वत:हून भिन्न जाणत असल्याने ज्ञानीला रागाचा अकर्ता म्हटले आहे.

पहा हं, येथे अज्ञानीला त्याच्या विभावाचा कर्ता म्हटले आहे परंतु परद्रव्याचा कर्ता तर कोणीच असू शकत नाही. शास्त्रामध्ये कर्ता-कर्माची चर्चा जेवढी आहे तेवढी भोक्ता-भोग्य संबंधी नाही. कारण उघड आहे जेथे कर्ताबुद्धि आहे तेथे भोक्ताबुद्धिही आहेच आहे. त्याचप्रमाणे जीव परद्रव्याचा कर्ता नाही या सिद्धांताने तो परद्रव्याचा भोक्तादेखील नाही, परद्रव्य त्याचे भोग्य नाही हे देखील सिद्ध होते.

**कर्मकारक** - कर्ताकारकानंतर थोडे कर्मकारकाबद्दल बोलूया. कर्म हा शब्द तसा फसवा आहे. अनेक विविध अर्थांनी तो वापरला जातो. सर्वसाधारण लोक तर त्याचा अर्थ माहित नसतानादेखील हा शब्द सर्रास वापरताना आढळतात. जसे, आपण कर्म करीत रहावे पण त्याच्या फळाची अपेक्षा ठेवू नये. घर गृहस्थी, धंदा व्यापार सचोटीने करावा, इतरांना मदत करावी अशी त्यांची या 'कर्मा' संबंधीची मान्यता आहे. परपदार्थांच्या क्रियांचा मी कर्ता आहे व शरीरादिच्या क्रिया माझे कर्म आहे ही मान्यता तर महान मिथ्यात्व आहे. परंतु अशाच प्रकारच्या उपदेशाचे डोस लोक एकमेकांना पाजत असतात व ऐकणाऱ्यांनाही ते गोड वाटत असतात.

शास्त्रामध्ये कर्म हा शब्द अनेक अर्थांनी वापरला जातो (१) द्रव्यकर्म - ज्ञानावरणादि आठ कर्म जी पुद्गलाची-कार्माणवर्गणेची अवस्था आहे. (२) भावकर्म - जीवाचे राग द्वेष, मोह इत्यादि परिणाम (३) नोकर्म - शरीर, मन, वाणी इत्यादि. (४) कर्म म्हणजे कार्य-पर्याय. प्रत्येक द्रव्याची अथवा गुणाची पर्याय हे त्याचे कर्म आहे. कर्मकारकाच्या चर्चेमध्ये हा चौथ्या प्रकारचा अर्थ अभिप्रेत आहे.

आपण द्रव्य कर्ता (त्रिकाली उपादान) व पर्याय त्याचे कर्म असे म्हणतो. आता उपादानाचे भेद व खरा कर्ता कोण हे माहित झाल्यानंतर तुमच्या हे सहज लक्षात येईल की तत्समयाची पर्यायाची योग्यता हे क्षणिक उपादान कारण कर्ता आहे व ती

पर्याय कर्म आहे. याचप्रकारे सहाही कारक त्या विशिष्ट पर्यायावरच घटित होतात. पूर्वी आपण सहा कारक द्रव्यावर घटविले होते आता पर्यायावर घटवित आहोत. पर्याय स्वतःच कर्ता, पर्याय स्वतःच कर्म, पर्याय स्वतःच करण, पर्याय स्वतःच संप्रदान, पर्याय स्वतःच अपादान, पर्याय स्वतःच अधिकरण आहे. याला आत्म्यावर घटवूया. द्रव्य व पर्याय अभेद करून द्रव्याचे सहा कारक याप्रमाणे आहेत.

आत्मा स्वतःच आपल्या निर्मल, शुद्ध पर्यायांचा कर्ता आहे. शुद्ध पर्याय त्याचे कर्म आहे, आत्माच त्याचे साधन म्हणजे करण आहे, स्वतःलाच तो शुद्धतेचे दान देतो म्हणून आत्माच संप्रदान, स्वतःमधूनच देतो म्हणून आत्माच अपादान व स्वतःच्या आधारानेच देतो म्हणून आत्माच अधिकरण आहे.

आत्म्याच्या शुद्ध पर्यायाचे सहा कारक खालीलप्रमाणे आहेत - शुद्ध पर्याय स्वयं कर्ता, शुद्ध पर्याय स्वयं कर्म, शुद्धताच तिचे साधन असल्याने शुद्ध पर्याय करण आहे, स्वतःलाच शुद्धतेचे दान देत असल्याने शुद्ध पर्याय संप्रदान, स्वतःमधून शुद्धता प्रकट होत असल्याने शुद्ध पर्याय अपादान, स्वतःच्या आधारे शुद्ध होत असल्याने शुद्ध पर्याय स्वतः अधिकरण आहे.

हे सारे समजल्याने दृष्टि परपदार्थांपासून व पर्यायांपासून हटून स्ववर केंद्रित होते व ज्ञानानंद स्वभावाला जाणत राहिल्याने पर्यायामध्ये वीतरागतेची - आनंदाची प्राप्ति होते.

**करणकारक** - लोकांमध्ये करणकारक अर्थात साधनाबद्दल काही कमी घोटाळे नाहीत. एकदा एक ८७ वर्षांचे वृद्ध गृहस्थ आपल्या घरी आले होते. ते म्हणाले की, 'जैनतत्त्व परिचय' व 'करणानुयोग परिचय' पुस्तकं वाचून मला खात्री पटली आहे की आत्मानुभवाचा शास्त्रशुद्ध मार्ग मला तुमच्याकडेच मिळेल. मला खात्री आहे की तुम्ही आत्मानुभवी आहात. अहो, मी कोण्या एका व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली ४ वर्षांपासून साधना करतोय, सम्यग्दर्शन प्राप्त करण्याचा प्रयत्न करतोय पण सारे व्यर्थ !'

मी म्हटले, 'अहो काय काय प्रयत्न केले जरा सांगा तरी.'

'मी रोज पहाटे उठून पाऊण तास स्थिर आसन लावून, नासाग्र दृष्टि ठेऊन ॐ चा जाप तसेच सिद्धांचा जाप करत आहे', असे त्या व्यक्तीने सांगितले.

' काका, आपणाला सिद्धांचे स्वरूप तर माहितच असेल नाही का?'- मी. त्यावर ते म्हणाले, 'अहो त्याची काय गरज आहे? मला काही त्यांचे स्वरूप माहित नाही. हे पहा, मला फक्त मिथ्यात्व घालवून सम्यक्त्व प्राप्त करायचे आहे, अनंतानुबंधी तर आपल्याला नाहीच कारण आपण एवढे पुण्य करतो आहोत - मंद कषायी आहोत.'

मी मनातल्या मनात काय ते समजले. समाजात भोळ्या लोकांची व त्यांची दिशाभूल करणाऱ्यांची काही कमतरता नाही. त्यानंतर दीड ते दोन तास मी व तुमच्या दादांनी त्यांच्याशी चर्चा करून त्यांना अभ्यासाची योग्य दिशा दाखवून दिली. कितीही उच्च प्रकारचा शुभभाव असला तरी सम्यक्त्व प्राप्त झाल्याखेरीज तो अनंतानुबंधीच असतो हेही सांगितले.

सध्या तर प्रेक्षाध्यान, विपश्यना ध्यान आदि अनेक ध्यानांचे पेव फुटले आहे. कोणी स्वत:ला आकाशात उंच भरारी मारताना अनुभवतो, तर कोणाला पांढरा शुभ्र दिव्य प्रकाश दिसतो, तर कोणी संगीताच्या आलापाद्वारे आत्म्याची अनुभूति झाल्याचा दावा करतात. ध्यानाच्या ध्येयासंबंधी तर अज्ञान आहेच आहे, त्याच्या साधनासंबंधी-करणकारकासंबंधीही अज्ञान आहे. आत्मानुभूति ही ज्ञानगुणाची पर्याय आहे मग त्याचे साधन म्हणजे करण देखील ज्ञानाची पर्यायच आहे. शास्त्रामध्ये म्हटले आहे की प्रज्ञाछिन्नीद्वारे भेदविज्ञान करून-अर्थात ज्ञानाच्या द्वारे स्व आणि पर यांच्यातील भेद जाणून प्रज्ञेद्वारेच स्वला ग्रहण करायचे आहे-स्वला जाणायचे आहे.

**संप्रदानकारक** - आता थोडी चर्चा अन्य कारकांबद्दलही करूया. संप्रदान म्हणजे ज्ञानाचे जे कार्य झाले ते स्वत:च स्वत:ला ज्ञान दिले. आपण गुरु शिष्याला ज्ञानदान देतो असे निमित्ताचे कथन करतो ते निमित्ताचे ज्ञान करविले जाते, परंतु गुरु काही त्यांच्या शिष्याला ज्ञान अथवा सम्यक्त्व प्रदान करू शकत नाही, त्याची पर्याय आणू शकत नाही. शिष्य ते स्वत:च्या

योग्यतेने व पुरुषार्थाने प्राप्त करतो, हां, त्यावेळी गुरुची-निमित्ताची उपस्थिति असते.

अनेक जण म्हणतात, 'अहो, आम्ही तर गुरु केला. आता आमचा सारा भार गुरुवर. तोच आमचे भले करेल, आता आम्हाला काही काळजी नाही.' स्टेशनवर एखाद्याने हमाल केला व सारा बोजा त्याच्यावर टाकला हे आपण पहातो, परंतु त्याच सुरामध्ये हा गुरु करण्याचा प्रकार काही अजबच आहे नाही का?'

मोक्षमार्गाचा उपदेश - देशनालब्धि आपल्याला खऱ्या देव, गुरु, शास्त्र व आत्मानुभवी ज्ञानी यांच्या द्वारेच मिळते, अन्य कोणाकडून नाही हे खरे आहे. परंतु हे तर निमित्त आहे. आपण स्वत: जीवद्रव्य त्याचे त्रिकाली उपादान कारण आहोत. पुरुषार्थ व तत्समयाच्या पर्यायाच्या योग्यतेनेच मोक्षमार्ग प्रकट होतो - सम्यग्दर्शन-आत्मानुभूति प्रकट होते.

**अपादानकारक** - ज्ञानाची पर्याय ज्ञानातून उत्पन्न होते असे न मानता शास्त्रातून ज्ञान होते, दिव्यध्वनितून ज्ञान होते, ज्ञेयामधून ज्ञान आले असेच जो जीव मानतो तो अज्ञानी आहे. उपादानाचे तिन्ही प्रकार अपादानकारक आहेत. परंतु परद्रव्य किंवा निमित्त हे अपादानकारक नाहीत. १९-२० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. माझ्या आईच्या आग्रहावरून तिच्याबरोबर धर्माची धुरा वहाणाऱ्या एका प्रतिष्ठित व्यक्तिकडे गेले होते. त्यांना प्रश्न विचार असा आईचाच आग्रह, योग्य उत्तर मिळणार नाही याची खात्री होती तरी विचारले 'मला सम्यग्दर्शनाची प्राप्ति कशी होईल ते सांगा.'

' बाळ, ते फार अवघड आहे. मेडिकल पास करून डॉक्टर होणे हे दहा हजारातल्या एखाद्यालाच जमते' - ते उत्तरले.

मी म्हणाले, 'डॉक्टरकीची पदवी तर मी केव्हाच प्राप्त केली आहे. मला सम्यग्दर्शनाबद्दल सांगा.'

त्यावर ते म्हणाले 'त्याचा काही नियम नाही, कोणाला झोपडीत होते तर कोणाला महालात. अरे कोण आहे ते तिकडे? आपल्या टाईम्स ऑफ इंडियातल्या जाहिरातीबद्दल काय झाले?'

मी काय समजायचे ते समजले. तुम्हीही समजला असाल की सम्यग्दर्शन आत्म्यातून उत्पन्न होते व आत्माचे लक्ष्य करण्याने उत्पन्न होते.

हा प्रसंग परनिंदा किंवा आत्मप्रशंसा करण्यासाठी नाही सांगितला. तुम्ही सुद्धा परीक्षाप्रधानी होऊन एखाद्याच्या कथनाद्वारे त्याच्या व त्याच्या उपदेशाची सत्यासत्यता पडताळून पाहिली पाहिजे.

**अधिकरणकारक** - प्रत्येक द्रव्य स्वतःच्याच आधारे रहाते, ते स्वतःचेच अधिकरण आहे. असे न मानता अज्ञानी जीवाने आजपर्यंत शरीराच्याच आधारे आपले अस्तित्व मानले आहे. 'शरीर नसेल तर जीव कोठे व कसा राहील? मोक्षमार्गासाठी शरीराची आवश्यकता आहे ना? शरीराला नीट सांभाळा म्हणजे तुमची धर्मसाधना नीट चालेल' असेही सल्ले लोक देतात. पहा, वज्रवृषभनाराच संहनन (हाडांची व त्यांच्या वेष्टणाची अत्यंत मजबूती असणारे शरीर) असल्याशिवाय कोणी क्षपक श्रेणी मांडून मोक्षाला जाऊ शकत नाही असे शास्त्रातलेच वचन वापरून या श्रेष्ठ संहननवाल्या शरीराच्या आधारानेच मोक्ष मिळतो असे मानतात. तुम्हाला माहित आहे का की सातव्या नरकात जाणाऱ्या जीवाला (मनुष्य किंवा तिर्यंचाला) देखील वज्रवृषभनाराच संहननच असते? शास्त्रातील ही सारी कथनं निमित्ताचे ज्ञान करवितात, अनुकूल परिस्थिति दर्शवितात. ते काही खरे कारक किंवा क्रियेचे जनक नाहीत.

पहाता पहाता चर्चा खूप लांबली. आज येथेच पूर्ण करते. कारणांच्या चर्चेत पाच समवायांची चर्चा ओघाने येतेच त्याबद्दल पुढील पत्री चर्चा करूया.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# पाच समवाय

पत्रांक १० १६ जून २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना.

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

तुम्ही दोघीजणी मुलांच्या सुट्टीनिमित्त येथे माहेरी येऊन ८-१० दिवस राहिलात व परत गेलात. लौकिक सुख दु:खाच्या गोष्टीही तुम्ही केल्यात, काही बाबतीत आमचा सल्ला - आमची मतंही विचारलीत. त्यावर लौकिक सल्ल्याबरोबर तत्त्वज्ञानाच्या व वस्तुस्वरूपाच्या दृष्टीने मी तुम्हाला काही उपेदशही दिला.

मुलींनो, बाह्य पदार्थांना इष्ट अनिष्ट मानून त्यांच्या संयोग, वियोगामध्येच आपण सुख दु:ख मानतो व तेवढेच आपले सर्वस्व मानतो. परंतु या सर्व गोष्टींहून भिन्न, या सर्वांना जाणणारे मी कोणी भिन्न तत्त्व आहे, अनुपम आश्चर्यकारी व अनुभवात येणारी वस्तु आहे, जिच्या अनुभवामध्ये अतींद्रिय व खरे सुख प्राप्त होते याची अनेकांना जाणीवही नसते.

या स्वाधीन सुखाची सहज उपलब्धि सोडून हा जीव अनादिपासून परद्रव्यांच्या परिणमनामध्ये काहीतरी फेरबदल करण्याच्या मागे लागून आपले जीवन वाया घालवत आला आहे. परद्रव्याचे कार्य कोणी अन्य द्रव्य करूच शकत नाही हे न जाणल्याने पराच्या कर्तृत्वबुद्धीने हा जीव दु:खी होत आहे परंतु त्या प्रयत्नातच स्वत:ला सुखी मानत आहे. ही दुसऱ्या कोणाची नव्हे परंतु आपलीच दयनीय अवस्था आहे की नाही याचा तुम्हीच विचार करा.

कोणतेही कार्य होते त्यावेळी अनेक कारणं सहज एकत्रित होतात. कारणांच्या या समूहाला ' समवाय ' म्हटले आहे. कोणत्याही कार्याच्या उत्पत्तिमध्ये पाच कारणांचा समवाय म्हणजे समूह आढळतो. त्यांना पाच समवाय म्हटले जाते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत - (१) स्वभाव (२) निमित्त (३) नियति (काललब्धि) (४) पुरुषार्थ आणि (५) भवितव्य (होनहार).

या सर्व कारणांच्या समवायाने - एकत्रित येण्याने कार्य होते असे मानणे हा अनेकांत आहे, सम्यक्त्व आहे. परंतु एकाच कारणाने कार्याची उत्पत्ति होते असे मानणे हा एकांत आहे - मिथ्यात्व आहे.

सर्वप्रथम आपण या पाच शब्दांचा अर्थ समजून घेऊया.

**(१) स्वभाव** - स्वभाव शब्दाशी तर आता तुम्ही परिचित आहातच. वस्तुचा म्हणजे द्रव्याचा स्वत:चा भाव-स्वभाव आहे. त्या स्वभावानुसारच कार्य होते. कोणतेही कार्य आपल्या द्रव्य स्वभावाचे कधीही उल्लंघन करीत नाही. द्रव्याची जी जी पर्याय होते त्या त्या पर्यायरूप परिणमण्याची योग्यतारूप धर्म - स्वभाव त्या द्रव्यातच विद्यमान असतो. याला द्रव्यशक्ति असेही म्हणता येईल. उपादानाच्या भाषेमध्ये याला 'त्रिकाली उपादान' असे म्हणतात.

घडारूप कार्य होण्याचा स्वभाव मातीमध्ये आहे. केवलज्ञानरूप परिणमण्याचा स्वभाव जीवद्रव्यात आहे. एवढेच नव्हे तर रागद्वेषादि जे विभाव परिणमन आहे ते होण्याची योग्यता अर्थात अनियत स्वभाव देखील जीवद्रव्यामध्ये आहे. जसे, शीतलता हा पाण्याचा स्वभाव असला तरी अग्निच्या संयोगात गरम होण्याची देखील त्यात पर्यायगत योग्यता आहे. परंतु ज्ञानरूप परिणमण्याचा स्वभाव शरीरात, इंद्रियांत, मेंदूत नाही. तसेच स्पर्श, रस, गंध किंवा वर्णरूप किंवा शरीररूप परिणमण्याचा स्वभाव जीवामध्ये नाही, कर्मरूप परिणमण्याचा देखील स्वभाव नाही.

आपण पूर्वी पाहिलेच होते की प्रत्येक द्रव्याचा स्वत:चा स्वभाव आहे. स्वभाव हा स्वत:सिद्ध असतो, त्याला कोणी उत्पन्न करीत नाही किंवा त्यामध्ये कोणी बदल करू शकत नाही. हा स्वभाव अनादिअनंत एकसदृश-एकरूप-एकसारखा असतो. स्वभावाला अन्य कोणाच्या सहाय्याची, मदतीची आवश्यकता नसते अर्थात तो 'स्वसहाय' अथवा 'असहाय' असतो. स्वभाव कधीही खंडित होऊ शकत नाही.

सदैव कायम रहाणे - ध्रुवरूपाने टिकून रहाणे हा जसा द्रव्याचा स्वभाव आहे त्याचप्रमाणे कायम राहून देखील निरंतर

परिणमन करणे, दर समयाला विशिष्ट अवस्थारूपाने रहाणे, परिणमनशील असणे हादेखील द्रव्याचा स्वभाव आहे. यांनाच अनुक्रमे नित्य स्वभाव व अनित्यस्वभाव म्हटले आहे. प्रत्येक समयाला त्या समयाच्या पर्यायाच्या योग्यतेनुसार परिणमण्याचा-कार्यरूप होण्याचा स्वभाव-क्षणिक उपादान त्या द्रव्यातच योग्यतारूपाने विद्यमान असतो. त्याला पर्यायशक्ति देखील म्हणतात.

**(२) निमित्त** - निमित्त कारणासंबंधी आपण सविस्तर चर्चा केलीच आहे. जेव्हा कार्य होते तेव्हा कार्याच्या उत्पत्तिमध्ये अनुकूल होण्याचा आरोप ज्याच्यावर येतो, परंतु जे स्वतः कार्यरूप परिणमत  नाही त्यास निमित्त म्हणतात. निमित्त कार्यामध्ये काहीही फेरबदल, मदत, ढवळाढवळ करीत नाही परंतु तरीदेखील निमित्ताची उपस्थिति अनिवार्यपणे असतेच.

जो निमित्ताला मानतच नाही त्याने पाच समवायापैकी एका कारणाला-निमित्त नावाच्या समवाय कारणाला मानले नाही. ही त्याची मान्यता खोटी आहे.

जेव्हा माती स्वतःच्या उपादानाने घडारूप परिणमन करते त्यावेळी कुंभार, चाक, दण्ड वगैरे निमित्तं देखील उपस्थित असतातच. जेव्हा सम्यग्दर्शनरूप कार्य होते अर्थात जीवद्रव्य किंवा जीवाचा श्रद्धागुण स्वतःच्या योग्यतेने सम्यग्दर्शन पर्यायरूपाने परिणमित होतो त्यावेळी दर्शनमोहनीय कर्माची उपशमादि अवस्था आढळते हे अंतरंग निमित्त आहे. अंतरंग म्हणजे आतले असा अर्थ नाही बरं! नियमरूपाने जे निमित्त असतेच त्याला अंतरंग निमित्त म्हणतात. सम्यग्दर्शन प्रकट करणाऱ्या कोणत्याही जीवामध्ये हे असतेच.

बहिरंग निमित्तं प्रत्येकाच्या बाबतीत वेगवेगळी असू शकतात. यामध्ये खऱ्या देव, गुरु, शास्त्र यांच्या द्वारे देशना मिळणे हे बाह्य निमित्त  आहे. ही देशना त्या भवात अथवा पूर्वीच्या भवात मिळालेली असू शकते. जिनबिम्बदर्शन, जातिस्मरण, नरकातील तीव्र वेदना, स्वर्गातील ऐश्वर्य आदिच्या निमित्ताने जीव अंतर्मुख होऊन विचार करू लागतो व स्वतःच्या

शुद्धात्मस्वरूपाचे चिंतवन करून त्यामध्ये एकाग्र होताच त्याला शुद्धात्मानुभूति होते - सम्यग्दर्शनाची प्राप्ति होते.

निमित्तप्रधान शैलीमध्ये ‘ देशना ’ रूप निमित्ताला आत्मानुभूतिरूप कार्यामध्ये अत्यंत महत्वाचे स्थान देऊन आपण आत्मज्ञानी व्यक्तींचे, गुरुंचे व या सर्व देशनेचे मूलस्रोत अशा अरिहंत भगवंतांचे उपकार स्मरण करतो.

पाच कारणांपैकी एखाद्या कारणाला मुख्य करून वर्णन केले जाते त्यावेळी इतर चारही कारणांचा गौणपणे स्वीकार असतोच असतो. परंतु असे न मानता, सर्वथा एकाच कारणाने कार्य होते असे मानणे हा मिथ्या एकांत आहे, याला एकांतवाद म्हणतात. कोणी फक्त निमित्तालाच कर्तापणे स्वीकारतात व निमित्त मिळाले नाही म्हणून माझे कार्य होत नाही असे मानून पराधीन दृष्टिवाले होतात. अन्य कित्येक जण नियतिवर-दैवावर सारा हवाला टाकून एकांत नियतिवादाचे पोषण करतात.

(३) **काललब्धि** - प्रत्येक वस्तुमध्ये विशिष्ट कार्य होण्याची योग्यता ज्या समयात असते त्याला काललब्धि म्हणतात. यालाच नियति असेही म्हणतात. आपण उपादानाच्या चर्चेमध्ये क्षणिक उपादान कारणाला कार्याचे नियामक कारण अर्थात कार्य कधी होणार याचे नियामक कारण असे म्हटले होते.

प्रत्येक द्रव्य अनादिअनंत आहे व त्याची प्रत्येक समयात एक पर्याय होते. मला सांगा बरं, एका समयात एक पर्याय होते तर प्रत्येक द्रव्याच्या पर्याय किती असतील ? विचार करा म्हणजे उत्तर नक्कीच मिळेल. हे पहा, तीन काळाचे - भूत, वर्तमान व भविष्य काळाचे समय अनंत आहेत व तेवढ्याच प्रत्येक द्रव्याच्या पर्याय आहेत. द्रव्याच्या पर्यायांचा हा जो अनादिअनंत प्रवाह आहे त्यातील प्रत्येक पर्यायाचा समय निश्चित आहे अथवा असेही म्हणता येईल की प्रत्येक समयाची पर्याय निश्चित आहे. हे कोणीही ठरविलेले नाही. प्रत्येक पर्यायाची योग्यतारूप क्षणिक उपादान त्या द्रव्यातच विद्यमान आहे.

कार्य होण्याच्या योग्यतेलाच काल म्हणतात. द्रव्याचा स्वकाल अनादिअनंत आहे तर पर्यायाचा स्वकाल एक समयाचा

आहे, एवढेच नव्हे तर तो निश्चित आहे. पर्यायांच्या अनादिअनंत प्रवाहातली प्रत्येक पर्याय निश्चित आहे, स्वसमयामध्ये निबद्ध आहे.

काललब्धिच्या आधारे तर आपण इतर कारणांची देखील निश्चिती सिद्ध करू शकतो. निमित्त ही परद्रव्याची पर्याय असते हे आपण पूर्वी पाहिलेच आहे. प्रत्येक द्रव्याची प्रत्येक पर्याय आपल्या स्वसमयीच उत्पन्न होते हे आत्ताच आपण पाहिले. याचा अर्थ असा की विशिष्ट समयातले अर्थात विशिष्ट कार्याचे निमित्तदेखील निश्चित असते, त्यालाही कोणी बदलू शकत नाही, पुढे मागे करू शकत नाही.

**(४) पुरुषार्थ** - पुरुषार्थ शब्दाचा लौकिक अर्थ करताना आपण धर्म, अर्थ, काम व मोक्ष पुरुषार्थ म्हणजे विशेष कार्यासाठी जीवाचे प्रयत्न अशाप्रकारे अर्थ करतो. जीवाचे विशेष गुण व पर्याय शिकताना आपण वीर्य गुणाची चर्चा करताना पाहिले होते की पुरुषार्थ ही वीर्य गुणाची पर्याय आहे. स्वभावाची रचना पर्यायामध्ये करणे हे त्याचे कार्य आहे. सहाही द्रव्यांमध्ये पर्यायरूप कार्य स्वभावानुसार होतच असते म्हणून सर्व सहा द्रव्यांमध्ये वीर्य गुण व त्याची पुरुषार्थ ही पर्याय दर समयाला होत असते. तो पुरुषार्थ तर सहाही द्रव्यांच्या प्रत्येक पर्यायामध्ये कारणरूपाने विद्यमान असतो.

अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्यायाच्या व्ययरूप क्षणिक उपादान कारणाची चर्चा करताना या पूर्व पर्यायाच्या व्ययाला आपण कारणरूपाने पाहिले होते. प्रत्येक समयात पूर्व पूर्व पर्यायाचा व्यय व उत्तर उत्तर पर्यायाचा त्या त्या समयाच्या पर्यायाच्या योग्यतेनुसार उत्पाद असे निरंतर चालू असते. अशाप्रकारे ज्या पर्यायाच्या व्ययपूर्वक विशिष्ट पर्याय होते ती पूर्व पर्याय देखील नक्की आहे.

कारण-कार्याची चर्चा करताना या पूर्ववर्ती पर्यायांच्या रूपामध्ये आपण पुरुषार्थाचा विचार करू शकतो. सम्यग्दर्शनरूपी कार्यामध्ये त्याच्या पूर्वी होणाऱ्या अनेक पूर्ववर्ती अवस्था-जसे सम्यग्दर्शनापूर्वी करणलब्धि, त्यापूर्वी प्रायोग्यलब्धि, त्यापूर्वी देशनालब्धि त्यापूर्वी विशुद्धिलब्धि व त्यापूर्वी

क्षयोपशमलब्धि आदिद्वारे पुरुषार्थाची सिद्धि आपण करू शकतो. सम्यग्दर्शनासाठी केलेल्या सर्व प्रयत्नांना आपण पुरुषार्थ म्हणतो व मोक्षमार्गासाठी त्याचाच उपदेश दिला जातो.

प्रत्येक समयाच्या पर्यायामध्ये ‘ पुरुषार्थ ’ हे कारण विद्यमान असतेच. पाचही कारणांचा समवाय असतो हे आपण पाहिलेच आहे. यातले पाचवे कारण आहे ‘भवितव्य’.

(५) **भवितव्य** - याचा शब्दश: अर्थ आहे ‘होण्यायोग्य’. वस्तुमध्ये ज्या समयी जे कार्य होण्यायोग्य असते तेच होते, अन्य नाही, यालाच भवितव्य अथवा ‘होनहार’ असे म्हणतात. आत्ताच काललब्धिच्या चर्चेमध्ये आपण काल म्हणजेच पर्यायाचा समय निश्चित आहे हे पाहिले होते, येथे प्रत्येक पर्याय निश्चित आहे हे सिद्ध होते. प्रत्येक समयामध्ये ‘होण्यायोग्य पर्याय’ च होते अन्य नाही. पर्यायाचा हा योग्यतारूप धर्म त्या त्या द्रव्यातच विद्यमान आहे.

आपण एखाद्या वस्तुची लांबी, रुंदी, उंची मोजून त्या वस्तुचा विस्तार किती आहे हे पहातो. जिनेन्द्र भगवान आपल्या दिव्य केवलज्ञानाद्वारे वस्तु म्हणजे द्रव्य किती प्रदेशी आहे हे तर जाणतातच परंतु एवढेच नव्हे तर त्या वस्तुचा अनादिअनंत पर्यायक्रमही जाणतात. कालाच्या अपेक्षेने वस्तु अनादिअनंत पसरलेली आहे, त्याचा प्रवाहक्रम देखील जाणतात. द्रव्याच्या क्षेत्र अपेक्षेने विस्तारास ‘तिर्यक्‌प्रचय’ म्हणतात व कालअपेक्षेने अनादिअनंत प्रवाहास ‘ऊर्ध्वप्रचय’ म्हणतात.

पहा बरं, क्षेत्राच्या अपेक्षेने एकेक जीव द्रव्य, धर्म द्रव्य, अधर्म द्रव्य असंख्यात प्रदेशी, आकाश द्रव्य अनंत प्रदेशी, काल द्रव्य एकप्रदेशी तर पुद्‌गल द्रव्य एक अथवा बहुप्रदेशी (स्कंधाच्या अपेक्षेने) असे असताना देखील सर्व द्रव्यांचा काल अपेक्षेने विस्तार समानच आहे-अनादिअनंत आहे. लांबी, रुंदी व उंची या तीन डायमेन्शन्स (मोजमापं) आहेत तर काल ही वस्तुची चौथी डायमेन्शन आहे. वस्तुचा विस्तार आपण मोजतो त्याचप्रमाणे त्याचा काल अपेक्षेने विस्तार मोजल्यास अनादिअनंत आहे. आजकाल शास्त्रज्ञांनीही Time is a fourth dimension असे म्हणून काळाला मान्य केले आहे.

अशाप्रकारे स्वभाव, निमित्त, पुरुषार्थ, काललब्धि व भवितव्य या पाच प्रकारच्या कारणांचे-पाच समवायाचे स्वरूप आपण थोडक्यात पाहिले. जेव्हा जेव्हा कार्य होते तेव्हा तेव्हा ही पाचही कारणे असतातच. कोणतेही कार्य कारणाशिवाय होत नाही. जसे कारण असेल तसे कार्य होते. जसा स्वभाव, जसा पुरुषार्थ, जशी काललब्धि, जसे भवितव्य, जसे निमित्त तसेच कार्य होते.

पाच समवायांचे नाव व स्वरूप ऐकून तुमच्या मनात अनेक प्रश्न उठतील याची मला कल्पना आहे. तुम्ही म्हणाल, 'आम्हाला जर विशिष्ट कार्य करायचे असेल तर आम्ही या पाच समवायांना-पाच कारणांच्या समूहाला कोठे बरे शोधून काढायचे?' किंवा 'आमची काललब्धिच आली नसेल तर?' किंवा 'न जाणो आमचे भवितव्य काय असेल?' किंवा 'अहो आमचे भवितव्य असे आहेच तर मग पुरुषार्थ करायची काय गरज आहे?' किंवा 'आम्ही पुरुषार्थ तर करू, परंतु निमित्तच नाही मिळाले तर?'

वस्तुच्या स्वतंत्र कारण-कार्य व्यवस्थेचे रहस्य लक्षात न घेतल्याने असे प्रश्न उठतात व कारणासंबंधीच्या चिंतेने, कारणांना मिळविण्याच्या चिंतेने जीव आकुळ व्याकुळ होतो. मुलींनो ! एक गोष्ट सदैव ध्यानात राहू द्या की तत्त्वज्ञान हे सर्व आकुलतांना नष्ट करणारे आहे. पाच समवायांचे स्वरूप जाणताच अनंत आकुलता कमी होते. प्रत्येक पर्यायामध्ये त्या पर्यायाचे स्वतःचे पाचही समवाय एकत्रित होतात. ते स्वतःच एकत्रित होतात, कोणी त्यांना जुळवून एकत्रित करू शकत नाही.

वस्तुमध्ये अनंत गुण व प्रत्येक गुणाची प्रत्येक समयात नवी नवी पर्याय-नवे नवे कार्य निरंतर चालू असते. या पर्याय आपल्या इच्छेनुरूप होत नसून नियत म्हणजे निश्चित वस्तुव्यवस्थेनुसार होतात. मी असं केलं असतं तर तसं घडलं असतं अशी जर तर ची भाषा किंवा जर तर ची शक्यता वस्तुच्या स्वतंत्र कारण-कार्य व्यवस्थेमध्ये नसते. येथे तर सारे काही नियत म्हणजे निश्चित आहे-कारणही नियत आहे आणि कार्यही नियत आहे मग करण्या धरण्याचे राहिलेच काय?

आपण आत्ताच काललब्धि व भवितव्य या दोन कारणांची चर्चा करताना पाहिले आहे की प्रत्येक पर्यायाचा स्वसमय-तिचा जन्मक्षण निश्चित आहे, पुढे मागे होऊ शकत नाही तसेच कोणती पर्याय होणार हे देखील निश्चित आहे. द्रव्याच्या पर्यायांच्या अनादिअनंत प्रवाहक्रमातील प्रत्येक पर्याय स्वत:च्या योग्यतेनुसार होणारी तीच होते व ही पर्यायशक्ति अथवा योग्यतारूप धर्म प्रत्येक द्रव्याचा स्वतंत्र आपापला विद्यमान आहे. तो काही नव्याने तयार होत नाही.

फक्त एक पर्याय निश्चित आहे असे नाही, पूर्ववर्ती पर्याय की जिच्या व्ययपूर्वक वर्तमान पर्याय उत्पन्न होते तीही निश्चित आहे. त्याही पूर्वीच्या सर्वच पर्याय निश्चित आहेत. यालाच विधि, प्रक्रिया अथवा पुरुषार्थ म्हटले आहे. यावरून पुरुषार्थ देखील निश्चित आहे हे सिद्ध होते.

प्रत्येक द्रव्याचा स्वभाव तर अनादिअनंत - त्रिकाल एकरूपच असतो हे तर सांगायची गरजच नाही. तोही नियत आहे - निश्चित आहे. 'स्वभाव, पुरुषार्थ, काललब्धि, भवितव्य सारे काही निश्चित आहे परंतु निमित्तं तर आपण शोधू तेव्हाच व आपणास हवी तीच आपण मिळवू शकतो ना?' असा कोणी प्रश्न विचारेल. त्याचे समाधान असे आहे की, निमित्त ही परद्रव्याची पर्याय आहे अर्थात परद्रव्याचे कार्य आहे. तेही त्या त्या द्रव्याच्या स्वभाव, पुरुषार्थ, काललब्धि व भवितव्यानुसारच होणार जे सर्वच निश्चित आहे. त्या द्रव्याची पर्याय दुसरा कोणी कसे बरे करू शकेल? यावरून विशिष्ट कार्याचे निमित्तदेखील निश्चित आहे हे सिद्ध होते.

ही सारी स्वयंचलित-ऑटोमॅटिक व्यवस्था आहे. कारण-कार्य व्यवस्थेचे रहस्य जाणल्याने आपल्याला वस्तुस्वातंत्र्याचे ज्ञान होते, आपल्या चुकीच्या मान्यता नष्ट होतात, आकुलता नाहिशी होते व कर्तृत्वबुद्धीचे भूत उतरल्याने उपयोग सहजपणे पर्याय व पर्यायाच्या कर्तापणापासून हटून स्वस्वभावावर केंद्रित होतो-सम्यक् पुरुषार्थ चालू होतो, सम्यग्दर्शनरूपी कार्य प्रकट होते. पर्याय निश्चित व त्यांचा क्रम देखील निश्चित असताना पाचही समवाय निश्चित असलेच पाहिजेत, नाही का? या साऱ्या गोष्टींचे योग्य ज्ञान होताच क्रमबद्धपर्यायाचा सिद्धांतही आपल्या

लक्षात येतो-त्याचे मर्म समजते-त्या बाबतीतल्या अनेक प्रश्नांची उकल होते.

अजीव द्रव्यांच्या पर्यायामध्येही हे पाचही समवाय आढळतात, तर मग जीव इतका पराधीन आहे काय की त्याला हे पाच समवाय शोधावे लागतील?

जेव्हा विशिष्ट कार्य होणार असते त्यावेळी हे पाचही समवाय सहज मिळतात, जेव्हा ते कार्य होणार नसेल तेव्हा मिळत नाहीत. अज्ञानी जीवाला कर्तृत्वबुद्धीचा अहंकार असल्याने मी कार्य केले तर होते, मी नाही केले तर होत नाही अशी विपरीत बुद्धि - मिथ्याबुद्धि होते.

आपण रोजच्या जीवनात हे पदोपदी अनुभवत असतो परंतु मानावयास तयार होत नाही. आपण विशिष्ट इष्ट संयोगाच्या प्राप्तिसाठी धडपडत असतो, पैशाच्या अभावाने ती गोष्ट अप्राप्य वाटते परंतु पैशांची सोय झाली तरीदेखील त्या वस्तुची प्राप्ति होत नाही असे आढळते तेव्हा आपण दु:खी कष्टी होतो. अशावेळी जिनागमातील सिद्धांत आठवले असता आकुलता शांत होते.

कार्तिकियानुप्रेक्षा ग्रंथामध्ये आचार्य कार्तिकेय यांनी म्हटले आहे - "ज्या जीवाचे, ज्या ठिकाणी, ज्या वेळी, ज्या विधिने जे जन्म अथवा मरण जिनेन्द्र भगवंतांनी नियतरूपाने जाणले आहे त्या जीवाचे, त्याच ठिकाणी, त्याच वेळी, त्याच विधिने ते अवश्य होते. ते टाळण्यास इन्द्र किंवा जिनेन्द्रदेखील समर्थ नाहीत. अशातऱ्हेने जो सर्व द्रव्यांना व त्यांच्या सर्व पर्यायांना जाणतो तो सम्यग्दृष्टि आहे, जो शंका करतो तो मिथ्यादृष्टि आहे."

जैनेन्द्र सिद्धांतकोशकारांनी म्हटलं आहे, " जे कार्य अथवा जी पर्याय ज्या निमित्ताद्वारे, ज्या द्रव्यामध्ये, ज्या क्षेत्रात व ज्या काळी ज्याप्रकारे होणार असेल ते कार्य त्याच निमित्ताद्वारे, त्याच द्रव्यात, त्याच क्षेत्रामध्ये, त्याच काळी, त्याचप्रकाराने होते."

पहा बरं, यामध्ये द्रव्य, क्षेत्र, काल, भाव व निमित्त सारे काही निश्चित सिद्ध झाले. पाच समवायामध्ये आपण द्रव्याचे स्वचतुष्टय घटवू शकतो. कसे ते पहा हं !

स्वभावात द्रव्य व क्षेत्र यांचा समावेश होतो, काललब्धि मध्ये कालाचा समावेश होतो, भवितव्यामध्ये होण्यायोग्य 'भाव' व पुरुषार्थामध्ये कारणरूप भाव आहे. निमित्तामध्ये परद्रव्याची पर्याय आहे. अशाप्रकारे स्व आणि पर सिद्ध झाले. स्वमध्ये स्वभाव, पुरुषार्थ, काललब्धि व भवितव्य हे चार समवाय व परामध्ये निमित्त असे विभाजन होईल.

याच समवायांना उपादान व निमित्ताच्या रूपाने घटविले असता पुढीलप्रमाणे विभाजन होईल. स्वभाव हे त्रिकाली उपादान, पुरुषार्थ हे अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्यायाच्या व्ययरूप क्षणिक उपादान व काललब्धि व भवितव्य हे त्या समयाच्या पर्यायाच्या योग्यतारूप क्षणिक उपादान कारण आहे. निमित्ताला तर निमित्त रूपाने आपण पाहिलेच आहे.

आता तुम्ही या पाच समवायांची द्रव्य व पर्याय अशी विभागणी करू शकाल? स्वभाव हे द्रव्य आहे व पुरुषार्थ, काललब्धि, भवितव्य व निमित्त या साऱ्या पर्याय आहेत.

आहे की नाही गंमत? आपल्याला जे सिद्धांत माहित आहेत, जी तत्त्वं माहित आहेत त्यांच्या दृष्टीने कोणत्याही विषयावर विचारमंथन करून आपणास बरीच काही माहिती उपलब्ध होते, त्यांचे यथार्थ भावभासन होते.

पाच भावांचे नाव ऐकले आहात ना? पारिणामिक भाव, औपशमिक भाव, क्षायोपशमिक भाव, क्षायिक भाव, व औदयिक भाव असे जीवाचे असाधारण भाव आहेत जे जीवद्रव्याव्यतिरिक्त अन्य द्रव्यांमध्ये आढळत नाहीत. यातील 'पारिणामिक भाव' स्वभावरूप भाव आहे व अन्य चार भाव पर्यायरूप भाव आहेत, पर्याय आहेत, कार्य आहेत.

स्वभाव तर त्रिकाल असतो, त्याला निमित्ताची गरज नसते परंतु कार्यामध्ये निमित्ताची उपस्थिति आढळते. येथे हे जे जीवाचे पर्यायरूप चार भाव आहेत त्यामध्ये निमित्तरूपाने कर्माची विशिष्ट अवस्था आढळते म्हणून त्या निमित्तांचे ज्ञान करविण्यासाठी जीवाच्या या भावांना कर्मांच्या त्या त्या अवस्थेनुसार नाव दिले आहे.

जीवाच्या ज्या भावांच्या वेळी कर्माची उपशम अवस्था आढळते त्यास 'औपशमिक भाव' म्हणतात.

जीवाच्या मोह, राग, द्वेषादि भावांच्या वेळी कर्माचा उदय निमित्तरूपाने हजर असतो त्या भावांना 'औदयिक भाव' म्हणतात.

जीवाच्या ज्या भावांच्या वेळी कर्माचा क्षयोपशम निमित्तरूपाने हजर असतो त्या भावांना 'क्षायोपशमिक भाव' म्हणतात.

जीवाच्या ज्या भावांच्या वेळी कर्माची क्षयरूप अवस्था असते, त्या भावांना 'क्षायिक भाव' म्हणतात.

परंतु जीवाचा पारिणामिक भाव हे कार्य नसल्याने, पर्याय नसल्याने त्यामध्ये निमित्ताचा प्रश्नच येत नाही. हा तर जीवाचा अनादिअनंत त्रिकाल स्वभाव आहे.

पर्याय जेव्हा या निज ध्रुव पारिणामिक भावाला अभेद होऊन स्वपणे स्वीकार करते, त्यालाच जाणण्यात मग्न होते तेव्हा पर्याय विभावरूपाने न परिणमता स्वभावरूपाने परिणमते, जीवाला आत्मानुभूति होते-सम्यग्दर्शन होते, अतींद्रिय आत्मिक सुखाचा अनुभव होतो.

आचार्यकल्प पं. टोडरमलजींनी मोक्षमार्गप्रकाशक ग्रंथामध्ये या पाच समवायांबद्दल फार चांगल्याप्रकारे विवेचन केले आहे, ते असे -

''येथे प्रश्न आहे की मोक्षाचा उपाय काललब्धि आल्यावर भवितव्यानुसार बनतो की मोहादिंचा उपशमादि (निमित्त) झाल्याने होतो की आपल्या पुरुषार्थाने उद्यम केला असता बनतो? ते सांगा. जर पहिल्या दोन कारणांनी होत असेल तर मग आम्हाला उपदेश का देत आहात? आणि जर पुरुषार्थाने होत असेल तर उपदेश तर सर्वजण ऐकतात, त्यातील कोणी उपाय करू शकतो कोणी करू शकत नाही; याचे कारण काय?

समाधान - एक कार्य होताना, अनेक कारणं आढळतात. जेव्हा मोक्षाचा उपाय बनतो तेव्हा सर्व कारणं मिळतात, जेव्हा बनत नाही तेव्हा सर्वच कारणं मिळत नाहीत.''

ते पुढे म्हणतात, ''ज्या समयामध्ये कार्य झाले ती काललब्धि आणि जे कार्य घडले ते तर भवितव्य (होनहार), निमित्त तर कर्माचे उपशमादि आहेत ज्यांचा कर्ता आत्मा होऊ शकत नाही. पुरुषार्थाने उद्यम करणे हे आत्म्याचे कार्य आहे म्हणून त्याला पुरुषार्थाचा उपदेश दिला जातो.

जो जीव जिनेन्द्रकथित उपदेशानुसार खरा (योग्य) उपाय करेल त्याचे कार्य अवश्य प्रकट होईल. जो पुरुषार्थाने मोक्षाचा उपाय करेल त्याला अन्य कारणं तर स्वयमेव प्राप्त होतात आणि जो उपाय करीत नाही त्याला अन्य कारणंदेखील प्राप्त होत नाहीत.''

येथे अन्य चार समवायांचा स्वीकार तर आहे परंतु त्यांना गौण करून पुरुषार्थाच्या मुख्यतेने कथन केले आहे - जीवांना मोक्षाचा योग्य पुरुषार्थ करण्याची प्रेरणा दिली आहे. कारण - कार्य व्यवस्थेचे असे समीचीन विवेचन जिनागमामध्ये केले आहे. कथन जिनागमातले असले तरी अशी व्यवस्था वस्तुंमध्येच - सहाही द्रव्यांमध्ये विद्यमान आहे. सर्वज्ञ भगवंतांनी त्या व्यवस्थेला जाणून त्याचे कथन केले आहे.

शास्त्रामध्ये काही ठिकाणी काललब्धिच्या मुख्यतेने कथन येते. जसे, काललब्धि प्राप्त झाल्यावर जीवास सम्यग्दर्शन होते. त्यावेळी देखील तेथे सर्व पाच समवायांचा स्वीकार असतो परंतु एकाच्या मुख्यतेने कथन केले जाते. शास्त्रातील कथनांचा योग्य अर्थ लावण्याची कला अवगत नसेल तर जीव शास्त्राभ्यास करूनदेखील एकांत मिथ्यामतांचेच पोषण करतो - गैरसमजूत करून घेतो. मला खात्री आहे की पाच समवायांच्या चर्चेने द्रव्यांची स्वतंत्रता, पर्यायांची स्वतंत्रता तसेच सहजता व निश्चित म्हणजेच नियत कारण-कार्य व्यवस्था तुमच्या लक्षात आली असेल.

अधिक चर्चा पुढील पत्रामध्ये करूया.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# कारण - कार्यासंबंधी काही शक्ति.

पत्रांक ११ २६ जून, २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

पाच समवायांच्या चर्चेमुळे मानसिक अशांति दूर झाली, धैर्य आले असे तुम्ही आपापल्या परीने सांगितलेत. अगं, लौकिक समस्या तर चालूच रहातात. लहान मोठी संकटंही येतात, अशावेळी तत्त्वज्ञानाची बैठक नसेल,तत्त्वज्ञान माहित नसेल तर मनाची अत्यंत घालमेल होते. प्राप्त परिस्थितीतून बाहेर पडायचा मार्ग तर दिसत नाही व त्यामुळे हताश होऊन शोकाचे, क्रोधाचे परिणाम-संक्लेश परिणाम होत रहातात.

अशा संक्लेश परिणामांमुळे अशी काही कर्म बांधली जातात की त्यांच्या फलस्वरूप भविष्यातही अशाच प्रकारचे प्रतिकूल संयोग प्राप्त होत रहातात. दुसरा एखादा जीव अनुकूल संयोगात हर्षित होतो, त्याचे भोक्ताबुद्धिरूप अज्ञान कायम रहाते, लोभ, मान, हास्य आदि परिणामांद्वारे त्यालाही कर्मबंध होतच रहातो. त्यातून सुटण्याचा एकमेव मार्ग तत्त्वार्थश्रद्धानरूप सम्यग्दर्शन हेच आहे.

जिनेन्द्रकथित आगमाद्वारे वस्तुस्वरूपाचे ज्ञान करून घेताना सहाही द्रव्यांचे जे परिणमन होते-कार्य होते त्याच्या कारणांची मीमांसा आपण करीत आहोत. प्रत्येक द्रव्य स्वतंत्र आहे व ते स्वाधीनपणे आपले परिणमन करते-स्वत:चे कार्य करते-दुसऱ्याचे कार्य करू शकत नाही. सर्व चराचराचे कार्य करणारा कोणी ईश्वर आहे ही मान्यता साफ खोटी आहे

प्रत्येक द्रव्यामध्ये कारण-कार्यासंबंधी अनेक शक्ति आहेत त्यांचे स्वरूप पाहूया. प्रत्येक द्रव्य अनंत शक्तींनी युक्त आहे. 'जैनतत्त्व परिचय' पुस्तकामध्ये सामान्य गुणांच्या चर्चेमध्ये आपण वस्तुत्व व द्रव्यत्व गुणांबद्दल सविस्तर चर्चा केली होती. प्रत्येक द्रव्यामध्ये वस्तुत्व नावाचा गुण आहे, द्रव्याचा असा स्वभाव आहे की त्यायोगे द्रव्य स्वत:चे प्रयोजनभूत कार्य अर्थात

परिणमन करते - त्यामध्ये उत्पाद व्यय होत रहातो. द्रव्याच्या या स्वभावास वस्तुत्व गुण म्हटले आहे.

द्रव्यत्व नावाचा गुण अर्थात द्रव्याचा एक स्वभाव असाही आहे की हे परिणमन निरंतर - प्रत्येक समयाला चालूच रहाते द्रव्य आपले स्वरूप कायम टिकवून सदैव परिणमन करते.

प्रत्येक द्रव्यामध्ये 'उत्पाद व्यय ध्रुवत्व' शक्तिदेखील आहे. या शक्तीच्या कारणाने द्रव्य उत्पाद व्यय ध्रुवता युक्त आहे. या शक्तिमुळे प्रत्येक समयामध्ये पूर्ववर्ती पर्यायाचा व्यय व वर्तमान पर्यायाचा उत्पाद व द्रव्याची ध्रुवता कायम टिकून रहाते. स्वतंत्रपणे-स्वाधीनपणे परिणमण्याचा प्रत्येक द्रव्याचा स्वभावच आहे.

निमित्त मिळाले नाही म्हणून एखाद्या द्रव्याचे कार्य अडून राहिले असे कधी होतच नाही. ज्या समयाला जशी पर्याय होणार आहे अर्थात जशी होनहार आहे-जसे भवितव्य आहे त्याप्रकारचे निमित्त सहजपणे मिळते. निमित्त आले म्हणून कार्य झाले असे नाही, निमित्ताविनाच कार्य झाले असेही नाही. निमित्ताची सहज उपस्थिति असणे हा सहज सुंदर नैसर्गिक नियम आहे - अशीच कारण-कार्याची स्वतंत्रता व सहजता आहे.

प्रत्येक द्रव्यात अशा कितीतरी शक्ति आहेत की ज्या कारणरूपाने कार्य करण्यास समर्थ आहेत. 'क्रियाशक्ती'च्या कारणाने द्रव्य आपल्या षट्कारकांच्या अनुसार परिणमन करते. कर्ता, कर्म, करण, संप्रदान, अपादान, अधिकरण हे षट्कारक आहेत. त्या त्या नावाच्या शक्ति आहेत. त्यांच्याविषयी आपण चर्चा केलीच आहे.

द्रव्यामध्ये एक 'परिणाम शक्ति' आहे. द्रव्याचाच असा स्वभाव आहे की द्रव्य आपल्या स्वभावामुळेच नित्य ध्रुवरूप देखील रहाते आणि आपल्या स्वभावामुळेच व्यय आणि उत्पाद देखील करते. उत्पाद, व्यय आणि ध्रुवता या तिन्हींचा मिळून एक अस्तित्वमयपणा द्रव्याचा स्वभाव आहे. हे तिन्ही परामुळे म्हणजे निमित्तामुळे नसून आपल्या स्वभावामुळे आहेत असे ही परिणाम शक्ति सांगते.

द्रव्यामध्ये एक 'अकार्यकारणत्व शक्ति' आहे. द्रव्य दुसऱ्या द्रव्याचे कार्य नाही तसेच कारणही नाही. गुणसुद्धा दुसऱ्या कोणाचे कारण नाही तसेच कार्य देखील नाही, त्याप्रमाणे प्रत्येक पर्यायसुद्धा दुसऱ्या कोणाचे कारण नाही आणि कार्यदेखील नाही. हा द्रव्याचा स्वभाव असल्याने द्रव्याच्या प्रत्येक गुणाची प्रत्येक पर्याय स्वत:चेच कारण आहे व स्वत:चेच कार्य आहे. पर्यायाला द्रव्याचे कार्य म्हणणे हा देखील उपचार आहे. प्रत्येक पर्याय निजसामर्थ्यानेच स्वतंत्रपणे प्रकट होते, ती दुसऱ्या कोणाचे कारणही नाही व कार्यही नाही.

सम्यग्दर्शनाची पर्याय कर्माच्या उपशमादिने करविली नाही तसेच ही पर्याय कर्मामध्ये काही करेल असेही नाही. एका द्रव्याचे कार्य दुसरे द्रव्य करते हा जैनसिद्धांत नाही.

पहा, येथे अकार्यकारणत्व शक्तीच्या द्वारे पराचे कार्य किंवा कारण होण्याचा निषेध करीत आहेत, आपल्या स्वत:चे कार्य करण्याचा निषेध नाही करत. द्रव्य व पर्याय स्वतंत्ररीत्या आणि स्वाधीनपणे स्वत:चे कार्य करतात, पराचे नाही असे सांगून अस्ति नास्ति सिद्ध केली आहे, वस्तुचा अनेकांत स्वभाव सांगितला आहे.

आता भावअभावादि सहा शक्तींचे स्वरूप पाहूया. या देखील सामान्य शक्ति असल्याने सर्व द्रव्यांमध्ये आढळतात. त्या अशाप्रकारे आहेत.

(१) **भावशक्ति** - भावशक्तिमुळे द्रव्य नेहमी आपल्या वर्तमान अवस्थेने युक्त असते.

भावशक्तीचे कार्यच असे आहे की द्रव्यामध्ये वर्तमान अवस्था म्हणजे पर्याय विद्यमान असतेच - करावी लागत नाही.

(२) **अभावशक्ति** - अभावशक्तिमुळे द्रव्यामध्ये वर्तमान अवस्थेव्यतिरिक्त दुसरी कोणतीही अवस्था-पर्याय होऊ शकत नाही. त्यामध्ये परद्रव्याच्या पर्यायाचा तर अभाव आहेच आहे, त्याच द्रव्याच्या पूर्व पर्यायांचा व भविष्यकालीन पर्यायांचा देखील वर्तमानकाळामध्ये अभाव असतो.

(३) **भावअभावशक्ति** - भावअभावशक्तिमुळे वर्तमान पर्यायाचा नियमाने आगामी समयामध्ये अभाव होतो-व्यय होतो.

वर्तमान पर्यायाचा मला नाश करायला हवा अशी चिंता करण्याचे कारण नाही व वर्तमान पर्याय कायम धरून ठेवण्याची इच्छा व प्रयत्नदेखील व्यर्थ आहेत. अनादिपासूनचे अज्ञान व मिथ्यात्व आत्तापर्यंत चालत आले आहे म्हणून घाबरण्याचेही कारण नाही. त्याचा अभाव करण्याची योग्यता व क्षमता जीवद्रव्यातच आहे.

(४) **अभावभावशक्ति** - भविष्यातील पर्याय जी वर्तमान समयात नाही, अभावरूप आहे तिचा पुढच्याच समयात उत्पाद होईल-भाव होईल अशी अभावभावशक्ति प्रत्येक द्रव्यात आहे.

त्या शक्तिमुळे वर्तमान पर्यायाचा आगामी समयात व्यय होऊन नवीन पर्यायाचा उत्पाद होईल.

(५) **भावभावशक्ति** - होणारी पर्याय होईलच अशी ही भावभावशक्ति आहे. या शक्तिमुळे ज्या समयी जी पर्याय होणार आहे ती होतेच.

(६) **अभावअभावशक्ति** - जी पर्याय होण्यायोग्य नाही ती होतच नाही अशी अभावअभावशक्ति आहे.

द्रव्यस्वभाव असा अगाध आहे. परिणमनशीलता हा द्रव्याचा स्वभाव आहे, परिणमन अर्थात पर्याय हे द्रव्याचे वर्तमान आहे, द्रव्य त्यारूपाने वर्तमानकाळात विद्यमान आहे. त्याला त्यारूपाने रहाण्यासाठी अन्य कोणाच्या सहाय्याची थोडी देखील अपेक्षा नाही. कोणी सहाय्य करण्याची इच्छा करेल तरी सहाय्य करूच शकत नाही

प्रत्येक द्रव्याच्या प्रत्येक समयाच्या पर्यायाची अशी स्वतंत्रता, स्वाधीनता, सहजता व निश्चितता लक्षात येताच आपली अनंत आकुलता कमी होते, निराकुलतेची प्राप्ति होते.

पराच्या व स्वतःच्याही परिणमनाची चिंता सोडून, पर्यायावरील लक्ष हटवून त्रिकाली ध्रुव स्वभावाचा स्वपणे स्वीकार करून त्यामध्ये एकाग्र होण्याने पर्यायामध्ये स्वभावरूप परिणमन सुरू होते-सम्यग्दर्शनाची प्राप्ति होते.

ज्ञानाची दर समयाला जाणणेरूप पर्याय निरंतर होत असते. स्वतःच्या व दुसऱ्याच्या पर्याय करण्याची, बदलण्याची, टिकविण्याची किंवा नाश करण्याची कुठलीही शक्यताच उरत नाही. पर्याय एक समयाची आहे व नाशवंत आहे परंतु मी स्वतः

त्रिकाल ध्रुव आहे हे लक्षात येताच ज्ञानाची पर्याय पर्यायांना जाणणे सोडून सामान्य अशा निज ध्रुव शुद्धात्म्याला जाणू लागते. त्यातच अहंपणा स्थापित होऊन सम्यग्दर्शन-धर्माची प्रथम पायरी प्राप्त होते.

कारण-कार्यासंबंधी एवढी सारी चर्चा केल्यानंतर थोडी चर्चा कारणपरमात्मा व कार्यपरमात्मा याविषयी करूया. शास्त्रामध्ये असे अनेक शब्द वाचण्यात येतात परंतु त्यांचा अर्थ न समजल्याने अनेक प्रश्न उभे रहातात, घोटाळे होतात.

अशा अनेक व्यक्ति आढळतात की ज्या मोठ्या उत्साहाने जिनागमाचा अभ्यास करण्यासाठी ग्रंथाचे वाचन सुरू करतात, परंतु त्यातील अर्थ व मर्म न समजल्याने त्यांचा सारा उत्साह मावळतो व स्वाध्याय करणेही बारगळते. स्वाध्याय करून स्वत:चे स्वरूप ओळखून घेण्यापेक्षा पूजा, दान, उपवास, यात्रा या क्रिया सोप्या वाटू लागतात. अन्य ओळखीचे लोकही वाहवा करतात व हा जीव त्यातच संतुष्ट होऊन आपण 'धर्म' केल्याच्या वृथा अभिमानात व समाधानात वावरू लागतो. परंतु आत्म्याचा धर्म आत्म्यात आहे व आत्म्याला जाणण्याने तो प्रकट होत असतो.

जिनागमाचा अभ्यास काही फार अवघड गोष्ट नाही. विशिष्ट पद्धतीने क्रमाक्रमाने एक एक सिद्धांत शिकत गेल्यास काहीच अवघड नाही, अत्यंत रोचक, बुद्धीला व तर्काला पटणारी अशी ही तत्त्वं आहेत. त्यातील बारकावे, न्याय, तर्कसंगत व युक्तिसंगत सिद्धांत शिकताना आनंद होतो, अधिकाधिक शिकण्याची रुचि उत्पन्न होते, ज्ञानही तीक्ष्ण होते, बुद्धि प्रगल्भ होते, स्वत:बद्दलच्या एवढ्या सहज सुंदर सम्यक् माहितीपासून आपण आजपर्यंत वंचित राहिलो याचे सखेद आश्चर्य वाटते.

हां, आपण कारणपरमात्मा व कार्यपरमात्मा यांच्याबद्दल बोलत होतो. तुम्ही म्हणाल,'परमात्म्याचे हे प्रकार तर आम्हाला माहित नाहीत. सकलपरमात्मा म्हणजे 'कल' सहित - शरीरसहित असे अरहंत भगवान व निकल परमात्मा म्हणजे शरीररहित असे सिद्ध भगवान हे तर आम्हाला ठाऊक आहे.'

तुम्हाला वाटतात त्याप्रकारचे हे भेद नाहीत. जरा नीट लक्ष देऊन वाचा. पर्यायामध्ये परमात्मदशा प्रकट करणे अर्थात अरहंत, सिद्ध दशा 'कार्यपरमात्मा' आहे. ही दशा-अवस्था-

पर्याय-कार्य बाह्य अन्य गोष्टींमधून, कर्माच्या क्षयामधून, निमित्तातून प्रकट होत नाही परंतु उपादानगत योग्यतेतून प्रकट होते. परमात्मदशारूपी जी पर्याय आहे त्याचे उपादानकारण हेच 'कारणपरमात्मा' आहे. पाच समवायांच्या भाषेत सांगायचे तर 'स्वभाव' नावाचे जे समवाय कारण आहे ते 'कारणपरमात्मा' आहे. निमित्त उपादानाच्या भाषेत सांगायचे तर उपादान हे कारणपरमात्मा आहे.

प्रत्येक जीवद्रव्याचा त्रिकाली स्वभाव-ज्ञायकभाव-परमपारिणामिक भाव निज ध्रुव शुद्धात्मा समान आहे. अर्थात प्रत्येक जीव स्वभावाने कारणपरमात्मा आहे.

मी पण स्वभावाने कारणपरमात्मा आहे एवढे ऐकून हुरळून जाऊ नका. 'कारण' तेव्हाच म्हटले जाते जेव्हा 'कार्य' होते. कार्या विना कारण कशाचे? ज्याने परमात्मदशारूप 'कार्य' प्रकट केले त्यालाच 'कारणपरमात्मा' म्हणता येईल. आपण पूर्वी उपादानकारणांच्या चर्चेमध्ये पाहिले होते की तत्समयाची पर्यायाची योग्यताच निश्चयकारण-खरे कारण आहे व त्रिकाली उपादान हे व्यवहार कारण-उपचार कारण आहे. खरे कारणच कार्याचा नियामक आहे.

परमपारिणामिक भाव अर्थात त्रिकाली उपादानरूप कारणपरमात्मा तर प्रत्येक जीवात आहे परंतु काहीजणच परमात्मदशेला प्राप्त आहेत. ज्या जीवाने ध्रुवस्वभावाची दृष्टि-त्यामध्ये स्वपणा स्थापित केला अर्थात पुरुषार्थ केला व परमात्मदशा प्रकट केली त्याच्या त्यासमयाच्या पर्यायाच्या योग्यतेला-क्षणिक उपादानाला खरोखरी कारणपरमात्मा व त्या पर्यायाला कार्यपरमात्मा असे म्हणतात.

कोणी अन्य परमात्मा-तीर्थंकर-केवली आपल्या कार्यपरमात्म्याचे कारण नाहीत, परंतु आपला 'कारणपरमात्मा' आपण स्वत:च आहोत.

कारण-कार्य व्यवस्थेची ही सारी चर्चा करण्याचे प्रयोजनच हे आहे की हा जीव अनादिपासून मिथ्यात्व अवस्थेमध्ये आपल्या कार्याचे कारण अन्य द्रव्यांमध्ये शोधत आला आहे. शास्त्रातील निमित्त कथनं वाचून योग्य अर्थ लावण्याऐवजी त्याने निमित्ताधीन

एकांत दृष्टि पुष्ट केली व त्यामुळे त्याचा उपयोग कधी स्वसन्मुख झाला नाही. सदा सर्वदा परसन्मुख दृष्टि व पराची महिमा असल्याने हा 'ज्ञायक' स्वत:विषयी अनभिज्ञच राहिला-अडाणी राहिला.

कारणपरमात्मा, कार्यपरमात्मा याप्रमाणे शास्त्रात कारणसमयसार व कार्यसमयसार असाही उल्लेख येतो. समय शब्दाचे अनेक अर्थ आहेत. समय हे व्यवहार कालाचे माप आहे, शास्त्रालादेखील समय म्हणतात, समय म्हणजे द्रव्य-सहाही द्रव्यांना समय म्हणतात, सर्व द्रव्यांमध्ये सारभूत असे जीवद्रव्य-निजद्रव्य-मी स्वत: समयसार आहे. जीवद्रव्यामध्ये निजशुद्धात्म्याला समयसार म्हटले आहे. स्व शुद्धात्म्याची दृष्टि, ज्ञान, रमणता याला स्वसमय अर्थात कार्यसमयसार म्हटले आहे व स्वशुद्धात्म्याला कारणसमयसार म्हटले आहे.

यावरून एक गोष्ट लक्षात येते की प्रत्येक द्रव्याच्या 'कार्याचे' 'कारण' त्या द्रव्यातच विद्यमान आहे. कोणालाही स्वत:च्या कार्यासाठी पराधीन होऊन पराकडे आशाळभूत नजरेने पाहण्याची गरज नाही. नियमसार ग्रंथामध्ये 'कारणनियमसार' व 'कार्यनियमसार' ची चर्चा केली आहे. नियमसार कुंदकुंदाचार्यांनी लिहिलेला परम अध्यात्मिक ग्रंथ आहे हे तुम्हाला माहितच असेल. त्या ग्रंथावर पद्मप्रभमलधारीदेव या मुनिराजांनी विश्लेषणात्मक भाष्य अर्थात टीका लिहिली आहे.

जो नियमरूपाने करण्यायोग्य आहे तो 'नियम' होय अर्थात दर्शन, ज्ञान, चारित्र हाच नियम आहे. सम्यक् या अर्थी व विपरीततेचे खंडन करण्यासाठी 'सार' म्हटले आहे. रत्नत्रय नियम आहे. व्यवहार रत्नत्रय अर्थात रागभाव जो रत्नत्रय नाही परंतु त्याचा सहचर असल्याने उपचाराने रत्नत्रय म्हटला जातो त्यास कोणी करण्यायोग्य मानू नये यासाठी 'सार' शब्द जोडला आहे, जो निश्चय रत्नत्रयाचा सूचक आहे. शुद्धरत्नत्रयरूप 'नियम' हा मोक्षमार्ग आहे, तो 'कार्यरूप' आहे हा कार्यनियमसार आहे. त्याचे 'कारण' कोण आहे हे सांगतात. 'कारण' त्यालाच म्हटले जाते ज्याच्या आश्रयाने कार्य प्रकट होते. ज्याप्रमाणे कार्य वर्तमानात आहे त्याचप्रमाणे त्याचे कारणसुद्धा वर्तमानातच असते.

कार्य जीवद्रव्यात आहे तर त्याचे कारणही जीवद्रव्यातच आहे, शरीरामध्ये, शरीराच्या क्रियांमध्ये - बाह्य व्रत उपवासांमध्ये नाही. 'कार्य' स्वभावपर्याय आहे तर त्याचे कारणही स्वभावरूपच आहे, विभाव नाही - शुभभाव नाही, व्रत उपवास करण्याचे परिणाम नाही.

सहज परमपारिणामिक भावामध्ये स्थित असा शुद्धचेतना परिणाम कारण आहे अर्थात परमपारिणामिक भावामध्ये सदैव रहाणारी शुद्ध एकसदृश परिणति आहे तिला 'कारणनियमसार' म्हटले आहे. याचेच दुसरे नाव 'कारणशुद्धपर्याय' आहे.

कारणनियमाचे भान केल्याने, त्याच्या आश्रयाने 'कार्यनियम' रूप मोक्षमार्ग प्रकट होतो. परपदार्थाच्या - भगवान अरहंत किंवा गुरुच्या आश्रयाने अथवा राग म्हणजे व्यवहार रत्नत्रयाच्या आश्रयाने मोक्षमार्ग प्रकट होत नाही.

येथे 'कारणशुद्धपर्याय' शब्दामध्ये पर्याय अर्थात परिणति असा शब्द आला आहे. ही कार्यरूप पर्याय नसून त्रिकाल एकसदृश शुद्ध परिणति की जी द्रव्य व गुण यांच्याशी अभेदरूपाने प्रत्येक समयात वर्तत असते, ती पारिणामिक भावस्वरूप आहे. आपण कार्याला पर्याय म्हणतो ती तर उत्पाद व्ययरूप, विसदृश पर्याय आहे.

अनादिपासून जीव विभाव परिणाम करत आला. हे त्याचे विभावरूप कार्य परपदार्थांमुळे, कर्मामुळे झालेले नसून त्याच्या स्वत:च्या अपराधाने होत आले आहे. प्रत्येक पर्यायामध्ये शुद्ध चैतन्य परिणतिरूप कारण विद्यमान असताना देखील त्याचे भान, त्याचे लक्ष न करण्याने, त्याचा आश्रय न घेण्याने विभाव पर्याय होत रहातात.

द्रव्य, गुण आणि कारणशुद्धपर्याय अभेदरूपाने आहेत यालाच कारणपरमात्मा म्हटले आहे. वर्तमान पर्याय ज्यावेळी या कारणपरमात्म्याशी अभेद होते-त्याचा आश्रय घेते तेव्हा शुद्ध कार्य प्रकट होते, 'कारण' लक्षात येते. जोपर्यंत 'शुद्धकारण' माहित नव्हते, तोपर्यंत 'शुद्धकार्य' देखील प्रकट होत नव्हते.

आपण मोक्षमार्गाला मोक्षाचे कारण म्हणतो परंतु ते उपचारकथन आहे, व्यवहारकथन आहे. सम्यक्त्वापासून केवलज्ञानापर्यंत सर्व शुद्ध कार्यांचे मूळकारण ही परमपारिणामिक भावात स्थित असलेली 'कारणशुद्धपर्याय' आहे, तिच्या आश्रयानेच शुद्धपर्यायरूप कार्य प्रकट होते.

'कारणशुद्धपर्याय' रूप कारण तर अनादिअनंत विद्यमान आहे परंतु शुद्धपर्यायरूप कार्य तेव्हाच प्रकटते की जेव्हा या कारणानुसार परिणति होते, या कारणाचा आश्रय घेतला जातो. नाहीतर ते कारण 'असून नसल्यासारखेच' आहे.

शास्त्रात म्हटले आहे की 'कारणानुविधायिनी कार्याणि' - कार्य कारणाला अनुसरून होत असते.

तुम्हीदेखील हे नीट ध्यानात ठेवा की फक्त कारण - कार्याची चर्चा करण्याने, शास्त्रातील तत्त्वज्ञान वाचल्याने, पाठ केल्याने किंवा शिकण्या शिकविण्याने काही 'शुद्धपर्याय' रूप कार्य प्रकट होणार नाही. त्यासाठी स्वसन्मुखता करून कारणपरमात्म्याला-कारणशुद्धपर्यायाला अभेदपणे जाणले पाहिजे. सुरवातीला या 'कारणां' ची ओळख नव्हती म्हणून त्या बद्दल ही सारी चर्चा आवश्यक होती. परंतु केवळ चर्चेमध्ये संतोष मानू नका. अंतर्मुख होऊन निजकारणपरमात्म्याला 'जाणा'.

ही सारी 'कारण-कार्य व्यवस्था' समजाविण्यापूर्वी पत्रांक ३ मध्ये मी तुम्हाला 'क्रमबद्धपर्याय' काय आहे याविषयी चर्चा करण्याचे आश्वासन दिले होते. तुम्हीही जिज्ञासेने त्या विषयाबाबत शिकण्यासाठी आतुर झाला आहात हे मला माहित आहे.

मलाही आता या साऱ्या सिद्धांतांच्या आधारे तुम्हाला 'क्रमबद्धपर्याय' समजावून सांगणे सोपे होणार आहे.

तरी आगामी पत्राद्वारे आपण त्याविषयी चर्चा करूया.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# क्रमबद्धपर्याय - स्वरूप

पत्रांक १२ ५ जुलै २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

तुम्ही अनेक दिवसांपासून ज्याची चर्चा ऐकण्यास-वाचण्यास उत्सुक आहात त्या 'क्रमबद्धपर्याय'च्या चर्चेला आपण आजपासून प्रारंभ करणार आहोत. 'ऐकण्यासाठी' असे लिहिले त्याचे कारण हेच की या विषयावर 'क्रमबद्धपर्याय' या डॉ. हुकमचंदजी भारिल्ल लिखित पुस्तकाच्या आधारे मी जो क्लास घेतला होता-प्रवचनं दिली होती त्याच्या ९० मिनिटांच्या २८ कॅसेट्सचे सेट्स तयार आहेत. तुमच्याकडे ते पाठवीत आहे . निमित्तोपादान प्रमाणे याही नीट ऐका.

सर्वप्रथम 'क्रमबद्धपर्याय' म्हणतात कशाला हे आपण पाहूया. स्वभावपर्याय, विभावपर्याय यांच्यासारखी ही कसली पर्याय आहे असे वाटू देऊ नका. ही पर्याय नसून वस्तुची परिणमनासंबंधीची व्यवस्था आहे. त्याची व्याख्या पहा बरं!

ज्या द्रव्याची, जी पर्याय, ज्या क्षेत्रामध्ये, ज्या काळामध्ये, ज्या निमित्ताच्या उपस्थितिमध्ये, ज्या पुरुषार्थपूर्वक, जशी होणार असेल; त्याच द्रव्याची, तीच पर्याय, त्याच क्षेत्रामध्ये, त्याच काळामध्ये, त्याच निमित्ताच्या उपस्थितिमध्ये, त्याच पुरुषार्थपूर्वक तशीच होते, अन्यप्रकारे नाही. वस्तुव्यवस्थेच्या या नियमाला क्रमबद्धपर्याय म्हणतात.

या व्याख्येवरून हे लक्षात येईल की ही नुसती पर्यायासंबंधी म्हणजे कार्यासंबंधी व्यवस्था नसून यामध्ये सर्व प्रकारच्या कारणांची अर्थात उपादान-निमित्ताची; द्रव्य क्षेत्र काल भाव निमित्त यांची व पाचही समवाय या कारणांची व त्याचबरोबर कार्याची - पर्यायाची चर्चा आहे. गेल्या अनेक पत्रांद्वारे ज्या कारणांची आपण इतक्या विस्ताराने चर्चा केली ती सर्व कारणे व कार्य यांच्या सुव्यवस्थित व्यवस्थेचे स्वरूप सांगणारा हा सिद्धांत आहे.

क्रम म्हणजे एकानंतर एक, क्रमाने, एकावेळी नव्हे आणि बद्ध म्हणजे नियमित अर्थात निश्चित, नक्की व पर्याय म्हणजे द्रव्य किंवा गुणाचे परिणमन. यालाच आत्मख्याति शास्त्रात 'क्रमनियमित' असे म्हटले आहे.

या विश्वातील प्रत्येक द्रव्याची सत्ता अनादिअनंत आहे. ही सत्ता उत्पादव्ययध्रौव्यात्मक आहे. प्रत्येक समयात नवीन पर्यायाचा उत्पाद, पूर्व पर्यायाचा व्यय होत रहातो व द्रव्य आपल्या स्वरूपाने कायम रहाते.

येथे प्रश्न हा उठतो की वस्तुमधील या परिणमनासंबंधी काही स्वभावगत नियमदेखील आहे की आपण आपल्या इच्छेनुसार हवे तसे परिणमन करू शकतो?

या प्रश्नाचे उत्तर असे आहे की प्रत्येक द्रव्य त्याच्या स्वतःच्या निश्चित क्रमानुसार परिणमित होत असते. हा क्रम प्रत्येक द्रव्याचा आपला स्वतःचा निश्चित आहे. प्रत्येक परमाणुचा, प्रत्येक जीवाचा, तसेच अन्य सर्व द्रव्यांचा हा पर्यायक्रम भिन्न भिन्न आहे. याच कारणामुळे वर्तमानकाळी वेगवेगळ्या द्रव्यांच्या पर्यायांमध्ये विभिन्नता आढळते.

जीवांचेच पहा ना! कोणी ऐकेंद्रिय पर्यायामध्ये तर कोणी द्वींद्रियादि पंचेंद्रियापर्यंत वेगवेगळ्या पर्यायांमध्ये तर अन्य अनंत जीव सिद्धपर्यायामध्ये आहेत. कोणी सम्यग्दर्शन प्राप्त करून अल्पकाळात मोक्ष प्रकट करतो तर कोणी कालांतराने मोक्ष अवस्था प्राप्त करतो.

श्रेणिक राजा व चेलना राणी यांची कथा तर तुम्हाला माहितच आहे. चेलनाराणी सम्यग्दृष्टि होती तर श्रेणिक राजा गृहीत मिथ्यात्वी. यशोधर मुनींच्या गळ्यात मेलेला साप टाकला त्या परिणामांद्वारे त्याला ७ व्या नरकाचा बंध झाला. ज्यावेळी दिगंबर मुनिंचे उपसर्गजयी स्वरूप पाहिले, महावीर भगवंतांच्या समोवशरणात जिनधर्माचे व वस्तुस्वरूपाचे ज्ञान झाले तेव्हा तो सम्यग्दृष्टि बनला, क्षायिक सम्यक्त्व प्रकट केले. एवढेच नव्हे तर त्याने तीर्थंकर प्रकृति बांधण्यास सुरुवात केली. नरकायु घटून पहिल्या नरकातील आयु बांधली. सध्या श्रेणिक राजाचा जीव

पहिल्या नरकामध्ये आहे तेथील चौऱ्याऐंशी हजार वर्षांचे आयुष्य भोगून तो याच भरतभूमीच्या उत्सर्पिणी काळातील पहिला तीर्थंकर होणार आहे. श्रेणिक राजाच्या अगोदर सम्यग्दृष्टि झालेली चेलनाराणी स्वर्गामध्ये कित्येक सागर वर्षांचे आयुष्य भोगत चौथ्या गुणस्थानातच रहाणार व कालांतराने मोक्षास जाणार. कोणी सम्यग्दृष्टि होऊन त्याच भवात मोक्ष प्राप्त करतो तर कोणी सम्यग्दृष्टि पुन: मिथ्यात्वी होऊन अर्धपुद्गलपरावर्तन-जो अनंत काळ आहे तोपर्यंत जन्म मरणरूपी संसारातच गटांगळ्या खातो व नंतर पुन: सम्यग्दर्शन प्राप्त करून मुनि होऊन मोक्ष प्राप्त करतो.

जीवांच्या बाह्य आचरणामध्ये व रागभावांमध्ये देखील विविधता आढळते. एखाद्याच्या बाह्य आचरणाकडे पाहून देखील तो अविरत सम्यग्दृष्टि आहे की नाही हे ठरवता येत नाही. भरत चक्रवर्ती क्षायिक सम्यग्दृष्टि, तद्भव मोक्षगामी असूनदेखील आदिनाथ भगवंतांच्या समोवशरणात त्यांची दिव्यध्वनि ऐकायची सोडून साठ हजार वर्षांपर्यंत सहा खंड जिंकण्यासाठी गेले.

त्यांचा पुत्र मारीचि मुनिदीक्षा घेऊन समोवशरणात दिव्यध्वनि ऐकत असे परंतु सम्यग्दर्शनाविना भ्रष्ट होऊन सुमारे एक कोडा कोडी सागर वर्षांपर्यंत भवभ्रमण करून सिंहाच्या पर्यायामध्ये सम्यग्दर्शन प्राप्त करून त्यानंतर दहाव्या भवात चोवीसावे तीर्थंकर महावीर होऊन तो जीव मोक्षास गेला. यावरून कोणी बाह्य व्रतं धारण केली आहेत म्हणून सम्यग्दृष्टि असेलच असेही नाही आणि बाह्य मुनिव्रतं धारण न करता जो स्वत:ला मुनि मानत असेल तर तेही खोटे आहे. 'करणानुयोग परिचय' पुस्तकात याविषयी शास्त्रोक्त माहिती आपण घेतलीच आहे.

आपला विषय चालला होता की वेगवेगळ्या जीवांच्या पर्यायांमध्ये व पर्यायक्रमामध्ये विभिन्नता आढळते. पर्यायांचा हा निश्चित क्रम सुव्यवस्थित आहे, स्वाभाविक म्हणजे सहज आहे, कोणी बनविलेला नाही. विश्वातील सर्व द्रव्यांच्या अनादिअनंत सर्व पर्यायांना व त्यांच्या पर्यायक्रमाला अर्थात क्रमबद्धपर्यायाला सर्वज्ञ भगवान आपल्या केवलज्ञानाद्वारे युगपत् एका समयात स्पष्ट जाणतात. परंतु केवलज्ञानी फक्त जाणतातच, त्या पर्यायांना

करत नाहीत. त्यांनी जाणलं आहे म्हणून द्रव्यांना तसेच परिणमन करावे लागते असे नाही. द्रव्य तर स्वतंत्रपणे स्वाधीनपणे परिणमन करतात.

नियमसार ग्रंथात म्हटले आहे, 'णाणा जीवा णाणा कम्मा.....' अर्थात जीव नानाप्रकारचे आहेत व त्यांचे कर्म व भाव नानाप्रकारचे आहेत. सर्व जीव द्रव्यदृष्टीने समान आहेत, गुणांच्या अपेक्षेने देखील प्रत्येक जीवामध्ये अनंत गुण आहेत, त्यामध्ये एकसुद्धा कमी अधिक नाही व सर्व गुण सर्व जीवांमध्ये समान आहेत. परंतु तरीदेखील सर्व जीवांच्या अनंत गुणांच्या एखाद्या विशिष्ट समयाच्या पर्याय पाहिल्या असता एकाच्या पर्याय दुसऱ्याच्या पर्यायांसमान आढळत नाहीत. प्रत्येक जीवाच्या अनादिअनंत पर्यायांचा क्रम एकाचा दुसऱ्याशी जुळत नाही. प्रत्येक द्रव्याचा आपला आपला पर्यायक्रम सुनिश्चित आहे.

माळेमधल्या मोत्याप्रमाणे - जसा माळेमधील प्रत्येक मोती आपल्या विशिष्ट जागी आहे, पुढे मागे होऊ शकत नाही त्याप्रमाणे प्रत्येक द्रव्याची प्रत्येक पर्याय स्वतःच्या जागेवरच उत्पन्न होते, तो त्या पर्यायाचा जन्मक्षण आहे. आपल्या इच्छेनुसार किंवा भावना केल्याने किंवा अन्य कोणत्याही उपायांनी हा क्रम बदलत नाही अशीच वस्तुव्यवस्था आहे.

क्रमबद्धपर्याय वस्तुस्वरूपासंबंधी एक सिद्धांत आहे. याचे योग्य स्वरूप लक्षात न आल्याने व आजपर्यंत स्वतःला दुसऱ्याच्या परिणमनाचा कर्ता मानल्याने व स्वतःच्या इच्छेनुसार स्वतःचेही परिणमन बदलण्याचा मिथ्या अभिमान असल्याने अनेक जीवांना हा सिद्धांत स्वीकारण्याची भीती वाटते.

'सारे काही निश्चित असेल तर मग आमच्या हाती करायचे काय राहिले?' 'भगवंतांनी जसे जाणले तसे व तेव्हाच होणार मग आम्ही प्रयत्न तरी कशाला करावयाचे? तुम्ही उपदेश तरी कशाला देता?' 'शिवाय आमचा पुरुषार्थ तो काय राहिला?' असे त्यांचे म्हणणे असते.

या व अशाप्रकारच्या अनेक भ्रांत कल्पना उत्पन्न होण्याचे एकच कारण आहे, ते म्हणजे या सिद्धांताविषयीचे अज्ञान. क्रमबद्धपर्यायाविषयी यथार्थ ज्ञान झाले असता दुसऱ्या द्रव्यांच्या तसेच स्वद्रव्याच्या पर्याय करण्याविषयीची कर्तृत्वबुद्धि व त्या पर्याय बदलण्याची खोटी बुद्धि यांच्यामुळे उत्पन्न होणारे संकल्प विकल्प मिटतात, मिथ्यात्वाचा अभाव होतो. क्रमबद्धपर्याय समजून घेणे हाच खरा पुरुषार्थ आहे, जो मोक्षमार्गाचा प्रारंभ करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

हा सिध्दांत समजल्याने अकर्ता स्वभावाचा निर्णय होतो, त्यानंतरच ज्ञायकभावाशी तन्मय होऊन निर्विकल्प आत्मानुभूति प्रकट होते. स्वामीजींनी म्हटले आहे की, 'ज्ञानस्वभावाच्या पुरुषार्थाद्वारे क्रमबद्धपर्यायाचा निर्णय करून पर्याय स्वसन्मुख होते, तेव्हा त्या पर्यायामध्ये पाचही समवाय असतात-स्वभाव, पुरुषार्थ, काललब्धि, होनहार आणि निमित्त. ते म्हणतात, 'पहा ही वस्तुस्थिति! पुरुषार्थ देखील नाहिसा होत नाही आणि क्रम देखील तुटत नाही. ज्ञायकस्वभावाच्या आश्रयाने खरा पुरुषार्थ होतो आणि सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्राच्या निर्मल पर्यायांचा क्रम सुरू होतो.'

क्रमबद्धपर्याय फक्त कालाचा किंवा फक्त नियतिचा दर्शक नाही. परंतु त्यामध्ये द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, निमित्त अर्थात पाचही समवाय या सर्वांचीच सुनिश्चितता असते. जिनागमामध्ये ठिकठिकाणी-चारही अनुयोगांमध्ये, स्तुति-भजनांमध्ये हा सिद्धांत सांगितला आहे.

क्रमबद्धपर्यायाचे यथार्थ ज्ञान नसणारा अज्ञानी क्रमबद्धपर्यायाच्या नावाखाली आपले 'एकांत नियतवादा'चे अज्ञान, मिथ्यात्व पुष्ट करतो, हा तर स्वच्छंदी जीवांचा एकांत नियतवाद आहे असे गोम्मटसार ग्रंथात म्हटले आहे.

जो जीव सर्वज्ञाला मानत नाही, ज्ञानस्वभावाचा निर्णय करत नाही, ज्याने अंतरोन्मुख होऊन समाधान केले नाही, ज्याचा विपरीत भावांसंबंधीचा उल्हास कमी झालेला नाही आणि 'होणार असेल तेच होईल' असे म्हणत स्वच्छंदी होऊन जो मिथ्यात्वाचे पोषण करतो तो गृहीत मिथ्यादृष्टि आहे असे शास्त्रवचन आहे.

यावरून हे सिद्ध होते की क्रमबद्धपर्याय एकांत नियतवाद नसून खरा अनेकांत कथन करणारा स्याद्वाद आहे.

अनेक लोकांची अशी मान्यता आहे की विशिष्ट घटना विशिष्ट काळी घडणार असेल तर ती निश्चितच घडेल, मग भले त्याचे निमित्त काहीही असो. जसे, एखादा ज्याची आयु पूर्ण झाली आहे तो कॅन्सरने मरेल अथवा हार्ट अॅटॅकने किंवा अपघाताने, भारतात मरेल किंवा अमेरिकेत मरेल. ही मान्यता पूर्णपणे चुकीची आहे.

क्रमबद्धपर्याय फक्त काळाचेच कथन करत नाही परंतु द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, पुरुषार्थ, निमित्त, होनहार या सर्व गोष्टींची सुनिश्चितता दर्शवितो. आयु पूर्ण झाल्यावर जी व्यक्ति ज्याकाळी-अर्थात ज्या समयाला, ज्या ठिकाणी, ज्या निमित्ताने जशाप्रकारे मरणार असेल त्याचप्रकारे मरेल, वेगळ्या वेळी , वेगळ्या ठिकाणी व वेगळ्या निमित्ताने नव्हे.

प्रत्येक द्रव्याची प्रत्येक समयामध्ये एक एक पर्याय होत असते व काल अनादिअनंत आहे. याचे तात्पर्य असे आहे की भूत, वर्तमान व भविष्य काळाचे जेवढे अनंत समय आहेत तेवढ्या प्रत्येक द्रव्याच्या तिन्ही काळाच्या पर्याय आहेत. त्यातील प्रत्येक पर्याय आपल्या स्वसमयामध्ये खचित आहे, निश्चित आहे. त्या पर्यायाला त्या समयातून हटवून पुढे मागे करताच येत नाही. पर्यायाची ही अचलता अज्ञानीच्या लक्षात न आल्याने तो काळाकडेच पहात बसतो, उतावळेपणा करतो.

मिथ्यात्व आणि कर्तृत्वबुद्धीच्या अभिमानापोटी त्याला काळाच्या निश्चितपणावर-पर्याय विशिष्ट समयीच होईल या गोष्टीवर विश्वास बसत नाही. कोणी विशिष्ट पर्याय वेळेच्या आधी आणू इच्छितो. जसे, आदिनाथ भगवंतांच्या दिव्यध्वनिमध्ये मारीचि चोवीसावा तीर्थंकर होणार आहे असे कथन ऐकून मारीचिला राग आला. 'मी दुसरा तीर्थंकर होऊन दाखवेन' असे म्हणत दुरभिमानाने ३६३ पाखंड मतांची त्याने स्थापना केली. मिथ्यात्वापोटी १ कोडाकोडी सागर वर्षांपर्यंत भवभ्रमण करून नंतर तो चोवीसावा तीर्थंकर झाला.

काहीजण नको वाटणाऱ्या घटनेसंबंधीचे भविष्य ऐकून ती घटना टाळण्यासाठी आपल्या पुऱ्या शक्तिसह प्रयत्न करतात. जसे, द्वारका १२ वर्षांनंतर जळेल, द्वीपायन मुनिंच्या निमित्ताने जळेल, मद्य पिऊन धुंद झालेले यादव राजकुमार त्यांच्या क्रोधास कारणीभूत होतील इत्यादि सर्व गोष्टी नेमिनाथ भगवंतांच्या दिव्यध्वनिमध्ये ऐकून ती घटना टाळण्यासाठी जे सारे प्रयत्न केले गेले त्यांचा क्रमिक विकास होत होत ठीक त्याच वेळी त्याच निमित्तांनी ती घटना तशीच घटली. निमित्त नैमित्तिक संबंध नामक प्रकरणामध्ये आपण या घटनेची विस्ताराने चर्चा केलीच आहे.

भविष्याची गोष्ट तर राहू द्या, भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टींबद्दल आपण कितीतरी संकल्प विकल्प करत बसतो. ही तर आपल्या प्रत्येकाच्या अनुभवातली गोष्ट आहे. अमुक केलं असतं तर तमुक घडलं असतं, या डॉक्टरऐवजी त्या डॉक्टरकडे गेला असता तर कदाचित अमक्याचे प्राण वाचले असते अशा बिनकामाच्या कल्पनांमध्ये आपल्या आयुष्याचा अमूल्य वेळ आपण विनाकारण वाया घालवत असतो. जे घडून गेले आहे ते कधीही बदलू शकत नाही याची आपणा प्रत्येकाला पूर्ण खात्री आहे तरीदेखील मनाचे हे खेळ चालूच रहातात.

'रिकामा न्हावी भिंतीला तुमड्या लावी' अशी म्हण तुम्हाला ठाऊकच आहे. मनाचे देखील असेच आहे. जो नियमित स्वाध्याय, तत्त्वचिंतन, मनन, पाठांतर करतो त्याच्या मनात रात्रंदिवस त्याचेच विचार घोळतात. परंतु रिकामे मन कल्पनांद्वारे विविध संभावना रंगवून कल्पनेचेच साम्राज्य निर्माण करते. जीव त्याद्वारे चिंतित होतो, आकुलित होतो, राग द्वेष करतो, दु:खी होतो. वर्तमानकाळात जगण्याऐवजी हे जीव भूतकाळात किंवा कल्पनेतल्या भविष्यकाळातच रमतात.

कोणी ज्योतिषांवर सारी मदार टाकून तथाकथित भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी जो जो जे जे उपाय सांगेल ते ते करत सुटतो. बुवाबाजी, कुदेव, कुगुरु, हिंसादि पापं यांच्यामागे लागून मिथ्यात्वरूपी मुळं मजबूत करून संसाररूपी वृक्षाची जोपासना करतो.

आपल्या मर्जीप्रमाणे पर्याय बदलू पाहणाऱ्या जीवांचे वस्तुस्वरूपाबद्दल अज्ञान आहे, ते सर्वज्ञाचे स्वरूप जाणत नाहीत, क्रमबद्धपर्यायाचे त्यांना ज्ञान नाही, त्याचा निर्णय नाही आणि निमित्तामुळे कार्य होते, निमित्त बदलण्याने कार्यही बदलेल अशी त्यांची मिथ्यामान्यता आहे.

तुम्ही म्हणाल की, 'मग काय नुसतं पहात रहायचं ?'

नुसतं पहात राहण्याला, ज्ञाता दृष्टा बनायला फार मोठा पुरुषार्थ लागतो. आतून इच्छा तर उत्पन्न होते आहे, भय-संताप तर वाटतो आहे पण काही करायचे नाही ना, नाही तर केले असते अशा विचारांसह परवश होऊन, दु:खी आकुलित होऊन पहात रहाणे हे खरे ज्ञाता दृष्टापणाचे लक्षण नव्हे. कर्माच्या उदयामध्ये दु:खी होऊन भोगणे ही तर कर्मफलचेतना झाली. ज्ञान स्वत:ला कर्माचा भोक्ता आहे असे अनुभव करत कर्माचे फल भोगण्यात गुंतते.

अशा प्रसंगी रागी द्वेषी होऊन जीव काहीतरी उपाय करू पहातो, परद्रव्याची क्रिया तर करू शकत नाही परंतु रागद्वेषरूप परिणमतो, ते करण्यायोग्य मानतो ही तर कर्मचेतना आहे. ज्ञान रागद्वेषरूप विभाव भावात गुंतते व स्वत:ला त्यारूपच अनुभवू लागते.

अशा वेळी सम्यग्दृष्टि जीवालाही भूमिकेनुसार - त्याच्या गुणस्थानानुसार चारित्रमोहाच्या उदयामध्ये कमी अधिक सुख दु:ख व रागद्वेष होतात परंतु आता त्याने या संयोगी भावांहून भिन्न अशा स्वत:च्या ज्ञाता दृष्टा अकर्ता स्वभावाची ओळख केली व अनुभूति घेतली असल्या कारणाने करण्याचा भाव उत्पन्न झाला तरीदेखील कर्तृत्वबुद्धि अर्थात मी पराचे परिणमन करू शकतो असे अज्ञान - अशी मिथ्याबुद्धि नसते. त्याला ज्ञानचेतना असते. अज्ञानजनित रागद्वेष त्याला उत्पन्न होत नाहीत. अल्प रागद्वेष आहेत परंतु त्याचे त्याला स्वामित्व नसते, ज्ञाता स्वभावाहून त्यांच्या भिन्न अस्तित्वाचे त्याला सदैव भान असते.

तुम्ही विचारलंत की नुसतं पहात रहायचं का? ज्याने क्रमबद्धपर्यायाचा व त्याद्वारे सर्वज्ञतेचा - सर्वज्ञ स्वभावाचा निर्णय

स्वसन्मुखतेपूर्वक केला आहे त्याचाच निर्णय खरा आहे. शास्त्रामध्ये वाचून क्रमबद्धपर्यायाचा खरा निर्णय होऊ शकत नाही. संयोगांकडे पहात पहात 'होण्यायोग्य झाले आपण काय करू शकतो?' असे म्हणणे हे अज्ञानतेचेच द्योतक आहे. कोणी म्हणतो की भगवानाच्या इच्छेप्रमाणे सारे काही होत आहे, तर कोणी म्हणतो की नियति बलवान आहे, दैवाच्याच आधीन सारे काही आहे व शास्त्र शिकून शास्त्राच्या भाषेत क्रमबद्ध व्हायचे तेच होणार असे कोणी म्हणतो हे सारे एकाच माळेचे मणी आहेत, सारे एकसारखेच आहेत, एकांत मिथ्यादृष्टि आहेत.

आपण पूर्वी पाहिलेच आहे की क्रमबद्धपर्याय केवळ नियतिचा द्योतक नाही परंतु त्यामध्ये पाचही समवाय सुनिश्चित आहेत. सर्व समवायांना स्वीकारून एखाद्या कारणाच्या मुख्यतेने कथन असेल तर ते योग्य होईल, परंतु सर्वथा एकाच कारणाने कार्य होते असे मानणे व इतर समवायांना अनिश्चित व पराधीन मानणे हे चुकीचे आहे.

संयोग तर ज्ञानी-अज्ञानी कोणीच पलटवू शकत नाहीत कारण संयोग तर परद्रव्य आहेत. त्यांना कोण हटवू किंवा पलटवू शकेल बरे? परंतु संयोगीभाव - मोह, राग, द्वेष रूप विभावभाव जीव करतो. अज्ञान अवस्थेमध्ये मिथ्यात्व व अनंतानुबंधी राग द्वेष रूप संयोगी भाव उत्पन्न होतात परंतु ज्ञानी जीवांना मिथ्यात्व व अनंतानुबंधीचा तर भावच उत्पन्न होत नाही व उरलेले रागद्वेष देखील वाढत्या वीतरागतेबरोबर कमी होत जातात.

दोन्हीमधला फरक लक्षात आला ना? संयोग हे तर परद्रव्य आहेत ज्यांचा जीवाशी काही काळ संबंध येतो. परंतु संयोगी भाव हे संयोगाकडे पाहून होणारे जीवाचे विभावभाव आहेत. हे नीट ध्यानात असू द्या की कोणताही संयोग जीवाला मोह रागद्वेष उत्पन्न करण्यात व सुख दु:ख देण्यात समर्थ नाही. परंतु जीवच स्वत: संयोगामध्ये इष्ट-अनिष्टपणाची कल्पना करून मोही, रागी, द्वेषी होऊन दु:खी होतो.

ज्याने स्वत:चे स्वाधीन सहज सुखमय स्वरूप अनुभवले आहे त्याला संयोगापासून सुख-दु:ख होते अशी मिथ्यामान्यता

नसते. संयोगांकडे पहात बसण्यातही त्याला आता रस उरत नाही. हां, ज्याप्रमाणे रोगाचा इलाज करण्यासाठी नाइलाजास्तव आपण कडू औषधे, इंजेक्शने घेतो त्याप्रमाणे सम्यग्दृष्टि ज्ञानी जीवसुद्धा सांसारिक प्रसंगांमध्ये विविध कार्य करताना आढळतात परंतु त्यामध्ये सुद्धा त्यांची ज्ञाता दृष्टापणाची धारा अखंडपणे चालूच असते.

यावरून लक्षात आलेच असेल की क्रमबद्धपर्यायाचा सिद्धांत समजणे किती आवश्यक आहे ते!

क्रमबद्धपर्यायाचे स्वरूप जाणताच विविध संयोग पाहून किंवा वेगवेगळ्या जीवांचे वेगवेगळे परिणाम पाहून उत्पन्न होणारे आश्चर्य व आकुलता कमी होते. स्वत:चे किंवा अन्य व्यक्तींचे परिणाम बदलण्याचे प्रयत्न व इच्छा कमी होऊन दृष्टि आपल्या त्रिकाली ज्ञायक स्वभावावर जाते. क्रमबद्धपर्याय जाणल्याने पर्यायबुद्धि नष्ट होऊन द्रव्यदृष्टि होते. सर्वज्ञस्वभावाचा व क्रमबद्धपर्यायाचा निर्णय होताच स्वानुभूति प्रकट होते, जीव अकर्ता होतो, कर्तृत्वबुद्धि नाहिशी होते. स्वत:मध्येच एकाग्र झाल्याने-रममाण झाल्याने आणि पूर्णरूपाने स्थिर झाल्याने सर्वज्ञतेची प्राप्ति होते - केवलज्ञान उत्पन्न होते आणि संपूर्ण विश्वाच्या सर्व क्रमबद्ध पर्याय साक्षात आपल्या ज्ञानात झळकू लागतात.

अशा रीतीने प्रत्येक आत्मार्थी जीवाने क्रमबद्धपर्यायाचे स्वरूप जाणून त्याचा स्वसन्मुखतेपूर्वक निर्णय करणे अत्यावश्यक आहे. अधिक चर्चा पुढील पत्री करूया.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# क्रमबद्धपर्याय - एक शाश्वत सत्य

पत्रांक १३ १५ जुलै २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

क्रमबद्धपर्यायाची चर्चा तुम्ही अत्यंत उत्सुकतेने वाचत आहात तसेच त्याविषयावरील माझ्या कॅसेट ऐकण्यास सुरवात केलीत असे तुम्ही कळवलेत. त्या कॅसेटमधील मंगलाचरण मोना तू लिहून मागितले आहेस. अगं, त्या तर कार्तिकेयानुप्रेक्षा या ग्रंथातील गाथा नं. ३२१, ३२२ व ३२३ आहेत. रोज ऐकून तर पाठ होतीलच परंतु शब्द नीट समजावेत म्हणून लिहून पाठवत आहे.

जं जस्स जम्मि देसे जेण विहाणेण जम्मि कालम्मि ।
णादं जिणेण णियदं जम्मं वा अहव मरणं वा ॥३२१॥

तं तस्स तम्मि देसे तेण विहाणेण तम्मि कालम्मि ।
को सक्कदि वारेदुं इंदो वा तह जिणिंदो वा ॥३२२॥

एवं जो णिच्छयदो जाणदि दव्वाणि सव्वपज्जाए ।
सो सद्दिट्ठी सुद्धो जो संकदि सो हु कुद्दिट्ठी ॥३२३॥

प्राकृत भाषेमधील या गाथा आहेत. अर्थ लक्षात आलाच असेल. तो असा-ज्या जीवाचे, ज्या देशामध्ये, ज्या काळी, ज्या विधीने, जे जन्म अथवा मरण जिनेन्द्र भगवंतांनी निश्चितरूपाने जाणले आहे; त्या जीवाचे, त्याच देशामध्ये, त्याच काळी, त्याच विधीने ते अवश्य होते. त्याला टाळण्यास इन्द्र अथवा जिनेन्द्र कोण बरे समर्थ आहे? अर्थात ते कोणीही टाळू शकत नाही. अशाप्रकारे जो सर्व द्रव्यांना व त्यांच्या सर्व पर्यायांना जाणतो (अर्थात हा नियम प्रत्येक द्रव्याच्या प्रत्येक पर्यायाबाबत लागू आहे असे जो जाणतो) तो सम्यग्दृष्टि आहे व जो यामध्ये शंका बाळगतो तो मिथ्यादृष्टि आहे.

कॅसेटवरून एक गंमत आठवली. २० जानेवारी २००१ पासून आपल्या घरी हा क्रमबद्धपर्यायाचा विषय मी रोज सकाळी साडे आठ ते दहा घेत असे. २६ जानेवारीला प्रचंड भूकंप झाला हे सर्व विदितच आहे. त्यावेळी मी क्लासच घेत होते. माझ्या

खालचे आसन डुगडुगु लागले. काय होते आहे असा विचार मनात येऊ लागला तोवर समोर बसलेल्या साऱ्या १९-२० जणांच्या चेहऱ्यावरचे भाव, थोडी भीति, थोडी चलबिचल माझ्या लक्षात आली. पहा आता भूकंप होत आहे. हा सुद्धा क्रमबद्ध आहे इत्यादि क्रमबद्धपर्यायाविषयीचे माझे कथन मी चालूच ठेवले. आम्ही सर्वजणांनी अत्यंत निश्चिंतपणे स्वाध्याय चालूच ठेवला. सतत दोन मिनिटे भूकंप चालू होता. त्या दिवशीची कॅसेट ऐका - तुमच्या लक्षात येईलच.

पहा बरं, क्रमबद्धपर्यायाचा सिद्धांत लक्षात आल्याने संकटाचे भय, मरणाचे भयदेखील नाहिसे होते, निराकुलता प्राप्त होते.

क्रमबद्धपर्यायाचा सिद्धांत सिद्ध करण्यासाठी सर्वज्ञता हा सर्वात प्रबळ हेतु (पुरावा) दिला जातो, सर्वज्ञतेच्या आधाराने क्रमबद्धपर्याय सिद्ध केला जातो. सर्वज्ञतेसंबंधीच्या अनेक मिथ्या मान्यतांचे खंडण तर आपण पूर्वी केलेच आहे.

होऊन गेलेल्या गोष्टी-घटना तर कोणीही बदलू शकत नाही यावर प्रत्येकजण विश्वास ठेवतो, मान्य करतो परंतु भविष्यकालीन प्रत्येक घटनासुद्धा निश्चित आहे व ती विशिष्ट क्रमानेच होणार आहे ते कोणी बदलू शकत नाही, हे अनेकांना मान्य होत नाही. तसे मान्य केल्याने त्यांना स्वत:चे कर्तृत्व व पुरुषार्थ नष्ट झाल्यासारखे वाटते; पराधीन, परवश, परतंत्र झाल्यासारखे वाटते. परंतु यामध्ये तर अनंत स्वतंत्रता आहे.

पर्यायाला तर द्रव्याची देखील अपेक्षा नाही. प्रत्येक पर्याय त्या समयाच्या पर्यायाच्या योग्यतेनुसार म्हणजेच स्वत:च्या योग्यतेनुसार स्वत:च्या षट्कारकांनी त्याचप्रकारे परिणमते अन्य प्रकारे नाही अशी सुनिश्चितता - स्वतंत्रता आहे. ही निश्चितता जाणल्याने आपण निश्चिंत होतो-आकुलतारहित, चिंतारहित होतो. सर्वज्ञ भगवान या सर्व पर्याय वर्तमानकाळातच युगपत् स्पष्ट जाणतात ही तर ज्ञानाची दिव्यता आहे, ज्ञानस्वभावाचे सामर्थ्य आहे.

जो जीव ज्ञानाचे हे सामर्थ्य नाकारतो, सर्वज्ञतेचा म्हणजेच स्वत:च्या सर्वज्ञस्वरूपाचा स्वीकार करीत नाही, त्याचे अज्ञान,

मोह, राग, द्वेष टळत नाहीत. अरहंत व सिद्ध सर्वज्ञ आहेत. त्यांचे सर्वज्ञस्वरूपच जाणले नाही तर त्यांचे नामस्मरण करून, णमोकार मंत्राची पारायणं करून, इतकी वर्षं पूजा अर्चा करूनही आपल्या पदरात काहीच लाभ पडणार नाही.

प्रवचनसार ग्रंथामध्ये म्हटले आहे की, 'जो अरहंतांना द्रव्य रूपाने, गुणरूपाने व पर्यायरूपाने जाणतो तो स्वतःच्या आत्म्याला जाणतो व त्याचा मोह म्हणजे मिथ्यात्व लयास जातो - नष्ट होतो.'

जे जीव अरहंतांना मानतात परंतु त्यांच्या सर्वज्ञस्वरूपाविषयी अनभिज्ञ आहेत, त्यांचे अरहंतांना मानणे, पूजणे, नमस्कार करणे सारे व्यर्थ आहे.

प्रथमानुयोगात भविष्यासंबंधी अनेक कथनं लिखितरूपात आज उपलब्ध आहेत. भविष्यातील उत्सर्पिणी काळात होणाऱ्या २४ तीर्थंकरांची नावे, त्यांचे मातापिता, जन्म व निर्वाण क्षेत्र या साऱ्यांची नोंद जिनागमात आहे. केवळ तीर्थंकरच नव्हेत तर साऱ्या त्रेसष्ट शलाका पुरुषांची नावेही प्रसिद्ध आहेत. या शलाका म्हणजे विशेष व्यक्ति कोण असतात हे माहित आहे का? ते जाणण्यापूर्वी आपण उत्सर्पिणी, अवसर्पिणी व कालचक्र यांविषयी माहिती घेऊया.

२० कोडाकोडी सागर वर्षांचा एक कल्पकाळ असतो. त्यापैकी १० कोडाकोडी सागरांचा अवसर्पिणी (उतरता) काळ व १० कोडाकोडी सागरांचा उत्सर्पिणी (चढता) काळ होय. सागराचे व कोडाकोडीचे प्रमाण आपण 'करणानुयोग परिचया' द्वारे शिकलोच आहोत.

उत्सर्पिणी व अवसर्पिणी काळामध्ये काळाचे सहा सहा विभाग असतात. अवसर्पिणीच्या पहिल्या विभागास - काळास सुषमा सुषमा म्हणतात त्यावेळी येथे भरतक्षेत्रात उत्तम भोगभूमि असते. मनुष्यांची व तिर्यंचांची उत्कृष्ट आयु ३ पल्य असते व उंची ३ कोस असते. त्या काळाच्या शेवटी आयु २ पल्य व उंची २ कोस असते. हा काळ ४ कोडाकोडी सागराचा असतो.

त्यानंतर येणाऱ्या दुसऱ्या काळास सुषमा म्हणतात. त्यावेळी येथे मध्यम भोगभूमि असते. आयु सुरवातीला २ पल्य व शेवटी

१ पल्य असते तर उंची प्रथम २ कोस तर शेवटी १ कोस असते. हा काळ ३ कोडाकोडी सागराचा असतो.

त्यानंतरच्या तिसऱ्या काळास सुषमा दुषमा म्हणतात. त्यावेळी येथे जघन्य भोगभूमि असते. आयु सुरवातीला १ पल्य तर शेवटी १ कोटी पूर्व असते. उंची सुरवातीला १ कोस तर शेवटी ५०० धनुष्य असते. १ पूर्व म्हणजे सत्तर लाख छप्पन हजार करोड वर्ष अथवा ८४ लाख गुणिले ८४ लाख वर्ष, त्याला १करोडने गुणले असता १ कोटी पूर्व होतात. हा तिसरा काळ २ कोडाकोडी सागर वर्षांचा असतो.

चौथ्या काळास दुषमा सुषमा म्हणतात. या काळात कर्मभूमिचा प्रारंभ होतो. सुरवातीला आयु १ कोटी पूर्व तर शेवटी १२० वर्षांची असते. उंची सुरवातीला ५०० धनुष्य तर शेवटी ७ हात असते. या चतुर्थ काळात जीव मोक्षास जाण्यास प्रारंभ होतो. चोवीस तीर्थंकर याच काळात होतात.

भोगभूमितील जीव ४ थ्या गुणस्थानाच्या वर जाऊ शकत नाहीत, तसेच तेथील सर्व जीव मरणानंतर देवगतितच जातात. मिथ्यादृष्टि मरून भवनवासी, ज्योतिषी किंवा व्यंतर होतात यांना भवनत्रिक देव म्हणतात. सम्यग्दृष्टि मरून १ ल्या किंवा २ ऱ्या (सौधर्म, ईशान) स्वर्गात जातात.

कर्मभूमितले जीव मरून चार गतिंपैकी कोणत्याही गतित जाऊ शकतात. मनुष्य जीव पुरुषार्थ करून मोक्ष देखील प्राप्त करू शकतात. चौथा काळ १ कोडाकोडी सागराला ४२००० वर्ष कमी एवढा असतो. पाचव्या काळाचे नाव आहे दुषमा. सध्या येथे या भरतक्षेत्रात पंचम काल चालू आहे. या काळात जन्मलेला जीव मोक्षास जाण्याचा पुरुषार्थ करू शकत नाही. परंतु पुरुष मुनि होऊन ७ व्या गुणस्थानापर्यंतचा पुरुषार्थ करू शकतात. हा काळ २१००० वर्षांचा असतो. आयु सुरवातीला १२० वर्ष तर शेवटी २० वर्ष असते. उंची सुरवातीला ७ हात तर शेवटी २ हात असते.

सहाव्या काळाचे नाव आहे दुषमा दुषमा. हाही काळ २१००० वर्षांचा असतो. या काळी धर्माचा लोप होतो. आयु सुरवातीला २० वर्ष तर शेवटी १५ वर्ष असते. उंची सुरवातीला

२ हात तर शेवटी १ हात असते. सुषमा, दुषमा ऐवजी सुखमा, दुखमा अशीही नावे शास्त्रात आढळतात.

अवसर्पिणीच्या या सहा काळांमध्ये आपण आयु व शरीराची उंची क्रमशः घटत गेलेली पाहिली. परंतु गंमत अशी आहे की मनुष्यांचा आहार मात्र वाढत जातो, प्रमाणही वाढते व अधिक वेळा खाल्ले जाते. पहिल्या काळात चौथ्या दिवशी बोराएवढा आहार असतो. दुसऱ्या काळात एक दिवसाआड बेहड्याएवढा आहार असतो. तिसऱ्या काळात एकदिवसाआड आवळ्याएवढा तर चौथ्या काळात रोज एकदा आहार असतो. पाचव्या काळात अनेक वेळा आहार असतो, हे तर आपल्यावरून दिसूनच येते. सहाव्या काळात अति प्रचुर वृत्ति असते. मासे आदिचा आहार असतो. हे सहा काळ उलट्या क्रमाने उत्सर्पिणी काळात असतात.

काळांचा हा क्रम कोणी बनविलेला नाही. तो सहज नैसर्गिक क्रम आहे व त्या त्या काळी जीवांची तशी योग्यता व शरीराची रचनाही सहज तशी होते. दोहोंमध्ये फक्त निमित्त नैमित्तिक संबंध आहे.

सध्या आपण अवसर्पिणीच्या पंचम काळात आहोत. सध्याचा हा हुंडावर्पिणी काळ आहे. असंख्यात अवसर्पिणी काळां नंतर एक वेळ येणारा असा हा हुंडावसर्पिणी काळ आहे. इतर अवसर्पिणींच्या मानाने हा निकृष्ट काळ आहे. तीर्थंकरांना कन्या होणे (वृषभदेव राजाला होत्या), चक्रवर्तीचा मानभंग (भरत चक्रवर्तीचा बाहुबलीद्वारे पराजय), सर्व तीर्थंकरांचा अयोध्येमध्ये जन्म न होणे व सर्व तीर्थंकरांचे सम्मेदशिखर येथून निर्वाण न होणे इत्यादि या हुंडावसर्पिणीची वैशिष्ट्ये आहेत. शलाकापुरुष ६३ न होता कमी होणे हीही एक विशेषता आहे.

२४ तीर्थंकर, १२ चक्रवर्ती, ९ नारायण, ९ प्रतिनारायण व ९ बलभद्र असे ६३ शलाकापुरुष होतात. परंतु या चौथ्या काळात शांतिनाथ, कुंथुनाथ व अरनाथ हे तीन तीर्थंकरही होते व चक्रवर्तीदेखील. त्यामुळे ३ कमी. तसेच महावीर तीर्थंकर अनेक भवांपूर्वी त्रिपृष्ट नारायण होते. असे ६३ मधून ४ वजा जाता ५९ शलाका पुरुष या चतुर्थ काळात होऊन गेले.

जिनागमामध्ये भूत, वर्तमान, भावि काळातील भरत, ऐरावत, विदेह क्षेत्रातील तीर्थंकरादिंची नावे प्रसिद्ध आहेत, त्यांच्या पूर्वभवांची नावेही सांगितलेली आहेत. जर सर्व काही क्रमबद्ध नसते तर कोण जाणू शकले असते? हे जीव तीर्थंकर होणार हे निश्चित आहे त्याअर्थी त्यांचे त्यायोग्य भाव होणे, तीर्थंकर प्रकृति बांधण्यायोग्य षोडशकारण भाव होणे हे देखील निश्चित आहे. ते कोणत्या केवलीच्या, तीर्थंकरांच्या निकट अर्थात पादमूलात, तीर्थंकर प्रकृति बांधण्यास प्रारंभ करणार हेही निश्चित आहे. अनादिअनंत काळातील सर्व अनंत तीर्थंकर, अनंत केवली यांनी पूर्वी कोणकोणते भव धारण केले, कोणत्या भवात केव्हा सम्यक्त्व प्राप्त केले, केव्हा कोणती कर्मप्रकृति बांधली, कसे कसे परिणाम झाले, केव्हा केवलज्ञान झाले या सर्व गोष्टी सर्वज्ञ भगवान एका समयात युगपत् स्पष्ट जाणतात. सर्व पर्याय तसेच त्यांची सर्व कारणं निश्चित नसतील तर त्यांना सर्वज्ञदेखील कसे जाणू शकले असते? व ज्यांना सर्व द्रव्यांच्या अनादिअनंत सर्व पर्याय ज्ञानात येत नसतील त्यांना सर्वज्ञ ही संज्ञा कशी प्राप्त झाली असती?

आपल्याला अचानक घडणाऱ्या, अनपेक्षित वाटणाऱ्या अपघाताने होणाऱ्या घटना पाहून आश्चर्य वाटते, आकुलता उत्पन्न होते. परंतु या घटना व त्यांच्यामुळे विविध व्यक्तिवर होणारे विविध परिणाम हे सारे काही निश्चित आहे. आपण सिनेमाच्या रीळाशी याची तुलना करूया.

विशिष्ट क्रमाने चित्रित केलेली सिनेमाची फिल्म ही त्याच क्रमाने प्रदर्शित होते, त्याचा क्रम बदलत नाही. त्याचप्रमाणे द्रव्याच्या अनादिअनंत पर्यायाचा क्रम निश्चित आहे तो बदलत नाही.

स्थूल दृष्टीने पाहिले असता जे परिणमन अव्यवस्थित दिसते, विसंगत वाटते तेदेखील सूक्ष्मतेने विचार केला असता सुव्यवस्थितच असल्याचे लक्षात येते. ज्याप्रमाणे नाटकाच्या रंगमंचावरील जे दृश्य व्यवस्थित दिसते ते तर निश्चित व पूर्ण व्यवस्थित असतेच परंतु जे दृश्य अव्यवस्थित - अस्ताव्यस्त दिसते तेखील पूर्व नियोजित आणि व्यवस्थितच असते.

जसे राजमहालाचे दृश्य व्यवस्थित आणि पूर्वनियोजित असते तसेच गरीबाच्या झोपडीचे दृश्यही पूर्वनियोजित व व्यवस्थितच असते. तुटकी फुटकी भांडी, खाट, फाटके कपडे वगैरे सर्व वस्तु निश्चित पूर्वनियोजित ठिकाणी ठेवाव्या लागतात. त्याचप्रमाणे द्रव्यांचे अव्यवस्थित दिसणारे परिणमनदेखील निश्चित आणि व्यवस्थितच असते.

नाटकातील प्रसंग क्रमशः येतात, एकावेळी नाही. त्याप्रमाणे प्रत्येक द्रव्याच्या पर्याय क्रमशः होतात, एकावेळी नाही. नाटकामध्ये हे निश्चित असते की कोणत्या दृश्यानंतर कोणते दृश्य येईल. त्याचप्रमाणे पर्यायांमध्येही हे निश्चित आहे की कोणत्या पर्यायानंतर कोणती पर्याय येईल. जी पर्याय जेव्हा, जेथे, ज्याप्रकारे, ज्या निमित्ताने, जशी होणार असेल तीच पर्याय, त्याचवेळी, तेथेच, तशाचप्रकारे, त्याच निमित्ताने, तशीच होईल; अन्यप्रकारे नाही याचेच नाव क्रमबद्धपर्याय आहे.

ज्याने नाटक पाहिले आहे असा प्रेक्षक हे जाणतो की कोणत्या दृश्यानंतर कोणते दृश्य येणार आहे. त्याचप्रमाणे सर्वज्ञ भगवान सर्व द्रव्यांच्या सर्व पर्यायांचा निश्चित क्रम आपल्या ज्ञानाद्वारे जाणतात.

हां, परंतु एक मोठा फरक आहे बरं का! नाटककाराने अथवा सूत्रधाराने नाटकाची निर्मिती केली आहे, त्याने आपल्या कल्पनेने इच्छेनुसार दृश्य बनविले आहेत - प्रसंगांची रचना केली आहे परंतु क्रमबद्धपर्यायाला कोणी बनविले नाही, रचलेले नाही, सर्वज्ञांनीसुद्धा त्याची निर्मिती केलेली नाही. सर्वज्ञ तर केवळ त्यांना जाणतात आणि जेव्हा त्यांची वाणी सहजरूपाने खिरते तेव्हा त्यामध्ये क्रमबद्धपर्यायाचे वर्णन अर्थात वस्तुस्वरूपाच्या व्यवस्थेचे विवरण येते. अशारीतीने आपण सर्वज्ञतेच्या हेतुद्वारे क्रमबद्धपर्यायाचे स्वरूप व सिध्दि पाहिली.

प्रवचनसार ग्रंथावरील टीकेमध्ये आचार्य अमृतचंद्रांनी क्रमबद्धपर्यायाची सिद्धि केली आहे. त्याविषयी समजून घेऊया. प्रत्येक द्रव्य सदैव आपल्या स्वभावामध्ये रहाते म्हणून 'सत्' आहे. द्रव्यालाच सत् म्हणतात. 'सत् द्रव्यलक्षणम्' हे तत्त्वार्थसूत्रातील सूत्र आहे. हे सत् कसे आहे हे सांगणारे, 'उत्पाद व्यय ध्रौव्ययुक्तं सत्' हे सूत्र देखील त्यातच आहे. द्रव्याचा

स्वभाव उत्पाद, व्यय, ध्रौव्यस्वरूप परिणाम आहे. परिणाम म्हणजेच पर्याय काय आहे हे ते समजावितात.

ज्याप्रमाणे प्रत्येक द्रव्याचे स्वतःचे विशिष्ट क्षेत्र आहे, त्याचा विस्तार आहे व त्या विस्ताराचा जो छोट्यात छोटा अंश आहे त्यास प्रदेश म्हणतात; त्याचप्रमाणे द्रव्याचा जो अनादिअनंत काल आहे, जो एक अखंड प्रवाह आहे त्याच्या छोट्यात छोट्या अंशाला 'पर्याय' किंवा 'परिणाम' म्हणतात. येथे प्रदेशांचे उदाहरण घेऊन आचार्यांनी पर्यायासंबंधीचा सिद्धांत आपल्याला सांगितला आहे, पर्यायांचा सुनिश्चित क्रम सिद्ध केला आहे.

ज्याप्रमाणे द्रव्यातील प्रदेशांचा क्रम सुनिश्चित आहे, एक प्रदेश दुसऱ्या प्रदेशाहून भिन्न आहे, प्रत्येक प्रदेशाची आपापली जागा निश्चित आहे, एक प्रदेश उचलून दुसऱ्या प्रदेशाच्या जागी अदलाबदल करता येत नाही, अन्यथा द्रव्याचे क्षेत्र खंडित होईल. त्याचप्रमाणे द्रव्याच्या कालाच्या अखंड प्रवाहामधील प्रत्येक पर्यायाची जागा निश्चित आहे, पर्यायांचा क्रम निश्चित आहे. एका पर्यायाला आपल्या जागेवरून हटवून दुसऱ्या पर्यायाच्या जागी अदलाबदल करता येत नाही. त्यामध्ये फेरबदल करण्याचा प्रयत्न द्रव्याला कालअपेक्षेने खंडित करेल. तसे झाल्यास द्रव्याचा द्रव्यपणा रहाणार नाही, द्रव्याचा नाश होईल. परंतु असे कधीच होऊ शकत नाही.

अज्ञानीने वस्तुस्वरूपाच्या विरुद्ध मान्यता ठेवून पर्यायामध्ये फेरफार करण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो निष्फळच आहे. वस्तुची व्यवस्था अज्ञानीच्या मान्यतेनुसार नाही, ती तर स्वतःसिद्ध स्वयंचलित व्यवस्था आहे जिचे नाव आहे क्रमबद्ध-पर्याय! ही व्यवस्था समजून घेतल्याने अज्ञान व दुःखाचा नाश होतो. सुखी होण्याचा हाच उपाय आहे.

क्रमबद्धपर्याय सर्व द्रव्यांचे स्वरूप आहे, स्वभाव आहे. लोकाकाशामध्ये जेवढे असंख्यात प्रदेश आहेत, तेवढेच एक एक जीवद्रव्याचे प्रदेश आहेत. तसेच तिन्ही काळाचे जेवढे समय आहेत तेवढ्याच प्रत्येक द्रव्याच्या पर्याय आहेत अर्थात गुणांच्या अपेक्षेने प्रत्येक गुणाच्या तेवढ्याच पर्याय आहेत. या सर्व पर्यायांपैकी प्रत्येक पर्यायाचा स्वतःचा स्वसमय निश्चित आहे.

ज्याप्रमाणे लोकाकाशाच्या एकेका प्रदेशावर एक एक कालाणु खचित आहे, त्याचप्रमाणे तिन्ही काळाच्या एकेका समयामध्ये प्रत्येक द्रव्य, गुणाची एकेक पर्याय खचित आहे. प्रत्येक पर्याय आपल्या स्वकाळातच प्रकट होते असाच द्रव्याचा स्वभाव आहे.

या द्रव्यस्वभावाचे भान नसलेला अज्ञानी पर्यायांकडेच पहात रहातो, त्यांना आपला स्वभाव मानतो, त्यांच्यामध्ये फेरफार करू पहातो, त्याच विकल्पांमध्ये गुरफटून जातो. त्याची दृष्टि स्वभावाकडे वळत नाही,त्याला द्रव्यदृष्टि प्राप्त होत नाही अर्थात तो सम्यग्दृष्टि बनत नाही.

द्रव्यदृष्टि प्राप्त करण्यासाठी द्रव्यस्वभावाचे अर्थात क्रमबद्ध-पर्यायाचे ज्ञान व प्रतीति - दृढ श्रद्धा आवश्यक आहे. पर्याय निश्चित आहेत हे समजल्याशिवाय जीव निश्चिंत होत नाही व निश्चिंत झाल्याशिवाय - निर्भार झाल्याशिवाय दृष्टि व ज्ञान स्वभावाकडे वळत नाही, अंतर्सन्मुखता होत नाही, एकाग्रता होत नाही.

तुम्ही म्हणाल, 'दुसऱ्याचे काम जाऊ दे परंतु स्वत:चे काम तरी करायला नको का?' मला असे सांगा की हा 'मी' अर्थात स्व तुम्ही कोणाला मानलेत? शरीर व जीव यांच्या संयोगाने झालेल्या मनुष्यपर्यायाला अर्थात 'असमानजातीय द्रव्य पर्यायाला' 'मी' असे मानून बोलत आहात की 'मी' म्हणजे आत्मा याअर्थी बोलत आहात? जर आत्मा याअर्थी 'मी' शब्द वापरत आहात तर तो कोणता आत्मा आहे? रागी, द्वेषी, अशुद्ध आत्मा आहे की स्वभावरूप शुद्धात्मा आहे?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की स्वत:चे कोणते काम - कार्य तुम्ही करू इच्छिता? तुम्ही तर जीवद्रव्य, ज्ञानादि अनंत गुणांचा समूह, असंख्यात प्रदेशी, अरूपी, संकोच विस्तार शक्तीने युक्त अनादिअनंत वस्तु आहात व तुमचे परिणमन - कार्य दर समयामध्ये चालूच आहे. ते करण्या न करण्याच्या इच्छेची गरजच नाही, ती व्यर्थ आहे. इच्छा केली म्हणून एखादे कार्य घडते असे मुळीच नाही. ज्ञान, दर्शन, चारित्र, वीर्य आदि अनंत गुणांचे कार्य निरंतर चालूच आहे. इच्छारहित अशा

वीतरागी जीवांच्याही या सर्व अनंत गुणांचे कार्य सदैव चालूच आहे.

जर मनुष्यपर्यायरूपी स्वचे काम करू इच्छित असाल तर तुमच्या इच्छेनेच आजपर्यंत सर्व कामं करीत आलात का? माझ्या पोटी जन्म घेतलात तो ठरवून घेतलात का? लहानपणी जो शारीरिक, बौद्धिक विकास होत गेला तो ठरवूनच केलात का? की सहज झाला? तुम्ही ठरवूनच केला असतात तर दोघींचा एकसमान का नाही केलात? तुम्ही ठरवूनच सारं करता तर कधी आजारी का पडता बरं? कधी दु:खी तर कधी हर्षित का होता बरं? सदैव आनंदातच रहावे की, कोणी अडवले आहे का?

तुम्ही म्हणाल, 'पहा, आम्ही हवे ते खाद्यपदार्थ बनवून खातो, आवडतील ते कपडे घालतो, हवे त्या पद्धतीने मौजमजा करतो.'

मला सांगा, तुमच्या मर्जीप्रमाणे तुम्ही पिठापासून चपात्या की पुऱ्या की लापशी बनविलीत असे तुम्ही मानलेत. परंतु पोटात गेल्यावर तुम्ही तुमच्या मर्जीप्रमाणेच त्याचे परिणमन घडवून आणलेत की काय? त्यापासून हाडे, स्नायु, रक्त, चरबी, त्वचा, विष्टा इत्यादि बनले ते तुम्ही इच्छेनुरूपच बनविले असेल नाही का? मग कधी कधी रक्ताचे प्रमाण कमी झाले म्हणून रक्त वाढण्यासाठी कोणाला औषधं का बरं खावी लागतात?

तुम्ही म्हणाल, 'आई, ते सारे जाऊ दे. आमच्या ज्ञानाचे जाणण्याचे कार्य निरंतर चालू आहे. काय जाणायचे आणि काय नाही जाणायचे एवढे तरी आम्ही ठरवू शकतो ना? तूच तर वारंवार म्हणतेस की उपयोग पराकडून - रागाकडून हटवून स्वसन्मुख केल्याशिवाय - निजशुद्धात्म्याकडे लावल्याशिवाय क्रमबद्धपर्यायाचा व सर्वज्ञतेचा निर्णय होणार नाही. निदान हा उपयोग तरी आम्ही हवा तसा वळवू शकतो की नाही?'

मुलींनो, 'मला उपयोग स्वसन्मुख करायचा आहे' - अशी वृत्ति उठणे, विकल्प येणे, इच्छा उत्पन्न होणे हा तर रागभाव आहे, आकुलता आहे. राग करता करता वीतरागता प्राप्त होणे - निर्विकल्प शुद्धात्मानुभूति होणे हे कसे शक्य आहे?

ज्याप्रमाणे प्रत्येक द्रव्याच्या प्रत्येक गुणाच्या अनादिअनंत पर्याय निश्चित आहेत, त्याचप्रमाणे ज्ञानगुणाच्याही अनादिअनंत पर्याय निश्चित आहेत. ज्ञानगुणाची प्रत्येक समयाची 'जाणणेरूप' अवस्था स्वतंत्रपणे स्वत:च्या उपादानाने होत आहे. स्वपरप्रकाशक शक्तीच्या कारणाने ज्ञानाची पर्याय स्वत:च्या योग्यतेनेच प्रकट होते. कोणत्या वस्तुसंबंधीचे - ज्ञेयासंबंधीचे ज्ञान होत आहे ही ज्ञानाची स्वत:ची त्यासमयाची योग्यता आहे. समोर ज्ञेय आहे म्हणून ज्ञान होते अशी निमित्ताधीन पराधीनता तेथे नाही. ज्ञेयानुसार ज्ञान होत नाही.

ज्ञानाची प्रत्येक पर्याय स्वाधीन आहे, ज्या समयी ज्या ज्ञेयाला जाणण्याची ज्ञानाची योग्यता असेल, त्या समयी त्याच ज्ञेयाला जाणणारी ज्ञानाची पर्याय स्वत:च्या निजशक्तीने उत्पन्न होते. तुम्हीच सांगा, शुद्धात्म्याविषयी चिंतन करायचे असे ठरवून देखील दुसरेच काही विचार मनात का येतात? देवाची पूजा करताना मन कोठेतरी का भरकटते? नीट लक्ष देऊन दूध तापवत असताना मधेच कोठेतरी तंद्री लागून दूध ऊतू जाते, असे का बरे होते? तोंडामध्ये पक्वान्न असताना त्याच्या चवीचे ज्ञान होण्याऐवजी मला तुमची आठवण का बरे होते? तुम्ही माझ्या ज्ञानाचे ज्ञेय का होता? ताप आला असता स्वादिष्ट पदार्थदेखील बेचव का लागतात?

हे एक त्रिवार सत्य आहे की ज्ञेयाच्या अनुसार ज्ञान होत नाही, परंतु ज्ञानाच्या अनुसार ज्ञेय जाणले जाते. ज्याप्रमाणे द्रव्य व गुण त्रिकाल सत् आहेत - त्यामध्ये काहीही बदल होत नाही, त्याप्रमाणे प्रत्येक समयाची पर्यायदेखील त्या त्या समयाची सत् आहे. पर्यायाला तिच्या निश्चित स्थानावरून-समयावरून कोणीही हटवू शकत नाही.

ज्यावेळी वस्तुस्वरूपाचे, सहज कारण-कार्य व्यवस्थेचे अर्थात क्रमबद्धपर्यायाचे ज्ञान होते, स्वत:च्या ज्ञानाद्वारे हा तत्त्वनिर्णय पक्का होतो तेव्हा ज्ञानाचा उपयोग सहज रीतीने स्वसन्मुख होतो व ज्ञानाची पर्याय सहजपणे स्वला जाणत उत्पन्न होते, त्रिकाली ध्रुव निजशुद्धात्म्याशी अभेदरूप होऊन शुद्धात्मानुभूति प्रकट होते. हाच सम्यग्दर्शन प्राप्तीचा समय आहे.

'स्वत:ला ओळखून स्वत:लाच जाणत रहा' ही तर उपदेशाची भाषा आहे. स्वत:ला जाणल्यानेच कल्याण होणार आहे हे लक्षात आल्यानंतर 'आता मला आपला उपयोग परापासून हटविला पाहिजे, स्वकडे नेला पाहिजे' अशी कोणतीही कसरत करावी लागत नाही.

आपल्याला कोठे धोका आहे व कोठे नाही तसेच कोठे फायदा आहे हे एकेंद्रियादि सर्वच जीवांना कळते. नाही ना खरे वाटत? वनस्पतिकायिक जीव हा एकेंद्रिय जीव आहे. आपल्या घरात ठेवलेली फुलझाडे, रोपटी सूर्यप्रकाशाच्या दिशेने वाढतात, लाजाळूच्या झाडाला हात लावताच पाने मिटतात. मुंग्या, किडे, कीटक डोळे व कान नसतानाही धोक्याची जाणीव होताच दूर पळतात, खाद्य अखाद्य पदार्थांचा निर्णय करतात.

आपण तर संज्ञी पंचेंद्रिय मनुष्यपर्यायातील जीव आहोत, खऱ्या देव, गुरु, शास्त्रांचा समागम व उपदेश मिळाल्यावर स्वत:चे कल्याण कशात आहे हे ठरविण्याएवढा विवेक नक्कीच आपल्याजवळ आहे. असे असतानादेखील अनादि अज्ञानाच्या संस्कारामुळे हा जीव काहीतरी करू पहातो. त्याची ही 'करू करू' ची वृत्ति पाहून त्याला सांगण्यात येते की 'बाबा रे! तू तुझा उपयोग स्वसन्मुख कर.' परंतु सत्य गोष्ट तर अशी आहे की स्व संबंधी ज्ञान झाल्यानंतर 'स्व' ची अपूर्व महिमा जागृत होते तेव्हा उपयोग सहजच स्व ला पकडतो - 'स्व' ज्ञानाचे ज्ञेय बनते, करावे लागत नाही. त्यासाठी क्रमबद्धपर्यायाचा, सर्वज्ञतेचा, स्वाधीन कारण-कार्य व्यवस्थेचा सम्यक् निर्णय होणे अत्यावश्यक आहे.

जिनागमाचा कोठलाही अनुयोग, कोणतेही प्रकरण, कोणतेही पान काढून पहा त्याच्या कथनाद्वारे क्रमबद्धपर्यायाची सिद्धि होते. त्यापैकी काही हेतु (पुरावे) आपण पुढील पत्राद्वारे पाहूया.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# क्रमबद्धपर्याय - सिद्धि

पत्रांक १४ २५ जुलै २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

गेल्या पत्रामध्ये आपण कालचक्राचे स्वरूप पाहिले होते. अवसर्पिणी व उत्सर्पिणी मिळून एक कल्पकाळ होतो जो २० कोडाकोडी सागराचा असतो - हे वर्णन वाचून तुम्ही मोठे आश्चर्य व्यक्त केलेत. पूर्वी होऊन गेलेल्या डायनोसोरस किंवा इतर महाकाय प्राण्यांचे अवशेष सापडल्याने सध्याच्या युगातील वैज्ञानिक अनेक कारणे शोधण्याचा प्रयत्न करतात. परंतु अवसर्पिणी काळ व त्यामध्ये होणारे परिवर्तन पाहिले की आश्चर्य वाटेनासे होते.

पूर्वी एवढी मोठी माणसे व तिर्यंच कसे असू शकतील असा प्रश्न पडण्याचे काहीच कारण नाही. वटवृक्षासारख्या अनेक प्रचंड वृक्षांनादेखील सध्या 'बॉनसाय' पद्धतीने काही इंचांचे झालेले आपण प्रत्यक्ष पहातो. फूटभर वृक्ष पूर्ण विकसित फळा फुलांनी बहरलेला आपण पहातो तसेच हे आहे.

एकामागून एक अशा अनंत कल्पकाळांचे हे रहाटगाडगे अनादिपासून चालत आले आहे, अनंत काळपर्यंत चालतच रहाणार. आपण आज अस्तित्वात आहोत - आपण म्हणजे जीवद्रव्य. जो जो अस्तित्ववान आहे, त्याचे अस्तित्व अनादिअनंत विद्यमान रहात असते. याचा अर्थ असा की अनादिपासून अनंतानंत कल्पकाळ होत आले तरीदेखील आपण जन्म मरण, जन्म मरण करतच आहोत. या भवामध्ये जर सम्यग्दर्शनाची प्राप्ति केली नाहीत तर अजूनही अनंत काळ असेच भटकण्याचा विचार आहे की काय?

तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्याने प्राप्त संयोग सुटून जातील की काय याची भीति बाळगण्याचे कारण नाही.

आपल्याला वाटते पैशामुळे संयोग प्राप्त होतात. त्यासाठी अथक परिश्रमाने आपण पैसे मिळवितो. तेव्हा लक्षात येते की पैसे असले तरी विशिष्ट वस्तु प्राप्त होण्यामध्ये अनेक अकल्पित

विघ्नं येतात. आपण ठरवतो काही व होते वेगळेच काही. त्यापायी चिंतेने अर्धमेले होण्याची पाळी येते. सर्वसामान्य लोकदेखील असे म्हणतात की, 'भाग्य से अधिक और समय से पहले कुछ नहीं मिलता ।'

एवढे करून विशिष्ट संयोग प्राप्त झाले तरीदेखील आता त्यातल्या कटकटी लक्षात येतात, सुख वाटेनासे होते किंवा इतर गोष्टींच्या प्राप्तीची इच्छा उत्पन्न होते व हा जीव दु:खीच रहातो.

अज्ञानी जीवाला स्वत:मध्येच असणाऱ्या स्वाधीन, सहज सुखाची माहितीच नाही. कोणी उपदेश दिला तर त्यावर त्याचा विश्वास बसत नाही. या जीवाने आतापर्यंत अनंत भव धारण केले. प्रत्येक भवात याने संयोगप्राप्तिसाठी जीवन बरबाद केले. परंतु ते संयोग सोडून - मरण होताच दुसरीकडे जन्म घेण्यास निघून गेला.

मुलींनो, आपण या भवात देखील निरंतर रागद्वेष, इच्छा करून हा संयोगाचा - परिग्रहाचा डोलारा उभा केला आहे तो काही आपल्याबरोबर परभवात येणार नाही. परंतु कषायापोटी बांधलेले कर्म मात्र बरोबर येणार आहे, भविष्यात त्याचे फळही भोगावे लागणार आहे.

असाच मूर्खपणा अजून किती भवांपर्यत चालू रहाणार आहे याचा हा विवेकी जीव विचारच करत नाही. या जीवाला विवेक म्हणजे ज्ञान आहे परंतु विवेक म्हणजे स्वत:च्या हिताचा किंवा अहिताचा ज्याला विचार नाही, त्याला विवेकी म्हणावे की अविवेकी?

असो. क्रमबद्धपर्यायाचा सिध्दांत सिद्ध करण्यासाठी आपण सर्वज्ञता हा सर्वात बलवान 'हेतु' पाहिला, त्याचप्रमाणे प्रवचनसारमध्ये प्रदेशांच्या दृष्टांताद्वारे पर्यायांचा अचलपणा सिद्ध केला आहे हेही पाहिले. संपूर्ण जिनागमामध्ये क्रमबद्धपर्यायाची पुष्टी करणारी अनेक कथनं आढळतात. जिनागम चार अनुयोगांमध्ये विभाजित आहे. आता आपण चारही अनुयोगातील काही उदाहरणांद्वारे, त्यांच्या आधारे क्रमबद्धपर्यायाची सिद्धि कशी होते ते पाहूया.

**(१) प्रथमानुयोगाच्या आधारे क्रमबद्धपर्यायाची सिद्धि -**

संपूर्ण प्रथमानुयोग सर्वज्ञ भगवान, अवधिज्ञानी मुनि किंवा मन:पर्ययज्ञानी मुनिंनी केलेल्या भविष्यकालीन व भूतकालीन सुनिश्चित घोषणांनी युक्त आहे. जसे -

(१) भगवान नेमिनाथांनी द्वारका जळण्याविषयीची घोषणा बारा वर्षे आधीच केली होती. त्याचबरोबर हेही सांगितले होते की कोणत्या निमित्ताने, कशी व कधी जळेल, त्यामध्ये कोण वाचेल. निमित्ताधीन दृष्टिवाले लोक निमित्त टाळण्यामध्ये प्रयत्नशील झाले, परंतु झाले तेच जे क्रमबद्ध होते व सर्वज्ञांनी जाणून जे सांगितले होते.

(२) भगवान आदिनाथांनी मारीचिच्या भविष्याबाबतीत सारे काही १ कोडाकोडी सागर वर्षांपूर्वीच घोषित केले होते. ते चोवीसावे तीर्थंकर होतील, त्यांचे माता-पिता कोण होतील वगैरे साऱ्या गोष्टी जशा सांगितल्या होत्या तशाच घडल्या. त्यामधल्या प्रत्येक भवासंबंधी, प्रत्येक समयाच्या परिणामांसंबंधी, बांधल्या जाणाऱ्या कर्मप्रकृतिंसंबंधी साऱ्या भविष्यकालीन घटना त्यांनी केवलज्ञानाद्वारे युगपत् आधीच जाणल्या होत्या.

(३) अष्टांगनिमित्तज्ञानाद्वारे भविष्यासंबंधीच्या गोष्टी जाणल्या जाऊ शकतात. आचार्य भद्रबाहुंनी निमित्त ज्ञानाच्या आधारेच उत्तरभारतात १२ वर्षे दुष्काळ पडेल असे सांगितले होते, तेही खरे झाले.

(४) सम्राट चंद्रगुप्तांच्या स्वप्नांच्या आधारे आचार्य भद्रबाहुंनी भविष्यकालीन अनेक गोष्टींविषयी भाकित केले होते, ज्याची प्रचीति आज आपणास येत आहे.

(५) अनेक अवधिज्ञानी मुनींनी जीवांच्या आयुसंबंधी, पूर्वभवांसंबंधी कथन केलेले आपण प्रथमानुयोगामध्ये वाचतो.

परंतु एकानेही असे सांगितलेले नाही की ही घटना घडणार आहे त्यासाठी तुम्ही हा उपाय कराल तर ती टळेल. जर विशिष्ट घटना टळू शकत असेल तर ती क्रमबद्ध कशी असेल? आजकाल ज्योतिष शास्त्राच्या आधारे भविष्य वर्तवून लोकांकडून अनेक उपाय करविले जातात, ग्रहादिंच्या शांतिसाठी व दुसऱ्या

अनेक उपायांच्या नावाखाली गृहीत मिथ्यात्वाचे पोषण केले जाते. त्याचे एकच कारण हे आहे की जीवांना क्रमबद्धपर्यायाचे ज्ञान नाही व सर्वज्ञतेच्या खऱ्या स्वरूपाची ओळख नाही.

**(२) करणानुयोगाच्या आधारे क्रमबद्धपर्यायाची सिद्धि -**

करणानुयोग अहेतुवाद आगम आहे. असे का ? या प्रश्नाला तेथे थारा नाही. सर्वज्ञांनी आपल्या दिव्य केवलज्ञानाद्वारे प्रत्यक्ष स्पष्ट जाणून हे सारे कथन केले आहे. यामध्ये अनेक नियम, गणिताची सूत्रं, त्रिलोकाची रचना वगैरे सांगितले आहे. जर कोणी विचारले, दोन अधिक दोन चारच का? सूर्य पूर्वेलाच का उगवतो? तर या प्रश्नांचे उत्तर हेच आहे की तसे आहे म्हणून सांगितले जाते.

हां, न्यायशास्त्र, द्रव्यानुयोग यांना तर्क, अनुमान, युक्ति, आगम यांच्याद्वारे आपण सिद्ध करू शकतो. परंतु करणानुयोगामध्ये आगम म्हणजे सर्वज्ञाची वाणी हाच एकमेव आधार आहे. करणानुयोगातील काही सिद्धांत पाहूया.

(१) दर ६ महिने व ८ समयांमध्ये ६०८ जीव नित्य निगोदामधून निघतात व एवढ्या वेळात एवढेच जीव मोक्षाला जातात.

(२) त्रसपर्यायाची उत्कृष्ट स्थिति साधिक दोन हजार सागर वर्ष आहे. एखादा जीव अधिकात अधिक इतकी वर्षं द्वींद्रियादि पर्यायांमध्ये जन्म मरण करत राहून परत निगोदामध्ये जातो. त्यामध्ये मनुष्यभवांची संख्या फक्त ४८ आहे. ही अधिकात अधिक शक्यता आहे. चारही गतिंमधील जीवांची संख्या निश्चित आहे. एखाद्या पर्यायात अधिक जीव तर एखाद्या पर्यायात कोणी जीवच नाहीत असे होऊ शकत नाही.

(३) जीवसमास, गुणस्थान, पर्याप्ति, प्राण, संज्ञा, उपयोग व गति आदि चौदा मार्गणा या वीस प्ररूपणांचे सविस्तर वर्णन, त्यामध्ये जीवांची संख्या, त्यांच्या भावांचे परिमाण, त्यांचे आपापसातील प्रमाण, जीवाच्या कोणत्या परिणामांद्वारे कोणत्या कर्मप्रकृति बांधल्या जातात, कोणकोणत्या मार्गणेच्या जीवांना कसे कसे बंध, उदय होतात या साऱ्या गोष्टी निश्चित आहेत. त्या

क्रमबद्धपर्यायाला सिद्ध करतात. सर्वज्ञ तर या नियमांना जाणतात व कथन करतात, परंतु त्यांना बनवित नाहीत.

(४) प्रत्येक मिथ्यादृष्टि जीवाला पाच परावर्तनरूप संसारामध्ये फिरावे लागते. या पाच परावर्तनाचे स्वरूप लक्षात आले तर क्रमबद्धपर्याय व सर्वज्ञता यांची सिद्धि तर होतेच, शिवाय संसारात रस रहात नाही, भवभ्रमणाचे भय वाटू लागते आणि सर्वज्ञस्वभावी निजशुद्धात्म्याचे ज्ञान-ध्यान होते.

(५) भूत-वर्तमान-भविष्य तीर्थंकरांची संख्या व नावे निश्चित आहेत. त्यांच्या पूर्वभवातील नावे देखील जिनागमात लिहिलेली आहेत. क्रमबद्धपर्यायाच्या या गोष्टींवर विश्वास न ठेवणारे जीव तीर्थंकर किंवा चक्रवर्ती बनण्याची स्वप्नं पहातात. परंतु या पदांची इच्छा करणाऱ्याला त्या पुण्यप्रकृति बांधल्या जात नाहीत. विशिष्ट बंध करण्यायोग्य - उपादेय मानल्याने त्याची बंधतत्त्वाविषयीची व अन्य सर्व तत्त्वांविषयीची विपरीत मान्यता असल्याने त्याचे मिथ्यात्व कायम रहाते. मिथ्यात्व अवस्थेमध्ये असे सातिशय पुण्य बांधले जात नाही.

(६) शास्त्रामध्ये सांतरमार्गणा, निरंतर मार्गणा सांगितल्या आहेत. निरंतर मार्गणेमध्ये विशिष्ट गुणस्थानांमध्ये कायम कोणी ना कोणी जीव असतातच. जसे, मिथ्यात्व नामक पहिले गुणस्थान, अविरत सम्यक्त्व नामक चौथे गुणस्थान, देशविरत नामक पाचवे गुणस्थान, प्रमत्तविरत व अप्रमत्तविरत नामक सहावे व सातवे गुणस्थान, सयोगकेवली नामक तेरावे गुणस्थान या गुणस्थानांमध्ये सदैव कोणी ना कोणी जीव असतातच.

तेराव्या गुणस्थानातील जीव सर्वज्ञ असतात. यावरून सर्वज्ञाची निरंतर उपस्थिति - कोणत्या ना कोणत्या क्षेत्रात तीर्थंकरांची व अन्य अरहंतांची सदैव उपस्थिति सिद्ध होते.

सांतर मार्गणेमध्ये नाना जीवांच्या अपेक्षेने दुसऱ्या, तिसऱ्या इत्यादि गुणस्थानांमध्ये कमीत कमी एकसमय व अधिकात अधिक विशिष्ट काळापर्यंत कोणीच जीव नाही अशी शक्यता असू शकते.

मार्गणा व गुणस्थानांचा 'काल' देखील निश्चित असतो. 'करणानुयोग परिचय' पुस्तकात गुणस्थानांचा जघन्य व उत्कृष्ट

काल, त्यातील गमनागमन आपण विस्ताराने पाहिले होते. गुणस्थानातील 'अंतर' देखील निश्चित असते. एखादा जीव समजा पहिल्या गुणस्थानातून वरच्या गुणस्थानात (४ थ्या, ५ व्या, ७ व्या वगैरे) गेला तर फिरून पहिल्या गुणस्थानात येण्यास कमीत कमी किंवा अधिकात अधिक किती काळ लागू शकतो यास मिथ्यात्व गुणस्थानाचे 'अंतर' म्हणतात.

जो सम्यक्त्वातून भ्रष्ट होऊन मिथ्यात्वात जातो व फिरून सम्यक्त्व प्राप्त करतो अशा जीवाचे सम्यक्त्वाचे अंतर कमीत कमी एक अंतर्मुहूर्त व अधिकात अधिक अर्धपुद्‌गलपरावर्तन काळ एवढे आहे, जो अनंत काळ आहे. हे एका जीवाच्या अपेक्षेने आहे. मोक्षाला जाणाऱ्या सर्व जीवांमध्ये अधिकात अधिक सहा महिन्यांचे अंतर पडू शकते व उरलेल्या ८ समयांमध्ये ६०८ जीव मोक्षास जातात.

प्रत्येक गुणस्थानातील जीवांची संख्या निश्चित आहे. एका समयात अधिकात अधिक किती जीव मोक्षास जाऊ शकतात, एकाच वेळी अधिकात अधिक किती केवलीभगवान केवली समुद्‌घात करतात यांची संख्या निश्चित आहे.

अशाच प्रकारच्या अन्य अनेक गोष्टी आहेत. कर्माच्या बंध, सत्ता, उदय आदि अवस्थांचे सूक्ष्म विवेचन आहे. उपशम श्रेणी चढणाऱ्या जीवांच्या कर्मामध्ये होणारी सर्व परिवर्तनं तसेच जीवाच्या भावांमध्ये होणारी परिवर्तनं याला उपशम विधान म्हणतात त्याचे विवेचन आहे. क्षपक श्रेणी चढणाऱ्या जीवांचे परिणाम, कर्मांचा क्षय-क्षपणा कशाप्रकारे होते, कोणकोणत्या गुणस्थानांमध्ये कोणत्या प्रकृतिंचा क्षय होतो इत्यादि क्षपणाविधान या साऱ्या गोष्टी लब्धिसार, क्षपणासार इत्यादि ग्रंथांमध्ये आढळतात.

हे सारे सूक्ष्म विवेचन वाचून सर्वज्ञता आणि क्रमबद्धपर्याय यांविषयी पक्की खात्री पटते. केवलज्ञानाची महिमा येते. आणि मीही सर्वज्ञ स्वभावी जीवद्रव्य आहे हे लक्षात येऊन दृष्टि स्वभावसन्मुख होते.

म्हटलेच आहे, चारही अनुयोगांचे सार वीतरागता आहे अर्थात् आत्मानुभूति हेच जिनशासन आहे.

**(३) चरणानुयोगाच्या आधारे क्रमबद्धपर्यायाची सिद्धि -**

रत्नकरंड श्रावकाचार, कार्तिकियानुप्रेक्षा, अष्टपाहुड, भगवती आराधना, पुरुषार्थसिद्ध्युपाय इत्यादि चरणानुयोगाच्या ग्रंथांद्वारे सर्वज्ञता व क्रमबद्धपर्याय यांची सिद्धि होते. देव, शास्त्र, गुरुंचे स्वरूप, पंच परमेष्ठींचे स्वरूप जाणून सर्वज्ञतेचे खरे स्वरूप लक्षात येते. श्रावक तसेच मुनि यांच्या आचरणाविषयीचे कथन वाचून, सम्यग्दर्शनपूर्वकच हे व्रतादि होतात असे निरूपण वाचल्याने मोक्षमार्गासंबंधी पर्यायांचा क्रम लक्षात येतो. सम्यग्दर्शनाविना बाह्य आचरणाला बालव्रत व बालतप म्हटले आहे. 'अंकाविना नुसती शून्यं' असे म्हटले आहे.

अंतरंग वीतरागतेनुसार बाह्य आचरणाचा सुमेळ असतोच, तो सहज असतो, असा सहज निमित्त नैमित्तिक संबंध लक्षात येतो.

चरणानुयोगात खाद्य-अखाद्यासंबंधी, आचरणासंबंधी, अहिंसात्मक प्रवृत्तींविषयी उपदेश दिला जातो, त्याला सर्वज्ञतेचा भक्कम आधार आहे. जीवसमासामध्ये १४ प्रकारचे जीवांचे भेद, त्यांचे पर्याप्त, अपर्याप्त भेद, हे जीव कोठे आढळतात, सम्मूर्च्छन जीवांची उत्पत्ति कोठे व कशी होते, निगोद जीव एकाच शरीरात अनंत रहातात ते कोठे कोठे आढळतात इत्यादि गोष्टी सर्वज्ञाशिवाय इतर कोणीही सांगू शकत नाही. सर्वज्ञाच्या आगमाद्वारेच आपण या जीवांचा निर्णय करून त्यांची हिंसा टाळण्याविषयी प्रयत्नशील राहू शकतो, खबरदारी घेऊ शकतो, हिंसारूप पापापासून स्वतःचा बचाव करू शकतो.

अशाप्रकारे सर्वज्ञतेला सिद्ध करणारे चरणानुयोगातील कथन हे क्रमबद्धपर्याय सिद्ध करणारे प्रमाण आहे.

**(४) द्रव्यानुयोगाच्या आधारे क्रमबद्धपर्यायाची सिद्धि-**

समयसार, प्रवचनसार, पंचास्तिकाय संग्रह, तत्त्वार्थसूत्र आणि त्याच्या टीका - सर्वार्थसिद्धि, तत्त्वार्थराजवार्तिक, तत्त्वार्थश्लोकवार्तिक आदि, अष्टशती, अष्टसहस्री, आप्तमीमांसा, परमात्मप्रकाश, योगसार प्राभृत, मोक्षमार्गप्रकाशक

इत्यादि ग्रंथांच्या आधारे क्रमबद्धपर्यायाची सिद्धि होते. ती याप्रकारे -

(१) द्रव्य, गुण, पर्यायांचे खरे स्वरूप जाणल्याने सर्वज्ञाची सिद्धि होते. जातिअपेक्षा सहा द्रव्य, प्रत्येकाची संख्या, त्यांचे प्रदेश (क्षेत्र), प्रत्येक द्रव्याचे अनंतगुण, त्या सर्वांच्या तिन्ही काळाच्या सुनिश्चित पर्याय व त्यांचेही अविभाग प्रतिच्छेद युगपत् प्रत्यक्ष स्पष्ट जाणून त्याचे कथन करणारे सर्वज्ञच असू शकतात, अन्य कोणी नाही.

एकेका समयाच्या पर्यायाची सुनिश्चितताही सर्वज्ञतेला व क्रमबद्धपर्यायाला सिद्ध करते. समजा, एखादा एक विशिष्ट पर्याय तिच्या निश्चित स्थानावरून (समयावरून) हटवू इच्छित असेल तर ती पर्याय तो कोठे ठेवेल? आणि जी जागा रिकामी होईल तेथे कोणती पर्याय आणेल? पर्यायांची श्रृंखला तुटल्याने द्रव्य खंडित होईल, नष्ट होईल व द्रव्य नष्ट झाल्याने एक एक द्रव्याचा नाश होत विश्वाच्या नाशाचा प्रसंग उद्भवेल. सर्वज्ञताच धोक्यात येईल. अनादिपासून आजपर्यंत जितके अनंत तीर्थंकर झाले त्या सर्वांचा निषेध होईल. परंतु असे कधी होऊ शकत नाही.

(२) प्रत्येक पर्यायाचा स्वत:चा जन्मक्षण असतो, स्वकाल असतो. द्रव्याच्या अनादि-अनंत प्रवाहक्रमामध्ये प्रत्येक पर्याय निश्चित स्थानावर खचित आहे, विराजमान आहे.

(३) पाच समवाय - प्रत्येक पर्यायाच्या अर्थात कार्याच्या उत्पत्तिमध्ये स्वभाव, पुरुषार्थ, काललब्धि, भवितव्य व निमित्त असे पाच समवाय असतात व ते निश्चित असतात. याची चर्चा आचार्य सिद्धसेन यांनी 'सम्मईसुत्तं' मध्ये व आचार्य रविषेण यांनी 'पद्मपुराण' मध्ये केली आहे. यावरून क्रमबद्धपर्यायाची सिद्धि होते.

(४) कारण-कार्य संबंध व (५) निमित्त-उपादान.

प्रत्येक कार्यामध्ये अनेक कारणं असतात व ती निश्चित असतात. त्यापैकी उपादान कारणांमध्ये त्रिकाली उपादान, अनंतरपूर्व क्षणवर्ती पर्यायाच्या व्ययरूप क्षणिक उपादान व तत्समयाच्या पर्यायाची योग्यता हे क्षणिक उपादान आहेत, जे

सारे निश्चित आहेत. निमित्त ही अन्य द्रव्याची पर्याय आहे जी आपल्या स्वकालामध्ये प्रकट होते. यावरून पर्यायांची व त्यांच्या क्रमाची सुनिश्चितता लक्षात येते.

(६) स्वचतुष्टय - प्रत्येक द्रव्य स्वतःच्या द्रव्य, क्षेत्र, काल, भाव यामध्ये निबद्ध आहे. द्रव्याचा स्वकाल म्हणजेच अनादिअनंत पर्यायांचा क्रम - प्रवाह निश्चित आहे. द्रव्याचे द्रव्य, क्षेत्र, काल व भाव खंडित होऊच शकत नाही. तसे झाल्यास द्रव्याचा नाश होईल आणि विश्वाच्या नाशाचा प्रसंग येईल. यावरून पर्यायांच्या अनादिअनंत निश्चित क्रमाची सिद्धि होते.

(७) पर्याय सत् आहे - पर्याय देखील क्षणिक सत् आहे. जी आहे तिचा नाश होऊ शकत नाही. कोणीही पर्यायाला तिच्या स्वकालावरून - स्वसमयावरून हटवू शकत नाही.

(८) वस्तुस्वातंत्र्य - प्रत्येक द्रव्य स्वतंत्रपणे, स्वाधीनपणे आपल्या क्रमबद्धपर्यायांचा कर्ता आहे.

(९) अकर्तावाद - एक द्रव्य दुसऱ्या द्रव्याचा, दुसऱ्या द्रव्याच्या पर्यायाचा कर्ता नाही, तसेच स्वतःमध्येही क्रम सोडून वाट्टेल त्या पर्यायाचा कर्ता नाही.

(१०) ४७ शक्तिपैकी भाव, अभाव, भावअभाव, अभावभाव, भावभाव व अभावअभाव शक्ति हेच दर्शवितात की प्रत्येक समयामध्ये सुनिश्चित पर्यायाचा उत्पाद व सुनिश्चित पूर्व पर्यायाचा व्यय होतो. यांची चर्चा आपण पूर्वी केलीच आहे.

(११) कालनय व अकालनय - एखाद्या अपेक्षेच्या मुख्यतेने वस्तुला जाणणे किंवा कथन करणे याला नय म्हणतात. प्रवचनसार ग्रंथामध्ये ४७ नयांचे वर्णन आहे. आपण जे पाच समवाय पाहिले त्यामध्ये काल हे एक कारण आहे व स्वभाव, पुरुषार्थ, भवितव्य, निमित्त ही काल सोडून अन्य कारणं आहेत त्यांना अकाल म्हणतात. प्रत्येक पर्यायात एकावेळी पाचही कारणं उपस्थित असतात त्यापैकी काललब्धिला मुख्य करून अन्य चार कारणं गौण केली असता ' काललब्धिने कार्य होते' असे कथन 'कालनया'चे कथन आहे व कालाला गौण करून अन्य चार

कारणांना किंवा अन्य एकेक कारणाला मुख्य केले असता जे कथन होईल ते 'अकालनया'चे कथन होय.

कथन कालनयाचे असो वा अकालनयाचे, फरक फक्त कथनामध्ये आहे, कार्यामध्ये नाही. कार्य अर्थात पर्याय आपल्या स्वकाळातच होते अन्य काळात नाही तसेच निश्चित रूपाने जी पर्याय होणार असेल तीच होते अन्य नाही.

(१२) सम्यक् पुरुषार्थ - क्रमबद्धपर्यायाचे नाव ऐकून कोणाला प्रश्न पडतो की 'मग आमचा पुरुषार्थ काय राहिला?' कोणाला वाटते 'चला, बरे झाले. आता पुरुषार्थ न करताच माझे कार्य निश्चित वेळी होईल.' अशा जीवांना सांगावे लागते की कार्य होण्यासाठी अनेक कारणं एकत्रित येतात त्यामध्ये पुरुषार्थ हे एक कारण आहे. पुरुषार्थाविना तर कार्यच होत नाही. पुरुषार्थ करणाऱ्याला इतर कारणं सहज मिळतात.

(१३) सम्यक् नियतिवाद - पाच समवायांमध्ये पुरुषार्थाबरोबर 'नियति' सुद्धा एक कारण आहे. याला काललब्धि देखील म्हणतात. अन्य समवायांसह नियतिच्या मुख्यतेने कथन करणे हा सम्यक् नियतिवाद आहे. परंतु मिथ्या नियतिवादवाला फक्त काळालाच मानतो आणि पुरुषार्थाला उडवूनच लावतो.

(१४) ज्ञानस्वभाव व ज्ञेयस्वभाव - ज्ञानस्वभावाच्या पुरुषार्था द्वारे क्रमबद्धपर्यायाचा योग्य निर्णय करून जेव्हा पर्याय स्वसन्मुख होते तेव्हा एका समयामध्ये त्या पर्यायाचे पाचही समवाय हजर असतात. पुरुषार्थ तर होतो परंतु पर्यायाचा क्रमसुद्धा तुटत नाही.

(१५) क्रमवर्ती आणि अक्रमवर्ती - द्रव्य हे गुण आणि पर्यायवान असते. गुणांना अक्रमवर्ती व पर्यायांना क्रमवर्ती म्हणतात. कारण गुण एकावेळी विद्यमान असतात व पर्याय क्रमाने होतात. त्यांनाच सहभूवि किंवा सहवर्ती आणि क्रमभूवि असेही म्हटले आहे. गुण युगपत्-अक्रमबद्ध-सहवर्तीच असतात हा सम्यक् एकांत आहे. तसेच पर्याय एकानंतर एक निश्चित क्रमाने क्रमबद्धच असतात हाही सम्यक् एकांत आहे. द्रव्य गुणपर्यायात्मक असल्याने सम्यक् अनेकांत स्वरूप आहे.

(१६) सर्वज्ञता - याची आपण विस्ताराने चर्चा केलीच आहे. अनेक न्यायग्रंथांमध्ये सर्वाधिक चर्चा सर्वज्ञतेच्या सिद्धिविषयीच आहे. तत्त्वार्थसूत्रात म्हटलंय, ' सर्वद्रव्यपर्यायेषु केवलस्य ' अर्थात केवलज्ञान सर्व द्रव्यांच्या सर्व पर्यायांना जाणते. फक्त पर्यायांनाच जाणते असे नाही तर त्या पर्यायांच्या सर्व कारणांना, त्या पर्यायांच्या क्रमाला देखील जाणते, भविष्यकाळातील सर्व पर्यायांना जाणते. यावरून सिद्ध होते की सर्व पर्याय क्रमबद्धच परिणमतात. सर्वज्ञता हा क्रमबद्धपर्यायाला सिद्ध करणारा सर्वात प्रबळ हेतु (प्रमाण) मानला गेला आहे व सर्वज्ञतेची चर्चा जिनागमात सर्वत्र आढळते. जिनागमाचा मूळ कर्ताच सर्वज्ञ भगवान आहेत.

प्रवचनसार ग्रंथातील ' ज्ञानतत्त्वप्रज्ञापन ' नावाचा अधिकार सर्वज्ञतेची सिद्धि करणारा आहे, अमितगति आचार्यांचा योगसार प्राभृतही तसाच आहे.

प्रवचनसार ग्रंथामध्ये प्रदेशांच्या दृष्टांताद्वारे पर्यायांच्या क्रमबद्धतेची-अचलपणाची सिद्धि आपण पूर्वी विस्ताराने पाहिलीच आहे.

अशाप्रकारे संपूर्ण जिनागमामध्ये क्रमबद्धपर्यायाची सिद्धि केलेली आहे. मुलींनो, ग्रंथांद्वारे आपण फक्त या विषयाबाबत जाणू शकतो, परंतु निर्णय करण्यासाठी आपल्याला स्वसन्मुख होऊन-आपल्या ज्ञानस्वभावामध्ये लीन होऊनच हा सम्यक् निर्णय होतो. केवळ शास्त्रांमधून वाचणे व शास्त्रातील दाखले देणे ही तर पोपटपंची झाली.

आगम ग्रंथांचे मूळकर्ता श्री सर्वज्ञ भगवान आहेत. त्यांच्या वाणीद्वारे आपल्याला वस्तुस्वरूपाचे सम्यक् स्वरूप समजते. आपल्या बुद्धिद्वारे यथार्थ निर्णय करून स्वत:ला जाणल्याने, त्यामध्ये एकाग्र झाल्याने सम्यक्त्वाची प्राप्ति होते, अतींद्रिय आनंदाची अनुभूति होते, निराकुलता प्राप्त होते.

यासाठी नक्की काय करायचे याविषयीची चर्चा आपण पुढील पत्राद्वारे करूया.

जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**

# आत्मानुभूति

पत्रांक १५ १५ ऑगस्ट २००१

प्रिय सौ. रीना व सौ. मोना,

अनेक उत्तम शुभाशिर्वाद.

क्रमबद्धपर्यायाच्या सविस्तर चर्चेने तुमच्या अनेक शंकांचे निरसन झाले व चारही अनुयोगातील दाखले वाचून तुम्ही खूपच प्रभावित झाला आहात असे तुम्ही लिहिलेत. वारंवार त्याचेच विचार येतात व आत्मानुभूति करण्याची तीव्र उत्कंठा जागृत झाल्याचेही तुम्ही फोनवर सांगितलेत. स्वसन्मुखता करायची म्हणजे नक्की काय करायचे असा तुमचा प्रश्नही समजला. आत्मानुभूतिची ही कला आम्हालाही शिकव ना अशी तुम्ही आवर्जून विनंती केलीत. आज आपण त्याबाबतीत चर्चा करूया.

चर्चा केल्याने किंवा ऐकल्याने आत्मानुभूति होणार नाही हे सर्वप्रथम ध्यानात घ्या. आपण रस्त्यावर मार्गदर्शक पाट्या पहातो. त्यावर गावाचे नाव व दिशा दाखविली जाते, मार्गाचा इशारा दिला जातो परंतु मार्गक्रमण तर आपल्यालाच करावे लागते. तद्वतच चर्चेद्वारे हे सारे मार्गदर्शन आहे. ते जाणून त्यारूपाने परिणमन करणे हे तर तुमचे तुम्हालाच करावे लागणार आहे.

पुरुषार्थाच्या मुख्यतेनेच मोक्षमार्गाचा उपदेश दिला जातो की, ''हे जीवा! अत्यंत दुर्लभात दुर्लभ असा मनुष्यभव, इंद्रियांची पूर्णता, शारीरिक स्वास्थ्य व महान पुण्याच्या उदयामध्ये प्राप्त असा सर्वज्ञकथित आगमाचा उपदेश तुला प्राप्त झाला आहे. अत्यंत निकृष्ट अशा या पंचम काळात असा महादुर्लभ योग तुला मिळाला आहे. तरी प्रथमात प्रथम आपले हित साधून घे अर्थात स्वत:ला ओळखून स्वत:ला जाण, सम्यक्त्व प्राप्त करून घे.' मी अभव्य असेन तर?' 'माझी काललब्धिच आली नसेल तर?' 'माझे भवितव्य काही वेगळेच असेल तर?' इत्यादि शंका उपस्थित करून गर्भगळित होऊ नकोस. म्हणतात ना 'रडत जाऊन मेल्याची खबर आणणे', तशी परिस्थिति होऊ देऊ नकोस''.

पुरुषार्थ करणाऱ्या जीवाला इतर सर्वच कारणं सहज मिळतात, निमित्तदेखील सहज मिळते. असाच सहज निमित्त नैमित्तिक संबंध असतो.

सम्यक्त्व प्राप्तिसाठी विशिष्ट पात्रता असणे जरूरीचे आहे. त्याची सविस्तर चर्चा आपण करणानुयोग परिचय पुस्तकात प्रकरण (पत्रांक) १० मध्ये केली आहे. ती पुन्हा एकदा वाचा.

मद्य, मांस, मध आणि पाच उदुम्बर फळांचा त्याग, कुदेव कुगुरु, कुशास्त्र यांचा त्याग, अन्याय, अनीति, अभक्ष्यभक्षण यांचा त्याग करणे ही तर पात्रता झाली. खऱ्या देव, गुरु (मुनि), शास्त्र यांची परीक्षापूर्वक स्वीकृति, त्यांच्या गुणांप्रति आदरभाव असणे आवश्यक आहे. जेव्हा त्यांचे स्वरूप समजून येते तेव्हा आदरभाव देखील सहजच वाटतो.

सर्वज्ञतेचा व क्रमबद्धपर्यायाचा निर्णय तसेच निमित्त उपादान, निमित्त-नैमित्तिक, निश्चय व्यवहार, चार अभाव व द्रव्य गुण पर्याय अर्थात द्रव्याचे सामान्य विशेष स्वरूप, सात तत्त्व अर्थात नऊ पदार्थ इत्यादि साऱ्या गोष्टींचे आगमानुसार ज्ञान व आपल्या बुद्धिद्वारे त्यांच्या योग्यपणाचा निर्णय या साऱ्या गोष्टी जरूरी आहेत.

या सर्व गोष्टींचा आपण विविध अंगांनी आत्तापर्यंत अभ्यास केला आहे. सात तत्त्वं शिकताना आपण 'जैनतत्त्व परिचय' मध्ये 'सात तत्त्व-आत्मानुभूति' या प्रकरणामध्ये आत्मानुभूतीची चर्चा केलीच होती. आज पुन्हा वेगळ्या दृष्टीने त्यावर चर्चा करूया.

आत्मानुभूति म्हणा, सर्वज्ञतेचा निर्णय म्हणा, क्रमबद्धपर्यायाचा निर्णय म्हणा हे सारे एकच आहे. हे काही शास्त्रज्ञानाने-शब्दज्ञानाने प्रकट होत नाही परंतु आत्मज्ञानाने - आत्म्याची दृष्टि केल्याने - जसे सर्वज्ञ भगवंतांनी शुद्ध ध्रुव आत्म्याचे स्वरूप सांगितले आहे तसे त्याला जाणल्याने हा निर्णय यथार्थ होतो. पर्यायांकडे पहात पहात क्रमबद्धपर्यायाचा निर्णय होत नाही परंतु त्रिकाल एकरूप एकसदृश अशा स्वभावाचे-ज्ञायकभावाचे-परमपारिणामिक भावाचे - शुद्धात्म्याचे लक्ष करून त्यात एकाग्र झाले असता हा निर्णय होतो अर्थात सम्यक्त्व प्रकट होते.

तुम्ही म्हणाल की ' द्रव्य कधीच पर्यायविरहित होऊ शकत नाही. तर मग पर्यायाला सोडून नुसता द्रव्यस्वभाव कसा बरे लक्षात येऊ शकेल ?'

आपल्या श्रुतज्ञानामध्ये मुख्य गौण करून जाणण्याची शक्ति आहे. आपण लौकिक जीवनात त्याचा पदोपदी वापरही करतो.

परंतु अध्यात्माच्या विषयात, जेव्हा आत्मानुभूतीचा विधि, मार्ग सांगितला जातो तेव्हा आम्हाला कसे जमणार म्हणून हा जीव हातपाय गाळून पुरुषार्थहीन होतो. अर्थात सम्यक् पुरुषार्थ न करता, दुसराच म्हणजे संसार परिभ्रमणाचाच पुरुषार्थ करतो. जसा मोक्षमार्ग व मोक्ष सम्यक् पुरुषार्थाने होतो तसाच संसारदेखील उलट्या पुरुषार्थानेच चालू रहातो.

मुख्य गौण करून जाणण्यासंबंधीचे उदाहरण आपण पाहूया. एखाद्या स्त्रीजवळ सोन्याच्या बांगड्या, हार, अंगठी व कानातले टॉप्स आहेत. त्यांचे डिझाईन, घडण पाहून ती नेहमी खूष होत असते. कोणी तिला विचारले की तुझ्याजवळ किती सोने आहे? अशावेळी सोन्याच्या बांगड्या, हार आदि अवस्था गौण करून ती सोने या एकाच दृष्टीने विचार करून सांगते की माझ्याजवळ अमुक इतके तोळे सोनं आहे. त्याच वस्तुंकडे बांगड्या, हार आदि अवस्थांच्या दृष्टीने पहाणे ही पर्यायदृष्टि, विशेषाला पहाणे आहे व त्याच वस्तुंकडे सोने या दृष्टिने पहाणे द्रव्यदृष्टि आहे - सामान्याला पहाणे आहे. वस्तु एकच, त्याकडे पहाण्याची दृष्टि वेगवेगळी आहे.

ही मुख्य गौण करण्याची कला आपल्या श्रुतज्ञानामध्ये आहे. यालाच नयज्ञान म्हणतात. सम्यक्ज्ञानीलाच खरे नय असतात. मुख्य तो निश्चय आणि गौण तो व्यवहार होय. अध्यात्मामध्ये नेहमी द्रव्यदृष्टि-सामान्यदृष्टि मुख्य असते म्हणून त्यालाच निश्चयनय म्हणतात.

सोन्याला मुख्य करताना अवस्था नाहीशा होत नाहीत व अवस्थांना मुख्य करताना सोने नाहीसे होत नाही.

त्याचप्रमाणे आपण आपल्या स्वद्रव्याचा विचार करूया. त्यामध्ये अनंतगुणस्वरूप एक, असंख्यात प्रदेशस्वरूप अभेद, नित्य, सामान्य स्वरूप आहे व त्याचबरोबर पर्यायांमध्ये विविधता आहे, गुणांमध्ये अनेकता, प्रदेशांमध्ये भेद, अनित्यता आहे, जे विशेष स्वरूप आहे. विशेष अर्थात पर्याय व्यक्त आहे व सामान्य अव्यक्त आहे तरीदेखील अविद्यमान नाही-प्रत्यक्ष विद्यमान आहे व स्वसंवेद्यमान आहे-स्वसंवेदनाच्या द्वारे जाणले जाऊ शकते.

द्रव्याच्या एका भागात सामान्य तर दुसऱ्या भागात विशेष असे नसते. जे क्षेत्र सामान्याचे आहे तेच क्षेत्र विशेषाचे आहे.

सोन्याच्या हारामध्ये जे क्षेत्र सोन्याचे आहे तेच क्षेत्र हाराचे आहे. सोने व हार या दोन सर्वथा भिन्न गोष्टी नाहीत, वस्तु एकच आहे, क्षेत्र एकच आहे.

आजपर्यंत आपण फक्त विशेषांकडे लक्ष देत आलो होतो. पर्यायांकडे पाहून आपण फक्त पर्यायाएवढेच आपल्याला मानले होते. त्या कारणाने निरंतर रागद्वेष आकुलताच होत राहिली. विशिष्ट पर्याय प्राप्त करण्याची, प्राप्त पर्याय टिकविण्याची, अनिष्ट वाटणारी पर्याय हटविण्याची चिंता सतत चालू राहिल्याने हा जीव दु:खीच होत राहिला होता.

ज्यावेळी जीव आपल्या सामान्य स्वरूपाला ओळखून त्याची दृष्टि करतो, त्यास स्वपणे स्वीकारून त्यास जाणत रहातो, त्यामध्ये मग्न होतो, लीन होतो, एकाग्र होतो, तेव्हा त्याला सहजच निराकुलतेची प्राप्ति होते. कारण सामान्य तर सदैव एकसमान-एकसदृश रहाते. त्यात बदल करण्याची चिंता उरत नाही. सामान्य तर सदैव प्राप्तच आहे-विद्यमानच आहे-प्रकटच आहे त्यामुळे प्राप्त करण्याविषयीची आकुलता समाप्त होते. सामान्य तर त्रिकाल आहे, परमइष्ट आहे त्यामुळे त्याला हटविण्याचा प्रश्नच नाही - कोणी हटवू शकतही नाही त्यामुळे तीही चिंता मिटते.

पर्यायामध्ये अनेक कारणं असतात, स्वभावाला कारणांची आवश्यकताच नाही. काललब्धि, भवितव्य, पुरुषार्थ, निमित्त हे तर पर्यायामध्ये लागू असतात, विशेषामध्ये असतात, सामान्यामध्ये नाही त्यामुळे तीही चिंता मिटते.

उलट या सामान्याची दृष्टि करण्याने पर्यायामध्ये विशेषता - शुद्धता - मोक्षमार्गाची सुरवात - वीतरागता प्रकट होते. आत्मानुभूतिरूप कार्य प्रकट होते. सामान्याला ' शुद्ध ' म्हणतात व विशेषाला ' अशुद्ध ' म्हणतात. सामान्य व विशेष हे अविनाभावी आहेत. विशेषविरहित सामान्य असत नाही व सामान्यविरहित विशेष असत नाही. जेथे विशेष आहे तेथेच सामान्य आहे. विशेषाचे व सामान्याचे क्षेत्र भिन्न नाही.

आरशाचेच उदाहरण पहा ना. आरशातील प्रतिबिंब हे आरशाचे विशेष आहे, आरसा सामान्य आहे. आरशाचे जेवढे क्षेत्र आहे त्यात सर्वत्र प्रतिबिंबं आहेत. स्वच्छत्व अर्थात

रिफ्लेक्टिव्हिटी आरशाचा गुण आहे तो आरशाच्या संपूर्ण क्षेत्रात रहातो. प्रतिबिंब अर्थात रिफ्लेक्शन ही आरशाची अवस्था आहे तीदेखील त्या संपूर्ण क्षेत्रात आढळते. रिफ्लेक्शन रिफ्लेक्टिव्हिटीला सिद्ध करते. प्रतिबिंब आरशाच्या स्वच्छतेला जाहिर करते अर्थात आरशाचा निर्णय प्रतिबिंबामुळे होतो.

आपल्याला आरसा पहायचा असेल तर प्रतिबिंबांना गौण करून आपण आरशाला पहातो. आरशाच्या लाकडी चौकटीत काही प्रतिबिंब दिसत नाही, त्यामुळे लाकडाला आपण आरसा म्हणतही नाही. जेवढ्या क्षेत्रात प्रतिबिंब आढळते अर्थात स्वच्छता आढळते तोच तर आरसा आहे.

मुख्य गौण करण्याच्या कलेचा प्रयोग तर आपण रोज आरशासमोर करतच आलो आहोत. मला सांगा रोज तुम्ही आरशात पहाता, आरशासमोर उभ्या रहाता ते आरसा पहाण्यासाठी की त्यातले तुमचे प्रतिबिंब पहाण्यासाठी? त्यावेळी तुम्ही आरशाला गौण करून प्रतिबिंबाला पहाता. आरशाच्या संपूर्ण क्षेत्रात कोणते ना कोणते प्रतिबिंब आढळतेच, त्या सर्वांना तुम्ही पहात रहाता - न्याहाळता की फक्त तुमच्याच प्रतिबिंबाला न्याहाळता? अन्य सर्व गोष्टींचे प्रतिबिंबही समोर दिसतच असते परंतु तिकडे आपले लक्ष असत नाही. आपल्या प्रतिबिंबावर आपले सारे ध्यान केंद्रित होते.

हे ध्यान कोणी शिकवावे लागते का? ते प्रतिबिंब माझे आहे अशी मान्यता असल्याने त्याचे ध्यान - त्यावर लक्ष देऊन न्याहाळणे सहजच होते. आत्म्याचे ध्यान करायला मात्र आपण 'कोणाकडे जाऊन मला ध्यानाचे धडे घ्यावे लागतील' अशी कल्पना करतो. आरशाचे प्रतिबिंब न्याहाळताना ती आरशाची अवस्था आहे म्हणून नव्हे तर आपलाच चेहरा आहे या भावनेने आपण मोठ्या आत्मीयतेने त्याकडे पहातो. प्रतिबिंब पहात असताना निर्णय मात्र आपल्या स्वत:चा करत असतो.

शास्त्रामध्ये सिद्धांचे ध्यान करा, सिद्ध आदर्श आहेत असे कथन येते. आरशालाही आदर्श म्हणतात. आरशामध्ये शरीराचे प्रतिबिंब दिसते त्याप्रमाणे सिद्धांमध्ये आपल्या स्वभावाचे प्रतिबिंब दिसते. सिद्धांचे स्वरूप लक्षात आल्यावर हे समजते की त्यांचा जसा स्वभाव आहे तसा पर्यायामध्ये पूर्ण प्रकट झालेला आहे.

स्वभाव तर सर्व जीवांचा समानच असतो. आपला स्वभावही असाच आहे.

म्हणून सिद्धांच्या स्वरूपाचे चिंतन केले असता आपल्याला आपल्या स्वभावाचे ज्ञान होते. ती सिद्धांची अवस्था म्हणून नव्हे परंतु माझ्या स्वभावाचे प्रतिबिंब आहे - माझा स्वभावच आहे या भावनेने आपण त्याला जाणत राहातो. हेच तर ध्यान आहे.

' एकाग्रचिंता निरोधो ध्यानम् ' असे ध्यानाचे स्वरूप तत्त्वार्थसूत्रामध्ये सांगितले आहे. चित्त एकाच गोष्टीवर स्थिर करून - एकाग्र करून जाणत रहाणे हेच तर ध्यान आहे. हे ध्यान अशुभ गोष्टींचेही होऊ शकते. जसे, आर्त व रौद्र ध्यान. इष्टवियोगाबद्दल, अनिष्ट संयोगाबद्दल, पीडा-वेदनेचे किंवा भविष्यकालीन निदान - मनोरथ यांचे चिंतन करून दु:खी होणे हे आर्तध्यान आहे. हिंसा, असत्य, चोरी, परिग्रहासंबंधी चिंतवन करून आनंदित होणे हे रौद्रध्यान आहे.

आगमकथित तत्त्वांचे, कर्माच्या अवस्थांचे व त्यांच्या नाशाच्या उपायांचे, त्रिलोकाच्या रचनेचे, जिनेन्द्र भगवानांच्या आज्ञेचे चिंतवन करणे यास धर्मध्यान म्हटले आहे. शुद्ध आत्म्याचे चिंतन करून त्याला जाणत रहाणे, निर्विकल्प अनुभूति करणे हे खरोखरी म्हणजे निश्चयाने धर्मध्यान आहे.

शुक्लध्यान हे ८ व्या गुणस्थानापासून वरच्या गुणस्थानांमध्ये होत असते. त्यामध्ये जीवाचे अत्यंत विशुद्ध परिणाम असतात, वीतरागता अधिक असते. वीतरागतेसह तो आपल्या शुद्धात्म्याचे ध्यान करतो.

आपणा सर्वांची समस्या ध्यान कसे करायचे ही नसून ध्यानाचे ध्येय काय आहे, कशाचे ध्यान करावयास हवे या विषयीचे अज्ञान हीच मोठी समस्या आहे. आपले प्रयोजन मोक्षमार्गाचा प्रारंभ करून मोक्ष प्राप्त करणे हे आहे. त्यासाठी निज म्हणजे स्वत:च्या शुद्ध स्वरूपाला जाणायचे आहे. तुम्ही म्हणाल, 'आमच्यात अजून शुद्धताच कोठे आहे? की त्या शुद्धतेला आम्ही जाणावे? आमच्यात तर मोह, राग, द्वेषरूप अशुद्धताच आहे. हां, अरहंत सिद्धांचे ध्यान करायला सांगत असशील तर ठीक आहे कारण त्यांची शुद्ध पर्याय प्रकट आहे.'

पत्राच्या सुरवातीलाच मी सांगितले होते की सामान्याला शुद्ध म्हणतात. पुन्हा एकदा सांगते नीट लक्ष देऊन पहा हं!

शुद्ध-अशुद्ध म्हणण्याच्या दोन पद्धति आहेत. एक पद्धत अशी आहे की पर्यायामधील शुद्धता व अशुद्धता. संवर, निर्जरा, मोक्ष या शुद्ध पर्याय आहेत तर आस्रव, बंध या अशुद्ध पर्याय आहेत. दुसरी पद्धत अशी आहे की सामान्याला शुद्ध म्हणतात व विशेषाला-पर्यायाला अशुद्ध म्हणतात. या दुसऱ्या पद्धतिमध्ये पर्याय शुद्ध असो की अशुद्ध, दोन्हींना 'अशुद्ध' म्हणण्यात येते.

एका ज्ञान गुणावर घटविले असता ज्ञान गुण हे 'सामान्य' व मति, श्रुत, अवधि इत्यादि ज्ञानाच्या पर्याय 'विशेष' आहेत. परंतु एकेका गुणावर आपल्याला लक्ष केंद्रित करून चालणार नाही. कारण अनंत गुणांचा अखंड पिंड असे द्रव्य 'सामान्य' आहे. त्यामध्ये भेद पाडून एखाद्या गुणाचे किंवा अनेक गुणांचे भिन्न भिन्न कथन करणे हे 'विशेष' आहे. अखंड अभेद द्रव्यामध्ये कोणत्याही अपेक्षेने भेद पाडणे यालाच शास्त्रात पर्याय अर्थात विशेष म्हटले आहे, त्यादृष्टीने जाणणे ही पर्यायदृष्टि आहे.

द्रव्यामध्ये कोणताही भेद न करता प्रदेशांचा, गुणांचा अथवा कालअपेक्षेने प्रवाहक्रमाचाही भेद न करता, द्रव्याच्या 'सामान्य' स्वरूपाला ग्रहण करणे म्हणजे जाणणे ही द्रव्यदृष्टि आहे, यालाच शुद्धनय म्हटले आहे. नुसतेच जाणायचे नाही परंतु त्यामध्ये स्वपणा स्थापित करून 'हा मी आहे' अशाप्रकारे जाणायचे आहे. यालाच 'दृष्टीचा विषय' म्हटले आहे.

प्राथमिक भूमिकेमध्ये आत्म्याचे स्वरूप समजाविण्यासाठी शास्त्रामध्ये आत्म्याचे भेद करून कथन केले जाते. गुण, पर्याय आदिंचे स्वरूप समजाविले जाते. परंतु आत्मा तर वस्तुपणाने एक आहे, अभेद, अखंड आहे, नित्य त्रिकाल आहे. वस्तुची ही एकताच त्या वस्तुची शुद्धता आहे.

प्रत्येक द्रव्य सामान्य विशेषात्मक आहे. सामान्य तर सदैव तेच, एकरूप, ध्रुव रहाते व विशेष बदलत रहाते. जीव अवस्थारूपाने वेगवेगळा भासत असला तरी त्याच समयात तो सामान्याच्या अपेक्षेने एकच आहे. समयसार कलशमध्ये म्हटले आहे, 'नवतत्त्वगतत्वेऽपि यद् एकत्वं न मुंचति' अर्थात पर्यायामध्ये नऊ तत्त्वरूप होऊन सुद्धा द्रव्य आपले एकत्व - सामान्य स्वरूप कधीच सोडत नाही.

सामान्य व विशेष एकमेकांना कधीच सोडून रहात नाहीत. यासाठी सर्वप्रथम जीवाचे 'विशेष' जाणून जीवाचा निर्णय करावयास हवा व नंतर या विशेषांना गौण करून त्यांच्यामध्येच असलेल्या सामान्याला मुख्य करून जाणले पाहिजे.

'जैनतत्त्व परिचय' पुस्तकात चार्टद्वारे हे सारे समजाविले होते. वस्तु सामान्यविशेषात्मक आहे. प्रत्येक वस्तु स्वचतुष्टयाने युक्त असते अर्थात स्वतःच्या द्रव्य, क्षेत्र, काल, भावाने युक्त असते. त्या प्रत्येकामध्ये द्रव्य अंश (सामान्य) व पर्यायअंश (विशेष) केले असता प्रत्येक द्रव्यामध्ये द्रव्यअपेक्षेने सामान्य-विशेष, क्षेत्रअपेक्षेने अभेद-भेद, कालअपेक्षेने नित्य-अनित्य व भावअपेक्षेने एक-अनेक असे पैलू आहेत.

यापैकी सामान्य, अभेद, नित्य, एक असा हा 'दृष्टीचा विषय' आहे. असे चार भेदही न पाडता जो एक आहे त्यावर दृष्टि केंद्रित केली असता, जाणणारी पर्याय त्याच्याशी एकमेक झाली असता अभेद म्हणजेच निर्विकल्प आत्मानुभूति होते. त्यावेळी विकल्प म्हणजे भेदही नसतो व विकल्प म्हणजे रागही नसतो.

यासाठी म्हटले आहे की निजशुद्ध भगवान आत्म्याला जाणा. पहा, त्याला 'जाणा' म्हटलंय, त्याबद्दल नुसते विकल्प करणे, मी शुद्ध बुद्ध ज्ञाता दृष्टा म्हणत बसणे, सिद्धांचे जाप देणे हे कार्यकारी नाही. तुम्ही म्हणाल, 'शास्त्रातच सिद्धांचे, अरहंतांचे ध्यान करायला सांगितले आहे.' होय, ते खरे आहे. परंतु हे पराचे ध्यान झाले, शुभध्यान झाले. दुनियेतील इतर गोष्टींचा विचार सोडून अरहंत सिद्धांचे स्वरूप चिंतवन करत त्यांचे नामस्मरण करण्याचा उपदेश दिला जातो. परंतु हे स्वतःचे ध्यान नाही. हे करत असतांना अरहंत सिद्धांचे लक्ष सोडून जो जीव स्वतःच्या शुद्धात्म्याला जाणू लागेल त्यालाच आत्मानुभूति होईल. असे झाले तरच सिद्धांचे ध्यान कार्यकारी ठरेल.

उपयोगाची स्थिरता करण्यासाठी शास्त्रात ध्यानाचे अनेक प्रकार सांगितले आहेत. परंतु तत्त्वांचे सम्यक् स्वरूप जाणून, यथार्थ निर्णय करून, शुद्धात्म्याला जाणत राहिल्यानेच आत्मानुभूति प्रकट होते.

मुलींनो, हे भव्य जीवांनो, संसार सागराच्या किनाऱ्यापाशी येऊन आता परत माघारी फिरू नका. आत्मकल्याणाचा हा इतका

सहज, सुलभ, सुंदर मार्ग तुम्ही मोठ्या रुचीने ऐकत आलात, वाचत आलात. दुर्लभात दुर्लभ अशा सर्व गोष्टी प्राप्त झाल्या आहेत आता काही सम्यक्त्व प्राप्ति कठिण नाही. सर्व शक्तिनिशी पुरुषार्थाने सम्यक्त्वाची प्राप्ति शीघ्रातिशीघ्र करून घ्या. पुरुषार्थ करणाऱ्याला अवश्य कार्यसिद्धि होतेच.

सम्यक्त्वप्राप्तिपूर्वीच्या पाच लब्धिचे स्वरूप आपण 'करणानुयोग परिचय' मध्ये पाहिलेच होते. त्यापैकी (१) क्षयोपशमलब्धि - संज्ञी पंचेंद्रियपणा व ज्ञान तत्त्वज्ञानामध्ये लागणे हे तर तुम्हाला प्राप्त आहे. (२) विशुद्धिलब्धि अर्थात कषायांची मंदताही आहे. त्याच्याशिवाय विषय कषायांच्या इतर गोष्टी सोडून तत्त्वज्ञानामध्ये रुचि होऊ शकत नाही. (३) देशनालब्धि - देशना तर तुम्हाला मिळतच आहे. ती धारणेमध्ये - स्मरणात ठेवणे ही देशनालब्धि देखील तुम्हाला प्राप्त आहे. (४) प्रायोग्यलब्धि - जिनेन्द्र कथित उपदेश जो परंपरेने चालत आला आहे व तुम्ही जाणला आहे त्याविषयी तत्त्वनिर्णय करून त्यावर चिंतन मनन करणे हे आता तुमच्या हातात आहे. (५) करणलब्धि - सम्यक् पुरुषार्थ करून स्वसन्मुखतेद्वारे परिणामांची इतकी विशुद्धता वाढत जाते की दर्शनमोहनीय कर्माचा उपशम होतो व जीव स्वत: तत्त्वश्रद्धानी होतो. सम्यग्दर्शन व आत्मानुभूति प्रकट होते.

या पाच लब्धिंचे स्वरूप 'लब्धिसार' ग्रंथामध्ये अत्यंत विस्ताराने दिले आहे. कर्मामधील स्थित्यंतरं समजावली आहेत. या विषयावर स्वतंत्र पुस्तक लिहिण्याविषयी काही जणांचा आग्रह आहे. पाहूया काय होते ते. प्रत्येक कार्य स्वसमयीच होते व त्या त्या द्रव्यातच होते, आपण केल्याने नाही, होय ना? आपले कार्य तर आपल्या पुरुषार्थाने आपल्या द्रव्यात होते. कारण कार्य व्यवस्थेचे हे रहस्योद्घाटन समजल्याने आपली आकुलता कितीतरी कमी होते. यथार्थ तत्त्वनिर्णय करणे हाच पुरुषार्थ आहे.

तुम्हीदेखील शीघ्रातिशीघ्र सम्यक् पुरुषार्थ करून मोक्षमार्ग रूपी कार्य प्रकट कराल अशी मला आशा आहे, अशी मला खात्री आहे.

कल्याणमस्तु.
जय जिनेन्द्र.

**तुमची आई.**


ॐ